
# आमचीं विलायतला प्रथमभेट

१८५७

सौ. अनसूयाबाई कामत
बी.अे.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.



REFBK-0007798

৬৫৭৭৭
১৮।৩।৬৭
৮৩৪

৬৫৭৭৭ প্রবাস
১৮।৩।৬৭

# आमची विलायतला प्रथम भेट

लेखिका

सौ. अनसूयाबाअी कामत, बी. अे.

REFBK-0007798

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

मूल्य चार रुपये

सर्वाधिकार स्वाधीन

प्रथमावृत्ति : १९५१

प्रकाशक
ग. पां. परचुरे
प्रकाशन मन्दिर,
गोरेगांवकर चाळ, २
गिरगांव, मुंबअी ४

मुद्रक
र. अ. मोरमकर
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
३६४ ठाकुरद्वार, मुंबअी ४

मुखपृष्ठ सजावट
कु. कमलिनी कामत

# अर्पणपत्रिका

ज्यांच्यामुळें मला हा विलायतेचा
प्रवास करण्याची संधि मिळाली त्या
" स्वतः " ना
हें पुस्तक मी प्रेमपूर्वक अर्पण करतें.

— लेखिका

# प्रस्तावना

आजकाल जो तो विलायतेला जातो; जणूं काय, विलायत हिंदुस्थानचें मागील दार झालेली आहे; असें असतांना, या आमच्या भेटीची रोजनिशी छापण्याचा उपद्व्याप मी कां केला असें कांहीं लोकांना वाटण्याचा संभव आहे. याला माझें एवढेंच उत्तर आहे कीं, आम्हीं विलायतेला भेट दिली ती वीस वर्षांमागें, म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या आधीं. त्यावेळीं युरप खंडाची स्थिति वेगळी असल्यामुळें, माझे अनुभवही सध्यांपेक्षां थोडे वेगळे होते; शिवाय, माझे हे अनुभव ज्यांनीं माझ्या हस्तलेखामध्यें वाचले, त्यांना ते आवडले; म्हणून ते छापण्याचें धाडस मी करीत आहें.



आम्ही दोघें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम........................ वि: ............
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

सप्टेंबर १९३०

वर्ना व स्वतः मी या महिन्याच्या पहिल्या तारखेला ' लॉइड् ट्रिस्टी-नो 'च्या ' कॅकोव्हिया ' नांवाच्या इटॅलियन बोटीनें विलायतेला जावयास निघालों. मदन मंडळी व आणखी दोनतीन नातलग मंडळी आम्हांला निरोप देण्याकरितां बंदरावर आली होती. बोटीवरचे पहिले तीनचार दिवस बोटीच्या हालण्यामुळें मला आमच्या ' कॅबिन ' ( बोटीवरची खोली ) मध्येंच जेवणखाण करावें लागलें; कारण जरी मला वांति अशी झाली नाहीं, तरी उभें राहिलें असतां डोकें फिरूं लागे; त्यामुळें माझ्यानें जेवणाचे खोलींत जाववलें नाहीं; यापुढचा प्रवास मात्र एकंदरीनें मला सुखावह झाला.

या बोटीवरचीं जेवणें फारच उत्तम असतात, व मांसाहार न करणाऱ्याला सुद्धां खावयास इतके पदार्थ असतात कीं, त्यांनीं पूर्ण तृप्ति होते. इटॅलियन लोकांनीं तयार केलेल्या कांहीं भाज्या आमच्याच भाज्यांप्रमाणें लागत; शिवाय भात, आमटीही मिळत असे. बोटीवरचे सर्व इटॅलियन अधिकारी व नोकर उतारूंच्या सुखसोईकरितां झटणारे व हंसतमुखानें काम करणारे असल्यामुळें, प्रवासांत कोणतीही गैरसोय भासली नाहीं. ' डेक ' ( बोटीवरची वर फक्त छत लावलेली अशी मोकळी जागा ) वर मांडलेल्या लहान लहान टेबलांवर चहा पीत असतां व इतर वेळीं ' व्हायोलिन ', ' पियानो ' वगैरे वाद्यांचें वादन होत असे; रात्रीच्या जेवणानंतर पुष्कळदां सिनेमा दाखवीत असत; याशिवाय, आणखीही कांहीं करमणुकीचे प्रकार मधून मधून होत असत; कृत्रिम घोडे, जागच्याजागीं फिरणाऱ्या सायकली, जागच्याजागीं वल्हवावयाची जमिनीवरची होडी, वगैरे यंत्रें व्यायाम घेण्याकरितां मुद्दाम ठेविलेलीं होतीं. बोटीवरच्या लायब्ररींतून

उतारूंना पुस्तकें वाचावयास मिळत. मींही 'Paying Guests' ही इ. एफ्. बेन्सन्ची कादंबरी घेऊन वाचली. बोटीवर खेळावयाचे म्हणून कांहीं विशेष खेळ असत, त्यांमध्यें एकदां शर्यती होऊन जिंकणाऱ्यांना काश्मीरच्या महाराजांच्या हातून बक्षिसें देण्यांत आलीं.

गरमीचा प्रदेश सोडून बोट जेव्हां थंड प्रदेशांत गेली, तेव्हां एका सकाळीं 'सोलाहॅट्स्' (उन्हांत वापरण्याच्या टोप्या)ची स्मशानयात्रा काढण्यांत आली. एका गृहस्थानें एका बाईचा फ्रॉक नेसून आपली टोपी एखाद्या मृत मुलाप्रमाणें एका तक्क्यावर ठेवून तिच्याजवळ एक गुलाबाचें फूल ठेविलें, व गंभीर चेहरा करून तो तक्क्या हातांत घेऊन चालला; त्याच्यापुढें एकजण 'बॅगपाइप' हें वाद्य वाजवीत चालला होता व पाठीमागून इतर मंडळी चालली. कांहीं वेळानें सर्व मंडळी एका ठिकाणीं थांबली. एकानें पाद्र्याचा वेष घेतला होता व नाकाला लाल रंग लाविला होता. तो गृहस्थ पुढें होऊन त्यानें त्या मृत टोपीविषयीं हृदयद्रावक (?) भाषण केलें. त्याबरोबर खूप हंशा पिकला, व नंतर सर्वांनीं एक गाणें म्हणून ती टोपी समुद्रांत फेकून दिली; मग बाकीच्यांनीं आणखी आठ दहा टोप्या समुद्रांत टाकल्या. या सर्व प्रकाराचें कारण हें कीं इंग्लंडमध्यें या टोप्या कोणीही वापरत नसल्यामुळें, त्या तेथें निरुपयोगी होतात.

एका रात्रीं जेवणानंतर 'फॅन्सी ड्रेस् बॉल' (विलक्षण वेष धारण करून मग केलेला नाच) झाला. अनेक विलक्षण पोशाख त्यावेळीं नजरेला पडले. कोणी वर्तमानपत्रें विकणारा झाला होता, कोणा एका बाईनें नवरीचे कपडे केले होते, तर कोणी इंग्रज खलाशी झाला होता. नंतर त्यांपैकीं उत्तम ठरलेल्या सहा पोशाखांच्या माणसांना काश्मीरच्या महाराजांनीं आपल्या पदरचीं बक्षिसें दिलीं; नंतर त्यांनीं सर्वांना अल्पाहार दिला. खाण्यापिण्याचे पदार्थ टेबलावर रचून ठेविले होते, त्यांवर शोभेकरितां इटॅलियन आचाऱ्यांनीं आपल्या कर्तबगारीचे कांहीं नमुने ठेविले होते; त्यांत एक मोठा साखरेचा पांढरा शुभ्र हंस पक्षी, एक देऊळ, एक मशीद, एक वाद्य असे जिन्नस होते. मशीद व देऊळ यांच्या बाजूला माडाचीं

रंगीत झाडेंही केलीं होतीं, व त्या इमारतींच्या आंत विजेचे दिवे पेटविले होते. अशाच तऱ्हेचा एखादा शोभेचा पदार्थ रोज जेवणाचे पदार्थ ठेवण्याच्या टेबलावर आचारी करून ठेवीत असत. एकदां पक्ष्याचें घरटें व त्यांत रंगीत अंडीं, एकदां लहान घर असे निरनिराळे पदार्थ ठेविलेले आम्हीं पाहिले.

बोटीवरच्या सफरीच्या शेवटीं शेवटीं बोटीच्या कप्तानानें सर्व उतारूंना एक थाटाची मेजवानी दिली; त्यावेळीं बोटीवरचें बॅन्ड् वाजत होतें, जेवणाऱ्यांच्या टेबलांवर प्रत्येक उतारूसाठीं एक एक वस्तु बक्षीस म्हणून ठेविली होती, व जेवणाचे पदार्थ एका विशिष्ट कागदावर छापून तो कागद प्रत्येकाच्या पुढें ठेविलेला होता. खाण्याचे जिन्नस वाढण्यास आणावयाच्या बशांत मजेदार वस्तु शोभेकरितां करून ठेविल्या होत्या. या मजेदार वस्तु म्हणजे कागदाच्या मोठ्याशा केलेल्या बोटी; ( त्यांच्या धुरांड्यांतून धूरसुद्धां जातांना दाखविला होता. ) विलायतेंत आकाशांतून पडलेल्या बर्फाचे जसे मनुष्य करितात तसले लहान मनुष्य साखरेचे तयार करून, त्यांच्या हातांत लहान केरसुण्या दिलेल्या होत्या. जेवण संपत आलें होतें व शेवटचा गोड पदार्थ तेवढा यावयाचा होता; इतक्यांत एकाएकीं जेवणाच्या खोलींतलें सर्व दिवे मालवून कोणी अंधार केला; आतां आंत कोणता विलक्षण पदार्थ वाढण्याकरितां येत आहे म्हणून साहजिकच आमची सर्वांची नजर दरवाजाकडे वळली; तों वाढावयाच्या पदार्थांच्या बशा घेऊन येणारे लोक दिसले, व प्रत्येकाच्या हातांतील बशींत एक लहान दीपगृह आंत पेटलेल्या दिव्यासहित दिसलें. त्या काळोखांत त्या दिव्यांचा लाल रंग फार मजेदार दिसला. मग जेवणाच्या खोलींत पुनः उजेड करून, त्या बशांतून आणलेलें ‘ आईसक्रीम ’ सर्वांना वाढलें. जेवण संपल्यावर कप्तानाचे भाषण, उतारूंच्या वतीनें भाषण, इटॅलियन व इंग्रज लोकांचीं राष्ट्रगीतें, वगैरे होऊन हा समारंभ पार पडला.

बोटीवर आमच्या कांहीं ओळखी झाल्या; पण त्यांतल्यात्यांत आमच्या आधींच्या ओळखीचे इंग्रज गृहस्थ मि. मेकिनर्नी हे आमच्याच टेबलावर

रोज जेवायला बसत असत. त्यांच्या आनंदी वृत्तीमुळें व मजेदार बोलण्यामुळें आम्हांला पुष्कळच मोकळें वाटलें.

मुंबईहून निघाल्यापासून पांचसहा दिवसांनंतर पहिलें बंदर अरबस्तानांतील एडन हें संध्याकाळीं लागलें. एडनच्या जवळ बोट आल्यावर बोटीवरून आम्हांला पूर्वीच्या ओळखीच्या कांहीं जागा दिसल्या. ( आम्ही १६ वर्षांपूर्वीं एडनला नोकरीनिमित्त सहा महिने राहिलों होतों. ) संध्याकाळ झाल्यामुळें आम्ही बंदरांत उतरलों नाहीं; पण आम्ही मागें राहत होतों तो बंगला, निदान ती जागा दिसली.

आणखी चारपांच दिवसांनंतर आफ्रिकेंतील सुएझ हें बंदर लागलें. तें भररात्रीं आलें. या बंदरांत होणाऱ्या तपासणीसाठीं सर्व उतारूंना त्या भलत्या वेळीं बिछान्यांतून उठून वर यावें लागलें. तपासणीचा फार्स झाल्यावर आम्ही परत जाऊन निजलों. सकाळीं आम्हीं उठल्यावर बोट या बंदरांतून हालली. आतां बोट सुएझच्या कालव्यामधून जाऊं लागल्यामुळें, दोन्ही बाजूंचे किनारे अगदीं जवळ दिसूं लागले. सुएझला किनाऱ्यालगत असलेल्या झाडांखालीं माणसें हवा खात बसलेलीं दिसलीं व इमारती दिसल्या. या दिवसाचा प्रवास फार मनोरंजक झाला. थोडथोड्या अंतरावर कालव्याच्या एका बाजूला स्टेशनें केलेलीं आहेत, तेथें कालव्यासंबंधीं सर्व व्यवस्था पाहणाऱ्या अधिकारी लोकांचीं घरें व लहानशा हिरव्यागार झाडांच्या वाड्या पाहून मौज वाटे. कधीं कधीं येथली मंडळी बोटीवरच्या मंडळीकडे पाहून हात हालवीत व बोटीवरची मंडळी त्यांच्याकडे पाहून तसेंच करीत. उलट दिशेनें आमच्यासारख्याच मोठ्या आगबोटी येऊं लागल्या, कीं कधीं कधीं त्यांना वाट देण्याकरितां आमच्या बोटीला थोडा वेळ नांगर टाकून स्वस्थ राहावें लागे. 'एल् कंटारा' नांवाच्या एका स्टेशनाजवळ आम्हांला अशा तऱ्हेनें बराच वेळ रखडावें लागलें. पण किनाऱ्यावरचा देखावा रम्य असल्यामुळें कंटाळा आला नाहीं. सुएझच्या कालव्यांतून पाण्याच्या मार्गानें आमची व इतर बोटी चालल्या होत्या. पलीकडे इजिप्तच्या किनाऱ्याच्या रस्त्यावरून मोटारी जात होत्या; त्यांतलीं

माणसें आम्हांला दिसत, इतका जवळ तो रस्ता होता. पलीकडे कांहीं अंतरावर आगगाडीचा रस्ता होता त्यावरून आगगाडीही जातांना एकदोनदां दिसली. शिवाय, किनाऱ्यावरील रस्त्यावरून सायकली, गाढवस्वार ( त्या देशांत गाढवांचा घोड्यांप्रमाणें बसावयास उपयोग करतात ) वगैरे जातांना दिसले. मुलें खेळतांना, व अर्धे तोंड झांकून घेतलेल्या या देशांतील मुसलमानी बायका किनाऱ्यावर फिरतांना दिसल्या. दुसऱ्या बाजूच्या म्हणजे अरबस्तानच्या किनाऱ्याजवळही माणसें लहान होड्यांतून वगैरे जातांना दिसलीं. अशा तऱ्हेनें हा सबंध दिवस किनाऱ्यावरची हालचाल पाहण्यांत मजेंत निघून जाऊन, रात्रीं दहा वाजण्याच्या सुमाराला आम्हीं ऑफ्रिकेंतील पोर्ट सय्यद बंदरांत आलों.

या बंदरांत लहान होड्या, मोठ्या आगबोटी, वगैरे असल्यामुळें देखावा मोठा गजबजलेला दिसत होता कांहीं वेळानें पलीकडच्या किनाऱ्याच्या बाजूनें एक तराफ्याचा पूल एखाद्या भयंकर मोठ्या सापाप्रमाणे नागमोडी हालचाल करीत येऊन हळूहळू आमच्या आगबोटीच्या बाहेरच्या जिन्याला येऊन मिळाला. या तरत्या पुलावरून आम्हीं पोर्ट सय्यदला गेलों, एका मोठ्या दुकानांत थोडीशीं खरेदी केली, व मग रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या फरसबंदी ओसरीवर लिंबाचें सरबत पीत बसलों. रस्त्यांवर जेथें तेथें दिव्यांचा लखलखाट होता. ठिकठिकाणीं असल्या ओसऱ्यांवर बसून लोक पत्ते खेळत किंवा खातपीत बसलेले होते. जागोजागीं वाद्यांचें वादन सुरू होतें. आजूबाजूला नानाप्रकारच्या वस्तु घेऊन फेरीवाले फिरत होते, व आमच्यासारख्या मंडळीला आपला माल खरेदी करण्याचा आग्रह करीत होते. तेथून परत येतांना किनाऱ्यावर असलेला लेसेप्स् या फ्रेंच एंजिनिअरचा अतिशय मोठा पुतळा आम्हीं पाहिला. रात्र असल्यामुळें पुतळा अतिशय मोठा असल्याचें तेवढें लक्ष्यांत आलें, बाकी कांहीं दिसलें नाहीं. या एंजिनिअरनें सुएझचा कालवा बांधला होता.

दुसऱ्या दिवशीं आम्हीं ग्रीस देशाच्या आसपासचीं बेटें, क्रीट् बेट, कॉरफ्यू बेट या अजूनपर्यंत फक्त भूगोलाच्या द्वारें माहीत असलेल्या

ठिकाणांच्या अगदीं जवळून गेलों; इतक्या जवळून कीं तेथले डोंगर, झाडें, वगैरे आम्हांला दिसलींच; पण मधून कांहीं घरेंही अगदीं दूर अशीं दिसलीं; कॅरफ्यू बेटांतील तर घरें, रस्ते व त्यांवरील गाड्यासुद्धां दिसल्या. रात्रीं आम्हीं ब्रिंडिसीला पोंचलों.

ब्रिंडिसी बंदर इटाली देशांत आहे. बोट अगदीं धक्क्याला लागली. व आम्हीं जरा किनाऱ्यावर फिरून आलों. येथपासून सर्व साहेबलोकांचें खंड सुरू झाल्यामुळें, रस्त्यांत त्याच लोकांचे थवे दिसत होते, व ती मंडळी विशेषतः माझ्याकडे आश्चर्यानें टक लावून पाहत होती. येथें गांवांतील सर्व रस्ते फरसबंदी असल्याचें पहिल्यानें माझ्या लक्ष्यांत आलें. व ते पाहून नवल वाटलें; कारण हिंदुस्थानांत मोठमोठ्या शहरांतील मुख्य रस्तेसुद्धां फरसबंदी नसतात.

पुढल्या रात्रीं जोराचा वारा सुटला व विजांचा लखलखाटही सुरू झाला, व त्यामुळें मला भीति वाटूं लागली; पण वादळ थोडक्यांतच आवरलें, व सकाळीं आम्हीं इटाली देशांतील व्हेनिस बंदरांत उतरलों.

व्हेनिस येथें आम्हीं 'मार्कोनी होटेल' नांवाच्या एका लहानशा होटेलमध्यें उतरलों. तेथें आम्हांला 'गँडोला' नांवाच्या लहानशा बोटींत बसून जावें लागलें. व्हेनिस हें शहर एक अजबच आहे. येथें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जावयाचें असल्यास एक पायांनीं तरी जावें, नाहींतर साध्या होड्यांनीं किंवा वाफेच्या बोटीनें जावें. असें असण्याचें कारण हें कीं शहर लहान लहान बेटांवर बांधलें गेलें आहे; त्यामुळें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यास या अनेक बेटांमध्यें असणाऱ्या कालव्यांतून होड्यांनीं जावें लागतें; नाहींतर, या कालव्यावर बांधलेल्या अनेक लहान पुलांचा उपयोग करून पायांनीं जावें लागतें. अर्थात, येथें घोड्यांच्या गाड्या किंवा मोटारगाड्या बिलकुल दिसत नाहींत.

युरोपखंडांतील घरांत राहण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग असल्यामुळें, या होटेलची रचना, तें सजवण्याची तऱ्हा, वगैरे पाहून मनाला फार बरें वाटलें. थोड्याशा पायऱ्या चढून गेलों कीं एक कृत्रिम फुलें ठेवून सुशोभित

केलेली बसावयाची खोली, पलीकडे आमची निजावयाची खोली, तिला लागूनच आंघोळीची, वगैरे व्यवस्था; घरांतच असलेल्या लहानशा बोळासारख्या जागेंतून जाऊन पुनः कांहीं पायऱ्या उतरल्या कीं जेवावयाची खोली; अशा तऱ्हेची गंमतीची रचना या होटेलांत होती. खोल्यांच्या भिंतींना रंग देण्याच्या ऐवजीं त्यांवर सुरेख रंगाच्या पानांफुलांची वेलबुट्टी असलेले कागद चिटकवलेले, खोल्यांतून व त्यांमधील पायवाटांतून जिकडेतिकडे गालिचे अंथरलेले, जेवणाच्या लहान टेबलांवरसुद्धां सुरेख वेलबुट्टीदार कपडे घातलेले व कृत्रिम फुलें ठेविलेलीं; ही सर्व व्यवस्था पाहून मनाला आल्हाद वाटल्यावांचून राहिला नाहीं.

आम्ही दोन दिवस राहून व्हेनिसमधलीं पाहण्यालायक सर्व ठिकाणें पाहून घेतलीं. व तीं पाहण्यासाठीं शहरांतील विचित्र रस्त्यांवरून पुष्कळ हिंडलों. येथें सर्व पायवाटा फरसबंदी आहेत. शहरांत फिरतांना मधूनच लहानशा बोगद्यासारख्या जागेंतून जावें लागतें व मधूनच चारही बाजूंनीं इमारती असलेल्या अतिशय मोठ्या चौकांत येऊन आपण दाखल होतों. एखादी लहान पायवाट कालव्याच्या अगदीं बाजूला असली, तर तिच्यांत कालव्याचें पाणी येऊन ती भिजलेली दिसे; व कांहीं इमारतींच्या खालच्या मजल्यांत समुद्राच्या भरतीच्या वेळीं पाणी भरत असे.

व्हेनिस शहरांतील सर्वांत मोठ्या कालव्याचें नांव 'ग्रॅन्ड कनाल्' असें आहे. प्रसिद्ध इंग्लिश कवि शेक्स्पिअर याच्या नाटकांत उल्लेख केलेला 'रिआल्टो ब्रिज' नांवाचा पूल याच कालव्यावर असून, तो आमच्या होटेलाच्या अगदीं जवळ होता. त्याच्यावरून आम्ही पुष्कळदां गेलों, आलों. या पुलाचा आकार छप्पर असलेल्या कमानीसारखा असून, त्यावर सारख्या पायऱ्या आहेत; व पायऱ्यांच्या दुतर्फा लहान लहान दुकानें आहेत. येथें कपडालत्ता, चामड्याचें सामान व आणखी पुष्कळ तऱ्हेचा माल विकत मिळतो.

येथलें प्रसिद्ध 'सेंट मार्क' चें देऊळ व दुसरें 'सेंट फ्रारी' चें देऊळ हीं आम्हीं पाहिलीं. 'सेंट फ्रारी' चें देऊळ पाहतांना आमचा दुभाष्या

बरोबर नसल्यामुळें देवळांतील विशेष पाहण्यासारख्या गोष्टी कोणत्या, वगैरे नीट समजलें नाहीं; पण दोनतीन विशेष गोष्टी येथें आढळल्या. 'बेलिनी' नांवाच्या प्रसिद्ध जुन्या इटॅलिअन चित्रकारानें काढलेलें मेरीनें येशूला मांडीवर घेतलेलें असें चित्र येथें आहे. तसेंच 'टिशिअन' नांवाचा एक फार जुना चित्रकार व शिल्पकार इटलींत होऊन गेला, त्यानें कोरलेलें एक पांढऱ्या संगमरवरी दगडाचें चित्र येथें आहे. याशिवाय येथें एक पांढऱ्या दगडाचा खांब पाहिला. या दगडाला इंग्रजींत 'ॲलाबॅस्टर्' दगड म्हणतात. हा दगड इतका पारदर्शक होता कीं, खांबाच्या पाठीमागें धरलेल्या दिव्याचा उजेड दगडामधून आम्हांला दिसला.

'सेंट मार्क'च्या देवळामध्यें पाहण्यासारखें काम म्हणजे तेथें असलेल्या चित्रांचें. हीं चित्रें रंगांनीं काढलेलीं नाहींत; तर, अनेक रंगांच्या कांचेचे अगदीं लहान लहान तुकडे एकमेकांत नीट बसवून हीं मोठमोठीं चित्रें तयार केलेलीं आहेत. या कामाला 'मोझेक्' हें नांव आहे. हीं चित्रे तयार करून आज शेंकडों वर्षे झालीं आहेत, तरी चित्रें जशींच्या तशीं कायम आहेत; व विशेष गोष्ट ही कीं चित्रें कांचीच्या तुकड्यांसारख्या बोजड वस्तूंपासून तयार केलेलीं असूनही, चित्रांतील मनुष्यांच्या तोंडावरील भाव, वगैरे अगदीं स्पष्ट तऱ्हेनें दिसत आहेत. यांत कांहीं सोनेरी रंगाचे तुकडे आहेत. ते आज इतक्या वर्षांनंतर सुद्धां छान लकाकत आहेत. देवळामध्यें सोन्यानें मढविलेलें व वर कलाकुसरीचें काम केलेलें असें, 'सेंट मार्क'चें थडगें आहे.

जुन्या काळीं जेव्हां 'डोजे' नांवाच्या राजाचें राज्य व्हेनिसवर चालत असे, तेव्हां तो 'डोजे' ज्या राजवाड्यांत राहत असे तो राजवाडा आम्हीं पाहिला. तो पाहतां पाहतां पाय दमून आले इतका मोठा तो आहे; व प्रसिद्ध माणसांचे मोठमोठे पुतळे आणि प्रसिद्ध जुन्या इटॅलिअन चित्रकारांनीं काढलेलीं चित्रें यांमुळे तो पाहण्यालायक झाला आहे. हीं चित्रें राजवाड्यांतील मोठमोठ्या दालनांच्या छतांवर बसविलेलीं आहेत, व त्या चित्रांच्या सभोंवतीं नक्षीदार सोनेरी काम केलेलें आहे. या राजवाड्याच्या

अगदीं शेजारींच त्या वेळचा तुरुंग आहे, व या दोन इमारतींमध्यें एक लहान कालवा असल्यामुळें त्या इमारती एका लहानशा, पण सर्व बाजूंनीं बंद अशा पुलानें जोडलेल्या आहेत. या पुलाला 'ब्रिज् ऑफ् साइज्' (हुंदक्यांचा पूल) असें नांव पडलेलें आहे; कारण जुन्या काळीं कैदी लोकांवरचे खटले राजवाड्याच्या एका दालनांत चालत असत, व कैद्याला शिक्षा होऊन तो त्या पुलावरून एकदां पलीकडच्या तुरुंगांत गेला कीं, त्याच्या जन्मभराच्या हालांस सुरुवात होत असे. आम्हीं या पुलावरून पलीकडे जाऊन त्या तुरुंगाच्या लहान, अंधाऱ्या, हवा नसलेल्या खोल्या पाहिल्या. एका कोठडींत पूर्वीसारखी एक दगडाची खाटही पाहिली. असल्या खाटेवर कैद्याला निजावें लागे. बिचारे किती निरपराधी मनुष्यप्राणी त्या ठिकाणाहून निजधामाला गेले असतील, असा उदासवाणा विचार त्या भयंकर कोठड्या पाहून मनांत आल्यावांचून राहत नाहीं.

वर पाहिलेल्या ठिकाणांशिवाय आणखी व्हेनिसमधलें 'म्युझिअम्' (पदार्थसंग्रहालय) व 'अकॅडमी' (चित्रसंग्रहालय) हीं ठिकाणें आम्हीं पाहिलीं; पण हीं नुसतीं ओझरतीं पाहिलीं; कारण आम्हांला वेळ अगदीं थोडा व संग्रह अतिशय मोठे अशी स्थिति झाली होती. या दोन्ही ठिकाणीं अनुक्रमें जुन्या महत्त्वाच्या पदार्थांचा व जुन्या प्रसिद्ध चित्रकारांच्या उत्तमोत्तम चित्रांचा संग्रह केलेला आहे.

व्हेनिस हें शहर कांचीच्या सामानाच्या कारखान्याबद्दल प्रसिद्ध आहे. हा धंदा या शहरांत आज कित्येक शतकें चालू आहे, व हें सामान तयार करण्याची पद्धत इतर शहरांतील पद्धतीपेक्षां फार निराळी आहे. इतर ठिकाणीं इच्छित वस्तूंचा सांचा तयार करून, व मग त्यांत कांचीचा रस ओतून जिन्नस तयार करतात; पण व्हेनिसमध्यें कांचीचा रस एका लांब नळकांड्याच्या एका टोंकावर थोडा घेऊन व नळकांडें फुंकून त्या रसाला आकार आणितात; आणि मग अगदीं थोड्या साध्या अवजारांनीं त्याला पुरता आकार देतात; मग आणखी रस घेऊन व तो त्या तयार झालेल्या भागाला चिकटवून त्या वस्तूचा पुढचा भाग तयार करतात. याप्रमाणें

प्रत्येक वस्तूचा प्रत्येक भाग नळकांडें फुंकून व हातकामानें केला जातो. अर्थात् असल्या पद्धतीनें केलेलें कांचीचें सामान फार महाग असतें. कांचीच्या सामानाचे मोठमोठे कारखाने येथें आहेत. सॅल्व्हिअॅटीच्या दुकानांत गेलों असतां, आम्हांला त्यांनीं ही सर्व कृति दाखविली. बांधून काढलेल्या एका लहानशा भट्टींत भयंकर जाळ पेटलेला होता, व त्याच्यामध्यें एका उथळ भांड्यांत कांचीचा रस होता. त्या रसाची तेथल्या एका कारागिरानें माझ्यासमोर एक फुलदाणी ('फ्लावर पॉट्') तयार केली, व मग ती मला बक्षिसादाखल तेथल्या माणसानें दिली. हें दुकान रंगीबेरंगी व नाजूक अशा कांचीच्या लहानमोठ्या वस्तूंनीं नुसतें खचून भरलें होतें. दालनेंच्या दालनें असल्या मालानें भरलेलीं पाहून आमचे डोळे दिपले.

'सेंट मार्क'च्या देवळाच्या समोर एक अतिशय मोठा फरसबंदी चौक आहे. या चौकांत सर्व दिवसभर अतिशय माणसाळलेल्या कबुतरांचे थवेच्याथवे स्वैरपणानें फिरत असतात. प्रवासी लोक तेथेंच मक्याचे दाणे किंवा दुसरें धान्य खरेदी करून त्या कबुतरांना खावयास घालतात, व तीं कबुतरें घाबरल्याशिवाय तें धान्य माणसांच्या हातांतून, ओठांवरून किंवा कोठूनही उचलून खातात. या जंगी चौकाच्या तिन्ही बाजूंना अनेक निरनिराळ्या मालाचीं व खाण्यापिण्याचीं दुकानें आहेत, व दुकानांच्या समोर लांबच लांब छपरांनीं आच्छादिलेल्या ओसऱ्या बांधलेल्या आहेत; त्यामुळें स्वस्थपणें या ओसऱ्यांमधून फिरत फिरत कांचीच्या तवदानापलीकडे असलेला माल पाहतां येतो; व थकल्यानंतर मधल्या फरसबंदी चौकांत बसून मोकळ्या हवेंत चहा, वगैरे घेतां येतो. संध्याकाळीं असा उघड्यावर चहा घेण्यांत मौज वाटते; व येथें अशी सरसहा रीत असल्यामुळें, कोणी आपणास चहा घेतांना पाहील असा संकोचही मनाला वाटत नाहीं. चहा पितांना त्या दुकानांत वाद्यांचें वादन चाललेलें असतें. आम्ही या चौकांतील दुकानांत थोडीशी खरेदी केली, व तेथें मोकळ्यावर चहाही घेतला. एका दुकानांत वादन चाललें असतां तेथें बसलेल्या दोन बायकांनीं

सांगितल्यावरून कीं काय, वाद्य वाजविणाऱ्यानें एकदोन इंग्रजी गाणीं वाजविलीं, व तीं ऐकून त्या म्हाताऱ्या बायका माना डोलवूं लागल्या; त्यावरून त्या इंग्रज बायका असाव्यात असा आम्हीं तर्क केला. त्या परक्या देशांत आपल्या देशचीं गाणीं ऐकून त्यांना अतिशय आनंद झाला असावा हें सहजासहजीं निघणारें अनुमान होतें.

आमच्या बोटीनें काश्मीरचे महाराजही व्हेनिसला आले होते. त्यांनीं आपल्या वाढदिवसानिमित्त ग्रँड् होटेल्मध्यें मेजवानी दिली तिला आम्ही गेलों होतों. ज्याप्रमाणे बोटीवरल्या इटॅलिअन स्वयंपाक्यांनीं कप्तानाच्या मेजवानीच्या दिवशीं व इतर वेळींही जेवणाचे पदार्थ वाढतांना ते अनेक प्रकारच्या कलाकुसरीच्या कामांनीं शोभिवंत केले होते, त्याचप्रमाणें या जेवणाचे वेळींही तेथल्या स्वयंपाक्यांची कुशलता आमच्या दृष्टीला पडली.

या शहरांत असतांना मी कोठेंही गेलें तरी लोक माझ्याकडे टक लावून पाहत; कारण मी कोणी परदेशाची बाई आहे हें त्यांना पोषाखावरून लागलेच कळे. विलायतेला जाणाऱ्या इतर दक्षिणी बायकांप्रमाणें मीं कासे शिवायचा पोषाख एक दिवसही न करतां माझा दक्षिणी पोशाखच कायम ठेविला; आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं हा पोशाख कासेशिवायच्या पोशाखा-पेक्षां जास्त चांगला दिसतो असें एकदोघींनीं मला बोलून दाखविलें. लंडनला थंडीचा कोट विकत घेईपर्यंत बाहेर जातांना मी लुगड्यावर आमच्या पद्धतीप्रमाणें शालही पांघरीत होतें.

## तारीख १८ सप्टेंबर

आम्ही दुपारच्या गाडीनें स्वित्झरलंड देशांतील लोझान् गांवीं जाण्यास निघालों. त्यासाठीं आमच्या होटेलामधून स्टेशनावर जाण्यासाठीं आम्हांला 'गॅंडोलां'त बसावें लागलें. वाटेंत आम्हांला कांहीं प्रसिद्ध इमारती दिसल्या. स्टेशनावर पोंचल्यानंतर तेथल्या गर्दीच्या मध्यभागीं मी उभी असतांना, एक गोरी बाई माझ्याकडे आली व तिनें मला नमस्कार केला; तोंडानें ' नमस्कार ' असें ती म्हणाली. मग मला कळलें कीं ती अमेरिकन

बाई असून, तिला मी हिंदु आहे हें समजलें, व आमच्यांत नमस्कार करण्याची पद्धत आहे हें ठाऊक असल्यामुळें तिनें मला नमस्कार केला.

आगगाडींत बसल्यावर या युरोपखंडांतील पहिल्या आगगाडीविषयीं माझें कांहीं विशेष चांगलें मत झालें नाहीं. आम्ही पहिल्या वर्गाच्या डब्यांत होतों; पण हा डबा हिंदुस्थानांतील पहिल्या वर्गाच्या डब्यापेक्षां मला पुष्कळ कमी दर्जाचा वाटला. समोरासमोर गाद्यांचीं दोन बाकें व वर फक्त सामानाकरितां जागा; यांशिवाय आराम खुर्ची, टेबल किंवा पृथक मोरीसुद्धां या डब्याला नव्हती. आपल्या देशांतील पहिल्या वर्गाच्या डब्यांत या सर्व सोई असतात. येथें कितीशा डब्यांना मिळून एक मोरीची खोली असते व तेथें जाण्यास लांबचलांब अरुंद गॅलरींतून जावें लागतें. इतकें करूनही, ती खोली जेव्हां नजरेस पडते तेव्हां तिची स्थिति पाहून मनाला जरा किळसच येते. असो!

आगगाडींतून देखावा मात्र छान दिसत होता. लहान लहान बागांतून दिसणारीं फुलें व भाजीपाला, मक्याचीं शेतें, नासपातीं (पेअर) फळांचीं झाडें, द्राक्षांचे वेल, मधूनमधून दिसणारे डोंगर व त्यांवर वसलेलीं लहानलहान खेडीं, हा देखावा पाहून मनाला आल्हाद झाला. शिवाय, प्रसिद्ध आंग्ल कवि शेक्सपिअर यान्या नाटकांत ज्यांचा उल्लेख केलेला आहे, अशीं 'पॅडुआ, व्हेरोना,' वगैरे शहरांचीं स्टेशनें प्रत्यक्ष पाहूनही आनंद वाटला.

मिलान् या शहरीं आम्हांला गाडी बदलावी लागली; व दोन गाड्यांमध्यें ताशा दोन तासांचें अंतर असल्यामुळें, आम्ही त्या वेळांत गांवांत जाऊन येथलें 'डुओमो' नांवाचें अतिशय प्रसिद्ध जुनें देऊळ पाहिलें. हें देऊळ दगडांचें बांधलेलें असून, यावरील असंख्य मनोरे व अतिशय बारीक खोदीवकाम वाखाणण्यासारखें आहे. या देवळाची आंतली बाजूसुद्धां अतिशय प्रेक्षणीय आहे. एखाद्या भव्य इमारतीला जेवढे मोठे दरवाजे असतात, तेवढ्या आकाराच्या अनेक खिडक्या या देवळाला असून, त्यांच्या कांचीच्या तावदानांत अतिशय उत्तम रंगीत चित्रें आंत रंग

भिनवून तयार केलेलीं आहेत. या चित्रांत 'बायबल' या ख्रिस्ती धर्मग्रंथांतील अनेक प्रसंग दाखविलेले आहेत. कांचींतून येणाऱ्या सूर्यप्रकाशामुळें हीं रंगीत चित्रे फारच खुलून दिसतात.

स्टेशनावर परत येऊन दुसऱ्या गाडींत बसावयाचे वेळीं जरा आमची धांदल झाली, कारण कोठली गाडी कोठल्या बाजूला जाते ही माहिती खुणांनीं विचारावी लागली. तेथें इंग्रजी भाषा जाणणारा कोणी भेटेना. एका गाडींत बसलों तर खरीं! पण मन जरा साशंक होतें व त्यामुळें स्वतः जरा अस्वस्थ झालें. ते बनीला कांहीं माहिती पुस्तकांत पहावयास सांगूं लागले, व सांगतांना 'डॉमोडॉसोला' या गांवाला चुकून 'डॉमोडोसा' म्हणत होते. तें ऐकून बनी हंसायचा व 'स्वतः'ची अस्वस्थता जास्त वाढवयाची. विचारा बनी! त्याला त्या गभीर प्रसंगींसुद्धां तो विलक्षण उच्चार ऐकून हंसूं येत होतें. शेवटीं आमची गाडी तीच होती अशी एकदांची आमची खात्री झाली! पण मग 'स्वतः'नां दुसऱ्या गोष्टीची भीति वाटूं लागली. या प्रवासांत रात्रीं दोन ठिकाणीं आमचे 'पासपोर्ट' (प्रवासाचे परवाने) व सामान तपासलें जाणार होतें. सामान तपासावयाचें तें जकात घेण्यासारखें कांहीं सामान आमच्याकडे आहे कीं नाहीं हें पाहाण्याकरितां; पण एक तर, जकातवाल्या कामगारांची भाषा आम्हांला येत नव्हती; व दुसरी गोष्ट ही कीं सर्व सामान वरून खालीं काढून व पेट्या उघडून सर्व जिन्नस दाखवावयाचे, म्हणजे एक मोठें कटकटीचें काम झालें असतें; पण ही भीति पुढें निष्कारण ठरली; कारण पेट्या वगैरे उघडावयास त्यांनीं आम्हांला सांगितलें नाहीं; व पासांचीही कांहीं भानगड झाली नाहीं.

संध्याकाळीं लेक मॅजिओरी नांवाचें इटली देशांतील एक प्रसिद्ध गोड्या पाण्याचें सरोवर नजरेला पडलें. हें सरोवर इतकें मोठें आहे कीं मला वाटतें आगगाडी यांच्या बाजूबाजूनें सारखी अर्धा तास चालली होती. मध्येंमध्यें सरोवराच्या कांठीं लहानलहान गांवें होतीं तेथें आगगाडी थांबे. सरोवराच्या पलीकडच्या बाजूला टेकड्या असून, त्यांच्या पायथ्याशीं सुद्धां खेडीं होतीं. सरोवरांत असलेल्या लहान लहान बेटांवर सुद्धां कांहीं खेडीं

वसलेलीं होतीं. जेथें तेथें टेकड्यांच्या उतारांवर द्राक्षांचे मळे दिसत होते. असा हा देखावा त्या संध्याकाळच्या शांत वेळीं फार रमणीय वाटला. आणखी जरा संध्याकाळ झाल्यावर वर वर्णिलेल्या सर्व खेड्यांत विजेचे दिवे लखलखूं लगले. या देशांत खेडयापाडयांतही विजेचे दिवे दिसतात, आणि आमच्या देशांत मोठ्या शहरांतही वीज दिसून येत नाहीं हा खेददायक विरोध त्यावेळीं मनांत आल्याशिवाय राहिला नहीं.

'सिप्लन् टनेल्' नांवाचा एक जगांतील अतिशय लांब, आश्चर्यकारक व प्रसिद्ध बोगदा याच प्रवासांत आम्हांला लागला. बोगद्यांत अंधारापलीकडे आम्हांला कांहींच दिसलें नाहीं; पण ती विलायतची अतिशय वेगानें जाणारी गाडी बोगद्यांतून बाहेर निघावयास वीसएक मिनिटें लागलीं, हें पाहून तो बोगदा केवढा लांब असला पाहिजे याची आम्हांला साधारण कल्पना आली.

रात्रीं साडेनवाच्या सुमाराला 'व्हेव्हे' स्टेशनावर आगगाडी उभी असतांना स्वतः कांचीच्या तावदानांतून बाहेर स्टेशनाच्या प्लॅट्फॉर्मकडे पाहत होते; इतक्यांत एक इंग्लिश् बाई तावदानासमोर येऊन व स्वतःचें नांव घेऊन 'आम्हीं येथें राहतों' अशा अर्थाचें एक वाक्य बोलली व दुसऱ्या क्षणांत तेथून नाहींशी झाली. ती बाई दुसरी कोणी नसून त्या हिंदुस्थानांत आमच्या अतिशय ओळखीच्या झालेल्या 'मिसेस् जॉली' या होत्या. त्या इंग्लंडमध्यें कोठेंतरी असल्याचें आम्हांला हिंदुस्थानांतून निघण्याचे वेळीं माहीत होतें; पण त्या 'स्वित्झरलंड' देशांतील एका अगदीं लहानशा स्टेशनावर अशा अचानक रीतीनें दिसतील ही कल्पना स्वप्नींही नसल्यामुळें आम्हांला फार आश्चर्य वाटलें. पण त्या एका क्षणांत तेथून निघून गेल्यामुळें, आम्हांला या गोष्टीचा पुढें कांहींच उलगडा करून घेतां आला नाहीं. थोडया वेळानें आम्ही 'लोसान्'ला पोंचलों आणि भाडयाच्या मोटरमधून 'होटेल द ला पे' ( Hotel de la paix ) नांवाच्या एका होटेलमध्यें जाऊन उतरलों. हें होटेल फार छान होतें, व आम्हांला दिलेल्या खोलींत दोन पलंग, कोच, खुर्च्या, लिहावयाचें टेबल, आरशाचें टेबल, कपडे ठेवण्याकरितां कपाट, वगैरे सामान भरपूर असून, शिवाय

आंघोळीकरितां, वगैरे एक खाजगी खोलीही आम्हांला मिळाली. या खोलींत गरम व थंड पाण्याचे नळ असल्यामुळें, हें एक लहानसें घरच होतें म्हटलें तरी चालेल. बनीला एक निराळीच खोली दिली होती.

## तारीख १९ सप्टेंबर

हॉटेलमधून लेमन सरोवराचा देखावा दिसत होता. लोझान गांव उंच-सखल जमिनीवर वसला असल्यामुळें रस्ते सुद्धां उंचसखल आहेत; पण ते फरसबंदी असून, फार स्वच्छ वाटले. आपल्यासारखे कच्चे रस्ते येथें दिसले नाहींत. आम्ही गांवांतून फिरलों व कांहीं दुकानेंही पाहिलीं. हाडांचीं व हस्तिदंती सुंदर लहान फुलें 'ब्रोच' सारखीं वापरण्यासाठीं येथें तयार करतात, व त्यांना खऱ्या फुलांप्रमाणें रंगही देतात. तसेंच, अनेक तऱ्हांच्या हातांनीं केलेल्या लाकडाच्या बाहुल्या व लहान लहान घरेंही तयार करतात. निजावयाच्या खोलीची आंतल्या सामानासकट लहानशी प्रतिकृति लाकडाची तयार केलेली आम्हीं पाहिली. त्यांत असलेला चिमुकला दिवा खरा पेटवितां येत असे. दुकानांत वस्तु पाहत असतांना शहरावरून 'झेपलिन्' नांवाचें जर्मन विमान उडत असल्याची बातमी कळल्यामुळें आम्हीं बाहेर जाऊन तें पाहिलें. तें ॲल्युमिनिअम् या धातूप्रमाणें आकाशांत लकाकतांना आम्हांला दिसलें. परकी भाषेचा बाऊ वाटून गिऱ्हाईक दुकानांत येण्यास एखादे वेळेस कांकू करील हें जाणून, कांहीं दुकानांवर "We Speak English" (आम्हांला इंग्रजी भाषा येते) अशा तऱ्हेची मध्येंच एखादी पाटी लावलेली आढळत असे.

येथें 'फ्युनिक्यूलर रेल्वे' नांवाची आगगाडी आहे. ती विजेच्या तारेच्या सहाय्यानें डोंगराच्या चढणीवर ओढून घेतली जाते. तसल्या आगगाडींत बसून आम्ही जवळच असलेल्या उशी गांवांत गेलों. जातांना जेथें तेथें फुलें दिसत होतीं. येथें पोंचल्यावर आम्ही अगदीं 'लेमन' सरोवरच्या कांठावर आलों. येथें सुंदर बागा होत्या व त्यांत अनेक

सुंदर फुलांचे वाफे होते. एक लहानशी आगबोट सरोवराच्या कांठावरील खेड्यांपाड्यांत उतारूंना नेण्याकरितां तयार होती; शिवाय, सरोवरांत सहल करण्याकरितां लहानलहान होड्या एका बाजूला रांगेनें लाविलेल्या होत्या. बागेंतील बांकांवर ऊन खाण्याकरितां बायका बसलेल्या होत्या व मुलें बागडत होतीं.

दुपारीं 'ओल्ड इंडिआ' (Old India) नांवाच्या एका मोठ्या दुकानांत जेवून, नंतर आम्हीं लोझानमधलें मोठें वार्षिक प्रदर्शन पाहावयास गेलों. स्वित्झरलंड देशामध्यें होणाऱ्या सर्व उद्योगधंद्यांचें हें प्रदर्शन होतें. त्यांतल्यात्यांत फुलांचें प्रदर्शन फारच वाखाणण्या-सारखें होतें. प्रदर्शन इमारतींच्या मध्यभागीं असलेल्या मोठ्या चौकामध्यें उत्तम फुलांनीं सुशोभित असे अनेक वाफे होते. ते पाहून डोळ्यांना फार सुख झालेंच; पण त्याशिवाय, उत्तमोत्तम रंगांचीं, मोठमोठीं उत्कृष्ट फुलें आंतील दालनांत होतीं तीं पाहून फार विस्मय वाटला.

येथें एका ठिकाणीं विजेच्या दिव्यांनीं माणसांवर उजेड पाडून त्यांचे चेहरे काढीत होते. माझा व वनीचा मिळून जोडचेहरा आम्हीं काढून घेतला.

प्रदर्शन पाहावयास आलेल्या लोकांना माझा लुगड्याचा पोशाख व वरून पांघरलेली शाल या पेहरावाचें इतकें आश्चर्य वाटत होतें कीं, प्रदर्शनांतील वस्तु पाहावयाचे बदलीं ते किती किती वेळ माझ्याकडे टक लावून बघत होते.

संध्याकाळीं ट्रॅममध्यें बसून आम्ही कांहीं अंतरावर असलेलें शेय्यी रोसी-आझ् (Chailly Rosiaz) हें खेडेंगांव पाहावयास गेलों. तेथें जातां-जातां पुढला रस्ता शांत व आजूबाजूच्या बागबगिच्यांनीं आणि झाडांझुडपांमुळें अतिशय रम्य वाटला. ट्रॅममधून उतरून आम्ही आजूबाजूला थोडीं फिरलों. सरोवराचा थोडा भाग दृष्टीस पडत होता, त्याच्या कांठीं असलेल्या टेकडी-वजा उंचसखल जमिनीवर द्राक्षांचे मळे वगैरे दिसत होते, व बाहेरून नीट-नेटकीं व सुंदर दिसणारीं, पण खेळांतील घरकुलाप्रमाणें भासणारीं लहान



सेंट् मार्कचें देऊळ–व्हेनिस्  [पृ. ७



रिआल्टो पूल–व्हेनिस्  [पृ. ७

लहान खेडेगांवच्या लोकांचीं घरें मधूनमधून नजरेला पडत होतीं कोठें फुलें, तर कोठें झाडांवर लोंवणाऱ्या नासपातीं ( Pears ) या फळांचे घोस पाहून मनाला फारच आनंद झाला; या शांत आणि रम्य ठिकाणीं नेहमींचें राहावयास मिळावें अशा विचार क्षणभर मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं.

## तारीख २० सप्टेंबर

आकाश अभ्राच्छादित असून पाऊस पडूं लागल्यामुळें आम्ही कोठें बाहेर जाऊं शकलों नाहीं; मात्र, चहा घ्यावयास दुपारीं बाहेर पडलों व एका लहानशा रस्त्यांतील एका साध्या, एकांत पण स्वच्छ अशा दुकानांत गेलों. या गांवीं चॉकोलेट् हें पेय फार छान मिळतें. हें एका माणसासाठीं मागविलें तर इतकें देतात कीं, त्यानें पोट अगदीं भरून जातें; व त्यांत मलई भरपूर घातल्यामुळें तें रुचीलाही उत्तम लागतें.

## तारीख २१ सप्टेंबर

प्रसिद्ध इंग्लिश कवि बायरन याच्या 'प्रिझनर् ऑफ् शिलॉन्' या कवितेमध्यें वर्णिलेला शिलॉन्चा किल्ला पाहावयास आम्ही आगगाडीनें गेलों. जातांना आगगाडीच्या एका बाजूला डोंगर व दुसऱ्या बाजूला लेमन सरोवर व त्याच्या कांठीं दोन दिवसांपूर्वीं पाहिलेल्या Chailly Rosiaz या रम्य खेड्याप्रमाणें अनेक लहान गांवें असा मनोहर देखावा दिसत होता. शिलॉन्चा किल्ला जमिनीचें एक टोंक सरोवराच्या आंत शिरलें आहे त्यावर बांधलेला आहे. किल्ल्याचा कांहीं भाग एका काळीं राजवाड्याप्रमाणें वापरला जात असल्यामुळें, त्यावेळचे जुने गालिचे 'प्यूटर्' ( pewter ), नांवाच्या धातूचीं भांडीं, लाकडी सामान, वगैरे वस्तु आजही तेथें दृष्टीस पडतात. त्यांचा संग्रह करून येथें ठेवलेला आहे, या खोल्या प्रशस्त असून. यांतील खिडक्यांच्या खालीं सरोवराचें पाणी येऊन भिडलें आहे; पण बायरननें आपल्या कवितेंत वर्णन केलेल्या बॉनिव्हार ( Bonivar ) या राजकीय कैद्याला ज्या खोलींत कित्येक वर्षे एका खांबाला बांधून ठेवलें होतें, ती

खोली फारच खराब व अंधारी वाटली. या खोलींत बायरनच्या नांवाची एक पाटी लावलेली आहे.

आम्हांला व आमच्याबरोबर असलेल्या इंग्रजी भाषा बोलणाऱ्या दुसऱ्या पाहुणाऱ्यांना हा सर्व किल्ला एका स्विस् बाईनें दाखविला, व सर्व माहिती तिनें इंग्रजी भाषेमध्यें दिली. किल्ल्याच्या बाहेरच असलेल्या लहानशा दुकानांत लहान चित्रें, वगैरे किल्ल्यासंबंधीं आठवणींच्या वस्तु खरेदी करून, आम्हीं लोझानूला परत येण्यास निघालों; पण सरळ परत न येतां वाटेंत मॉंत्र या गांवीं उतरलों. व्हेनिस्हून लोझान्ला येतांना व्हेव्हे स्टेशनावर मिसेस् जॉली या बाई जेथें अचानक आम्हांला दिसल्या, तेंच स्टेशन मॉंत्र असल्याचा आम्हांला भास झाल्यामुळें, मॉंत्रला उतरून पोस्ट ऑफिसांतून त्या बाईचा पत्ता मिळविण्याचा आम्हीं प्रयत्न केला, पण तो व्यर्थ गेला; तरी पण, तो गांव दिसल्यामुळें जरा बरें वाटलें. हा गांव डोंगराच्या बाजूवर वसल्यामुळें, गांवांतील कांहीं रस्ते खालीं व कांहीं वर आहेत. त्यामुळें गांवाच्या खालच्या भागांतून वरच्या भागांत जावयाचें असल्यास, या खालवरच्या रस्त्यांना जोडण्याकरितां मधूनमधून जे जिने केलेले आहेत त्यांमध्येंच घरें व मळे दृष्टीला पडतात. मॉंत्र स्टेशनावरील खाणावळींतच जेवण उरकून, आम्हीं पुढच्या आगगाडीनें लोझानूला परत आलों.

संध्याकाळीं लासिग्नाल् नांवाच्या डोंगरावरील एका प्रसिद्ध ठिकाणीं वर वर्णन केलेल्या 'फ्युनिक्युलर रेल्वे' नांवाच्या विजेनें चालणाऱ्या डोंगरी आगगाडीनें आम्हीं गेलों. या उंच ठिकाणाहून आसपासच्या डोंगरांचा व पायथ्याकडील शहरांचा एकदम दृष्टीस पडणारा भव्य देखावा पाहून आनंद वाटला.

स्वित्झरलंड या देशांत असतांना जेवणाखाण्यांत दुधावरची जाड मलई फार खाण्यांत येते असें आम्हांला आढळून आलें. इटली देशांतून आम्हीं जीं स्वित्झरलंडमध्यें गेलों, तीं एका तऱ्हेनें आइस्क्रीमच्या भूमींतून मलईच्या भूमींत गेलों असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण इटॅलियन्

लोक निरनिराळ्या प्रकारचें आइस्क्रीम् छान तयार करतात व त्यांच्या जेवणाखाण्यांत आइस्क्रीम ही वस्तु फार आढळते.

रात्रीं आम्हीं पुढें पॅरिसला जाण्याकरितां निघालों.

## तारीख २२ सप्टेंबर

अगदीं सकाळीं आम्हीं पॅरिसला पोंचलों आणि एका स्टेशनावरून दुसऱ्या स्टेशनावर जाण्यासाठीं भाड्याची मोटर केली. त्या मोटरवाल्यानें आम्हांला चांगलेंच ठकवलें. आम्हीं परकी मंडळी असून, आम्हांला फ्रेंच भाषा, वगैरे कांहीं येत नाहीं हें पाहून व मोटरचें भाडें दाखविणारें यंत्र फिरवून टाकून, त्यानें आमच्याकडे पुष्कळच भाडें मागितलें आणि तें आम्हांला मुकाट्यानें द्यावें लागलें. ही एक मोठी भानगडच युरोपच्या प्रवासांत असते. कोणत्या गोष्टीला किती पैसे साधारणपणें पडावेत याची आपल्याला मुळींच कल्पना नसते; शिवाय, प्रत्येक देशाची हद्द ओलांडून दुसऱ्या देशांत गेलें कीं तेथलें नाणेंही वेगळें ! हें पाहून मनुष्य गोंधळून जातो. आम्हांला अजूनपर्यंत इटली, स्वित्झरलंड व फ्रान्स या तीन देशांतील तीन प्रकारच्या नाण्यांचे व्यवहार करावे लागले. शिवाय, बोटीवर इंग्रजी नाणें वापरावें लागलें होतें तें निराळेंच.

आगगाडीचा प्रवास संपवून आम्ही बुलॅायन शहरीं दुपारच्या सुमाराला पोंचलों; व तेथें बोटींत बसून इंग्लिश चॅनाल मधून पलीकडे जाऊन, इंग्लंडच्या किनाऱ्यावरील फोक्स्टन या गांवीं उतरलों.

आतां आमचा युरोपचा प्रवास संपला होता. फोक्स्टनला लागलींच आगगाडींत बसून आम्ही लंडनला गेलों.

प्रवास दोन अडीच तासांचा होता. आगगाडी केंट नांवाच्या प्रदेशांतून चालली असतांना देखावा फार मनोरम दिसत होता. हिरवीं कुरणें, त्यांत फिरणारीं गुरें व मेंढरें, या प्रदेशांत होणारे ‘ हॅाप्स् ’ नांवाचे वेल चढविण्याकरितां शेतांत लाविलेल्या उंचउंच काठ्या, फळझाडें वगैरेंनीं युक्त असें हें इंग्लंडमधलें पहिलें दृश्य पाहत पाहत आम्ही प्रवास केला. लंडन

शहराच्या जवळ आल्यावर गरीब लोकांच्या वस्तींतील लहान लहान घरें आगगाडींतून दृष्टीस पडूं लागलीं; व या लहान घरांच्या पाठीमागें असणाऱ्या टिचभर जागेंत तेथें राहणाऱ्या लोकांनीं केलेल्या लहान बागा पाहून या लोकांना असलेल्या बागाइतीच्या आवडीची खूण पटली. चार फुलें, थोडासा हिरवळीचा भाग व दोनचार कोबी, कॉलीफ्लॉवर लाविलेले; त्यांतच दोरीवरून कपडे वाळत घातलेले असे हे लहान बाग पाहून आनंद वाटला. संध्याकाळीं गाडी व्हिक्टोरिआ स्टेशनावर पोंचल्याबरोबर विलायतेमध्यें असलेले आमचे एक दक्षिणी स्नेही मि. दाणी हे आम्हांला भेटण्याकरितां आलेले दिसले; त्यांच्याबरोबर भाड्याच्या मोटरमध्यें बसून आम्ही अलेक्झँड्रा होटेलमध्यें गेलों व आमचे स्नेही आपल्या घरीं परत गेले.

आंघोळी, वगैरे करून व आमच्या या फॅशनेबल होटेलमध्यें लौकरच जेवण उरकून, आम्ही जरा पाय मोकळे करण्याकरितां बाहेर पडलों; होटेला-बाहेरच्या भव्य रस्त्याच्या बाजूला असलेल्या फरसबंदी पायवाटेवरून (फुटपाथवरून) त्या दिव्यांच्या उजेडानें प्रकाशित झालेल्या रस्त्यांवरून फिरूं लागलों; पण मनांत एक प्रकारची विलक्षण हुरहुर सुरू झाली होती. जो इंग्लंड देश पाहण्यासाठीं इतक्या लांबचा प्रवास करून आम्हीं आलों होतों त्या देशाच्या त्या अफाट राजधानींत फिरत असतांना, आपलें असें एक माणूस येथें जवळ नाहीं, आपलीं सर्व माणसें कोठल्या कोठें राहिलीं व आपण कोठें येऊन पोंचलों, अशा तऱ्हेचे उद्वेगजनक विचार आल्या-मुळेंच ही हुरहुर मनाला वाटत होती.

## तारीख २३ सप्टेंबर

सकाळीं उठल्याबरोबरचें जेवण आटोपून स्वतः व बनी बाहेर गेले, व मी खालच्या मजल्यावरच्या पत्र लिहिण्याच्या भव्य खोलींत पत्र लिहीत बसलें. कांहीं वेळानें आमच्या वरच्या खोलींत असलेल्या टेलिफोनमधून माझी आतेबहीण सुलभा (ही शिक्षणाकरितां कांहीं वर्षांपूर्वी येथें आली होती) माझ्याकडे बोलली, व थोड्या वेळानें ती मला भेटावयास आली.

तिला पाहून व भेटून मला फार बरें वाटलें. कांहीं वेळानें बाहेर गेलेली मंडळी परत आल्यावर आम्हीं सर्व मिळून दुपारचें जेवण जेवावयास बाहेर गेलों. येथें अशी चाल आहे कीं अगदीं सकाळचें जेवण तेवढें आपल्या राहत्या ठिकाणीं जेवावें लागतें; कारण त्या जेवणाचा आकार होटेलमध्यें राहण्याच्या खर्चांमध्येंच आकारला जातो. बाकीचीं जेवणें आपल्याला वाटेल त्या ठिकाणीं जाऊन जेवावीं. आम्हीं आज 'लायन्स'च्या एका प्रसिद्ध दुकानांत जेवावयास गेलों. तेथें कोण गर्दी होती! शेंकडों माणसें तेथें जेवीत होतीं!

'लायन्स' नांवाच्या एका गृहस्थानें अशीं दुकानें लंडन शहरांत जागोजागीं काढलेलीं आहेत. हीं मध्यम वर्गाकरितां आहेत. दुकानें भव्य, सुशोभित व स्वच्छ, आणि जेवण वाढणारी मंडळी स्वच्छ कपडे घातलेली व कामांत चपळ अशी व्यवस्था येथें असून, जेवण फार चांगलें मिळतें. पुनः जितके पैसे आपल्याला खर्च करण्याची ऐपत आहे तेवढेच खर्च करून आपल्याला पाहिजेत तेवढेच जिन्नस मागवितां येतात; आणि अनेक प्रकारचे पदार्थ तेथें नेहमीं ठेविलेले असल्यामुळें, आपल्याला जेवण आवडणार नाहीं ही भीतिच नको. जेवणाऱ्यांचीं मनें रमविण्याकरितां वाद्- नही चाललेलें असतें. या दुकानाशिवाय, 'लायन्स'चीं साधारण गरीब माणसांकरितां जागोजागीं लहानलहान दुकानें आहेत तीं निराळींच. तेथें इतका थाट नसतो हें खरें, पण तेथें जेवणाला पैसेही थोडे पडतात.

संध्याकाळचें जेवणही आम्हीं 'लायन्स'च्याच दुकानीं जेवून, मग एम्बँक्मेंट् नांवाची टेम्स् नदीच्या बाजूला, पण उंचावरची रुंद, फरसबंदी रपेट बांधून काढली आहे, त्यावर फिरत राहिलों. फिरतां फिरतां रपेटी- वरच्या चितार्‍यांचीं चित्रेंही आम्हीं पहिल्यानेंच पाहिलीं. इंग्लंडांत रस्त्यांत भीक मागत फिरण्याला कायद्यानें बंदी आहे; त्यामुळें ज्यांना बिचाऱ्यांना निर्वाहाचें कांहींच साधन नाहीं, तीं गरीब माणसें कोठें काड्यांच्या पेट्या विकतात, कोठें चित्रांचीं कार्डें विकतात, तर कोठें निरनिराळ्या रंगांच्या खडूंनीं रपेटीवर आपल्या रांगोळीच्या चित्राप्रमाणें

चित्रें काढतात. जाणारे येणारे लोक चित्रें पाहून तीं काढणाऱ्याला एक लहानसें नाणें देऊन जातात. हीं चित्रें कधीं कधीं फार सुंदर काढलेलीं असतात. कोणी कोणी हीं चित्रें कागदांवर काढून त्यांचें लहानसें प्रदर्शनच तेथें मांडतात, व कांहींजण कपड्यावर लोकरीच्या कामाचीं चित्रें तयार करतात.

'एम्बॅंक्मेंट्' वर फिरत असतांना आपोआप आम्हांला जवळ असलेलीं भव्य 'हाउसिस् ऑफ् पार्लमेन्ट्' ( Houses of Parliament ) म्हणजे 'पार्लमेंट्' च्या सभा भरतात ती इमारत दिसली, व त्या इमारतीच्या सुंदर, नक्षीदार व उंच मनोऱ्यांतील प्रसिद्ध 'बिग्बेन्' ( Big Ben ) नांवाचें मोठें घड्याळ दृष्टीस पडलें. थोडें फिरून झाल्यावर, एकदम बेत करून आम्ही ( All quiet on the Western Front ) हा महायुद्धासंबंधींचा प्रसिद्ध बोलपट पाहावयास गेलों. लढाईंतील भयंकर गोष्टी यांत हुबेहुब वठल्या होत्या त्या पाहून मन द्रवलें. तोफांचे आवाज, वगैरे खऱ्यासारखे निघत होते.

जमिनीखालीं अतिखोल व दूरपर्यंत अशीं भुयारें खोदून त्यांतून दर दोन तीन मिनिटांनीं अति जलद अशा ज्या विजेच्या गाड्या सोडलेल्या असतात त्यांना 'अंडर ग्राउंड रेल्वे' अथवा 'ट्यूब' असें नांव आहे. या 'ट्यूब' मधून जाण्याचा पहिला अनुभव मला आज आला. भुयारें फार खोल असल्यामुळें, तेथें जाण्यायेण्यासाठीं विजेचे पाळणे ( Lifts ) असतात. किंवा, कांहीं ठिकाणीं 'एस्कलेटर्स' ( Escalators ) नांवाचे हालते जिने असतात; त्यामुळें, आपण जर अगदीं वरच्या पायरीवर स्वस्थ उभे राहिलों, तर कांहीं वेळानें तीच वरची पायरी हळूहळू खालीं गेल्यामुळें आपण कांहीं मेहनत केल्याशिवाय खालीं येऊन पोंचतों. हे सर्व नवीन प्रकार पहिल्यानें पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

या खोल भुयारांत नुसत्या आगगाड्याच जाण्यापुरती जागा असते असें नाहीं, तर तेथें तऱ्हेतऱ्हेच्या वस्तु विकत मिळण्याचीं दुकानेंही असतात; व तेथें त्रिकाळ दिव्यांचा लखलखाट असतो. कांहीं यंत्रें असतात, त्यांत एक

ठराविक नाणें टाकिलें, कीं चॉकोलेट्च्या वड्या वगैरे लहानसहान खाण्याचे किंवा इतर कांहीं पदार्थ आपोआप बाहेर येऊन आपल्याला मिळतात.

आज 'टयूब्'मधून जाण्याचा माझा पहिलाच दिवस होता. आणि कर्मधर्मसंयोगानें आजच मला एक चमत्कारिक अनुभव आला. 'टयूब'च्या विजेच्या गाड्यांची अशी व्यवस्था आहे कीं, गाडी स्टेशनावर थांबली कीं गाडीच्या डब्यांचे दरवाजे विजेच्या योगानें आपोआप उघडतात आणि गाडी पुनः चालू होण्याचे वेळीं ते आपोआप बंद होतात. अशा एका गाडींतून आम्ही तिथें आमचें स्टेशन आलें म्हणून उतरत होतों; मी खालीं उतरलें मात्र, इतक्यांत गाडीचे दरवाजे बंद होऊन गाडी पुनः चालू लागली, व स्वतः आणि यनी आंतच राहिले. बंद दरवाजांच्या कांचेंतून निराशेनें त्यांनीं माझ्याकडे पाहिलें व गाडी निघून गेली. मला कसेंसेंच वाटलें; पण करणार काय? मी तशीच प्लॅटफॉर्मवर एका बांकावर बसून राहिलें. लागलेच पांच सात मिनिटांत ते दोघे परत आले. त्यांना पुढच्या स्टेशनावर उतरल्याबरोबर जी उलट दिशेनें येणारी गाडी मिळाली तिनें ते आले होते.

## तारीख २४ सप्टेंबर

आमच्या सोलापूरच्या ओळखीचे एंजिनिअर मि. व्हॉन्‌ब्रॉक व त्यांच्या पत्नी आम्हांला अलेक्झँड्रा हॉटेलमध्यें भेटायला आलीं. आम्हीं इंग्लंडला आलों ही बातमी आम्हीं त्यांना तावडतोब टेलिफोननें कळविली, तेव्हां ती ऐकून त्यांना फार आश्चर्य वाटलें होतें. पुष्कळ बोलणेंचालणें झाल्यावर ती मंडळी आम्हांला दुपारच्या जेवणाला एका दुकानांत घेऊन गेली. जेवणानंतर रस्त्याच्या 'फुटपाथ' वरून दुकानांच्या खिडक्या पाहत पाहत आम्हीं फिरलों.

या देशांत 'खिडक्या सजविणें' हा दुकान मांडण्याचा एक प्रमुख भाग समजला जातो. प्रत्येक लहानमोठ्या दुकानाचा 'फुटपाथ'ला लागून असलेला भाग दुकानांत मिळणाऱ्या मालाच्या शेलक्या नमुन्यांनीं सजविलेला असतो. या नमुन्याची मांडणावळही मोठी मोहक असते;

व बाहेरच्या बाजूनें मोठीं कांचीचीं तावदानें लाविलीं असल्यामुळें, 'फुटपाथ' वरून जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांचें मन साहजिकच तेथें वेधतें, व त्यांना दुकानांत जाण्याचा मोह होतो. एका तऱ्हेनें ही 'खिडक्यांची सजवणूक' म्हणजे दुकानांतील मालाची भपकेदार जाहिरातच असते. रात्रीच्या वेळीं या खिडक्यांत विजेच्या दिव्यांचा लखलखाट केलेला असतो.

व्हॉन्‌बॉक मंडळी कांहीं वेळानें परत घरीं गेल्यावर, बनीला केंब्रिज युनिव्हर्सिटीमध्यें घ्यावें म्हणून खटपट करण्याकरितां प्रसिद्ध व्यापारी मि. टाटा यांच्या इंग्लंडमधल्या व्यवस्थापकांना भेटायला आम्हीं तिघें गेलों, तों ते गृहस्थ मि. मुजुमदार असून माझ्या पुष्कळ वर्षांपूर्वींच्या ओळखीचे आहेत असें कळलें. आज बरींच वर्षें आम्हांला एकमेकांचा पत्ता नव्हता, तीं आम्हीं अशा अचानक रीतीनें परदेशांत भेटलों!

याच कामानिमित्त पुढें India House (इंडिया हाउस) मध्यें गेलों. हिंदुस्थानमधले सरकारी अंमलदार जेव्हां या देशांत येतात, तेव्हां त्यांची रजा, पगार वगैरेसंबंधीं सर्व कामें या ठिकाणींच होतात. स्वत: व बनी येथल्या अंमलदारांकडे बोलण्यांत गुंतले असतां, मी त्या भव्य इमारतींत फिरून तेथें मांडलेल्या हिंदुस्थानांतील अनेक वस्तूंचें प्रदर्शन पाहिलें. शाली, शालू, शेले; शिवाय, हिंदुस्थानांत होणारें अनेक प्रकारचें कलाकुसरीचें काम तेथें मोठमोठ्या दालनांत व्यवस्थित मांडून ठेविलेलें आहे. हिंदुस्थानांतील शेताची एक हुबेहुब दिसणारी लहानशी प्रतिकृति तेथें दृष्टीस पडली. शेतांत बांधलेल्या कडब्याच्या जुड्या वगैरे सर्व कांहीं तिच्यांत होतें, व शेताच्या पलीकडच्या रस्त्यावरून एकामागून एक खटारे जातांना दिसत होते. हे खटारे विजेच्या कळीनें चालत, व एकंदर देखावा मजेदार वाटे. असाच एक कोळशाच्या खाणींतला देखावाही तेथें दाखविला होता.

रात्रीं लोकरच जेवण आटपून (Cynara) सायनारा नांवाचें माझें येथलें पहिलेंच नाटक पाहावयास आम्ही गेलों. नाटकाची गोष्ट साधी घरगुतीच असून, त्यांत विशेष महत्त्वाचा भाग असा कांहींच नव्हता; पण

७५११९ १३८ सू.५० १७/३

त्यांत ( Gerald Du Maurier ) आणि ( Gladys Cooper ) (जेरल्ड डु मारिअर आणि ग्लॅडिस कूपर) या इंग्लंडमधल्या प्रसिद्ध नटनटीनें काम केलें; या नाटकांत ( पुढें इंग्लंड देशामधल्या सर्व नाटकांत दिसून आलेला ) एक विशेष मुद्दा दिसून आला तो हा, गोष्ट कितीही सात्री असली, तरी नट व नटींचे हावभाव व बोलणें अगदीं साहजिक असून, देखावेसुद्धां रोजच्या व्यवहारांत दिसून येतात त्याप्रमाणें हुबेहुब होते. उदाहरणार्थ, रंगभूमीवरची निजावयाची खोली किंवा फराळाचें दुकान एखाद्या खऱ्याखुऱ्या निजावयाच्या खोलीप्रमाणें व फराळाच्या दुकानाप्रमाणें दिसलीं, पण, हिंदुस्थानवासी नटनटींनीं विशेषेंकरून शिकण्यासारखा धडा म्हणजे तेथल्या नट व नटींचा साहजिक अभिनय. आमच्या येथली रंगभूमीवरची पद्धत म्हणजे, जितके अस्वाभाविक हावभाव करतां येतील तितके करून, भाषण एकसारखें ठासून व प्रत्येक शब्दावर जोर देऊन करावयाचें. दुसरी गोष्ट अशी कीं, या देशांत नाटक गद्य असो किंवा संगीत असो, तें तीनएक तासांच्यावर चालावयाचें नाहीं. जरा लौकरच म्हणजे साडेआठाच्या सुमाराला सुरू होऊन साडेअकरापर्यंत चालावयाचें. विनाकारण जागरण नको, कांहीं नको. संगीत नाटक जरी असलें आणि त्यांतलीं पदें लोकांच्या फार आवडीचीं जरी असलीं, तरी टाळ्यांच्या कडकडाटानंतर पुनः पुनः तेंच गाणें तास, अर्धातास नट किंवा नटी कधींही म्हणणार नाहीं. व प्रेक्षकही तसें करण्याबद्दल त्यांच्या पाठीमागें लागणार नाहींत.

लंडनच्या रस्त्यांमध्यें रोज रात्रीं विजेच्या दिव्यांचा नुसता लखलखाट केलेला असतो; जणूं काय त्यांची रोजच दिवाळी ! रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांनीं दाखविलेल्या निरनिराळ्या मालाच्या जाहिरातीही पुष्कळदां चित्तवेधक असतात. एका जाहिरातींत एकदम एक ग्लास दिसे, मग शेजारीं एक बाटली येई. दुसऱ्याच क्षणीं ती बाटली वर जाऊन व ग्लासावर तिरपी वांकून, तींतून कांहीं पेय ग्लासांत पडतांना दिसे. मग हळूहळू या सर्व वस्तू अदृश्य होत. व पुनः कांहीं वेळानें पहिल्यासारख्याच दिसूं लागत. अशीच दुसरी एक जाहिरात पुढें आम्हीं पाहिली. आग लागली असतां,

ती विझविण्याच्या एका यंत्राची ती जाहिरात होती. एकदम आगीचा भडका झालेला दिसे, मग एक मनुष्य तें यंत्र सुरू करी. त्याबरोबर आग थोडी कमी झालेली दिसे, पुनः यंत्राचा उपयोग केल्यास आग आणखी कमी होई, व असें होतां होतां शेवटीं ती अगदीं विझून जाई.

## तारीख २५ सप्टेंबर

आम्हीं पहिल्यापासून ठरविलें होतें कीं, अलेक्झँड्रा होटेलमध्यें दोनतीन दिवसांपेक्षां जास्त राहावयाचें नाहीं; कारण तें होटेल श्रीमंती थाटाचें असून, तेथले दरही त्याच पद्धतीवर होते व ते आम्हांला झेपण्यासारखे नव्हते; म्हणून आम्हीं एक्सेलसिअर हाऊस ( Excelsior House ) नांवाच्या एका लहानशा बोर्डिंग हाउस ( राहण्याची सोय असलेली खाणावळ ) मध्यें राहावयास गेलों.

आज 'नॅशनल गॅलरी' ( National Galery ) नांवाचें अतिशय प्रसिद्ध व अतिशय मोठें चित्रांचें संग्रहालय पाहवयास आम्हीं गेलों. जुन्या काळापासूनच्या मोठमोठ्या नांवाजलेल्या चित्रकारांनीं काढलेलीं हजारों चित्रें येथें पाहावयास मिळतात. तीं चित्रें पाहत असतांना, कांहीं जुन्या चित्रांच्या हुबेहुब नकला करीत असलेलीं कांहीं माणसें आम्हांला आढळलीं; त्यांत पुष्कळशा बायका होत्या.

आज दुपारचें जेवण आम्हीं बाहेर घेतलें, पण रात्रीचें जेवण घरींच म्हणजे आमच्या राहत्या ठिकाणीं घेतलें. येथलें जेवण साधेंच पण चांगलें शिजविलेलें व भरपूर असून, दर अगदीं माफक होते; त्यामुळें रात्रीचें जेवण उरकण्यासाठीं धडपड करीत बाहेर जाण्याची आवश्यकता आम्हांला राहिली नाहीं.

## तारीख २६ सप्टेंबर

अगदीं सकाळची न्याहारी झाल्याबरोबर आमच्या खोलींतलें सामान व्यवस्थित लावून, दुपारचें जेवणही आम्हीं घरींच उरकलें; व नंतर आम्हीं

मादाम् तूसो ( Madame Tussaud ) या फ्रेंच् बाईचें प्रसिद्ध मेणाच्या चित्रांचें प्रदर्शन पाहावयास गेलों. येथें इंग्लंड देशांतले जुनेनवे राजे व राण्या, धर्मप्रचारक, लेखक, मुत्सद्दी, खेळांत प्रवीण झालेले लोक, प्रसिद्ध मल्ल वगैरे माणसांचे शेंकडों पुतळे अगदीं हुबेहुब करून ठेविलेले आहेत, व त्यांना कपडेही अगदीं त्या त्या व्यक्तीप्रमाणें घातलेले आहेत. इंग्लंडच्या इतिहासांतले कांहीं विशेष प्रसंगही अशा तऱ्हेचे मेणाचे पुतळे करून दाखविलेले आहेत. हा भाग आम्हांला फार आवडला. या प्रदर्शनाच्या इमारतींत आल्याबरोबर समोर जिन्यावर एक रखवालदाराचा हुबेहुब करून ठेवलेला पुतळा होता. तेथून वर गेल्याबरोबर दुसरा एक तसाच पुतळा उभा असलेला पाहून, थोडी मंडळी तेथें जमून त्याला कांहीं वेळ पाहत राहिली; तो पुतळा आहे कीं खरा मनुष्य आहे याविषयीं त्यांना निकाल लावतां येईना; इतक्यांत त्या रखवालदारानें आपला हात हालवून तो किंचित हांसला; त्याबरोबर तो पुतळा नाहीं अशी खात्री होऊन, पाहणाऱ्या मंडळीलासुद्धां हंसूं कोसळलें.

या इमारतींत खालीं एक खोली आहे; तिला ' चेंबर ऑफ हॉरर्स ' (Chamber of Horrors) असें नांव आहे; कारण येथें सर्व भीतिजनक वस्तु ठेविलेल्या आहेत. खुनी लोकांचे पुतळे, त्यांच्या कांहीं वस्तु, फ्रान्सचा राजा सोळावा लुई व त्याची बायको मारी आन्‌ तुवानेत्‌ यांचा शिरच्छेद ज्या सुरीनें केला ती सुरी, शिरच्छेदानंतरच्या त्यांच्या रक्तानें माखलेल्या शिरांच्या हुबेहुब प्रतिमा, वगैरे अंगावर शहारे आणणाऱ्याच वस्तूंचा संग्रह येथें आहे. ' बास्तील ' ( Bastille ) नांवाच्या प्रसिद्ध फ्रेंच तुरुंगाची भली थोरली किल्लीही येथें ठेविलेली आम्हीं पाहिली. हा भाग मला मुळींच आवडला नाहीं. अशा गोष्टी पाहून फायदा तर कांहींच नाहीं, पण एखाद्याच्या मनावर अनिष्ट परिणाम मात्र व्हावयाचा असें मला वाटलें.

या ' तूसो " ( Tussand ) घराण्याच्याच मालकीचें एक फराळाचें दुकान व एक सिनेमाही असून, या दोन्ही गोष्टी प्रदर्शनाच्या इमारतीच्याच दोन भागांत आहेत. तेथल्या फराळाच्या दुकानांत जाऊन आम्हीं चहा

घेतला. किती छान, प्रशस्त, नीटनेटकें व शांत दुकान होतें तें! सर्व वाढणाऱ्या बायकांचा तो एक नमुन्याचा पोशाख डोळ्यांना किती आनंददायक वाटत होता!

इतक्या थोड्या दिवसांच्या राहणींत आम्हांला हें दिसून आलें कीं, येथले पोलीस शिपाई व पोस्टाचे शिपाई आम्हांला रस्ते, वगैरे दाखविण्यांत फार तत्परता दाखवीत. एकतर, हे लोक नेहमींच आपल्या देशबांधवांना--सुद्धां अशा प्रकारची मदत देतात; आणि या अफाट लंडनमधल्या रस्त्यांची व त्यांवर असलेल्या इमारतींची बारीकसारीक माहिती असल्याबद्दल विशेषतः या लंडन शहरामधल्या पोलीस शिपायांची ख्याति आहे; पण आम्ही परक्या देशांतले अनोळखी लोक आहोंत हें जाणून, हे शिपाई आमच्या विशेष उपयोगी पडत. रस्त्यावर मोटरींची भीड लागली असतां, रस्त्याच्या पलीकडे जाण्यास मी भीतीनें कांकू करीत आहे असें पाहून, कित्येक वेळां पोलीस शिपायानें आपल्या हाताच्या एका इशाऱ्यानें गाड्या थांबवून मला पलीकडे जाण्यास खूण करावी. कधींकधीं रस्त्यावरून जाणाऱ्या अनोळखी माणसांना एखादें ठिकाण विचारण्याचा जेव्हां आम्हांला प्रसंग येई तेव्हां ते लोकही अतिशय आतुरतेनें व स्वतः थोडाबहुत त्रास सोसून आम्हांला मदत करीत.

## तारीख २७ सप्टेंबर

आम्ही ट्रॅममधून व्हॉन्‌वॉक मंडळीला भेटावयास गेलों. त्यांचें टुमदार घर शहराच्या बाहेर एका नवीन वसलेल्या भागांत असल्यामुळें, आजूबाजूचा देखावा खेडेगांवसा वाटला. कच्चा रस्ता, त्याच्या दोन्ही बाजूंना एकाच धर्तीवर बांधलेलीं, लहानलहान, टुमदार घरें, त्यांच्यापुढें त्या टिचभर बागा हें दृश्य रम्य वाटलें. दूर पाहिलें असतां, मोठे भाजीपाल्यांचे मळे दिसत. व्हॉन्‌वॉकच्या त्या सुरेखशा घरांत बोलण्याहंसण्यांत आम्ही सर्व संध्याकाळ व रात्र घालविली. आमचा चहा व रात्रीचें जेवण तेथेंच झालें.

## तारीख २८ सप्टेंबर

हाइड् पार्क नांवाच्या लंडन शहरामध्येंच असलेल्या अतिशय जंगी बागेंत आम्हीं फिरावयास गेलों. या बागेंत घोड्यावर बसून फिरण्याकरितां, मोटरकार्सकरितां व पायांनीं चालण्याकरितां असे निरनिराळे प्रशस्त रस्ते आहेत; व लहानलहान होड्यांतून सहल करण्यासाठीं मध्यें एक Serpentine (सरपेंटाइन) नांवाचें मोठें तळें आहे. जिकडेतिकडे हिरवळीचीं मैदानें, मोठमोठीं झाडें व सुंदर फुलांचे वाफे आमच्या नजरेस पडत होते. अनेक पुरुष, बायका व मुलें मोकळेपणानें फिरत होतीं. कोठें एखादा व्याख्याता लहानशा घोळक्याच्या मध्यभागीं उभा राहून आपल्या आवड या विषयावर व्याख्यान देत होता, बागेमध्यें एका ठिकाणीं बँड वाजत होतें तें कांहीं मंडळी ऐकत होती. बागेंत फिरून कंटाळल्यावर किंवा थकल्यावर बसण्याकरितां म्हणून खुर्च्यांच्या रांगच रांगा होत्या. या खुर्च्यांवर बसणा यांना थोडेंसें भाडें मात्र द्यावें लागत होतें. एका ठिकाणीं आम्हांला कबुतरें व चिमण्या दिसल्या; त्या चिमण्या इतक्या माणसाळलेल्या होत्या कीं माणसांच्या हातांतून खाण्यास त्यांना भीति वाटत नव्हती.

## तारीख २९ सप्टेंबर

मागल्या खेपेला 'नॅशनल गॅलरी' (National Gallery) मधलीं चित्रें अर्धवट पाहून झाल्यामुळें, आज तेथें पुनः जाऊन राहिलेलीं चित्रें पाहिलीं. हा चित्रांचा समुदाय इतका मोठा आहे, कीं आम्हांला इतका वेळ लागूनही आमचें चित्रें पाहणें म्हणजे अगदीं वरवर झालें. या चित्रांपैकीं एकेकाची किंमत म्हणजे हजारों रुपये आहे, व तीं सांभळण्याकरितां चित्रांच्या प्रत्येक खोलींत एकएक रखवालदार असतो; त्यांपैकीं एकानें आम्हांला हिंदुस्थानाविषयीं कांहीं प्रश्न विचारला. यापुढें पुष्कळदां निरनिराळीं पदार्थसंग्रहालयें वगैरे पाहत असतां एखादा रखवालदार

मुद्दाम पुढें येऊन बोलूं लागला म्हणजे आमचा तर्क होई कीं तो केव्हांतरी हिंदुस्थानांत येऊन गेलेला असावा; व हा तर्क नेहमीं खरा ठरे.

नेहमींप्रमाणें दुपारचें जेवण एका दुकानांत जेवून, आम्हीं 'टेट् गॅलरी' ( Tate Gallery ) नांवाचा दुसरा चित्रसंग्रह पाहावयास गेलों. यांत बऱ्याच अलीकडच्या काळांतील चित्रकारांचीं चित्रें असल्यामुळें, आम्हांला एका तऱ्हेनें हा संग्रह जास्त आवडला. National Gallery मध्यें जुन्याजुन्या चित्रकारांचीं प्रसिद्ध म्हणून जीं चित्रें आहेत, त्यांतील बहुतेक चित्रांचे विषय खिस्ती लोकांच्या 'बायबल' मधल्या गोष्टींवरून घेतलेले असल्यामुळें, आमच्यासारख्या तिऱ्हाईत लोकांना तीं चित्रें सारखीं पाहण्याचा कंटाळा आला; त्या मानानें Tate Gallery मधल्या चित्रांचे नेहमींच्या आयुष्यांतील विषय आम्हांला जास्त चित्ताकर्षक वाटले यांत नवल नाहीं.

## तारीख ३० सप्टेंबर

आज व्हिक्टोरिआ व आलबर्ट म्युझिअम् ( Victoria and Albert Museum ) नांवाचें पदार्थसंग्रहालय पाहण्यास गेलों. इमारतींत शिरल्याबरोबर आम्हांला विशेषेंकरून त्या संग्रहालयाचा कोठला भाग पाहावयाची इच्छा होती म्हणून तेथल्या एका रखवालदारानें आम्हांला विचारलें. आम्हीं म्हटलें कीं आम्हांला सर्व कांहीं पाहावयाचें आहे; त्यावर तो हंसून म्हणाला, कीं तसें केलें असतां तुम्हांला सात मैल चालावें लागेल इतका मोठा हा संग्रह आहे. हें ऐकून आम्हांला शरमल्यासारखें झालें. मग त्याच्या सांगण्यावरून आम्ही चिनी मातीच्या वस्तूंचा प्रचंड संग्रह पाहण्यास एकदम वर गेलों.

कितीतरी दालनें हजारों लहानमोठ्या चिनी मातीच्या वस्तूंनीं भरलेलीं आम्हीं येथें पाहिलीं. कांहीं लहान लहान सुरेख बाहुल्या व त्यांचे एकवट केलेले समुदाय पाहण्यास फार मजेदार वाटलें. कांहीं चिनी मातीच्या वस्तु चांदीसारख्या व कांहीं तांब्यासारख्या दिसत होत्या. एका बशींत

ओल्या वाटाण्याच्या शेंगा ठेविलेल्या आहेत असे एक दृश्य, व दुसऱ्या एका बशींत आक्रोडें ठेविलेलीं असें दुसरें दृश्य पाहून, शेंगा व आक्रोडें खरीं असावींत असा क्षणभर भास होई.

आणखी किती कितीतरी वस्तु आम्हीं येथें पाहिल्या. कितीतरी घड्याळें ( कांहींवर सोन्याचा मुलामा दिलेला ), गालिचे, जुने कपडे, फार जुने जोडे, अनेक राष्ट्रांतील जुनी नवीं कशिद्याचीं कामें, अनेक तऱ्हांचीं कलाकुसरीचीं कामे, जुने दागिने, जुन्या गाड्या, वगैरे कितीतरी वस्तु येथें आम्हीं पाहिल्या. इजिप्तमधल्या एका जुन्या थडग्यांतून काढलेली एक चिंधी येथें ठेविलेली आहे, ती सुमारें एक हजार वर्षांपूर्वीची आहे. शिंपांचे तुकडे लाकडांत बसवून तयार केलेली एक मोठी पेटी प्रेक्षणीय वाटली; तसाच एक शिंपांचा केलेला पाळणा पाहिला. तीनचार बाहुलीचीं घरें आंतील सर्व सामानासकट येथें ठेविलेलीं आहेत. तीं पाहून मौज वाटली. त्यांत एक अलिकडल्या काळांतलें आहे, तें फारच छान आहे. पुस्तकें, रद्दी कागद टाकण्याची टोपली, सामान ठेवण्याच्या पेट्या, वगैरे लहान लहान वस्तु अगदीं खऱ्यासारख्या अशा त्यांत कितीतरी आहेत.

या संग्रहालयांतील सर्वांत अचंबा वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे, निरनिराळ्या देशांतल्या आणि शिल्पकलेच्या दृष्टीनें प्रसिद्ध अशा कांहीं विशेष बांधकामाचे प्रचंड नमुने येथें करून ठेविलेले आहेत. एक अतिशय उंच खांब, एक उंच, नक्षीदार देऊळ, एक प्रचंड जिना, असे हे नमुने या पदार्थसंग्रहालयांत ठेवण्यासाठीं दालनेंही तशींच उंच बांधावीं लागलीं आहेत.

इतकें सर्व जरी आम्हीं पाहिलें, तरी या संग्रहालयाचा बराच भाग पाहण्याचा राहिला. दुपारच्या जेवणाची वेळ झाल्यामुळें, आम्ही या इमारतींत असलेल्याच जेवणाच्या दुकानीं जाऊन जेवलों. या देशांत प्रत्येक बाबतींत लोकांच्या सोईकडे फार लक्ष पुरविलें जातें याचें हें जेवणाचें दुकान हें एक उदाहरण आहे. मोठमोठे चित्रसंग्रह किंवा पदार्थसंग्रहालयें पाहण्यास गेलें असतां, खाण्यापिण्यासाठीं प्रेक्षकांना लांब जावें लागूं नये म्हणून

अशा प्रत्येक ठिकाणीं एक जेवणाचें दुकान असतें; त्यामुळें, खाऊनपिऊन ताजेतवानें झाल्यावर पाहिजे असल्यास पुनः संग्रहालय पाहण्यास सोईचें पडतें.

## तारीख १ ऑक्टोबर

प्रसिद्ध इंग्रज नाटककार 'शॉ' (Shaw) याचें 'The Devil's Disciple' हें नाटक पाहण्यास आम्हीं गेलों. यांत 'मार्टिन हार्वे' (Martin Harvey) या प्रसिद्ध नटानें मुख्य नायकाचा भाग घेतला होता. हा नट आज कमीतकमी २५ वर्षे चांगला नट म्हणून नांवाजलेला आहे. नाटक छान झालें. स्वातंत्र्यासाठीं अमेरिकन लोकांनीं इंग्रजांशीं केलेल्या युद्धाच्या वेळच्या इतिहासावर हें नाटक बसविलेलें असून त्यांत नाटककारानें आपल्या देशबांधवांवर मधूनमधून निर्भीडपणें विरुद्ध टीका केलेली आहे.

## तारीख ३ ऑक्टोबर

Tate Gallery या चित्रसंग्रहाचा राहिलेला भाग पाहावयास आम्हीं गेलों. हिंदुस्थानांतील चित्रकार फैझी रहामिन यांचीं दोन चित्रें तेथें पाहून विशेष कौतुक वाटलें. चित्रें पाहून झाल्यावर त्याच इमारतींतील दुकानांत दुपारचें जेवण जेवून, टेम्स नदीच्या बाजूला बांधलेल्या दगडी पाय-रस्त्यानें फिरफिरत आम्हीं Houses of Parliament (पार्लमेंटच्या सभेची भव्य इमारत)ला लागून असलेल्या बागेंत आलों. तेथें तऱ्हेतऱ्हेच्या फुलांचे वाफे पाहिले; त्यांत लीली ऑफ दी व्हॅली (Lily of the Vally) नांवाचीं नाजूक, पांढरीं फुलें मीं पहिल्यानेंच पाहिलीं. बागेंतील एका रखवालदाराकडे फुलांसंबंधीं कांहीं चौकशी करतांना त्यानें आपण हिंदुस्थानांत लष्करी नोकरीवर होतों म्हणून सांगितलें.

या देशांत रस्त्यावरून चालत असतांना, फुलें व फळफळावळ यांच्या दुकानांच्या मोठ्या कांचीच्या खिडक्यांतून व्यवस्थेनें व सुरेख दिसतील

अशा रीतीनें रचून ठेविलेलीं फुलें व फळें पाहून मनाला फार आनंद वाटे; कारण त्यांचे निरनिराळे रंग व सुंदर रचना यांनीं तीं फारच मोहक दिसत.

## तारीख ४ ऑक्टोबर

इंग्लंड देशाचा सर्व राज्यकारभार जेथें चालतो ती प्रसिद्ध इमारत म्हणजे Houses of Parliament पाहायला आज आम्हीं गेलों. आणखी वरीच मंडळी ती इमारत पाहायला त्या दिवशीं त्याच वेळीं आलेली होती. प्रत्येक खोलींत रखवालदार होता. तो सांगेल त्याप्रमाणें एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जावें लागे. आम्हीं सर्व खोल्या फिरून पाहिल्या. House of Lords मध्यें (सरदारांचें सभागृह) सर्व लाल चामड्याच्या खुर्च्या आणि राजे व राणीसाहेव यांच्या बसण्याच्या विशिष्ट खुर्च्या आहेत. House of Commons (साधारण सभासदांचें सभागृह) मधल्या खुर्च्या काळ्या आहेत; व तेथें प्रेक्षकांना बसण्याकरितां वरच्या बाजूला चौफेर गॅलरी आहे. Sir Thomas Roe (सर टॉमस रो) हा इंग्रज वकील हिंदुस्थानांत व्यापारासंबंधीं सवलती मागण्यास मोगल बादशाहाच्या दरबारीं आला त्या प्रसंगाचें चित्र या इमारतींत असलेल्या लायब्ररीमध्यें पाहून जरा मौज वाटली; कारण, आमच्या हिंदुस्थानचा इंग्लंडशीं जो अति निकट असा संबंध आला, त्याचा हा वरील प्रसंग म्हणजे पायाच होता. या इमारतींत West Minster's Hall नांवाचा एक अति मोठा दिवाणखाना आहे. तो फार जुना व इंग्लंडच्या इतिहासांत प्रसिद्ध असा आहे. या देशाचा पहिला चार्लस राजा, तसेंच हिंदुस्थानचा जुना गव्हर्नर जनरल वॉरन् हेस्टिंग्ज् यांच्यावर जुन्या काळीं पार्लमेंटच्या सभांमध्यें जे खटले झाले, त्या खटल्यांच्या वेळीं ते गुन्हेगार या दिवाणखान्यांत ज्या ज्या ठिकाणीं उभे राहिले होते, त्या त्या जागीं पितळेचे पत्रे मारून खुणा केलेल्या आम्हीं पाहिल्या. आणखी अनेक प्रसंगांच्या अशाच खुणा येथें आहेत.

ही इमारत पाहून झाल्यावर जवळच असलेली West Minster

Abbey ( वेस्ट मिनिस्टर ॲबे )ची इमारत पाहावयास आम्ही गेलों. इंग्लंडांत आजपर्यंत होऊन गेलेल्या अनेक प्रसिद्ध पुरुषांचीं थडगीं येथें आहेत. त्यांत लेखक, कवि, नट, लष्करी अंमलदार, वगैरे सर्व कांहीं धंद्यांचीं माणसें आहेत. हीं प्रसिद्ध माणसें ज्या जागीं पुरलीं आहेत त्या त्या ठिकाणीं त्यांचीं नांवें घातलेलीं आहेत; शिवाय, त्यांचीं स्मारकें म्हणून या इमारतींत ठिकठिकाणीं मोठमोठे सुंदर पुतळे उभारलेले आहेत. प्रसिद्ध लेखक Addison, कादंबरीकार Dickens, व नट Irving यांना पुरलेल्या जागा आम्हीं पाहिल्या; किंबहुना, आम्हीं त्यांच्यावरून चाललों. युरोप खंडांतील महायुद्धानंतर धारातीर्थी पडलेल्या योद्ध्यांतून एका अज्ञात योद्ध्याचें शव आणून, तें सर्व योद्ध्यांचें स्मारक म्हणून एका विशिष्ट जागीं समारंभानें पुरण्याची कल्पना कांहीं देशांनीं अमलांत आणली. त्यांतील इंग्रजांनीं आणिलेल्या अज्ञात योद्ध्याचें शव West Minister Abbey मध्यें पुरलेलें आहे तेंही आम्हीं पाहिलें. या इमारतीच्या एका भागाला Royal Chapel (रॉयल चॅपल) असें नांव आहे. येथें इंग्लंडच्या पुष्कळ जुन्या राजांचीं थडगीं आहेत. त्यांत राणी इलिझाबेथ हिचें व जे दोन लहान राजपुत्र त्यांच्या चुलत्यानें मारेकऱ्यांकरवीं मारविले त्यांचीं थडगीं आम्हीं पाहिलीं. Knights of the Garter ( नाइट्स् ऑफ धी गार्टर ) या पदवीचे जे जे मोठे सरदार आजपर्यंत होऊन गेले, त्यांचीं जुनीं निशाणें व शस्त्रें येथें भिंतींना लावून ठेविलेलीं आहेत. येथेंच एका मोठ्या दालनांत प्रत्येक इंग्लंडच्या राजाला राज्याभिषेक होतो. तेथें एक मोठी जड लाकडाची खुर्ची आहे; तिच्यावरच बसून हा राज्याभिषेक राजाला करण्याची रीत आहे. आणि खुर्चीच्या खालच्या भागांत एक मोठा ओबडधोबड दगड आहे. तो राज्याभिषेकाच्या समारंभाच्या वेळींही तेथेंच असतो. या दगडाला The stone of Destiny ( नशिबाचा दगड ) असें म्हणतात आणि आज शेंकडों वर्षें या दगडावर व या खुर्चीवर बसून या देशाच्या राजांना राज्याभिषेक करण्यांत आला आहे. सध्यांच्या राजघराण्यांतील कांहीं अलीकडील मंडळीचीं लग्नें याच ठिकाणीं झालेलीं आहेत.

दुपारच्या जेवणानंतर आम्हीं आगगाडीनें West Dulwich (वेस्ट डलिच) या ठिकाणीं आमचे स्नेही दाणी यांना भेटावयास गेलों. हा भाग शहरासारखा गजबजलेला नसून, येथें खेडेगांवाचा भास होतो. रस्ते शांत वाटतात, आणि त्यांच्या दुतर्फा असलेलीं तीं लहानलहान टुमदार घरें व त्यांच्यापुढले टिचभर बाग पाहून डोळ्यांना सुख होतें. शहरांतील सर्व सोई, दुकानें, वगैरे सर्व कांहीं येथें असल्यामुळें तशी अडचणही कांहीं नाहीं.

संध्याकाळीं परत आल्यावर रात्रीच्या जेवणासाठीं आम्हीं वीरस्वामीच्या दुकानीं गेलों. लंडनमध्ये पांचसहा हिंदी जेवणाचीं दुकानें आहेत; त्या सर्वांत हें अधिक श्रीमंती थाटाचें असल्यामुळें येथले जेवणाचे दरही अतिशय महाग होते. बैठकीच्या जागीं हिंदुस्थानांतील कलाकुसरीच्या कांहीं वस्तु ठेवून, या देशांतील दिवाणखान्याचें स्वरूप जागेला दिलें होतें. जेवणाची खोली मोठी प्रशस्त असून, त्यांत टांगलेले दिवे वगैरेही हिंदुस्थानचीच आठवण करून देत होते. जेवण वाढणाऱ्या हिंदी वाढप्यांनीं कपडेही आपल्या देशाचेच केलेले होते. येथे भात, सांबारें, भाज्या, पापड, चटण्या, कोशिंबिरी, वगैरे जेवण आम्हांला जेवायला मिळालें. याशिवाय, आणखीही आपल्या तऱ्हेचे पदार्थ येथें होते. आम्हांला आश्चर्य वाटलें तें हें कीं येथें जेवायला आलेले बहुतेक लोक हिंदी नसून इंग्रज होते. बहुतकरून ही जेवणारी मंडळी हिंदुस्थानांत येऊन गेलेली व येथल्या जेवणाची चटक लागलेली अशी असावी असें वाटलें.

## तारीख ५ ऑक्टोबर

Hyde Park (हाइड पार्क) या बागेच्या ज्या भागांत Albert Memorial (व्हिक्टोरिया राणीच्या यजमानांचें स्मारक) आहे तेथें जाऊन आम्हीं तें स्मारक नीट पाहिलें. मुख्य पुतळा बऱ्याच उंच चबुतऱ्याच्या मध्यभागीं असून, त्यावर नक्षीकाम आणि सोनेरी व रंगीतकाम केलेलें असें छप्पर आहे. चबुतऱ्याच्या चार कोनांवर चार

खंडांतील माणसें व जनावरें यांच्या कांहीं मोठया प्रतिमा करून ठेविल्या आहेत. स्मारक भव्य आहे. येथल्या बागेंत फिरत असतांना पुष्कळ सुंदर फुलेंही पाहिलीं.

रात्रीचें जेवण जेवायला आम्हीं एका चिनी दुकानामध्यें गेलों. येथल्या पदार्थांच्या रुचकरपणाविषयीं कीर्ति ऐकल्यामुळें आम्हीं तेथें गेलों खरीं, पण आमची तेथें निराशा झाली. आम्हीं आम्हां तिघांसाठीं तीन भाताचीं भांडीं मागितलीं; कारण आम्हांला असें वाटलें कीं, येथल्या पद्धतीप्रमाणें एकएका भांड्यांत एकापुरताच भात येईल; पण पुढें पाहिलें तों एकएका भांड्यांत इतका भात होता कीं तो खातां संपेना; व मग पुढें दुसरा कांहीं पदार्थ मागवून खाण्याची आम्हांला इच्छाच राहिली नाहीं.

## तारीख ६ ऑक्टोबर

आम्हीं तिघेंही सकाळच्या जेवणानंतर केंब्रिजला गेलों; व आनंदाची गोष्ट अशी झाली कीं मोठ्या मिनतवारीनें बनीला तेथल्या एका नव्या कॉलेजमध्यें जागा मिळाली. दिवस मात्र फार वाईट होता; सारखा झिम झिम पाऊस पडत होता, व मीं अजूनपर्यंत थंडीचा कोट विकत घेतला नसल्यामुळें, नुसती हिंदुस्थानच्या पद्धतीनें शाल पांघरून गेलें होतें. हवा सर्द झाली होती व आम्ही सर्व जरा जरा भिजत होतों; त्यामुळें मी आजारी पडण्याची भीति आम्हां दोघांच्या मनांत उत्पन्न झाली आणि मन अस्वस्थ झालें, म्हणून शहर नीट पाहण्याचा विचार सोडून देऊन, काम झाल्याबरोबर लागलींच आम्ही परत लंडनला आलों. परंतु जो केंब्रिज शहराचा भाग नजरेखालून गेला, त्यावरून तें शहर सुंदर ठेवणीचें आणि प्रशांत असावें असें वाटलें. शहरांतून वाहत जाणारी नदी पाहून मात्र, हा कालवा आहे कीं नदी आहे असें कोडें पडलें. कारण, येथली नदी हिंदुस्थानांतील एखाद्या लहानशा नदीच्या मानानेंसुद्धां फारच लहान आहे, व आमच्या येथल्या एखाद्या लहानशा कालव्याप्रमाणें दिसते.

## तारीख ७ ऑक्टोबर

आम्हीं Woolworth (वुलवर्थ) च्या एका दुकानांत गेलों. या नांवाच्या अमेरिकन दुकानाच्या शाखा लंडन शहराच्या पेठेपेठेनें आहेत, व दुसऱ्या कांहीं शहरांतसुद्धां केव्हां केव्हां नजरेला पडतात. या दुकानांत घरांत उपयोगी पडणाऱ्या लहानमोठ्या सर्व वस्तु विकत मिळतात. व मौज ही कीं प्रत्येक वस्तूची किंमत कांहीं दुकानांत ३ पेन्स (= ३ आणे) व कांहीं दुकानांत ६ पेन्स (= ६ आणे) यांवर असत नाहीं. समजा, आपल्याला एक चहाच्या सामानाचा सेट घ्यावयाचा आहे, तर पेल्या-बशीला ३ आणे, दुधाच्या भांड्याला ३ आणे, साखरेच्या भांड्याला ३ आणे, अशा तऱ्हेनें किंमती पडून, एका सेटला एकंदर रुपया, दीड रुपया पडेल. अशा स्वस्त वस्तु या दुकानांत मिळत असल्यामुळें, येथें सदा लोकांच्या झुंडी दृष्टीला पडतात. कांहीं मोठ्या शाखांमध्यें खरेदी करून थकलेल्या माणसांना खाण्याचे जिन्नस अति स्वस्त दरानें विकत मिळण्याचीही सोय आहे. फण्या, कातऱ्या, मण्यांच्या माळा, चिनी मातीचें सामान, स्वयंपाकाचीं भांडीं, झाडांचें बीं, पत्रें लिहावयाचे कागद, बटणें, काय वाटेल तें सामान येथें मिळतें; त्यामुळें, यांपैकीं एखाद्या दुकानांत फिरून पाहतां पुष्कळ उपयोगी व स्वस्त वस्तु नजरेंत येतात. आम्ही लहानसहान वस्तु Woolworth च्या दुकानांतून पुष्कळदां खरेदी केल्या.

आम्हीं हिंदुस्थानांतून आलेलीं पाहून येथला एक मनुष्य आमच्याकडे एकदोन वाक्यें हिंदुस्थानी भाषेंत बोलला.

याच दिवशीं आम्हीं British Museum (ब्रिटिश म्युझियम्) नांवाचें प्रसिद्ध पदार्थसंग्रहालय पाहिलें. पृथ्वीवरील सर्व देशांतील लहान-मोठ्या, नव्याजुन्या अशा सर्व वस्तूंचा येथें संग्रह केलेला आहे, तो सर्व नीट पाहावयाचा असल्यास किती महिने लागतील कोणाला ठाऊक! शिवाय, सर्वसाधारण मनुष्याला या सर्वच वस्तु पाहण्यांत तितकी गोडीही

वाटत नाहीं. आम्ही साधारणपणें सर्व वस्तूंवरून नजर फिरविली. There's nothing new under the Sun (जगांत नवीन वस्तु अशी कांहींच नाहीं) अशी एक इंग्रजी म्हण आहे, तिचें सत्य आम्हांला येथें पटलें. तीनचार हजार वर्षांच्या जुन्या खुर्च्या, जोडे, वहाणा वगैरे येथें पाहिलेलें कांहीं सामान हल्लीं वापरांत असलेल्या नमुन्याबरहुकुम दिसलें. ऊर (Ur) नांवाच्या एका अति प्राचीन शहरांतील खणून काढलेल्या जुन्या थडग्यांमधून निघालेलीं कांहीं सोन्याचीं भांडीं पाहिलीं, तीं आज आपण घरांत वापरींत असलेल्या भांड्यांसारखीं दिसलीं. आमटी वाढण्याचें टोंकदार भांडें, गाळणी, पडगीचा पेला अशीं हीं सुबक घाटाचीं व इतकीं जुनीं भांडीं पाहून आश्चर्य वाटलें. Elgin Marbles (एलगिन मार्बल्स) या नांवानें प्रसिद्ध असलेले जुने संगमरवरी पुतळे एका दालनांत पाहिले. जुन्या इजिप्शियन लोकांना मृत माणसांचीं व जनावरांचीं शरीरें वर्षानुवर्ष खराब झाल्याशिवाय ठेवण्याची कला माहीत होती. तशा तऱ्हेनें राखून ठेविलेलीं कित्येक हजारों वर्षांपूर्वींचीं माणसें व जनावरें येथें ठेविलेलीं आहेत. या मृत शरीरांवर कपड्याच्या पुष्कळ पट्ट्या गुंडाळून, मग तीं त्या त्या आकाराच्या लाकडाच्या पेट्यांत घातलेलीं आहेत; व लाकडावर रंगीत काम केलेलें आहे. ते रंग आजसुद्धां ताजे दिसतात. अशा तऱ्हेनें सुकवून ठेविलेल्या जनावरांत मांजरें, साप, पाली, वगैरे पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें. पण सर्वांत नवल वाटण्याजोगी गोष्ट म्हणजे, हजारों वर्षांपूर्वीचें इजिप्त देशांतील एक थडगें जसेंच्या तसें जमिनींतून खोदून काढून येथें कांचेखालीं झांकून ठेविलें आहे. त्यांत जें मृत शरीर आहे तें अजून जसेंच्या तसें आहे; म्हणजे, तो नुसता हाडांचा सांपळा नसून, शरीरावर कातडी व डोक्यावर थोडे केसही आज इतक्या वर्षांनंतर दृष्टीस पडतात. या संग्रहालयांतच Rosetta Stone (रोझेटा स्टोन) नांवाचा प्रसिद्ध दगडाचा तुकडा ठेविलेला आहे. या दगडामुळें इजिप्त देशामधल्या एका जुन्या भाषेची किल्ली माणसांच्या हातांत आली, आणि त्यामुळेंच हा दगड फार महत्त्वाचा झाला आहे. दोन हजार वर्षां-

पूर्वीचा कांहीं एक लेख या दगडावर तीन निरनिराळ्या भाषांत कोरलेला आहे. या तीन भाषांपैकीं एक भाषा ग्रीक व एक जुनी इजिप्शियन ही असल्यामुळें, ग्रीक भाषेच्या आधारानें त्या जुन्या इजिप्शियन भाषेचा उलगडा झाला.

रात्रीं New India Restaurant ( न्यू इंडिया रेस्टोरा ) नांवाच्या एका हिंदी दुकानांत देशी जेवण आम्हीं जेवलों. रस्त्यानें जातांना कांहीं मजेदार यंत्रें पाहिलीं; त्यांपैकीं एकांत लहान बाहुल्या करून त्या फुटबॉलच्या खेळाकरितां उभ्या केल्या होत्या, व इतर सर्व फुटबॉलच्या सामन्याचें सामान तयार होतें. एका फटींतून एक दोन 'पेनी 'चीं नाणीं आंत टाकून यंत्राची मूठ फिरवल्याबरोबर खऱ्या सामन्यासारखा बाहुल्यांचा सामना सुरू होऊन लागलीच एक बाजू जिंकली. त्याबरोबर यंत्र थांबलें. अशा तऱ्हेचीं निरनिराळ्या खेळांचीं हालतीं करमणुकीचीं चित्रें पुढें आम्हांला पुष्कळ ठिकाणीं आढळलीं.

## तारीख ८ ऑक्टोबर

दुकानांत थोडीशी खरेदी केली, व दुपारच्या जेवणाला आमची मित्र-मंडळी व्हॅानबॉक्स यांच्या घरीं गेलों.

## तारीख ९ आक्टोबर

आज वनी आपल्या कॉलेजांतील ' टर्म्स ' भरण्यासाठीं केंब्रिजला गेला आणि माझी आतेबहीण सुलभा आम्हांला भेटायला आली.

## तारीख १० ऑक्टोबर

थोडीशी खरेदी केली, आणि शफीच्या हिंदी दुकानांत रात्रीचें जेवण जेवावयास गेलों. येथें श्री. घोशाल, आय. सी. एस. हे भेटले. रात्रीं Cochran's Review ( कॉकरन्स रिव्ह्यू ) नांवाचा खेळ पाहावयास गेलों. एखाद्या नाटकाप्रमाणें पहिल्यापासून शेवटपर्यंत एक गोष्ट या खेळांत नव्हती. शाळेंतील बक्षीससमारंभाचे वेळीं ज्याप्रमाणें लहानलहान संभा-

घर्णें, गाणीं वगैरे निरनिराळे करमणुकीचे प्रकार एकामागून एक दाखविण्यांत येतात, त्याप्रमाणें या खेळामध्यें पुष्कळ लहानलहान गोष्टी होत्या.

## तारीख ११ ऑक्टोबर

येथें बरींच वर्षें स्थायिक होऊन राहिलेल्या दक्षिणी बाई श्रीमती मावळंकर यांच्याकडे चहाला गेलों. लंडन शहराच्या एका बाजूला कमी गर्दीच्या भागीं असलेल्या त्यांच्या स्वतःच्या बंगल्यांत आम्हीं गेलों. तेथें मोटरबसनें जाण्यास एक तास लागला. तिकिट देणाऱ्या माणसाला आम्हांला कोठें उतरावयाचें होतें तें सांगितल्याबरोबर तो म्हणाला,

'तुम्हांला कोठल्या बंगल्यांत जावयाचें आहे तें मला माहीत आहे; मी तुम्हांला बरोबर तेथें उतरवितों.'

या त्याच्या बोलण्यावरून आम्हांला कळून चुकलें कीं मावळंकरांच्या घरीं इतकी हिंदी मंडळी जात असावी कीं, त्यामुळें त्या बाजूला कोणीही हिंदी मंडळी जावयास निघाली, म्हणजे ती त्यांच्याच घरीं जात असणार असा तर्क त्या तिकिट देणाऱ्यानें काढला असावा. असो. या बाईंची व आमची प्रत्यक्ष भेट पूर्वी कधींही झालेली नव्हती. नवीनच ओळख होऊन सुद्धां, आमचें बोलणेंचालणें बराच वेळ मोकळेपणानें झालें. यांचा हा बंगला चांगला मोठा असून बाहेर बागही होती.

रात्रीं पुनः शफीच्या दुकानांत जेवावयास गेलों. येथें नेहमीं पुष्कळ माणसें जेवावयास आलेलीं दिसलीं. त्यामुळें हिंदुस्थानांतील ओळखीचीं माणसें येथें पुष्कळदां दिसत. आज पुनः घोशाल भेटले; व आमच्याच आगबोटीनें विलायतेला आलेल्या सौ. नेहरू याही दिसल्या. येथें कधींकधीं इंग्रज मंडळीही जेवावयास आलेली दिसे. आज दोन मडमा हिंदी तऱ्हेची साडी नेसून जेवावयास आल्या होत्या.

## तारीख १२ ऑक्टोबर

आजचा दिवस फार छान होता म्हणून आम्ही येथला प्रसिद्ध (Kew Gardens) (क्यू गार्डन्स) हा बाग पाहावयास गेलों.



" हुंदक्यांचा पूल "-व्हेनिस् [ पृ. ९



दुधी भोपळा, कारलें वगैरे आमच्या देशच्या भाज्या असलेली क्यू बगिच्यांतली कांचेची इमारत [ पृ. ४०

वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीनें या बागेची उभारणी झाली असल्यामुळें, येथें पृथ्वीवरील निरनिराळ्या खंडांतील हजारों झाडें, फुलें व फळें पाहावयास मिळतात. बागेचा विस्तार फारच मोठा असल्यामुळें, सगळा बाग पाहणें उरकणार नाहीं हें जाणून आम्हीं बागेचे विशेष भाग पाहून घेतले. जेथेंतेथें हिरव्यागार हिरवळी, त्यांमधून जाणाऱ्या लांबलांब पाय-वाटा, मोठमोठ्या झाडांचे मधूनच दिसणारे समुदाय, अशा ठिकाणीं दिसणारें एखादें तळें व त्यांतील बदकें व काळ्या मानेचे पांढरे राजहंस पक्षी, हिरवळीवर फिरणारे बगळे, फुललेल्या गुलाबांचे व इतर डोळ्यांत भरणाऱ्या रंगांच्या फुलांचे वाफे, झुडपांची रांग सारखी कापून तयार केलेली 'झाडांची भिंत' अशीं मनोहर दृश्यें आमच्या नजरेला सारखीं पडत होतीं; त्यामुळें, माझा कॅमेरा बरोबर न्यावयास विसरलें याचें मला फार वाईट वाटलें. उष्णकटिबंधांत होणाऱ्या वनस्पति व झाडें येथल्या थंड हवेंत जगणें शक्य नाहीं म्हणून त्यांच्यासाठीं मोठमोठ्या सबंध कांचीच्या अशा इमारती बांधून, त्यांत तीं झाडें लाविलीं आहेत. या कांचीच्या इमारतींत उंचउंच माड, सुपारी, ऊंस, संत्र्याचें झाड, घोसाळें, दुध्या भोपळा, लाल भोपळा, आळूं, मिरच्या, अशा अस्सल देशी वस्तु पाहून फार कौतुक व आनंद वाटला. भोपळे, घोसाळीं, संत्रीं झाडांवर लटकलेलीं होतीं. दुसऱ्या कांचीच्या इमारतींत नानाविध रंगांचीं अनेक फुलें पाहिलीं व त्यांत आपल्याकडील साधीं सदाफुली व रानटी पटकुळीचीं फुलें पाहून मौज वाटली. कांहीं लहान जंतुभक्षक वनस्पतिही आम्हीं येथें पाहिल्या. यांच्या पानांवर एक प्रकारचा चिकट गोंदीसारखा पदार्थ असतो; त्यावर लहानसा किडा बसला असतां, तो तेथेंच चिकटून राहून मरतो. अशाच तऱ्हेचें एक मजेदार pitcher plant (पिच्चर प्लांट) नांवाचें झाड आम्हीं येथें पाहिलें; तोंड धुण्याचें पाणी नेण्यास 'जग' नांवाचें जें इंग्रजी पद्धतीचें भांडें असतें, त्या आकाराचीं सुंदर फुलें या झाडाला येतात, व त्या फुलांतील मध पिण्यासाठीं जेव्हां जंतु त्यांत जातात तेव्हां ते तेथें पकडले जाऊन तेथेंच त्यांचा अंत होतो. बागेंतील

असल्या रम्य वस्तु पाहतां पाहतां बरीच संध्याकाळ झाल्यामुळें, आम्हीं जवळच असलेल्या एका अगदीं लहान दुकानांत चहा घेण्यासाठीं गेलों. उन्हाळ्यांत मोकळ्या हवेंत बसण्यासाठीं आपल्या येथें जसा मांडव घालतात, त्यासारख्या एका लहानशा मांडवांत बसून चहा प्याल्यावर आम्हीं घरीं परत आलों.

रात्रीच्या जेवणासाठीं आम्हीं दुसऱ्या एका लहानशा चिनी दुकानांत गेलों; पण तेथले सर्व पदार्थ बेचव व विलक्षण वासाचे असल्यामुळें, आम्हांला दोघांनाही जेवण गेलें नाहीं, आणि मन अगदीं विटून गेलें.

## तारीख १३ ऑक्टोबर

उत्तरेकडे Mexborough (मेक्सबरा) या गांवीं डॉक्टर राम हे हिंदी डॉक्टर आज पुष्कळ वर्षे स्थायिक झालेले आहेत; ते २५ वर्षांपूर्वी जेव्हां आमचे स्वतः विलायतेंत अभ्यास करीत होते तेव्हांचे त्यांच्या ओळखीचे असल्यामुळें, आम्हीं त्यांच्या आग्रहावरून त्यांच्याकडे चारपांच दिवस राहावयास गेलों. सकाळीं लंडन शहर सोडतांनाच मला खोकला सुरू झाला होता. तो संध्याकाळपर्यंत जास्त वाढून थोडा तापही आल्यामुळें, माझे हे दोनचार दिवस असेतसेच गेले. या सर्व कुटुंबानें आम्हीं परक्या ठिकाणीं आहोंत असें मात्र आम्हांला मुळींच वाटूं दिलें नाहीं. यांच्या येथें आपल्या तऱ्हेचे जेवणाचे प्रकार खावयास मिळाले. यांच्या येथें कामाला असलेली इंग्रज मुलगीही त्यांपैकीं कांहीं प्रकार करावयास शिकली आहे असें मला सौ. राम यांनीं सांगितलें.

मेक्सबरा गांव लहान आहे पण तो रम्य व शांत वाटला. जवळपास खाणींत काम करणाऱ्यांची वस्ती असून त्यांत डॉक्टरसाहेबांची प्रॅक्टिस बरीच असल्यामुळें, त्यांनीं आपल्या मदतीला म्हणून हाताखालीं एक दोन डॉक्टर घेतले आहेत. त्यांचें राहतें घरही त्यांच्या मालकीचें आहे. इतकीं वर्षे येथें राहिल्यामुळें व त्यांच्या सर्व मुलांचा जन्मही येथेंच झाल्यामुळें, घरांतील सर्व बायका इंग्रजी पद्धतीचाच पोषाख करतात. एक दिवस घरां-

तील कांहीं मंडळी बरेच मैल दूर असलेल्या Sutton ( सटन् ) या गांवीं मोटरमधून गेली, व सर्व दिवस तेथें डॉक्टर रामच्या दुसऱ्या एका हिंदी मित्राकडे घालवून संध्याकाळीं परत घरीं आली. स्वतः त्यांच्याबरोबर गेले. पण माझा ताप नुकताच गेला असल्यामुळें मी गेलें नाहीं. त्या दिवशीं संध्याकाळीं डॉक्टरांच्या सर्वांत लहान मुलीनें मला बोलपट पाहावयास नेलें. तो बोलपट Disraeli ( डिसरायली ) या नांवाचा असून, सुएझचा कालवा बांधण्याच्या वेळचें राजकारस्थान त्यांत दाखविलें होतें. चित्र फारच परिणामकारक होतें. व त्यांतील प्रसिद्ध मुत्सद्दी डिसरायली याची भूमिका छान वठली होती. ही भूमिका Arliss ( आरलिस् ) या नांवाच्या गृहस्थांनीं घेतली असून, ती त्यांची एक प्रसिद्ध भूमिका म्हणून ठरलेली आहे. हा बोलपट दाखवायचे आधीं पहिल्यानें दुसरीं कांहीं चित्रें दाखविलीं. त्यांत नुकत्याच कांहीं दिवसांपूर्वी R101 ( आर१०१ ) नांवाच्या इंग्रजी आकाशनौकेंत जळून खाक झालेल्या जवळ जवळ ५० माणसांच्या स्मशान-यात्रेचें हृदयस्पर्शी चित्र होतें.

## तारीख १७ ऑक्टोबर

मेक्सबराहून मोटारमधून डॉकॅस्टर शहरीं जाऊन तेथें आगगाडींत बसलों. यॉर्क या प्रसिद्ध शहरीं गाडी बदलून, लंडनहून एडिंबराला अतिशय जलद जाणाऱ्या Flying Scotsman ( फ्लाइंग स्कॉटस्मन ) नांवाच्या गाडींत बसलों, आणि संध्याकाळीं एडिंबरा शहरीं पोंहचलों. आगगाडींतून जेथें तेथें हिरवींगार कुरणें व मधून मधून भाजीपाल्यांचे मळे पाहून आनंद वाटे. संध्याकाळीं एडिंबराला पोंचून आम्ही Grosvenor Hotel ( ग्रव्हनर् होटेल ) मध्यें उतरलों.

## तारीख १८ ऑक्टोबर

जव ( याला इंग्रजींत 'ओटस' म्हणतात ) हें धान्य स्कॉच् लोकांच्या विशेष आवडीचें असल्यामुळें येथे त्याची भाकरी पहिल्यानेंच

खाली. रंगानें व आकारानें ती जवळजवळ आपल्या जोंधळ्याच्या भाकरीप्रमाणें दिसली, आणि खाण्यासही ती कांहीं वाईट लागली नाहीं.

आज स्कॉटलंड देशाच्या इतिहासांत प्रसिद्ध असलेला 'होलीरुड' राजवाडा पाहण्यास आम्ही गेलों. हा अगदीं गांवाबाहेर असून, त्याच्या आसपास डोंगर वगैरेचा देखावा दिसतो. राजवाड्यांतील जुन्या खोल्या जशाच्या तशा कायम ठेविल्या आहेत. मेरी राणीची (Mery Queen of Scotts) निजावयाची खोली, तिच्या नवऱ्याची खोली, ती निजत होती ते पलंग त्यांच्या रेशमी जाळ्यांपडद्यांसकट, एका कोणाचा खून झालेली जागा, वगैरे त्यावेळची आठवण करून देणाऱ्या वस्तु व ठिकाणें आम्हीं पाहिलीं. भिंतींवर जुन्या काळच्या रंगीत वेलबुट्टया व चित्रें आजही जशींच्या तशीं आहेत. राजवाड्याचा कांहीं मठासारखा भाग थोडाबहुत पडलेला आहे. पण त्याचा जो अवशेष आहे त्याचें दगडी बांधकाम व नक्षीकाम अजूनही सुरेख दिसतें. याशिवाय राजवाड्याचा सध्यां वापरांत असलेला एक विशिष्ट भाग आहे, तेथें इंग्लंडच्या राजेसाहेबांचा कोणी प्रतिनिधि मधून मधून राहतो. या भागातील दालनें उत्तम लाकडी सामाना ( फर्निचर ) नें शृंगारलेलीं आहेत. येथें व्हिक्टोरिया राणीसाहेब व त्यांचे यजमान यांच्या वापरांत असलेल्या खोल्याही आम्हीं आंतल्या सामानासकट पाहिल्या. रंगीत चित्रें आंत विणलेलीं आहेत असे जुने गालिचे व ज्या कपड्यानें खुर्च्या मढवलेल्या आहेत त्यावर असलेलें त्या वेळच्या सुखवस्तु स्त्रियांनीं केलेलें कशिद्याचें काम आम्हीं तेथें पाहिलें. तेथें एक पुष्कळ मोठें दालन आहे, त्याच्या सर्व भिंतींचें, वगैरे एकदर सगळें लाकूड फक्त एक झाड कापून त्यापासून तयार केलेलें आहे; इतकें मोठ ते झाड होतें.

हा जुना राजवाडा पाहून झाल्यावर आम्हीं एडिंबराचा जुना किल्ला पाहावयास गेलों. हा एका टेंकडीवर असून, याच्या पायथ्याशीं एडिंबराचें नवे शहर आहे, त्यामुळें येथून खालीं असलेल्या शहराचा व पलीकडे दूर असलेल्या समुद्राचा छान देखावा दिसतो. गेल्या महायुद्धांत रणांगणांत पडलेल्या स्काच लोकांचें एक अतिशय भव्य स्मारक येथें उभारलेलें आहे.

त्या इमारतींत सैन्यांतील प्रत्येक पलटणीची आठवण देण्यासाठीं एक एक कोपरा निरनिराळा ठेवला आहे. तेथें कोरीवकाम व नक्षीकाम करून, कोणत्या पलटणीचें तें स्मारक आहे तें लिहिलें आहे, व त्या त्या पलटणीं-तील युद्धांत पडलेल्या लोकांचीं नांवें लिहून तीं पुस्तकें त्या त्या ठिकाणीं ठेविलीं आहेत.

हें पाहून झाल्यावर आम्ही 'प्रिन्सेस स्ट्रीट' नांवाच्या येथल्या मुख्य रस्त्या-वर असलेल्या एका चांगल्याशा दुकानांत जेवावयास गेलों; व जेवून झाल्यावर या रस्त्यावरून शहराची शोभा पाहण्यासाठीं थोडींशीं येथेंतेथें फिरलों. प्रशस्त रस्ता; त्याच्या एका बाजूला सर्व इमारती; दुसऱ्या बाजूला थोडथोड्या अंतरावर प्रसिद्ध स्कॉच लोकांचे मोठमोठे पुतळे; त्यांच्यामध्येंही विशेष उठाव रीतीनें दिसणारा पांढरा शुभ्र व वरतीं नक्षीकाम केलेलें छत्र असलेला असा प्रसिद्ध कवि व कादंबरीकार सर वॉल्टर स्कॉट याचा पुतळा; या पुतळ्यांच्या ओळीच्या पलीकडे मजल्यामजल्यानें उतरत जाऊन खालीं खोलांत गेलेली आणि हिरवळ व सुंदर फुलांच्या वाफ्यांनीं भरलेली मोठी बाग; व पलीकडे उंच टेकडीवर नजरेंत भरणारा तो जुना किल्ला आणि त्यालाच लागून असलेला शहराचा जुना भाग; हें दृश्य फार मनोहर होतें यांत शंका नाहीं; पण आदल्या दिवशीं संध्याकाळीं या शहरांत आल्यापासून मला थोडासा ताप व दमा सुरू झाल्यामुळें, हें सर्व पाहणें मला कसेंबसें तरी उरकून घ्यावें लागलें; कारण ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशींच पुढल्या मुक्कामाला जाणें आम्हांला भाग होतें, व हा बेत बदलण्यांत कांहीं अडथळे आड येत होते. म्हणून धांपा टाकीत, हळूहळू चालत, कशीतरी एकदांची सर्व गोष्टीं-वरून नजर फिरवीत असें हे शहर मला पाहावें लागलें. यामुळें माझी थोडी निराशाच झाली.

मॅक्सवराच्या डॉ. रामची एक डॉक्टर मुलगी येथल्या एका इस्पितळांत काम करीत होती. ती रात्रीच्या जेवणानंतर आमच्या हॉटेलांत आम्हांला भेटण्यासाठीं आली, व आम्हीं पुष्कळ उशीरापर्यंत तिच्याकडे बोलत बसलें होतों.

# तारीख १९ ऑक्टोबर

सकाळीं डॉ. कु. राम हिच्या इस्पितळांत जाऊन तिच्या खोलींत आम्हीं थोडा वेळ बोलत बसलों, आणि नंतर तिला बरोबर घेऊन दुपारच्या जेवणासाठीं म्हणून बाहेर पडलों. तो रविवारचा दिवस होता. इंग्लंडमध्यें व विशेषतः स्कॉटलंडमध्यें या दिवशीं शहरांतील जीवन एकाएकीं नाहींसें झाल्यासारखें दिसतें. बहुतेक सर्व दुकानें बंद, रस्त्यावरची मोटरींची व माणसांची गर्दी एकदम कमी असा उदासवाणा देखावा या दिवशीं जेथें तेथें नजरेला पडतो. जेवण्याचीं मोठमोठीं दुकानें बंद असल्यामुळें, शेवटीं एका लहानशा दुकानांत आम्हीं गेलों. दुकान आंतून स्वच्छ, मजेदार व शांत होतें. आमच्याशिवाय दुसरें कोणीं फारसें तेथें नव्हतेंच. आम्हीं कांहीं वस्तु मागविल्या त्या मुद्दाम तयार करून आणीपर्यंत वेळ लागला. आधींच, डॉक्टरीणबाईच्या तयारीला थोडा वेळ मोडला होता; त्यांत आणखी हा वेळ गेला; त्यामुळें जेवण्यास जरा घाईच झाली. त्यांत आणखी रविवार असल्यामुळें टॅक्सीही लौकर मिळेना. शेवटीं जेमतेम हॉटेलमधलें सामान घेऊन स्टेशनावर जाऊन तिकिटें काढतों, तों गाडी निघावयाची वेळ झाली. मोठ्या मुष्किलीनें आम्हांला ती गाडी मिळाली. आणि स्वतःच्या मनाला एकदां शांतता आली. जी आम्हीं मंडळी गाडीच्या आधीं अर्धा अर्धा तास स्टेशनावर जाऊन बसणारी, त्या आम्हांला जर ही गाडी चुकली असती तर तो प्रसंग पहिला आणि शेवटचाच झाला असता.

आम्हीं ग्लासगो शहरीं जाण्यास निघालों होतों. आगगाडींतून देखावा फार छान दिसत होता. जेथें तेथें कुरणें, मधून मधून लागणारीं लहान लहान घरांचीं लहान लहान गांवें, लहान लहान आगगाडीचीं स्टेशनें, उंच सखल टेकडीवजा प्रदेश, मधून मधून रानवट प्रदेश असा हा देखावा होता. संध्याकाळीं आम्ही ग्लासगोला पोंचलों.

तो रविवार असल्यामुळें स्टेशनावर एखाद दुसराच पोर्टर होता. त्यामुळें जरा पोर्टर मिळण्यास त्रास पडला. शेवटीं एकदां सर्व व्यवस्था

ठीक होऊन, आम्ही Grand Hotel ( ग्रँड् होटेल ) मध्यें राहावयास गेलों. होटेल नांवाप्रमाणेंच उत्तम होतें. आमची खोली प्रशस्त व आराम-शीर असून, हॉटेलमधलें जेवण अगदीं पहिल्या नंबरचें चांगलें होतें. आम्ही खोलींत पहिल्यानें आल्याबरोबर एक चमत्कारिक गोष्ट झाली. आम्हीं खोलीचें दार ओढून घेतलें होतें तें कांहीं केल्या आम्हांला उघडतां येईना. किती उपाय केले, पण दाराला आपोआप कुलूप पडण्याची व्यवस्था अस-ल्यामुळें तें बंद झालें होतें, व तें उघडण्याची युक्ति आम्हांला माहीत नव्हती. शेवटीं आम्हीं खोलींतली विजेची घंटा दाबली, त्याबरोबर आमची काम करणारी बाई येऊन तिनें बाहेरून किल्ली लावून आमचें दार उघडलें. व मग आम्हांला तिनें त्या कुलपाची युक्ति दाखविली.

नंतर आम्हीं जराशीं Kelvin Park ( केल्व्हिन् पार्क ) नांवाच्या मोठ्या बागेंत फिरावयास गेलों. बागेंमधून नदी वाहत होती व नदीच्या पलिकडे टेंकडीवर या शहराच्या युनिव्हर्सिटीची इमारत दिसत होती. दूर अंतरावर पुष्कळ इमारती टेंकडीवर असल्याप्रमाणें दिसत होत्या, त्यावरून आमच्या लक्षांत आलें कीं या गावांसभोंवतींचा प्रदेश बराच उंच सखल असावा.

## तारीख २० ऑक्टोबर

Loch Lomond ( लॉक लोमंड ) हें स्कॉटलंड देशांतील अतिशय प्रख्यात, गोड्या पाण्याचें सरोवर पाहण्याकरितां आम्हीं सकाळीं आगगाडीनें निघालों. वाटेंत या शहराचें वैभव, म्हणजे मोठमोठे कारखाने, क्लाइड या नदीचें बंदर, त्यांतील आगबोटी, वगैरे देखावे दिसले. प्रसिद्ध सिंग-रच्या शिवण्याच्या यंत्रांचा कारखानाही वाटेंत लागला, व त्यावरूनच नांव पडल्यामुळें कीं काय, एक ' सिंगर ' नांवाचें स्टेशनसुद्धां लागलें. हा सर्व प्रदेश उंचसखल व डोंगराळ असा दिसला. Balloch Pier ( बॅलॉक पिअर ) या स्टेशनावर आगगाडींतून उतरून, आम्ही धक्कयावर जाऊन लहान आगबोटींत चढलों. या बोटींतून Loch Lomond सरोवराची

सुमारें २५ मैलांची लांबी आम्ही पाळथी पाडली. आजूबाजूच्या रम्य देखाव्यामुळें हा प्रवास फार आल्हाददायक वाटला. सरोवराच्या रुंद पात्राच्या आजूबाजूला लहानमोठे डोंगर होते, व त्यांवर असलेल्या झाडांच्या पानांचे अनेक रंग असल्यामुळें, तो देखावा फार मनोहर दिसत होता. या ऋतूंत दिसणाऱ्या पिवळा, हिरवा, गुलाबी, तांबडा, तपकिरी, वगैरे रंगांचें या झाडांवर मिश्रण झालें होतें. सरोवराच्या बाजूला वसलेलीं लहान लहान खेडीं मध्यें लागत, तेव्हां उतारूंना उतरण्या व घेण्याकरितां बोट तेथें जराशी थांबे; तेव्हां त्या खेडेगांवांतलीं लहानशीं टुमदार घरें पाहून, आपल्याला या अशा ठिकाणीं एक दोन दिवस राहावयास मिळालें तर काय बहार होईल असें मला वाटे. कारण इंग्लंड देशांतील खेडेगांवांत व आपल्या येथल्या खेडेगांवांत हा मोठा फेर मला दिसून आला कीं, येथलीं खेडेगांवांतलीं घरेंसुद्धां मोठमोठ्या हवेल्यांप्रमाणें चुना व विटांचीं असतात. त्यांचा आकार मात्र लहान असतो व त्यांत सोई वगैरे मोठ्या बंगल्यापेक्षां कमी असतील एवढेंच; आपल्याकडील अगदीं गरीब लोकांच्या मातीच्या भिंतींच्या चंद्रमौळी घरांसारखीं घरें तेथल्या खेडेगांवांत मला कधीं दिसलीं नाहींत. प्रवासी लोकांच्या सोईकरितां या खेडेगांवांत सुद्धां एखादें दुसरें होटेल दिसत होतें. एक दोन ठिकाणीं या खेडेगांवाच्या बाजूला धबधबे वाहत असलेले दिसले.

Rob Roy (रॉब रॉय) नांवाचा जो प्रसिद्ध स्कॉच लुटारू होऊन गेला, त्याची राहावयाची गुहा याच सरोवराच्या बाजूला आहे. ती जागा आम्हांला बोटींतून जातां जातां दिसली, आणि सरोवराच्या बाजूनें जाणारा मोटरचा रस्ता व आगगाडीचे रुळही लांब दिसत होते.

जेव्हां बोट Ardlui ( आर्डलुइ ) या खेडेगांवीं शेवटीं थांबली, तेव्हां बोट परत जावयास दोन तासांचा अवकाश असल्यामुळें आम्ही सरोवराच्या कांठीं उतरून जरा येथें तेथें फिरलों. तेथलें लहानसें आगगाडीचें स्टेशन व पोस्ट ऑफिस पाहून मौज वाटली. थोडीं घरें, एक होटेल, झाडेंझुडपें व झुळझुळ वाहणारे ओढे यांच्या आजूबाजूला जरा फिरून पाहिल्यावर,

पाऊस आल्यामुळें आम्हीं पुनः बोटीवर गेलों, आणि दुपारचें जेवण बोटीवरच घेऊन त्या रम्य सरोवरांतून परत येण्यास निघालों.

## तारीख २१ ऑक्टोबर

आज ग्लासगो शहर सोडून, उत्तर इंग्लंडांतील मोठमोठ्या सरोवरांच्या कांठीं असलेल्या प्रदेशांतील ( या प्रदेशाला The Lake District असें म्हणतात) ग्रासमिअर या गांवीं जाण्यास आम्हीं निघालों. वाटेंत आगगाडींतून दिसणारा देखावा फार भव्य वाटला. टेंकड्या, त्यांवर रानें, जोरानें वाहणाऱ्या नद्या व नाल. हिरवींगार कुरणें व त्यांतील गुरें, आणि मधून मधून दिसणारीं शेतकऱ्यांचीं घरें असा हा मिश्र देखावा मनोहर वाटला.

केसिक ( Keswick ) या गांवीं आम्ही आगगाडींतून उतरलों व स्टेशनावरून शहरांत जाण्यासाठीं एका घोड्याच्या गाडींत बसलों. आमच्या बरोबर एक अमेरिकन मुलगी या गाडींत होती. तिच्याकडे आम्हीं बोलावयास सुरुवात केली. तीही आमच्यासारखीच ग्रासमिअरला जावयास निघाली होती. केसिक गांवांत पोंचल्यावर आम्ही गाडींतून उतरून ग्रासमिअरला जाणाऱ्या मोटरची वाट पाहत राहिलों. गांव लहानसा, मजेदार दिसला. मोटर सर्व्हिसच्या ऑफिसाच्या दारांत आम्हीं उभीं राहिलों असतां, त्या अमेरिकन मुलीनें समोरच्या लहानशा फळांच्या दुकानांतून दोन पेअर्स फळें खरेदी करून, त्यांतलें एक मला खावयास दिलें.

कांहीं वेळानें आम्ही मोटरींत बसून पुढें निघालों. वाटेंत सारखा बारीक पाऊस पडत होता मधून मधून मोठमोठ्या सरोवरांच्या बाजूंनीं आम्हीं जात होतों. रस्त्याच्या बाजूला लागणाऱ्या टेंकड्यांवरील झाडांच्या पानांवर या ऋतूंत दिसणारे निरनिराळे रंग चढले होते; पिवळट हिरवा, तपकिरी, गुलाबी असे हे रंग फार मनोहर दिसत होते. टेंकड्यांवरून पाण्याचे ओढे वाहत होते व मधून मधून खेडेगांवांतील घरेंही दृष्टीस पडत होतीं.

शेवटीं एकदां आम्हीं आमच्या ठिकाणीं पोंचलों. आमचें होटेल ( Prince of Wales Hotel ) ग्रासमिअरच्या मोठ्या सरोवराच्या

अगदीं कांठावर होतें. होटेलची एकंदर जागा व बांधणी आम्हांला फार आवडली. पुढें बाग होती आणि सरोवरावर सहल करण्यासाठीं होटेलच्या लहान बोटीही होत्या.

इमारतीची बांधणी मजेदार होती. जिना चढून जाऊन, थोडेंसें चालून व पुनः दोन पायऱ्या चढून, लहान गॅलरीसारख्या जागेंतून गेल्यावर आमची खोली लागली. या खोलींतून सरोवराचा देखावा दिसत होता. होटेलच्या लहानशा टुमदार दिवाणखान्यांत बसून चहा व फराळ घेऊन, आम्हीं पाय मोकळे करण्यासाठीं जरा बाहेर पडलों. त्या लहान गांवांतील एका लहानशा शांत रस्त्यावर असलेल्या एका दुकानांतून आम्हीं प्रसिद्ध इंग्रज कवि Wordsworth ( वर्ड्‌स्वर्थ ) याच्या आठवणीसाठीं म्हणून तयार केलेल्या कांहीं धातूच्या वस्तु व त्याच्या ग्रासमिअरमधल्या लहानशा घराची एक अगदीं लहान चिनी मातीची प्रतिमा विकत घेतली. रात्रीं जेवणानंतर शेगडी पेटवून गरम केलेल्या दिवाणखान्यांत बसून आम्हीं त्या अमेरिकन मुलीशीं व दुसऱ्या मंडळींशीं थोड्या गोष्टी केल्या. होटेलांत यावेळीं फारसे लोक नव्हते. असे आमच्यासारखे दोनचार प्रवासी लोक एकदोन दिवसांकरितां आलेले होते.

## तारीख २२ ऑक्टोबर

सकाळच्या जेवणानंतर या गांवांतील देवळाकडे आम्हीं गेलों. आमच्याबरोबर आदल्या दिवशींची अमेरिकन मुलगीही होती. आम्हीं देवळाच्या आवारांत असलेलें Wordsworth ( वर्ड्‌स्वर्थ ) कवीचें अगदीं साधें थडगें पाहिलें व या कवीनें स्वतः हातानें लाविलेलें ' यू ' ( Yew ) नांवाचें झाडही पाहिलें. कवीच्या थडग्याजवळ त्याच्या कुटुंबांतील आणखी कांहीं मंडळींचीं थडगीं आहेत. देवळांत कवि ज्या बांकावर बसत असे तो बांक आणि त्याच्या स्मरणार्थ देवळाच्या भिंतीवर लिहिलेला शीळालेखही आम्ही पाहिला. हें देऊळ अति शांत अशा ठिकाणीं असून, त्याच्या बाजूनें एक मोठा ओढा वाहत आहे.

यानंतर Dove Cottage ( डव्ह कॉटेज ) नांवाचें या कवीचें अगदीं जुनें असें छोटेंसें घर पाहिलें. हें लहान घर रम्य, शांत अशा ठिकाणीं उंचसखल अशा टेंकडीवजा जमिनीवर आहे. जमीन याप्रमाणें उंचसखल असल्यामुळें, घराच्या पाठीमागची लहानशी बाग घराच्या वरच्या मजल्याच्या उंचीवर आलेली आहे; व त्यामुळें, बागेंत जावयाचें असल्यास वरच्या मजल्यावरूनच जावें लागतें. लाकडाच्या ओंड्यांचा एक लहानसा मांडव या बागेंत आहे, व घराच्या शेजारून टेंकडीवरून एक स्वच्छ पाण्याचा झरा सारखा झुळझुळ वाहत असतो. तो शांत व रम्य देखावा पाहून माझ्या मनाला आनंद झाल्याशिवाय राहिला नाहीं.

घराच्या आंतल्या खोल्या अगदीं लहानशा असल्यामुळें खेळाच्या घरकुलाची आठवण येते. येथें कवीनें व त्याच्या कुटुंबांतील माणसांनीं वापरलेल्या कांहीं वस्तु नीट सांभाळून ठेविलेल्या आहेत. कवीचे केस, त्याची दौत, मेणबत्तीचें घर, सुरेख रंगांचीं फुलें वर असलेला चहाचा पेला आणि त्याच्या हस्ताक्षराचे नमुने येथें ठेविलेले आम्हीं पाहिले. शिवाय, त्याची एक बहीण त्याच्याकडे नेहमीं राहत असे तिचा पलंग व हाततोंड धुवावयाचीं भांडीं आम्हीं येथें पाहिलीं. घराच्या स्वयंपाकाच्या खोलीच्या खिडकींतून बागेचा सुंदर देखावा दिसतो. अशा या छोट्या स्वयंपाकघरांत शेजारच्या बाजूच्या ओढ्याचें स्वच्छ पाणी आणून स्वयंपाक करण्यांत किती मौज वाटत असेल बरें ! असा विचार सहजच मनांत आला.

येथल्या एका अगदीं शांत अशा डोंगरी रस्त्यावर एक लाकडाचें फाटक आहे तें Wishing Gate ( वुइशिंगचें फाटक ) या नांवानें प्रसिद्ध आहे. या फाटकांतून आंत शिरल्यावर त्या उंचीवरून आजूबाजूच्या टेकड्या, सरोवर व वनश्री यांचा जो अतिशय रम्य देखावा दिसतो, तो Wordsworth कवीचा फार आवडीचा देखावा होता. त्यामुळें या फाटकाला फार महत्त्व आलेलें आहे, आणि तें फाटक पाहावयास गेलेल्या शेंकडों माणसांनीं फाटकाच्या लाकडावर आपलीं नांवें कोरून ठेविलीं आहेत.

नंतर जवळच असलेल्या एका मोठ्या दुकानांत आम्ही गेलों. हें दुकान म्हणजे सर्व तऱ्हेच्या जुन्या व मौल्यवान वस्तूंचें एक भांडारच होतें. टेबलें, खुर्च्यांसारखें लाकडी सामान, चिनी मातीचें सुंदर रंगीत सामान, मौल्यवान खड्यांचे दागिने, घड्याळें, चांदीचें सामान वगैरे हजारों रुपयांचा माल येथें भरलेला होता. चहाबरोबर घेण्याचें दूध ठेवण्याचीं चिनी मातीचीं एकदोन मजेदार भांडीं आम्हीं येथें पाहिलीं. हीं भांडीं गाईच्या आकाराचीं असून, या गाईच्या तोंडांतून दूध ओततां येई. गाईच्या पाठीवर ठेवलेल्या भोकांतून दूध आंत घालण्याची व्यवस्था केली होती. आणि त्यांच्या शेपट्यांचा उपयोग तीं भांडीं हातांत धरण्यास होई.

दुपारीं आम्ही दोघेंच ग्रासमिअर गांवाच्या बाजूला चालत गेलों. स्वतःनीं थोडी खरेदी केल्यावर आम्हीं पुनः जाऊन Wordsworth कवीचें थडगें पाहिलें. हे थंडीचे दिवस असल्यामुळें दुपारीं लौकरच अंधार पडला. तेव्हां एका लहानशा ठिकाणीं आम्हीं चहा पिण्यास गेलों. येथली चहा पिण्याची खोली अगदीं पृथक् बांधलेली होती. आंत लहान लहान टेबलें नीटनेटकीं व व्यवस्थित रीतीनें मांडलेलीं होतीं. खिडक्यांना सुरेख पडदे व भिंतींवर चित्रें लावून खोली सुशोभित केली होती. येथें दिव्यांच्या उजेडांत चहा घेऊन आम्ही घरीं परतलों. रात्रीच्या जेवणानंतर आदल्या दिवसाप्रमाणें दिवाणखान्यांत शेगडीच्या बाजूला बसून दुसऱ्या माणसां-बरोबर गोष्टी केल्या.

## तारीख २३ ऑक्टोबर

सकाळच्या जेवणानंतर पुनः Wishing Gate नांवाच्या फाटकाकडे आम्ही दोघें फिरायला गेलों व आजूबाजूला फिरून तेथला देखावा पाहिला. टिचभर घरें व त्यांचे टिचभर बगीचे व आजूबाजूचा रम्य प्रदेश पाहून मनाला आल्हाद झाला.

दुपारीं मोटारबसमधून Windermere नांवाच्या मोठ्या सरोवरा-जवळ असलेल्या त्याच नांवाच्या गांवाला गेलों. जातांना वाटेंत आम्हांला

आणखी लहानमोठीं सरोवरें लागलीं. Windermere गांवीं आम्हांला आगगाडींत बसावयाचें होतें; ती यावयास थोडा अवकाश असल्यामुळें, स्टेशनाजवळच असलेल्या एका अगदीं लहानशा लुटुपुटूच्या दिसणाऱ्या दुकानांत आम्हीं थोडेंसें कांहीं खाल्लें. तळलेलीं बटाट्यांचीं चाकें लहानलहान पुड्यांत घातलेलीं या देशांत विकत मिळतात, तसली एक पुडी बरोबर घेऊन आम्ही दुकानांतून निघालों आणि Liverpool (लिव्हरपूल) गांवीं जाणारी आगगाडी गांठली.

आगगाडींतून नेहमींप्रमाणें सुंदर देखावा दिसत होता. हिरवींगार कुरणें, मधून मधून लागणारे ओढे, लहान घरें आणि त्यांच्या छोट्या बागा असा हा देखावा होता. वाटेंत Lancaster (लॅन्कॅस्टर) व Preston (प्रेस्टन) सारखीं उद्योगधंद्यांसाठीं प्रसिद्ध असलेलीं कांहीं शहरें आम्हांला लागलीं; आणि संध्याकाळीं अंधार होण्याच्या सुमाराला आम्ही Liverpool (लिव्हरपूल) गांवीं पोंचलों. या गांवांत एक भलेंमोठें देऊळ बांधीत असून तें पाहण्यासारखें आहे असें कळल्यावरून, आम्ही तें पाहण्यास गेलों. तेथें पोंचेंपर्यंत चांगलाच अंधार झाला. शेवटीं दिव्यांच्या उजेडांत आम्हीं त्या देवळांतील दगडाचें सुरेख खोदीव नक्षीकाम पाहिलें; व आयर्लंड देशांतील डब्लिन गांवीं जाण्यासाठीं बोटीच्या धक्क्यावर गेलों. आम्हीं आमचें सामान आधींच येथें आणून टाकलें होतें. बोटीवरच्या बैठकीच्या खोलींत असून आम्हीं थोडा वेळ 'रेडियो' ऐकत बसलों. थोड्या वेळानें जेवून मग बोटीवरच्या लहानशा खोलींत निजावयास गेलों.

## तारीख २४ ऑक्टोबर

सकाळीं आम्ही डब्लिनला पोंचलों. येथें आम्ही Jury's Hotel (ज्यूरीज हॉटेल) मध्यें राहावयास गेलों. तेथें गेल्याबरोबर लागलींच तयार होऊन, पहिल्यानें आम्ही अगदीं जवळच असलेल्या येथल्या युनिव्हर्सिटीच्या इमारती पाहावयास गेलों. युनिव्हर्सिटीच्या आवारांत शिरल्यावर आजू-

बाजूला पुष्कळच मोठमोठ्या इमारती आम्हांला दिसल्या; व 'गाउन' (सर्व कपड्यांवरून घालावयाचा एक प्रकारचा झगा) घातलले विद्यार्थी व विद्यार्थिनीही येथून तेथून जात असलेल्या दिसल्या.

नंतर Phoenix Park (फिनिक्स पार्क) नांवाचा गांवांतील एक मोठा बगिचा पाहावयास आम्ही गेलों. हा बगिचा मुंबईतील 'राणीच्या बगिच्या' सारखा असून, याच्या एका भागांत निरनिराळ्या जनावरांचा संग्रह केला आहे. बागेतील पायवाटा छान, नीटनेटक्या असून, आमच्या-सारखे हवा खावयास आलेले पुरुष, बायका व मुलें तेथें फिरतांना आम्हांला आढळलीं. बागेतील निरनिराळ्या प्रकारच्या रंगीबेरंगी फुलांचे वाफे फार सुंदर दिसत होते. जनावरांच्या भागांत हत्ती, वाघ, सिंह, गेंडे, सुसरी, सीलमासा, वगैरे सर्व कांहीं होतें. येथें पांढरीं अस्वलें मी पहिल्यानें पाहिलीं. हीं पांढरीं अस्वलें उत्तर ध्रुवाकडच्या थंड हवेत राहत असल्या-मुळें, तीं फारशीं आपल्या पाहण्यांत येत नाहींत; कारण तीं गरम हवेत राहूं शकत नाहींत.

बाग पाहून झाल्यावर परत येऊन आम्हीं एका दुकानांत दुपारचें जेवण जेवलों; आणि नंतर ट्रॅमगाडीमध्यें बसून दूर कांहीं मैलांवर असलेल्या Hill of Howth नांवाच्या लहानशा टेकडीच्या बाजूला फिरावयास गेलों. या ट्रॅममधल्या प्रवासांत रस्त्याच्या एका बाजूला जुनीं व नवीं सुखवस्तु लोकांचीं घरें व त्यांपुढील नीटनेटक्या बागा व दुसऱ्या बाजूला समुद्राच्या बाजूच्या दलदलीच्या जागा सारख्या दृष्टीला पडत होत्या. Hill of Howth या ठिकाणीं पोंचल्यावर, सर्वभर अफाट समुद्र व समुद्राच्या बाजूला एक लहानसें खेडें असा देखावा दिसला. या ठिकाणीं आम्हीं फारसा वेळ कांहीं घालविला नाहीं; कारण अति थंड आणि अंगाला झोंबणारा असा वारा सुटला होता टेकडीवर जाणाऱ्या पायवाटेनें आम्हीं हळूहळू टेकडी चढूं लागलों, पण थोडेंबहुत वर गल्यावर इतकी थंडी भासूं लागली कीं हात काळेनिळे दिसूं लागले; त्याबरोबर आम्हीं लागलींच खालीं उतरलों. या पायवाटेच्या बाजूला कांहीं खेडेगांवच्या

लोकांचीं घरें होतीं. आधींच आयर्लंड देश ! आणि तेथल्या एका गांवाच्या कोपऱ्याचे टोंक ! तेथल्या खेडेगावच्या लोकांचा हिंदुस्थानांतील दक्षिणी तऱ्हेचा पोषाख केलेली बाई पाहण्याचा बहुतेक हा पहिलाच प्रसंग असणार ! तेव्हां मला पाहिल्याबरोबर एकदोघां मुलांनीं आंत धांवत जाऊन घरांतील इतर माणसांना मला पाहण्यासाठीं बाहेर बोलावून आणिलेलें जेव्हां मीं पाहिलें, तेव्हां मला त्यांचें कांहीं नवल वाटलें नाहीं.

## तारीख २५ ऑक्टोबर

सकाळच्या गाडीनें डब्लिनहून किलार्नी गांवाला जाण्यास आम्हीं निघालों. आमच्या डब्यांत Rev. Seale ( रे. सील ) नांवाचा एक धर्मोपदेशक होता, तो स्वतःकडे पुष्कळ गोष्टी बोलला. आश्चर्याची गोष्ट ही कीं आमच्या ओळखीचे आय. सी. एस. मधले एक बडे अधिकारी या गृहस्थाच्या ओळखीचे निघाले. आगगाडींतून दिसलेल्या देखाव्यावरून असें वाटलें कीं हा देश इंग्लंडदेशासारखा माणसांनीं गजबजलेला नसावा; व त्याचा पुष्कळ भाग शेतीभातीशिवाय मोकळा पडलेला असावा. जेथें तेथें रानवट, दलदलीसारखा प्रदेश आणि मधूनमधून ओढे नजरेस पडत होते. येथल्या दलदलींत पीट ( Peat ) नांवाचा एक पदार्थ आढळतो त्याचा सरपणाकडे उपयोग करतात. या ' पीट 'चे तुकडे कापून ठेवलेले आम्हीं कांहीं जागीं पाहिले. हा सर्व देखावा जरी रानवट होता, तरी जिकडेतिकडे हिरवेंगार दिसत होतें.

मध्यें एकदां गाडी बदलल्यावर, आम्हीं दुपारीं किलार्नी गांवीं पोंचलों आणि ' लेक होटेल ' ( Lake Hotel )च्या घोड्याच्या गाडींत बसून त्याच होटेलांत राहावयास गेलों. येथलीं जीं प्रसिद्ध किलार्नी सरोवरें पाहण्यासाठीं म्हणून आम्हीं येथें आलों होतों, त्यांतीलच एका सरोवराच्या अगदीं कांठावर हें होटेल होतें. होटेलाच्या आसपास उंच उंच झाडांची मोठी वाडी होती. वरच्या मजल्यावरच्या आमच्या खोलींत जातांयेतां सांठा करून ठेविलेल्या सफरचंदांचा छान वास येत असे. होटेलामध्यें मंडळी

काय ती दोनचारच होती; त्यामुळें कीं काय, आमच्या वांट्याला चांगली खोली आली होती. या खोलींतून समोरचा सरोवराचा रम्य देखावा अगदीं जवळ दिसे. होटेलाच्या पुढील दालनांत आजूबाजूच्या प्रदेशांत मिळणारे अनेक जातीचे पक्षी व सरोवरांत मिळणारे निरनिराळे मासे पेंढा भरून ठेविलेले होते. आंत गेल्यावर मोठ्या दिवाणखान्याच्या बाहेरील बाजूला कांचीच्या छपराचा एक लांबच लांब व्हरांडा आम्हांला दिसला. या व्हरांड्यांत 'जिरेनिअम' नांवाच्या इंग्लिश फुलांच्या कुंड्या ठेविल्या होत्या, त्यांतील लालभडक फुलांचे गुच्छचे गुच्छ पाहून मनाला फार आल्हाद वाटला.

होटेलांत आल्यावर आम्हीं चहा घेतला, आणि मग जरा बाहेर पडून शांत व रम्य अशा लहानशा खेडेगांवांतील रस्त्यावर थोडें चालून आम्ही परत घरीं आलों.

## तारीख २६ ऑक्टोबर

किलानींची सरोवरें नीट पाहण्यासठीं त्यांवर बोटींतून सहल करणें थंडीच्या दिवसांत अशक्य आहे असें कळल्यामुळें, या सरोवरांच्या सर्व बाजूंनीं वेष्टणाऱ्या ज्या दोन मोठ्या खाजगी वतनवाड्या आहेत, त्यांमधून फिरून सरोवराचा देखावा पाहण्याचें आम्हीं ठरविलें. त्याप्रमाणें, सकाळीं उठल्यावर खाणेंपिणें उरकून 'आयरिश जॅंटिंग कार' नांवाच्या एका प्रकारच्या उंच घोड्याच्या टांग्यांतून आम्ही फिरावयास निघालों. ही वतनवाडी (Muerors Estates) या नांवानें प्रसिद्ध आहे. जेथें तेथें दाट रानें, त्यांच्यामधून चांगला गाडीचा रस्ता, व मधून मधून दिसणारे सरोवरांचे भाग अशा तऱ्हेच्या देखाव्याचा आस्वाद घेत आम्ही दोन अडीच तास फिरलों. या रानांतील झाडांवर कोठेंकोठें कोरांटी व पिवळ्या रंगाचीं फुलें दिसलीं व 'हॉली'च्या झाडांवर लाल भडक रंगाचीं बोरांएवढीं फळेंही दिसलीं. रानांतील झाडांवर या ऋतूंत दिसून येणारे रंग म्हणजे पिवळा व गुलाबी. या रंगांच्या निरनिराळ्या झांका दिसत होत्या. या भागांत हरणेंही

आहेत; त्यांपैकीं एक लहानसें आमच्या नजरेला पडलें. आमचा गाडीवाला फार बोलका व मजेदार माणूस होता. आम्हांला जातांजातां तो बऱ्याच गोष्टी सांगत होता. मध्यें त्यानें आम्हांला ( horse chestnut ) नांवाचें एक झाड दाखविलें. त्याला हें नांव कां दिलें आहे हें विचारतां, त्यानें एक लहानशी फांदी तोडून आणून ती चाकूनें कापून आम्हांला दाखविली: तों त्या कापलेल्या ठिकाणीं आम्हांला हुबेहुब घोड्याच्या खुरासारखा भाग दिसला. ( Muchoss Abbey ) नांवाचा एक जुना, मोडकळीला आलेला मठ आम्हीं मध्यें उतरून पाहिला. ( Bricken Bridge ) नांवाच्या लहानशा पुलावर गाडी थांबवून एका बाजूला 'खालचें' ( Lower Lake ) व दुसऱ्या बाजूला 'मधलें' ( Middle Lake ) अशा दोन सरोवरांचा रम्य देखावा पाहिला सरोवरांत एका ठिकाणीं एक खडक आहे, त्यासंबंधी ( Collean Bawn ) नांवाच्या एका मासधरूच्या मुलीची आख्यायिका सांगतात; व त्याच मुलीचें नांव त्या खडकाला दिलें आहे. नंतर Old Weir Bridge नांवाचा पूल कांहीं अंतरावर पाहिला. त्याच्याखालून 'वरच्या' ( Upper Lake ) सरोवराचें पाणी येऊन, तें दुसऱ्या दोन सरोवरांच्या पाण्यांत मिसळतें. ज्या ठिकाणीं या तिन्ही सरोवरांचें पाणी एकमेकांत मिसळतें ती जागा आम्हीं पाहिली. या जागेला Meeting of the Waters ( पाण्यांचा मिलाफ ) असें नांव आहे. आजूबाजूला दाट झाडी आहे आणि जवळच Dinis Cottage नांवाची लहानशी बंगली आहे. येथें लहानसहान वस्तु पुष्कळ विकावयास असतात, तेथून मीं कांहीं चित्रांचीं पोस्टकार्डें विकत घेतलीं. येथल्या लहानशा बागेत ताड व बांबूसारखीं उष्ण प्रदेशांत दिसणारीं झाडें दिसलीं व बागेंत थोडींबहुत फुलेंही होतीं. वाटेंत Mount Tore नांवाची झाडाझुडपांनीं आच्छादिलेली टेकडी लागली. तिच्यावर आम्ही थोडेंसे चढून गेलों, तेथून दिसणारा सरोवरांचा देखावा पाहिला, आणि टेकडीवरून वाहणाऱ्या धबधब्याची शोभाही पाहिली. येथें मीं कांहीं चेहरे काढले. एकंदरीनें हें फिरणें फार आल्हाददायक झालें. आणि जरी त्या दिवशीं सूर्यप्रकाश नसल्यामुळें सरो-

वरांची शोभा थोडी कमी झाली होती, तरी पाऊस पडत नसल्यामुळें आमची आम्हांला धन्यता वाटली.

दुपारच्या जेवणानंतर आम्ही Earl Of Kenmare च्या इस्टेटींतून अशींच घोड्याच्या गाडींतून फिरावयास गेलों. ही वाटसुद्धां सकाळच्या सारखी रम्य होती. एक मोठा वाडा पुष्कळ वर्षांपूर्वीं जळून गेलेला असा तेथें पाहिला. त्याच्या पुढच्या सुंदर व प्रशस्त बगिच्याचें आतां रान बनून गेलें होतें. एका ठिकाणीं लॉनवर जाळीं पसरून कांहीं माणसें ससे पकडीत होतीं. Ross Castle नांवाच्या एका जुन्या किल्ल्याच्या बुरुजावर चढून तेथून सरोवराच्या पाण्याचा प्रशांत देखावा पाहिला, व मी विटांनीं बांधलेल्या एका बांकावर जराशीं बसलें. एकदां व्हिक्टोरिआ राणीसाहेब येथें बसल्या होत्या अशी आख्यायिका आहे.

## तारीख २७ ऑक्टोबर

हॉटेलमध्यें असलेली दोनचार मंडळी गेल्यामुळें, आज फक्त आम्हीच येथें रहिवासी राहिलों. आम्ही दुपारच्या गाडीनें डब्लिनला जावयास निघालों, आणि स्टेशनावर जातांना वाटेंत एका घरीं थांबून खास येथें तयार होणारी लेस थोडीशी खरेदी केली. येथली बाई थंडीच्या दिवसांत तऱ्हेतऱ्हेच्या लेसच्या वस्तु तयार करून त्या उन्हाळ्यांत गांव पाहण्यास येणाऱ्या प्रवासी लोकांस विकते. त्या वस्तूंवर केलेलें काम फार सुंदर होतें, पण किंमतीही तशाच जास्त होत्या. म्हणून थोडीशी लेस खरेदी करून मला तेथून पाय काढावा लागला.

## तारीख २८ ऑक्टोबर

सकाळीं आगगाडीनें किंग्सटनला जाऊन तेथें इंग्लंडला परत जाण्यासाठीं बोटीवर चढलों. बोट लागण्याच्या भीतीनें मी हा सबंध प्रवास बोटीवरच्या खोलीमध्यें पडून केला. Holyhead या ठिकाणीं बोटीवरून उतरल्यावर कस्टमखात्यातर्फे आमच्या सामानाची तपासणी होऊन, आम्ही आगगाडींत बसून Slangollen या उत्तर वेल्स देशामधल्या शहरीं जावयास

निघालों. पंचवीस वर्षांमागें स्वतः जेव्हां अभ्यासाकरितां परदेशीं गेले होते, तेव्हां एका स्कॉच बाईकडे ते कांहीं महिने राहिले होते. त्या बाई सध्यां Slangollen या शहरीं बिऱ्हाड करून राहिलेल्या आहेत असें कळल्यावरून, आम्ही त्यांना भेटावयास निघालों होतों. आगगाडी समुद्राच्या बाजूनें जात असल्यामुळें, बाजूचा देखावा छान दिसत होता. मधूनमधून समुद्रकिनाऱ्यावर घरेंही दिसत होतीं.

Chester गांवीं आम्हांला आगगाडी बदलावी लागली. दुसऱ्या आगगाडीला थोडा अवकाश असल्यामुळें आम्हीं Chester गांव पाहावयास निघालों. हा गांव फार जुना असून तेथें रस्त्यावरून जातांना जुनीं घरें अजून दृष्टीला पडतात. आम्हीं तेथलें एक देऊळ पाहावयास गेलों. या देवळाचा कांहीं भाग अकराव्या शतकांत बांधलेला आहे. तो भाग देवळाच्या दुसऱ्या भागाशीं ताडून पाहिला असतां, त्यांतील फेर लक्षांत येतो. या देवळांत रंगीत चित्रें आहेत. आंत तयार केलेल्या कांचीच्या मोठमोठ्या खिडक्या आहेत. त्यांपैकीं कांहींवर काळसर हिरव्या व तपकिरी रंगांनीं जास्त काम केलेलें असल्यामुळें, त्या इतक्या मनांत भरल्या नाहींत; पण दुसऱ्या कांहीं त्यांच्या तेजस्वी रंगामुळें रत्नजडित खिडक्यांप्रमाणें दिसल्या.

जवळजवळ दोन हजार वर्षांपूर्वीं जेव्हां रोमन लोकांनीं इंग्लंड देशावर स्वारी करून तेथें कांहीं काळ वास्तव्य केलें, त्यावेळीं बांधलेली एक जुनी व जाड भिंत आजही चांगली मजबूत अशा स्थितींत आहे. तिच्यावरून आम्हीं कांहीं अंतरापर्यंत चाललों. या भिंतीवर एक उंच बुरूज बांधलेला आहे, तेथून पहिल्या चार्ल्स राजानें प्रजेबरोबर झालेल्या आपल्या लढाईंत आपल्या सैन्यानें हार खाल्लेली पाहिली असें आम्हांला सांगण्यांत आलें. रोमन लोकांच्या वेळचें एक आंघोळीचें लहान टांकेंही येथे आहे. तें पाहण्या-साठीं या गांवांतील एका दुकानांत आम्हांला पैसे देऊन जावें लागलें. त्या टांक्याजवळ दुसरी एक दगडी बांधणीची जागा आहे, तेथें रोमन लोकांनीं आंघोळीकरितां गरम पाणी तापविण्याची कांहीं व्यवस्था केली असावी असें दिसतें.

या गांवीं दुसऱ्या एका ठिकाणीं जमीन खोदून रोमन लोकांच्या वेळचें एक अर्धचंद्राकृति नाटकगृह शोधून काढलें होतें. खोदून काढण्याचें काम पुरें झालें नव्हतें, पण त्याचा थोडा भाग आम्हीं पाहून आलों. नतर आम्हीं एका लहानशा दुकानांत कॉफी घेण्याकरितां गेलों. 'येथें तामीळ तऱ्हेची कॉफी मिळते, अशी पाटी दुकानाबाहेर पाहिल्यामुळें मुद्दाम आम्हीं या दुकानांत गेलों. नंतर स्टेशनवर परत जाऊन व पुन: आगगाडींत बसून आम्हीं Slangollen या शहरीं संध्याकाळीं जाऊन पोंचलों.

## तारीख २९ ऑक्टोबर

Slangollen हा गांव झाडाझुडपांनीं आच्छादलेल्या डोंगराच्या चढ-उतारावर वसलेला असून, गांवामधून Dee नांवाची नदी वाहत जाते. त्यामुळें येथली सृष्टिशोभा आम्हांस फार रम्य वाटली. होटेलांतील आमच्या खोलींतून होटेलापुढील रस्ता, रस्त्यापलीकडे होटेलाचा बाग, त्यापलीकडे नदी, आणि तिच्या पलीकडे उंच टेकडी असें दृश्य दिसत होतें, आणि नदीच्या पाण्याचा होणारा घसघस असा आवाज सारखा कानीं पडत होता. सकाळीं स्वतःच्या ओळखीच्या Alexander ( अलेक्झँडर ) कुटुंबास भेटावयास आम्हीं गेलों. या कुटुंबांतील मुख्य बाईचें वय ९० वर्षांवर असूनही त्यांचे सर्व व्यवहार एखाद्या मध्यम वयाच्या माणसा-प्रमाणें चालू असलेले पाहून आश्चर्य वाटलें. यांचे कान, डोळे व दांत मजबूत असून, त्या आपलीं कामें उत्तम तऱ्हेनें करीत असल्याचें पाहिलें; मात्र, यांच्या दोन पोक्त वयाच्या अविवाहित मुलींची स्थिति पाहून वाईट वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. एक मुलगी जन्मापासून आंधळी असून, दुसरीचे डोळेही बरेच अधु आहेत; तरी पण, त्या आंधळ्या बाईची आनंदी वृत्ति, सर्व ओळखीच्या मंडळीसंबंधीं चौकशी करण्याची आतुरता व इतर माहिती करून घेण्याची आवड, वगैरे पाहून मला फार आश्चर्य वाटलें; कारण असें मनुष्य इतर मनुष्याविषयीं उदासीन राहून नेहमीं आपल्या नशिबाला दोष देत राहिलेलें असणार हीच कल्पना साहजिक

वाटते. जुन्या गोष्टी ( म्हणजे स्वतः २५ वर्षांमागें या कुटुंबाच्या घरीं राहत होते त्या वेळच्या ) पुष्कळ निघाल्या आणि वेळ मजेंत गेला. यांचें घर फार छान वाटलें. घरासमोरील लहानशा बागेंत गुलाब व इतर फुलें फुललेलीं होतीं, व बाग घरापर्यंत जरा चढत गेली होती. घराच्या समोरच्या बाजूला नदी व कालवा, आणि त्यापलीकडे टेकड्या; त्या टेकड्यांवर पिवळा, तपकिरी, गुलाबी, वगैरे रंगांच्या पानांनीं भरलेलीं झाडेंझुडपें असा देखावा दिसत होता.

थोड्याबहुत गोष्टी झाल्यावर त्या दोघ मुली व आम्ही दोघें मिळून एका भाड्याच्या मोटरमधून तेथल्या डोंगरी रस्त्यांवरून लांब फिरावयास गेलों. जेथेंतेथें वर वर्णन केलल्या टेकड्या, त्यांवर मधूनमधून लहान नीट-नेटकीं घरें, हिरवीं कुरणें व त्यांत चरत असलेलीं मेंढरें, मधूनमधून दिसणारे ओढे व नद्या, आणि मधूनमधून लागणारीं मजेदार खेडीं व त्यांतील तीं लहान घरें आणि त्यांच्या छोट्या बागा असा देखावा पसरला होता; त्यामुळें आमचें हें मोटरमधलें फिरणे सृष्टिसौंदर्यानें भरलेल्या अशा प्रदेशांतून झालें. दूर एका डोंगराच्या खालीं Yale नांवाच्या मनुष्याचें घर आम्हांला दाखविलें. अमेरिकमधल्या प्रसिद्ध Yale University चा जो संस्थापक, त्याचेंच हें घर.

फिरून झाल्यावर आम्ही त्या दोघी बायकांना बरोबर घेऊन आमच्या होटेलामध्यें जेवावयास गेलों. व दुपारीं आम्ही Alexanders कडे चहा घ्यावयास गेलों. तेथें आम्हांला Mr. Darlington नांवाचे एक गृहस्थ भेटले. त्यांचा व्यवसाय वर्तमानपत्रांत लेख, वगैरे लिहिण्याचा होता. त्यांनीं युरोपमधल्या कित्येक राजांशीं झालेल्या आपल्या मुलाखतींच्या गोष्टी आम्हांला मोठ्या मजेदार रीतीनें सांगून हंसवून सोडिलें.

## तारीख ३० ऑक्टोबर

दोघी Milles Alexandes बरोबर आम्ही Plas Newydd नांवाचें एक जुनें घर पाहावयास गेलों. या घराचा पूर्वेतिहास पुढीलप्रमाणें अस-

त्याचा आम्हांला कळला. शंभर, सवाशें वर्षांपूर्वी दोन उच्च आयरिश कुळांतल्या दोघी मुलींच्या लग्नांसबंधीं कांहीं घोटाळा झाल्यामुळें, त्या घरांतून पळून गेल्या. यामुळें त्यांच्या नातलग मंडळीला आपल्या कुळांना यांनीं काळिमा लाविला असें वाटून, त्यांनीं त्यांच्याशीं आपला संबंध तोडून टाकला. इकडे या दोघी मुलींनीं आजन्म अविवाहित राहण्याचें ठरवून, एकवट घर केलें व तेथें त्या मरेपर्यंत राहिल्या. त्यांची एक काम करणारी बाई होती, तिला त्यांचा फार लळा लागला. त्यामुळें त्या तिघींनाही मृत्यूनंतर एका थडग्यांत पुरण्यांत आलें. त्या दोघी बायका मोठ्या सुशिक्षित असून, त्या जिवंत असतांना त्यांना या येथल्या घरांत अनेक नामांकित लेखकांनीं भेटी दिल्या, व अनेक माणसांनीं त्यांना नाना तऱ्हेच्या वस्तु भेटीदाखल पाठविल्या. याप्रमाणें पाठविलेले कांहीं नक्षीचे लांकडी तुकडे त्यांनीं आपल्या घराच्या बाहेरील दारावर व त्यांतल्या हॉलच्या भिंतींवर बसविलेले आजमितीलाही तेथें दिसतात. त्यांची हिशोबाची वही, वाळूचें घड्याळ आणि त्यांचा एक मोठा पलंग तेथें आम्हीं पाहिला. या घरांत त्याच्या सध्यांच्या मालकानें दुसऱ्या अनेक जुन्या वस्तूंचा संग्रह केलेला आम्हांला आढळला. त्यांत शेक्सपिअरच्या नाटकांच्या पहिल्या मोठ्या आकाराच्या आवृत्तींतील ( First Folio Edition ) एक प्रत, एक मोठें 'हार्प' नांवाचें जुनें वाद्य, वगैरे वस्तु होत्या. या घरांतील खोल्या लहान व ठेंगण्या अशा मजेदार आहेत. घराचा बगिचा मोठा असून, त्यांत कापून निरनिराळे आकार आणलेलीं अशीं झुडपें आहेत. त्यांतील एक कुत्र्याच्या घराच्या आकारासारखें केलें आहे. वेल्स लोकांतील ललितकलांना वाहिलेल्या लोकांचें जें वार्षिक संमेलन भरतें तें कांहीं दिवसांपूर्वी या बगिच्यांत भरलें गेल्यामुळें, त्यावेळीं लोकांना बसावयासाठीं ठेवलेले दगड तसेच येथें कायम होते.

दोन प्रहरीं पुन: आमचा चहा Alexander कुटुंबाबरोबर झाला. या वेळीं त्यांनीं आम्हांला आपल्या घराच्या पाठीमागें डोंगराच्या चढणीवर असलेला भाजीपाला व फळझाडांचा बाग व आपलें सर्व घर दाखविलें.

तेथें त्या कुटुंबाच्या ओळखीचे दोन गृहस्थ आम्हांला भेटले. त्यांतले डॉ. हर्बर्ट एकदां हिंदुस्थानांत येऊन गेलेले होते. दुसरे गृहस्थ मि. जोन्स हे पाद्री असून कांहीं वर्षांपूर्वी रत्नागिरी जिल्ह्यांत होते. त्यांच्या ओळखीचे रत्नागिरीमधील डॉ. वायली आमच्याही ओळखीचे होते. हे गृहस्थ आपापल्या घरीं गेल्यावर, मि. जोन्ससंबंधीं जी कांहीं माहिती आम्हांला कळली, ती माहिती कांहीं वर्षांमागें आम्ही स्वतः रत्नागिरीला असतांना आमच्या कानांवरून गेलेली होती. हें पाहून मला आश्चर्य वाटलें आणि 'The world is very small after all' (जग फार लहान आहे) या इंग्रजी म्हणीचें सत्य पटलें. हंसावयाची गोष्ट नाहीं, पण Alexanders च्या घरीं आम्ही जी सातआठ मंडळी जमलों होतों, त्यांत एक नव्वद वर्षांची म्हातारी बाई, तिची एक जन्मांध मुलगी, दुसरी एक अर्धवट दृष्टि असलेली मुलगी आणि एक बरीच बहिरी नातलग बाई, अशी एक पंगु मंडळीची चौकडी पाहून या विलक्षण योगाचें मला मनांतल्या मनांत जरा हंसू आलें. जी जन्मांध बाई होती तिला जरी कांहीं दिसत नव्हतें तरी आमच्या कांहीं मजेच्या गोष्टी ऐकून ती हंसे. पण तिच्या अर्धवट बहिऱ्या बहिणीला कांहीं ऐकूं न आल्यामुळें, ती सर्वांच्या तोंडांकडे पाही. म्हणजे मग कोणीतरी तिच्या 'ऐकण्याच्या शिंगा' मध्यें (Ear Horn) ती सर्व गोष्ट बोलत असे. पण एकंदरींत आमचें सर्वांचें संभाषण मनोरंजक झालें. होटेलांत परत जातांना आम्ही कांहीं चित्रांचीं पोस्टकार्डें व Plas Newydd मध्यें मागें राहत असलेल्या त्या दोघी बायकांची गोष्ट वर लिहिली आहे त्यांची (Ladies Of Slangollen) लहानशी चिनी मातीची प्रतिमा खरेदी केली.

## तारीख ३१ ऑक्टोबर

आम्ही सकाळच्या गाडीनें Stratford on Avon (स्ट्रॅटफर्ड ऑन् एव्हन) या गांवीं जावयास निघालों व जाण्यापूर्वी Alexander कुटुंबास पुनः एकदां भेटावयास गेलों, व त्यांच्याकडे पुनः थोडासा चहाही

घेतला. त्या बायकांनीं मला आपल्या बगिच्यांतले थोडे गुलाब दिले, आणि मि. डारलिंग्टन् व दोघी अलेक्झँडर मुली आम्हांला स्टेशनावर पोंचवावयास आल्या. ती जन्मांध बाई खरी, पण तिची वृत्ति किती आनंदी! व प्रत्येक ओळखीचें मनुष्य आणि त्याचे व्यवहार यासंबंधाच्या गोष्टी ती किती मन लावून ऐके! कदाचित् तिच्या अंधारमय आयुष्याबद्दल दया येऊनच ईश्वरानें ही आनंदी वृत्तीची देणगी तिला दिली असल! नाहीं वशावरून ?

Stratford on Avon या शहरीं आम्हीं संध्याकाळीं जाऊन पोंचलों व Red Horse Hotel नांवाच्या होटेलांत उतरलों. संध्याकाळीं जरा बाहेर पडून जगविख्यात आंग्लकवि व नाटककार शेक्सपिअर याच्या घराच्या चिनी मातीच्या लहान लहान प्रतिमा खरेदी केल्या.

## तारीख १ नोव्हेंबर

कांहीं मैलांवर असलेला Warwick Castle नांवाचा किल्ला पाहण्यास आम्हीं मोटरबसमधून गेलों. तेथें जातांना रस्त्याच्या आजूबाजूचा प्रदेश उंचसखल असून, त्यांत हिरवीं कुरणें व त्यांत ढोरें, गुरें आणि कोंबडीं दिसलीं. मध्येंच सलगमचीं शेतें लागत व तेथें माणसें तें सलगम खणून काढतांना दिसत. मधूनमधून आमचा रस्ता अगदीं अरुंद होऊन, बाजूला झुडपांच्या वया व दुतर्फा उंच झाडांच्या रांगा जवळजवळ एकमेकांना भिडलेल्या दिसत. जेथेंतेथें या ऋतूंत दिसणारे रंग, म्हणजे पिवळा, तपकिरी, गुलाबी, वगैरे रंग झाडांवर चढलेले दिसत होते. असा रम्य देखावा पाहत पाहत आम्हीं वॉरिक शहराचा कांहीं भाग ओलांडून वॉरिक किल्ल्याकडे येऊन पोहोचलों.

किल्ला Avon नदीच्या कांठीं असून, त्याच्या आजूबाजूला रानासारखा दाट वृक्षांनीं आच्छादलेला प्रदेश आहे. किल्ल्याला जोडून छान बगिच्या केलेला आहे, व त्यांत लहानलहान झुडपें कापून त्यांना पक्ष्यांचे वगैरे आकार दिले आहेत. बागेच्या एका बाजूला एक गंगाळासारखें मोठें दगडी



लॅङ्गॉखलेन् [ पृ. ६०



लॅङ्गॉखलेन् येथल्या दोन प्रसिद्ध स्त्रियांचें घर [ पृ. ६१

भांडें आहे, तें दोन हजार वर्षांपूर्वीचें असून ग्रीस देशांत जुन्या काळीं दारू ठेवण्यासाठीं वापरले जात असे.

किल्ल्याचें बांधकाम दगडी असून, ती इमारत अजून चांगली शाबूत व भव्य आहे. आंत अनेक सुंदर, जुन्या व मौल्यवान वस्तूंचा भरणा केलेला आहे. इंग्लंडची राणी Anne हिचा निजावयाचा बिछाना, फ्रान्स देशाची राणी Marie Antoinetta हिचें एक मोठें घड्याळ, प्रसिद्ध लेखक Isaac Walton याची एक लाकडी पेटी, अशा ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तु येथें आम्हांला दिसल्या; शिवाय, एक अतिशय सुंदर टेबल येथें पाहिलें. त्यावर lapis lazuli नांवाच्या निराळ्या रंगाच्या दगडाचे तुकडे बसवून छान नक्षीकाम केलेलें होतें. तसेच, एका विशिष्ट आकाराच्या दारू ठेवण्याच्या कांहीं बाटल्या पाहिल्या, त्यांवरील आरपार नक्षी कोरलेलीं सोन्याचीं आवरणें फार सुंदर होतीं. याशिवाय तेथें मौल्यवान लाकडी व हस्तिदंती सामान, रंगीत चित्रें आंत विणलेले असे जुने गालिचे, मोठमोठ्या जुन्या चित्रकारांचीं चित्रें व शस्त्रास्त्रें अनेक होतीं. किल्ल्याच्या कांहीं दालनांतून बाजूच्या नदीचा व रानाचा देखावा फार छान दिसला.

येथून आम्हीं Kenilworth किल्ला पाहावयास गेलों. मोटरबसमधून उतरल्यावर थोडें चालत जावें लागलें, पण रस्ता रम्य होता. लहानलहान घरें, त्यांच्यापुढें छोट्या बागा व आसपासच्या रानांतील झाडांवर या ऋतूंत दिसणाऱ्या अनेक रंगांच्या पानांची शोभा पाहत आम्हीं एकदांचीं किल्ल्याजवळ येऊन पोंचलों.

या किल्ल्याचे तीन निरनिराळे भाग एकमेकांपासून कांहीं अंतरावर असून, त्याच्या कांहीं भिंती व खिडक्या तेवढ्याच उभ्या आहेत. सर्वांत जुना भाग अतिशय भक्कम व साध्या 'नॉर्मन' बांधणीचा आहे. दुसरा भाग यानंतर बांधलेला असून 'गॉथिक' पद्धतीचा आहे. याच्या नक्षीदार खिडक्या अजून दृष्टीला पडतात. या भागांत आतां दिसत असलेल्या एका मोठ्या दालनाचा पूर्वीं मेजवान्या देण्याकरितां उपयोग होत असे. त्या दालनाच्या खालींच मद्याच्या बाटल्यांचा सांठा ठेवण्या-

करितां म्हणून तेवढेंच मोठें तळघर होतें, त्याचाही अवशेष आतां नजरेला पडतो. किल्ल्याचा अगदीं शेवटीं बांधलेला भाग तांबड्या दगडांचा व 'टयूडर' पद्धतीचा असून, तो इंग्लंडची राणी इलिझाबेथ हिच्या अमदानींत प्रसिद्ध असलेल्या Earl of Leicester या गृहस्थानें बांधलेला आहे. ही राणी त्या Earl ची पाहुणी म्हणून या जागीं १८ दिवस राहिली होती व तिचा आदरसत्कार अतिशय जंगी प्रमाणावर झाला होता अशी आख्यायिका आहे. त्याकाळीं या किल्ल्याच्या आसपास कृत्रिम सरोवरें, वगैरे होतीं; पण आतां तीं बुजवलेलीं असून आजूबाजूला जेथें तेथें हिरवळीचा प्रदेश व मोठीं झाडेंच फक्त दिसतात. प्रसिद्ध इंग्रज कादंबरीकार 'सर वॉल्टर स्कॉट' याच्या केनिलवर्थ या कादंबरींत किल्ल्याच्या ज्या भागाचा संबंध आला आहे, तो भाग वर लिहिलेला किल्ल्याचा 'नॉर्मन' पद्धतीचा भाग आहे असें आम्हांला कळलें.

केनिलवर्थ किल्ला वॉरिक किल्ल्याच्या अगदीं उलट आहे. वॉरिक किल्ल्याची सर्व इमारत शाबूत असून तो अजून वापरांत आहे, व तो सामानानें खचून भरलेला आहे; पण केनिलवर्थ किल्ला मोडलेला असून, फक्त त्याचा जीर्ण अवशेष त्याच्या जुन्या वैभवाची साक्ष देण्यास उभा आहे. अशा तऱ्हेनें हे दोन्ही प्रसिद्ध किल्ले पाहिल्यावर आम्ही Stratford on Avon या गांवीं परत आलों. वाटेंत वॉरिक शहरांतील लहानमोठीं राहतीं घरें व त्यांच्या लहानमोठ्या बागा आम्हांला दिसल्या.

परत आल्यावर चहा घेऊन, आम्ही जवळच असलेलें शेक्सपिअरचें घर पाहावयास गेलों. अंधार होत चालल्यामुळें घरांतील वस्तु दिसण्यास जरा त्रास पडत होता. शेक्सपिअरच्या आयुष्यावर व त्याच्या नाटकांवर प्रकाश पाडणाऱ्या ज्या ज्या वस्तु मिळाल्या त्यांचा संग्रह येथें केलेला आहे. त्याच्या तसबिरी व पुतळे, याच्या नाटकांची पहिली 'फोलिओ' आवृत्ति, तो शाळेंत ज्या 'डेस्का' कडे बसत असे ती 'डेस्क', त्याच्या वापरांत असलेलें एक कांचीचें मूठ असलेलें खुज्याच्या आकाराचें भांडें, त्याची सही व एक सोन्याची 'सिला' ची शिक्का करण्याची आंगठी अशा वस्तु

आम्हीं तेथें पाहिल्या. ही सोन्याची आंगठी शेक्सपिअरच्या मृत्यूनंतर एका शेतांत कोणाला तरी सांपडली, व ती शेक्सपिअरनें केलेल्या कारनाम्यावरच्या ' सिला ' शीं अतिशय बारकाईनें ताडून पाहतां तंतोतंत जुळलीं, अशा तऱ्हेनें ती त्याचीच आहे अशी खात्री झाली. याशिवाय आणखीं अनेक वस्तु तेथें ठेविलेल्या आहेत. त्या वस्तु जगांतील सर्वांत मोठ्या नाटककाराच्या व कवीच्या असल्यामुळें, अतिशय मौल्यवान आहेत; व म्हणूनच त्या राखण्याकरितां प्रत्येक खोलींत एक एक राखणदार ठेवलेला आहे. हे राखणदार हुशार असून, तेथें ठेविलेल्या सर्व वस्तूंची पुरी माहिती त्यांना आहे. शेक्सपिअर ज्या खोलींत जन्मला ती खोलीही जशीच्या तशी ठेविलेली आम्हांला दिसली. खालीं लाकडाची जमीन, व तें ठेंगणें सिमेंटचें छत, व कांचीच्या लहान लहान तावदानांच्या खिडक्या असलेल्या त्या खोलींत उभें असतां मनांत एक प्रकारची आदरयुक्त भावना उत्पन्न होते. जे अनेक लोक वर्षानुवर्षें हें पुण्यस्थान पाहावयास येत आहेत, त्यांपैकीं कांहींजणांनीं आपलीं नांवें खिडकीच्या तावदानांवर कोरून ठेविलेलीं आहेत. त्यांत प्रसिद्ध इंग्रज लेखक Carlyle व Scott यांचीं नांवें आम्हीं पाहिलीं. या घराच्या पाठीमागें जी बाग आहे तिच्यांत शेक्सपिअरच्या नाटकामध्यें ज्या ज्या झाडांचा उल्लेख केलेला आढळतो, त्या सर्व प्रकारचीं झाडें व रोपें लाविलेलीं आहेत. येथें एक केशराचें झाडसुद्धां होतें.

शेक्सपिअरचें जन्मघर पाहून झाल्यावर, त्यानें जे दुसरें मोठें घर पुढें खरेदी केलें तें पाहण्यास आम्हीं गेलों. या घराला New place (नवी जागा) असें म्हणतात. हें घर पूर्वीं फार मोठें होतें, पण आतां त्याचा बराच भाग पडलेला आहे. शेक्सपिअर ज्या मोठ्या खिडकीकडे बसून आपलें लेखन करीत असे त्या खिडकीचा फक्त पाया तेवढा आतां दिसतो. त्या खिडकीच्या बाहेर जें तुतीचें झाड आतां सध्यां आहे तें शेक्सपिअरच्या वेळीं त्या ठिकाणीं जें झाड होतें त्यापासून उत्पन्न झालेलें आहे. बगिच्यांत जी लहान तोंडाची विहीर आहे तीही शेक्सपिअरच्या वेळची असून, तींत अजून पाणी आहे.

या घराच्या आंत आंत पुष्कळ जुन्या वस्तूंचा संग्रह केलेला आहे: त्यांत शेक्सपिअरनें आपल्या नाटकांत उल्लेख केलेलीं अनेक त्यावेळचीं भांडींकुंडींही आहेत. या कवीनें वापरलेल्या दोन लाकडाच्या खुर्च्या आम्हीं पाहिल्या: शिवाय, जें तुतीचें झाड त्याच्या खिडकीच्या पुढें तेव्हां होतें त्याच्या लाकडापासून केलेलें उत्तम पॉलिशचें टेबलही येथें ठेविलेलें आहे.

इलिझबेथ राणीच्या काळीं ज्या तऱ्हेचे बाग करण्याची पद्धत होती त्या तऱ्हेचा मोठा बाग सध्यां या ठिकाणीं केलेला आहे; बागेच्या बाजूला असलेल्या वईचीं झुडपें कापून, त्यांना भिंती, फाटकें, वगैरेचे आकार आणिलेले आहेत. या जागींही शेक्सपिअरच्या नाटकांत उल्लेख केलेलीं सर्व झाडें व रोपें लाविलेलीं आहेत.

इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स याची राणी ही शेक्सपिअरच्या वंशजांना भेटण्याकरितां या घरांत एक दिवस आली होती, या एकाच गोष्टीवरून या कविश्रेष्ठाच्या श्रेष्ठत्वाची खूण पटेल. पण दैवाची लीला अशी आहे कीं या कवीचा दोनतीन पिढ्यांतच निर्वंश झाला.

यानंतर या शहरांतील ज्या प्राथमिक शाळेंत शेक्सपिअरचें शिक्षण झालें ती शाळा आम्हीं बाहेरूनच पाहिली. तसेंच, अमेरिकेंतील प्रसिद्ध Harvard च्या विश्वविद्यालयाचा पाया ज्यानें घतला त्या हारवर्डचे आईबाप ज्या घरांत राहत होते तें घरही आम्हीं येथें बाहेरूनच पाहिलें. यानंतर शेक्सपिअर-संबंधीं लहानलहान आठवणीच्या वस्तूंची खरेदी करून आम्हीं घरीं परतलों.

## तारीख २ नोव्हेंबर

आज रविवार असल्यामुळें प्रेक्षणीय जागा बंद होत्या; म्हणून आम्हीं Avon नदीच्या कांठानें फिरावयास गेलों असतां, तेथें दोन मोठे पांढरे राजहंस पाहिले व मी त्यांचा फोटो काढला. जातांजातां Shakespear Memorial Theatre नांवाचें जळलेलें नाटकगृह व तेथेच बांधकाम चालू असलेलें नवें नाटकगृह नजरेस पडलें. दुपारीं येथल्या Avon नदीवरच्या Clopton पुलावरून जरा फिरलों. हा पूल फार जुना असून,

तो शेक्सपिअरच्या वेळींही होता. हा दगडांचा बांधलेला आणि अजूनही मजबूत आहे.

## तारीख ३ नोव्हेंबर

सकाळीं शेक्सपिअरचें जन्मघर पुनः एकदां पाहून, येथील देवळांत शेक्सपिअरचें थडगें पाहण्यास गेलों. लहानसहान माणसांचीं थडगीं सुद्धां या थडग्यापेक्षां कितीतरी जास्त दिखाऊ असतात इतकें साधें हे थडगें आहे. जमिनीच्या एका लादीवर ' या जागीं शेक्सपिअरला पुरलें आहे ' असें लिहिलें आहे. या शिवाय, आणखी शोभा, वगैरे यावर कांहींच नाहीं, आणि एका तऱ्हेनें हें योग्यच आहे. ज्याची कीर्ति आज जगभर पसरली आहे व यापुढेंही शेंकडों वर्षें कायम राहील, त्या कविश्रेष्ठाची आठवण ठेवण्याकरितां दगडाच्या सुशोभित स्मारकाची गरज नाहीं. त्याची कविता व नाटकें हींच त्याचीं चिरकाल टिकणारीं स्मारकें आहेत.

पुढें जी शेक्सपिअरची बायको झाली त्या Anne Hathaway ( ॲन् हॅथवे ) चें घर पाहण्याकरितां आम्ही नंतर थोड्या अंतरावर असलेल्या Shotlery या गांवीं गेलों. Anne Hathaway चें गवती छपराचें जुनें घर आजमितीलाही जसेंच्या तसें असून, त्यांतलें पुष्कळ सामानही त्यावेळचें आहे. उठण्याबसण्याच्या खोलींत जुन्या तऱ्हेची भिंतींतली शेगडी, खाण्यापिण्याचे जिन्नस ठेवण्याचें मातीच्या भिंतींतलें लहान कपाट, एकदोन पितळेचीं स्वयंपाकाचीं भांडीं हीं त्यावेळचीं आहेत. शिवाय, येथें एक जुना लहानसा बांक आहे, त्यावर शेक्सपिअर जेव्हां लग्नापूर्वी आपल्या भावी पत्नीला भेटावयास जात असे तेव्हां कितीतरी वेळां बसला असणार ही कल्पना फार मनोरम वाटते. तसेच वरच्या मजल्यावर ॲनच्या बापाचा नक्षीकाम केलेला मोठा लाकडी पलंग आम्हीं पाहिला, आणि तेथेंच तिच्या बहिणीनें कपड्याचे धागे काढून त्यावर केलेलें कलाकुसरीचें काम ( drawn thread work ) हीं पाहिलें. एक विशिष्ट गोष्ट आम्हांला दाखविण्यांत आली ती ही कीं,

'ॲन'च्या खोलींत जाण्यास फक्त एक दरवाजा होता, तो तिच्या आई-बापांच्या खोलींतून होता. याचा अर्थ हा कीं, तिच्या आंतबाहेर जाण्यावर आईबापांची नजर राहावी. पलीकडे एक अगदीं ल्हानशी खोली सफरचंदांचा सांठा करून ठेवण्याच्या उपयोगासाठीं होती.

हे घर खेडेगांवासारख्या ठिकाणीं असल्यामुळें विशेष रम्य वाटलें. बाहेर मोठा बाग होता, पण त्यांत आम्हीं पाहिल्या वेळीं फारशीं फुलें नव्हतीं. एका ठिकाणीं एका द्राक्षाच्या वेलावर हिरव्या द्राक्षांचे घोंस दिसले. ॲन हॅथवेच्या घराण्यांतील वंशज व तसेच शेक्सपिअरच्या बहिणीचे वंशज अजून Stratford on Avon या गांवीं आहेत.

आम्ही या गांवीं ज्या Red Horse Hotel नांवाच्या होटेलांत राहत होतों तें बरेंच जुने असून, त्यांत प्रसिद्ध अमेरिकन लेखक Washington Irving यानें कांहीं महिने काढले होते. त्याचें प्रसिद्ध 'The Sketch Book' नांवाचें पुस्तक त्यानें येथेच लिहिलें. तो ज्या खोलींत बसत असे ती खोली, त्याची बसावयाची खुर्ची व तो ज्या चिमट्यानें शेगडींतला विस्तव हालवी तो चिमटा या सर्व वस्तु आम्हांला पाहावयाला मिळाल्या. या खोलींत एक जुनें मोठें उंच घड्याळ आहे, त्याचा उल्लेख या लेखकानें आपल्या 'Sketch Book' मध्यें केलेला आहे.

दुपारच्या गाडीनें आम्ही Torquay (टॉरकी) या शहरीं जावयास निघालों. आगगाडींतील तीनचार माणसें आपापसांत मजेदार गोष्टी बोलत होतीं त्या ऐकण्यांत वेळ निघून गेला. आगगाडी ज्या प्रदेशांतून जात होती त्यांतील देखावा नेहमींप्रमाणें सुंदर होता. शेवटीं शेवटीं तर आगगाडी सारखी समुद्र-किनाऱ्याच्या बाजूनें चालली होती. Torquay गांवीं जेव्हां पोंचलों तेव्हां मला मुंबईच्या 'मलबार हिल' ची आठवण झाली; कारण 'मलबार हिल' प्रमाणेंच येथें लहान टेकड्या समुद्राला लागून, अशा असून त्यांवर झाडेंझुडपें व घरें आहेत. 'टॉरकी' गांवीं आम्ही एका चांगल्यापैकीं होटेलांत उतरलों होतों. येथें मंडळी अठदहाच होती. हें होटेल जरा उंचावरच असून, त्याच्या प्रशस्त बगिच्यांतून खालीं उतरत गेलें म्हणजे समुद्रसपाटीवरचा रस्ता लागे.

हा रस्ता अगदीं समुद्राला लागून असल्यामुळें यावर फिरतांना सारखा समुद्र दिसे.

पहिल्याच रात्रीं जेवण आटोपून आम्ही तेथल्या भव्य व सोईस्कर दिवाणखान्यांत बसलों असतां एक इंग्रज गृहस्थ आपण होऊन आमच्याकडे आले व आमच्याकडे बोलू लागले; त्यामुळें आमचा नवीन ठिकाणीं प्रारंभीं वाटणारा संकोच तेव्हांच निघून गेला. हे गृहस्थ हिंदुस्थानांत पुष्कळ वर्षांपूर्वी आम्हांला नुसते नांवानें परिचित असलेले डॉ. हॅन्किन होते असें आम्हांला मग कळलें, आणि हे हिंदुस्थानांत Chemical Analyzer च्या हुद्यावर असल्यामुळें, साहजिकच आमच्या हिंदुस्थाना-बद्दल व एकमेकांच्या ओळखीच्या माणसांसंबंधीं गोष्टी झाल्या.

## तारीख ४ नोव्हेंबर

सकाळच्या फराळानंतर आमच्या होटेलाच्या मोटरबसमध्यें बसून आम्ही गांवांत गेलों, व दुकानांच्या ओळीच्या बाजूनें फिरून मग समुद्राल-गतच्या गांवाच्या भागांत फिरलों. हिंदुस्थानांत पडतें त्याप्रमाणें स्वच्छ ऊन पडलें होतें.

फिरून परत येतांना आमच्या होटेलाजवळ एक इंग्रज गृहस्थ आम्हांला भेटले व त्यांनीं आम्हांला ' गुड मॉर्निंग ' ( सुप्रभात ) म्हटलें; त्याबरोबर हे गृहस्थ कोण असावेत याबद्दल माझ्या मनांत कुतुहल उत्पन्न झालें, इतक्यात त्यांनींच सर्व गोष्टींचा खुलासा केला. अपलें नांव Col. Warden असून, आपण हिंदुस्थानांत पुष्कळ वर्षें होतों व तो देश आपल्याला फार आवडतो, वगैरे माहिती आम्हांला सांगून मग ते म्हणाले, ' कोणीही हिंदी मनुष्य भेटला कीं मी त्याला गुड मॉर्निंग म्हणतों. ' मग स्वतःनीं जेव्हां त्यांना सांगितलें कीं आपण महायुद्धाच्या वेळीं फ्रान्समध्यें होतों म्हणून, तेव्हां त्यानीं स्वतःची पाठ थोपटली.

दुपारच्या जेवणानंतर इतर पुष्कळ प्रवासी लोकांबरोबर एका मोठ्या मोटर-बसमध्यें बसून आम्ही Berky Falls नांवाचा धबधबा पाहावयास

गेलों. मोटरीमधून दिसणारा देखावा मोठा रम्य होता दुतर्फा हिरवीगार वई असलेल्या अरुंद खेडेगांवबजा वाटा, त्यांपलीकडे उंचसखल प्रदेशांतील हिरवींगार कुरणें, या ऋतूंत झाडांवर दिसणाऱ्या अनेक रंगांमुळें खुलून दिसणारीं रानें आणि त्यांमध्येंच वसलेलीं खेडीं आणि मध्येंच लागणारीं गांवें पाहत पाहत आम्हीं धबधब्याकडे पोंचलों. धबधबा आम्हीं मोटरमधून खालीं उतरून पाहिला. तो अनेक रंगांनीं खुललेल्या व वेलींनीं व्यापलेल्या अशा वृक्षांच्या बनलेल्या मंडपाखालीं होता. धबधबा पाहून झाल्यावर पुनः मोटरमध्यें बसून आम्हीं निघालों व जातांजातां टेकडीवरच्या रस्त्यावरून जाऊं लागलों. येथें अगदीं झाडझुडुप नसलेल्या, रुक्ष खडकाप्रमाणें दिसणाऱ्या कांहीं टेकडया आम्हीं पाहिल्या. यांना 'टॉरस' असें म्हणतात. हा प्रदेश बराच रानवट वाटला, पण असल्या जवळजवळ निर्जन व रानवट भासणाऱ्या ठिकाणींही एक छान होटेल होतें; तेथें थोडा वेळ थांबून सर्व प्रवाशांनीं चहा व केक्स घेतल्यावर, आम्हीं पुनः वाटेला लागून संध्याकाळीं घरीं परत आलों. या प्रदेशांत आढळून येणारे कांहीं जंगली तट्टूही येथून तेथून फिरतांना आम्हीं पाहिले.

## तारीख ५ नोव्हेंबर

हा सबंध दिवस होटेलाच्या ऊबदार दिवाणखान्यांत बसून घालविला; तुफानी वारा व मधूनमधून पाऊस एकसारखा सुरू होता. रात्रीच्या जेवणानंतर 'व्हायोलिन' व 'पिआनो' वादन झाले.

## तारीख ६ नोव्हेंबर

सरदीखोकल्यामुळें मी सर्व दिवस घरींच राहिलें. एका इंग्लिश बाई-बरोबर हिंदुस्थानासंबंधींच्या विषयावर माझें थोडें संभाषण झालें.

## तारीख ७ नोव्हेंबर

सकाळच्या फराळानंतर आम्हीं Coombe Cellars हें ठिकाण पाहवयास इतर पुष्कळ प्रवाशांबरोबर एका मोटया मोटरबसमधून गेलों.

रस्त्यावरील देखावा फार रम्य होता. त्या लहानलहान खेडेगांवांतील उंच-सखल वाटा, दुतर्फा हिरव्या वया व केव्हां केव्हां मोठीं झाडें, मधून दिसणाऱ्या लहानलहान समुद्राच्या खाड्या व त्यांना लागून असलेल्या उंचवट्यावरचीं खेडेंगांवें. दुसऱ्या बाजूला उंचसखल प्रदेशांतील हिरवीं कुरणें व त्यांत चरत असलेलीं गुरें, मेंढरें व कोंबडीं असा हा देखावा पाहत आम्हीं Coombe Cellars कडे येऊन पोंचलों. ( विलायतेंतील पाळीव जनावरें आपल्या येथल्या जनावरांपेक्षां मोठीं असतात असें मला आढळून आलें. तेथल्या मोठमोठें सामान वाहणाऱ्या गाड्यांचे घोडे, गाई व कोंबड्या मला येथल्यापेक्षां पुष्कळ मोट्या दिसल्या. ) Coombe Cellars ही जागा Teign नदीवर एकांतशा ठिकाणीं असून, नदीच्या पलीकडे लहान हिरव्या टेकड्या व त्यांवर असलेल्या गांवांचा देखावा दिसतो. या जागीं पूर्वीच्या काळीं मालावरची जकात टाळण्या-करितां लपवून छपवून आणलेला माल सांठवून ठेवण्याकरितां खोल्या बांधलेल्या होत्या. त्यापैकीं एक खोली अजून उभी आहे ती आम्हांला दिसली. येथेंही प्रवाशांची तहानभूक शमविण्यासाठीं एक होटेल होतें.

जसा तेथें जातांनाचा तसा तेथून परत येतांनाचा रस्तासुद्धां अति सुंदर होता. लहान, शांत व रम्य खेडेगावें, तेथलीं मजेदार दिसणारीं लहान घरें व त्यांच्या वितभर बगांतून कोठेंकोठे दिसणारीं फुलें, मधूनच एखाद्या घराच्या भिंतीवर चढलेली लाल पानांची वेल, मध्येंच वाहणारा एक लहानसा ओढा यांची शोभा पाहत पाहत, पुनः आम्हीं त्या सुरेख लहान वाटांनीं परत घरीं आलों. वाटेत एकदोन वेळां झाडांखालीं लाल सफरचंदांचे ढीग केलेले पाहून माझ्या मनाला फार आल्हाद वाटला; कारण हीं फळें आम्हीं महाराष्ट्रांत फक्त फळविक्यांकडे व दुकानांत पाहतो; व तीं साधारणपणें महाग असलेल्या फळांत मोडत असल्यामुळें आपण कधींमधींच खातों; तेव्हां त्यांचे झाडांखालीं केलेले मोठे ढीग पाहून आनंद वाटणें साहजिक होतें.

# तारीख ८ नोव्हेंबर

सकाळच्या फराळानंतर एका लहान, शांत व रम्य वाटेनें आम्हीं फिरावयास गेलों. पहिल्यानें समुद्राच्या बाजूनें चालत जाऊन, नंतर हिरव्या झाडांनीं आच्छादिलेल्या लहान टेकड्यांच्या मधल्या रस्त्याला आम्ही लागलों. वाटेंत लहान टुमदार घरें व त्यांच्या छोटेखानी बागा व हिरवळी पाहून मौज वाटली. बागेंत सुंदर फुलें असून, त्यांत अजून कांहीं गुलाबही दिसत होते. कांहीं घरें रस्त्याच्या सपाटीवर, तर कांहीं टेंकड्यांच्या उतरणी-वर होतीं. लाल भडक सफरचंदें झाडांवर लटकलेलीं पाहून व त्यांचा हवेंत दरवळलेला वास घेऊन मनाला फार आल्हाद वाटला. नंतर हळूहळू टेकडीवर चढून आम्ही Kents Cavern ( केंटस कॅव्हर्न ) नांवाच्या एका अतिशय पुरातन काळच्या गुहेकडे येऊन पोंचलों. या गुहेच्या खालच्या बाजूला एक लहानसा ओढा वाहत आहे.

ही गुहा प्रेक्षकांना दाखवून तींतील आश्चर्यानें थक्क करून सोडणाऱ्या अनेक गोष्टींचा खुलासा करून सांगण्यास एक तज्ञ मनुष्य तेथें आहे. तसेंच, त्या अंधाऱ्या गुहेंत नीट दिसावें म्हणून आंत विजेचे दिवे लाविलेले आहेत. या गुहेंत अतिशय पुरातनकाळचीं कांहीं मनुष्यें राहत होतीं. हें तेथें खोल जमिनींतून खोदून काढलेल्या कांहीं हत्यारांवरून समजतें. हीं हत्यारें दगड, हाडें व शिंगें यांचीं केलेलीं आहेत हीं मनुष्यें अर्धा, पाऊण लाख वर्षांमागें तेथें राहत असावींत असें अनुमान शास्त्रज्ञांनीं त्या गुहेत तयार झालेल्या खडकांच्या रचनेवरून काढलें आहे. गुहेंतील खणून काढ-लेल्या मातींत त्यावेळीं पृथ्वीवर वास्तव्य करीत असलेल्या अजस्र जनावरांचीं हाडेंही मिळालीं आहेत. व अशींच कांहीं हाडें अजून तथल्या मातींत पुरून गेलेलीं अशीं आमच्या नजरेस पडलीं. या गुहेत खडकांतून एकसारखें पाणी झिरपत असतें. व या झिरपणाऱ्या पाण्यांतील एका चुन्या-सारख्या द्रव्याचे अतिशय विलक्षण आकारांचे व निरनिराळया रंगांचे संगमरवरी दगडांसारखे दिसणारे खडक बनले आहेत. या खडकांचे

कांहीं लहानमोठे गज व खांब छपरापासून खालीं लोंबत आहेत, व कांहीं खालीं जमिनीवर उभे तयार झाले आहेत. यांपैकीं कांहीं खालचे व वरचे गज जोडले गेले आहेत, तर कांहींमध्यें जरा अंतर कायम आहे. या दगडांच्या आकृतींच्या अभ्यासानेंच असें ठरतें कीं, येथें ज्यांचीं हाडें मिळालीं तीं माणसें व जनावरें अर्धापाऊण लाख वर्षांमागें येथें राहत असावींत. या दगडांच्या आकृतींपैकीं कांहींना त्यांच्या विशिष्ट आकारांमुळें विशिष्ट नांवें दिलेलीं आहेत. एकाचें नांव Frozen Waterfall ( थिजलेला धबधबा), दुसऱ्याचें नांव Chinese Pagoda ( चिनी लोकांचें देऊळ ), व तिसऱ्याचे नांव Wedding Cake ( इंग्रज लोकांत लग्नाच्या वेळीं करतात तसली केक ) अशीं हीं नांवें आहेत. या संगमरवरी दगडासारख्या दिसणाऱ्या चित्रविचित्र खडकांचा समुदाय पाहून हें पऱ्यांच राहावयाचें अरण्य असल्याप्रमाणें भास होतो. असल्या एका खांबाला टिचकी मारल्याबरोबर त्यांतून मधुर सूर निघाला व दुसरा एक गुलाबी रंगाचा खडक इतका पारदर्शक आहे कीं, त्याच्या पाठीमागें साधा दिवा धरला असतां, अलीकडच्या बाजूला लाल उजेड पडला. गुहेबाहेरील लहानशा दुकानांतून येथली आठवण म्हणून एक अतिशय लहान मासा मी खरेदी केला. गुहेंत संगमरवरी दगडाप्रमाणें दिसणारा जो गुलाबी रंगाचा दगड वर्षानुवर्षे तयार झालेला आहे, त्या दगडाच्या तुकड्याचा हा मासा केला आहे.

दुपारीं येथलें पदार्थसंग्रहालय पाहण्यास आम्हीं गेलों. सकाळीं पाहिलेल्या या Kent's Cavern गुहेंतून खणून काढलेलीं हाडें, हत्यारें, वगैरे जिन्नस आम्हांला या ठिकाणीं पाहावयास मिळाले. लाखों वर्षांपूर्वीच्या रानटी स्थितींत असलेल्या मनुष्यांनीं केलेलीं दगडांचीं ओबड धोबड आउतें, व त्यानंतरच्या जराशा जास्त सुधारलेल्या माणसांनीं केलेलीं हाडांचीं आउतें आम्हीं येथें पाहिलीं. हाडाची फणी, सुई, चमचा, अशा तऱ्हेच्या वस्तु तेथें ठेवलेल्या दिसल्या. त्यावेळीं पृथ्वीच्या या भागांत राहत असलेल्या रानटी घोड्यांचीं, वाघांचीं, गुहेंत राहणाऱ्या अस्वलांचीं, हत्तींचीं Mammoth ( मॅमथ ) नांवाच्या जुन्याकाळच्या अजस्र हत्तींचीं हाडें व दांत येथें

ठेवलेले आम्हांला दिसले. हे सर्व जिन्नस आम्हीं सकाळीं पाहिलेल्या गुहेंतून काढलेले होते. कांहीं अस्वलांचे सुळे आपण मध्यम आकाराच्या ज्या करंज्या करतों तेवढे मोठे व त्यांच्याच आकाराचे होते.

ज्या इंग्लंड देशांत आज कोल्ह्यापेक्षां जास्त भयंकर असें रानटी जनावर दिसावयाचें नाहीं, त्याच देशांत लाखों वर्षांपूर्वी क्रूर, हिंस्र पशु राहत होते हा विचार मनांत येऊन, काळानें या जगांत किती मोटमोठे फेर घडून येत आहेत याचें आश्चर्य वाटलें; व पुढें एखाद्या भविष्यकाळीं आपल्या या हिंदुस्थान देशांतूनही क्रूर जनावरांचा नायनाट होईल अशी आशा वाटूं लागते.

## तारीख ९ नोव्हेंबर

सकाळीं आम्ही Marine Drive ( मरीन ड्राइव्ह ) नांवाच्या एका प्रशस्त रस्त्यानें फिरावयास गेलों. समुद्रालगत असलेल्या एका टेकडीवरून हा रस्ता गेला असल्यामुळें चालतांना एकसारखा समुद्राचा देखावा दिसत होता. टेकडीच्या माथ्यावर गेल्यावर तेथून खालीं असलेल्या समुद्राच्या लहानलहान खाड्या व त्यांच्या बाजूला वसलेलीं खेडेगांवें दिसलीं; मात्र, हवेंत धुकें असल्यामुळें देखावा चांगला स्पष्ट दिसत नव्हता. रस्ता चालतांना रस्त्याच्या बाजूला मधूनमधून एखादें घरही दिसे. दुसऱ्या बाजूनें टेकडी उतरल्याबरोबर आम्ही काल सकाळच्या रम्य रस्त्याला लागलों.

होटेलांत परत येतांना, त्या दिवशीं आपण होऊन आमच्याकडे ओळख करणारे कर्नल वॉर्डन व मिसेस नेलसन नांवाच्या त्यांच्या ओळखीच्या बाई आम्हांला भेटल्या; व त्या बाईनीं एका दुपारीं आपल्याकडे चहा घेण्यास आम्हांला बोलाविलें.

कर्नल पारट्रिज नांवाचे एक गृहस्थ आमच्या होटेलाच्या व्यवस्थापक मंडळीमध्यें होते, त्यांनीं आपण होऊन कांहीं मैलांवर असलेले एका गृहस्थांचे खासगी Botanical Gardens ( बोटॅनिकल गार्डन्स ) पाहावयास आम्हांला मोटरमधून नेलें. याचें कारण असें झालें कीं, सकाळीं फिरावयास गेलों असतांना रस्त्याच्या बाजूचीं कांहीं रानटी फुलें मीं तोडून आणलीं, व

त्यांचें नांव काय म्हणून होटेलाच्या व्यवस्थापकाला विचारलें; तेव्हां आम्हांला झाडांफुलांची माहिती करून घेण्याची आवड आहे असें वाटून, त्यांनीं त्यासंबंधीं कर्नल पारट्रिजनां सांगितलें; म्हणून कर्नल पारट्रिजनीं आम्हांला हा बाग पाहावयास नेलें.

या बागाची उभारणी वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करण्यास योग्य अशा तत्त्वांवर केली असल्यामुळें, येथें पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांतून आणिलेल्या अनेक वनस्पति आहेत. Rosemary, lavendar, heliotrope वगैरे ज्या सुवासिक वनस्पति यापूर्वीं मीं कधींही पाहिल्या नव्हत्या, त्या या बागेंत मीं पहिल्यानेंच पाहिल्या. पुष्कळ तऱ्हेचीं फुलें मीं तेथून घरीं घेऊन आलें. हा बाग अतिशय मोठा असून, त्याच्या एका भागांत पशुसंग्रहालयसुद्धां आहे; व विशेष गोष्ट ही आहे कीं हे दोन्ही संग्रह सार्वजनिक नसून एका माणसाच्या खासगी मालकीचे आहेत.

## तारीख १० नोव्हेंबर

Buckfast Abbey ( बकफास्ट ॲबे ) नांवाचा एक प्रसिद्ध मठ व देऊळ पाहण्याकरितां आम्हीं दुसऱ्या पुष्कळशा प्रवाशांबरोबर एका मोठ्या मोटरबसमधून गेलों. वाटेंत उंच प्रदेशांतील हिरवींगार कुरणें, त्यांत चरत असलेलीं गुरें, मेंढरें, मधूनमधून झाडांच्या राया, वगैरे सुंदर देखावा दिसला. पुढें Dart ( डार्ट ) नदीच्या किनाऱ्यानें रस्ता जात असतां नदीचें स्वच्छ पाणी, नदीच्या दोन्हीं किनाऱ्यांवरचीं या ऋतूमध्यें दिसणाऱ्या निरनिराळ्या रंगांच्या पानांनीं भरलेलीं झाडें व या लहानशा नदीला बांधलेलें पायऱ्यापायऱ्यांचें धरण दिसलें. ठिकठिकाणीं झाडांखालीं केलेले लाल सफरचंदांचे ढीगही आम्हीं पाहिले. Devonshire मध्यें, म्हणजे येथल्या या सर्व आसपासच्या प्रदेशांत या सफरचंदांपासून Suider ( सायडर ) नांवाचें एक रुचकर पेय तयार करतात.

Buckfast Abbey ( बकफास्ट ॲबे )कडे पोंचल्यावर आम्हीं खालीं उतरून येथलें मोठें पिवळसर रंगाच्या दगडांचें देऊळ आंतून पाहिलें, व

तेथें चालत असलेलें डागडुगीचें कामही पाहिलें. हा मठ शेंकडों वर्षांपूर्वीचा बांधलेला असून, आज कित्येक वर्षें त्याचें जीर्णोद्धाराचें काम रोमन कॅथलिक पंथाचे चारपांच भिक्षु स्वतः आंगमेहनतीनें करीत होते, ही गोष्ट विशेष होती. माती चाळण्यापासून तों नंतर दगड एकावर एक बसवून पक्कें बांधकाम तयार होईपर्यंतचें सर्व काम हे भिक्षु जातीनें खपून करीत होते. आम्हीं गेलों त्यावेळीं यांपैकीं एकजण मोठ्या चाळणीनें माती चाळीत असतांना आम्हांला आढळला. त्याच्याकडे स्वतः थोडे बोलले हे सर्व भिक्षु इंग्लंड देशामधले नसून, युरोपखंडामधल्या कोणत्यातरी देशांतले होते. येथल्या सफरीची आठवण म्हणून येथल्या लहानशा दुकानांतून आम्हीं एक 'पेपरवेट' (कागदांवर ठेवण्याचें वजन) खरेदी केलें (या मठाच्या डागडुगीचें काम अगदीं पूर्ण झाल्याची बातमी सन १९३२ मध्यें वर्तमानपत्रांतून कळली).

दुपारच्या जेवणानंतर 'Journey's End' नांवाचा बोलपट पाहवयास आम्हीं गेलों. लंडन शहरीं आल्याबरोबर आम्हीं पाहिलेल्या 'All quiet on the Westrn Front' या बोलपटाप्रमाणें 'Journey's End' हा बोलपटसुद्धां युरोपमधल्या महायुद्धासंबंधीं आहे; त्यामुळें अर्थात् हा शोकपर्यवसायी असून मनाला रुखरुख लावून सोडतो; पण 'All quiet on the Western Front' या बोलपटामध्यें लढाईच्या अनेक बाजू दाखविल्यामुळें, तो 'Journey's End' पेक्षां जास्त परिणामकारक वाटला.

आम्हांला या होटेलांत पहिल्याच रात्रीं भेटून ज्या डॉ. Han Kine नीं आमची ओळख केली, त्यांच्याकडे लहानशा एका लाकडी पेटीप्रमाणें दिसणारा एक 'रेडियो सेट' होता. रात्रीं जेवणानंतर या 'रेडियो' वरून लंडनमध्यें Prince Of Wales (प्रिन्स ऑफ वेल्स) नीं केलेलें भाषण आम्हीं स्पष्ट ऐकलें. दुसऱ्या दिवशीं महायुद्धाचा शेवट झाल्याची तारीख असल्यामुळें, त्या दिवशीं विकल्या जाणाऱ्या कृत्रिम अफूच्या फुलांची खरेदी करून लढाईमुळें पंगु झालेल्या लोकांच्या फंडाला हातभार लावण्यासंबंधीं उपदेश या भाषणामध्यें केलेला होता.

हा लहान पेटीसारखा 'रेडियो सेट' म्हणजे सध्यांच्या युगांतील एक 'जादूची पेटी'च नव्हे तर काय? साध्या पेटीसारखी दिसणारी पेटी! कोठें कशाला जोडलेली नाहीं, कीं कांहीं नाहीं! जरासें यंत्र हालविल्याबरोबर युरोप खंडांतील किंवा आफ्रिका खंडांतील एखाद्या गांवांत चाललेलें गायन-वादन बसल्याबसल्या या टॅारकी गांवांत आमच्या कानीं पडे!

## तारीख ११ नोव्हेंबर

सकाळीं होटेलांत लाल रंगाचीं अफूचीं कृत्रिम फुलें कोणी विकावयास आणिलीं. त्यांतून आम्हीं एक दोन खरेदी केलीं. नंतर समुद्रालगत असलेल्या एका टेकडीवर वळसे घेत जाणाऱ्या एका रम्य व शांत रस्त्यानें आम्ही फिरत गेलों. या रस्त्याचें नांव Bishops Walk असें होतें. येथें एका एकांत जागीं असलेल्या एका लहान बांकावर आम्ही बसलों. समोर अफाट समुद्र पसरलेला होता. एक पिवळसर तपकिरी रंगाच्या छातीचा पक्षी मधून मधून उड्या मारीत येऊन आमच्यापासून दोनचार हातांवर येऊन बसे व आमच्याकडे टवकाहून पाही; व पुन: झाडांत पळून जाई. त्यानें आमच्या अगदीं जवळ यावें म्हणून आम्हीं तेथल्या झुडपांवरचीं कांहीं बारीक रानटी फळें तोडून तीं हातांत धरून बसलों. यानंतर तो परत आमच्या समोर आलाही. पण तितक्यांत एकदोन माणसें त्या रस्त्यानें आलेलीं पाहून तो घाबरून उडाला.

## तारीख १२ नोव्हेंबर

या गांवांत असलेलें महायुद्धांतील मृतयोद्धयांच्या स्मरणार्थ उभारलेलें स्मारक पाहावयास आम्ही सकाळीं गेलों. मुलांनीं युद्धांत पडलेल्या आपल्या बापांच्या स्मरणार्थ व बहिणींनीं आपल्या भावांच्या स्मरणार्थ ठेविलेल्या खऱ्या व कृत्रिम फुलांचे हार आणि इतर लोकांनींही योद्धयांच्या स्मरणार्थ ठेविलेले हार व कृत्रिम अफूचीं फुलें येथें पुष्कळच ठेविलेलीं आम्हांला आढळलीं.

दुपारीं डॉ. हेन्किनच्या रेडियोवर पहिल्या 'गोलमेज परिषदे'च्या सुरुवातीला केलेलें बादशहाचें भाषण आम्हीं ऐकलें, तें अगदीं स्पष्टपणें ऐकू आलें. त्यानंतर कांहीं हिंदी महाराजांचीं व इतर वक्त्यांचीं भाषणेंही आम्हीं ऐकलीं.

यानंतर मिसेस् नेल्सन् या बाईकडे आम्ही चहा घ्यावयास गेलों. वर लिहिलेंच आहे कीं या बाई एकदां आम्हाला रस्त्यावर भेटल्या असतांना त्यांनीं आम्हांला आपल्या येथें चहा घेण्यास बोलाविले होते म्हणून. तेथें कर्नल वार्डन् होतेच. त्यांच्याकडे पुष्कळ विषयांवर आमचें बोलणेंचालणें झालें, त्यांत हिंदुस्थान हाही एक विषय होता.

## तारीख १३ नोव्हेंबर

Clovelly ( क्लव्हेली ) नांवाचें एक खेडें विलक्षण तऱ्हेनें एका डोंगराच्या वळचणींत वसलेलें असून, तें रम्य व पाहण्यासारखें आहे असें समजल्यावरून आम्ही तें पाहण्याकरितां मुद्दाम अगदीं सकाळच्या गाडीनें निघालों. तेथें जाण्यांत अर्धा दिवस मोडला व वाटेंत तीन टिकाणीं आगगाडी बदलावी लागली. असा कटकटीचा हा प्रवास होता, तरी आगगाडींतून दिसणारा देखावा मात्र अतिशय रमणीय होता. हिरव्यागार प्रदेशांतून दोन मोठ्या नद्या वळणें घेत घेत चालल्यासारख्या दिसत होत्या. शेवटीं एकदां आम्ही Bideford ( बिडीफोर्ड ) या गांवीं येऊन आगगाडींतून उतरलों. या गांवाहून क्लव्हेली Clovelly येथें जाण्यास मोटरबसमध्यें बसावें लागलें. आमची बस उभी होती त्या रस्त्याच्या बाजूला नदी व नदीच्या पलीकडे जरा उंचावर लहान घरें असा या गांवाचा देखावा आमच्या नजरेला पडला. नदींत मोठमोठीं जहाजें उभीं होतीं. प्रसिद्ध इंग्रज कादंबरीकार Kingsley ( किंग्सले ) याच्या Westward Ho या कादंबरीचें कथानक Bideford या गांवाच्या पार्श्वभूमीवर रचलें असल्यामुळें, या ग्रंथकाराचा या गांवीं उभारलेला पुतळा आम्हांला दूर दिसत होता.

Bideford ( बिडिफोर्ड ) पासून Clovelly ( क्लव्हेली ) ला जाण्याचा रस्ता फार सुंदर होता. नदीवरचा पांचशें वर्षांचा जुना पूल ओलांडून गेल्यावर, उंचसखल प्रदेशांतून आमची बस जात असतां, आजूबाजूला हिरवींगार कुरणें व मधूनमधून सुंदर लहान रस्ते लागत. मध्येंच लहान लहान पण रम्य अशीं घरें असलेलीं शांत खेडींही आम्हांला लागलीं. येथलीं खेडीं व हिंदुस्थानांतील खेडीं यांत पुष्कळ फेर आहे. आपल्या देशांत खेडीं म्हटलीं म्हणजे शेणामातीचीं तयार केलेलीं ओबडधोबड खोपटीं नजरेसमोर उभीं राहतात; पण इंग्लंडमधलीं खेडीं यापेक्षां वरच्या दर्जाचीं असतात. यांतलीं घरें कितीही लहान असलीं तरी तीं मोठ्या बंगल्यांप्रमाणें विटाचुन्याचीं केलेलीं असतात; त्यामुळें तीं दिसण्यांतही छान टुमदार दिसतात. मधूनमधून दूर अंतरावर समुद्रही दिसत होता.

शेवटीं Clovelly ला पोंचल्यावर आम्ही 'बस' मधून उतरलों. हवा उत्तम होती व वेळ दुपारची होती; अशा परिस्थितींत आम्ही ते खेडगाव पाहण्यास निघालों. समुद्रालगतच्या एका लहान टेकडीच्या माथ्यापासून तों खालीं समुद्रापर्यंत पोंचलेल्या एका वळचणींत हे गांव वसलेलं असल्यामुळें, त्याची रचना फार मजेदार आहे. टेकडीच्या शेंड्यापासून समुद्राकडे जाणारा एक लहानसा पण फरसबंदी रस्ता व त्या एकाच रस्त्याच्या दोन बाजूंना लहान लहान घरें अशी या लहानशा गांवाची मांडणी आहे. त्यामुळें एका घरांतील माणसांना शेजारच्या घरीं जावयाचें झाल्यास रस्त्यावरून थोडेंसें खालीं तरी उतरलें पाहिजे. नाहींतर, वर तरी चढलें पाहिजे. उन्हाळ्यांत जे प्रवासी लोक हा छोटासा गाव पाहावयास येतात, त्यांना हा सर्व गांव खालीं उतरून पाहण्यास सोईचें पडावें म्हणून गाढवाची सोई केलेली असते. या जनावरांच्या पाठीवर बसून खालीं समुद्रसपाटीपर्यंत जातां येतें. आम्हीं गेलों त दिवस थंडीचा असल्यामुळें, हीं गाढवें गांवाच्या बाजूला मोकळेपणानें चरत असतांना आम्हीं पाहिलीं. आम्हीं पायींच जाण्यास निघालों; पण वेळ थोडा असल्यामुळें व शेवटपर्यंत उतरून खालीं गेल्यास परत वर चढून येतांना मला फार

थकवा येईल असें वाटून, आम्हीं फक्त अर्धामर्धा रस्ता उतरून गेलों. तेथून खालीं या गांवचें छोटेंसें बंदर व त्यांतील लहान होड्या आमच्या नजरेस पडल्या. एक मनुष्य खालून मासे धरून आणून वर गांवांत चढून येत असलेला आम्हांला दिसला. आम्हीं येथल्या एका दुकानांत या गांवच्या देखाव्यांचीं कार्डें खरेदी केलीं; आणि Bideford ( बिडिफोर्ड )च्या स्टेशनाकडे परत जाणारी बस येण्याची वेळ होत असल्यामुळें टेकडीच्या माथ्यावर चढून आलों. येथें बसलों असतां त्या गांवचा एक मनुष्य आमच्याकडे येऊन बोलूं लागला. तो कांहीं वर्षांमागें हिंदुस्थानांत येऊन गेलेला होता. कांहीं वेळानें एक बाई आम्हांला दूर दिसली; ती जवळ आल्यावर कोण आहे हें समजतांच आम्हांला फार आश्चर्य वाटलें. कांहीं दिवसांपूर्वी इंग्लिश सरोवरांच्या आसपासच्या प्रदेशांत प्रवास करीत असतां केझिक गांवापासून ग्रासमिअरपर्यंत ज्या अमेरिकन मुलीचा आम्हांस सहवास घडला होता, व जी शेवटीं ग्रासमिअरला आमच्या हॉटेलांत उतरली होती तीच मुलगी ही होती. तिलाही आम्हांला येथें पाहून फार मौज वाटली. ग्रासमिअरला आमची व तिची फाटाफूट झाल्यावर ती दुसऱ्या ठिकाणीं प्रवास करून शेवटीं हा गांव पाहण्यास आदल्याच दिवशीं आली होती व या गांवांतील एका खानावळींत उतरली होती.

इंग्लंड देशांत प्रवास करतांना ही एक गोष्ट आमच्या लक्ष्यांत आली कीं एखादें सुंदरसें गांव असलें कीं तें कितीही लहान असो, तरी तेथें प्रवासी लोकांना राहण्याजेवण्याची सोय करण्याकरितां एखादी खाणावळ ही असावयाचीच. शिवाय, गांवांतील कांहीं रहिवाशांच्या घरींही प्रवाशांना थोडे दिवस राहण्याची सोय खासगी तऱ्हेनें केली जाते. यामुळें दोन फायदे होतात; एक असा कीं, रमणीय ठिकाणें पाहण्याची हौस असलेल्या प्रवाशाला कोठल्याही ठिकाणीं जाऊन सुखानें राहतां येतें; दुसरा फायदा असा कीं, अशा तऱ्हेनें प्रवासी येऊन राहिल्यानें गांवांतील लोकांना मिळकतही होते. दुसरी एक गोष्ट आम्हीं पाहिली ती ही कीं, अशा प्रत्येक सुंदर स्थळीं तेथल्या देखाव्यांचीं कार्डें व दुसऱ्या लहानलहान वस्तूंचीं दुकानें असतात.

प्रवासी लोकांना त्या ठिकाणीं झालेल्या आपल्या वास्तव्याची आठवण म्हणून साहजिकच हीं कार्डे व या वस्तु खरेदी कराव्याशा वाटतात. या एकदोन सोयी आपल्या देशांतील सुंदर स्थळीं झाल्या तर काय बहार होईल ? मग लोकांच्या नातलगांकडे जाऊन राहून त्यांना विनाकारण त्रास देण्याचेंही कारण राहणार नाहीं. असो !

कांहीं वेळानें आम्हीं मोटरबसमधून पुन: Bideford ला जाण्यास निघालों. थोड्या अंतरापर्यंत ती अमेरिकन मुलगीही आमच्याबरोबर बसमधून आली. आम्हीं एकमेकींना आमचीं नांवें व आपापल्या देशांतील आमचे पत्ते लिहून दिले.

' बिडिफोर्ड 'ला आगगाडींत चढून आम्हीं परत ' टॉरकी 'ला येण्यास निघालों. मध्यें आगगाडी बदलण्यासाठीं जेव्हां एका स्टेशनावर आम्हांला उतरावें लागलें तेव्हां तेथेंच चहा व खाणें घेऊन, मग रात्रीच्या जेवणाच्या वेळीं आम्हीं टॉरकीच्या आमच्या होटेलांत परत येऊन दाखल झालों.

## तारीख १४ नोव्हेंबर

सकाळीं Brixham ( ब्रिक्सहॅम ) चें बंदर व त्याला लागूनच असलेली Berryhead ( बेरीहेड ) नांवाची टेकडी पाहावयास आम्ही दुसऱ्या पुष्कळ मंडळीबरोबर मोटरबसमधून गेलों. रस्त्यानें जातांना नेहमींसारखाच सुंदर देखावा लागला. Brixham हें मासेधरू लोकांचें एक जुनें व शांत खेडें असून, येथें लहानलहान पण टुमदार व नीटनेटकीं अशीं घरें आहेत. कांहीं घरांचीं नांवें मला तऱ्हेवाईक वाटलीं. एका घराचें नांव ' सीता ' होतें. हिंदुस्थानांत येऊन गेलेल्या एखाद्या खलाशानें हें नांव दिलें असावें. याला लागून असलेल्या एका टेकडीवर चढल्याबरोबर ( याच टेकडीचें नांव Berayhead ( बेरीहेड ) होतें ) तेथून आजूबाजूच्या समुद्राचा, त्याच्या लहानसहान खाड्यांचा व त्या खाड्यांत फिरत असणाऱ्या तपकिरी शिडांच्या होड्यांचा आणि आजूबाजूच्या टेक-

ऱ्यांच्या खोऱ्यांतून वसलेल्या लहान लहान गांवांचा सुंदर देखावा लांब-पर्यंत आमच्या नजरेला पडला.

दुपारच्या जेवणानंतर आम्ही टॉरकी गांवांत जाऊन सामानानें सुस-ज्जित केलेल्या दुकानांच्या खिडक्या पाहत फिरलों.

## तारीख १५ नोव्हेंबर

आज आमचा टॉरकी सोडून लंडनला जाण्याचा दिवस होता. टॉरकी-मधल्या दहा दिवसांच्या वास्तव्यांत आम्हांला हिंदुस्थानसारखा स्वच्छ सूर्यप्रकाश उपभोगण्यास मिळाला. इंग्लंड देशांत वर्षांतील पुष्कळ महिने ढगें व पाऊस हीं अनुभवावीं लागतात; त्यामुळें स्वच्छ सूर्यप्रकाश पाहिल्यानें सर्वांच्याच मनाला आल्हाद वाटतो. Osborne Hotel (ऑसबोर्न होटेल) मध्यें माणसें थोडीं होतीं, पण त्यांतल्या एकदोन माणसांकडे आमची ओळख झाल्यानें आम्हांला एकलकोंड्यासारखें वाटलें नाहीं एक जरा विक्षिप्त बाई आम्हांला येथें भेटली, तिच्याकडे हिंदुस्थानासंबंधीं व दुसऱ्या पुष्कळ विषयासंबंधीं आमचें बोलणें झालें. डॉ. हॅन्किननीं आमच्या-कडे पहिल्याच दिवशीं ओळख केली होती, तेव्हां त्यांच्याकडेही आमचें पुष्कळ संभाषण झालें. याशिवाय, दुसऱ्या कांहीं रहिवाशांबरोबरही केव्हां केव्हां आम्ही गोष्टी बोलत असूं.

आमच्या होटेलाचा व्यवस्थापक व इतर काम करणारी मंडळी यांचा निरोप घेऊन दुपारच्या गाडीनें आम्ही लंडनला जावयास निघालों आग-गाडी कांहीं वेळानें Newton Abbot या स्टेशनावर थोडी थांबली; पण तेथून निघाल्यावर थेट लंडनला पोंचेपर्यंतच्या १८० मैलांच्या प्रवासांत ती कोठेंही थांबली नाहीं. हिंदुस्थानांतील आम्हां रहिवाशांना अतिशय परिचयाचे असलले, पुष्कळ कारखाने या प्रवासांत आगगाडींतून जातांजातां आमच्या नजरेस पडल Huntly & Palmers (हंट्ली ॲन्ड पामर्स) चा बिस्किटांचा कारखाना, Nestle (नेसले) चा चॉकोलेटचा कारखाना, Fry (फ्राय) चा कोकोचा कारखाना आणि Scott (स्कॉट) च्या

इमलशनची प्रयोगशाळा हीं आम्हांला ओझरतीं दिसलीं. Sutton ( सटन ) च्या बियांचे प्रयोग करून पाहण्याची शेतीजागाही आम्हांला दिसली. संध्याकाळीं लंडनला पोंचून Endsleigh Hotel नांवाच्या एका स्वस्त दराच्या हॉटेलांत आम्हीं राहावयास गेलों.

## तारीख १६ नोव्हेंबर

लंडन शहरांत हिंदी जेवण मिळण्याचीं जीं हिंदी लोकांनीं चालविलेलीं चारपांच दुकानें आहेत, त्यांत शफीचें दुकान हिंदी लोकांना फार प्रिय झालेलें आहे. तेथें आम्हीं दुपारच्या जेवणाकरितां गेलों. पुष्कळ हिंदी मंडळी तेथें आली होती.

जेवण झाल्यावर प्रसिद्ध गाणारी Galli Curci हिचा जलसा ऐकावयास आम्ही Albert Hall नांवाच्या अतिशय भव्य, जंगी व वर्तुलाकार इमारतीच्या दिवाणखान्यांत गेलों. या दिवाणखान्यांत पंधरावीस हजार माणसांची बसावयाची सोय केलेली आहे. बसण्याच्या खुर्च्यांची रचना नाटकगृहांतील खुर्च्यांप्रमाणें केलेली आहे. खालच्या जागांना अतिशय किंमत पडत असल्यामुळें, आम्ही बऱ्याच वरतीं खुर्च्या घेतल्या होत्याः पण दिवाणखान्याचें बांधकाम इतक्या शैलीनें केलेलें आहे, कीं तितक्या वर सुद्धां आम्हांला Galli Curci चें गाणें स्पष्ट ऐकूं आलें. आम्हां हिंदवासियांना सर्वच इंग्रजी गाणीं कानाला मधुर लागणें हें शक्य नाहीं; तरीपण मला तिचा आवाज मधुर व गाणें भावनामय वाटलें. तिचा आवाज गातांना अतिशय चढत असे, आणि तिनें घेतलेल्या कांहीं ताना पक्ष्यांच्या गानाप्रमाणें कानाला लागल्या. तिच्या गाण्यानंतर व बरोबरच्या माणसाच्या पिआनो वादनानंतर श्रोत्यांनीं टाळ्यांचा इतका कडकडाट केला कीं, त्या दोघांना जलसा संपल्यावरही आणखी कांहीं चिजा श्रोत्यांना ऐकवाव्या लागल्या. एकदां तर स्वतः गाणारणीला पिआनोकडे बसून गाण्याचें व वाजवण्याचें अशीं दोन्ही कामें एकदम करावीं लागलीं. ' Lo, Hear The Gentle

Lark' ' Home, Sweet Home ' आणि ' La Paloma ' हीं गाणीं Galli Curci नें फार छान म्हटलीं.

## तारीख १७ नोव्हेंबर

St. Paul's Cathedral नांवाचें इंग्लंड देशांतील अतिशय मोठें व जुनें खिस्ती देऊळ पाहावयास आम्ही गेलों. या देवळांत हजारों मनुष्यांची बसण्याची सोय आहे, व देवळावरतीं असलेल्या घुमटाचा जगांतील सर्व मोठ्या घुमटांत तिसरा नंबर लागतो. ( विजापूरच्या गोलघुमट इमारतीवरील घुमट व रोम शहरांतील St. Peter's Cathedral या देवळावरील घुमट हे दोन्हीहि St. Paul's Cathedral च्या घुमटापेक्षां मोठे आहेत असें म्हणतात ) या देवळांतील व्यासपीठ संगमरवरी दगडाचें केलेलें असून तें खूप मोठें आहे. व्यसपीठाच्या बाजूला असलेल्या मेणबत्त्या मुसळाएवढ्या जाड व उंच दिसल्या. घुमटाच्या आंतल्या बाजूला सोनेरी व रंगांत नक्षीकाम केलें आहे. त्या घुमटाच्या आंत वर्तुलाकार गॅलरीज सुद्धां आहेत. पण माझ्या प्रकृतीच्या नादुरुस्तीमुळें आम्हीं तेथें वर चढून गेलों नाहीं. देवळांत भिंतींच्या बाजूला सैन्याचे पुढारी, लेखक, चित्रकार, वगैरे अनेक प्रसिद्ध लोकांचे पुतळे ठेवलेले आहेत; आणि देवळाखालीं जें भुयार आहे त्यांत प्रसिद्ध लोकांचीं थडगीं आहेत. Wren ( रेन ) नांवाच्या ज्या कारागिरानें हें देऊळ बांधिलें आहे त्याचे अगदीं साधें, दगडी रंगाचें थडगें येथेंच आहे. त्याचें थडगें इतकें साधे असावयाचें कारण हे कीं त्या कारागिराचें खरें स्मारक म्हणजे Paul's Cathedral हें देऊळच आहे. या भुयारांत दोन मोठीं थडगीं आहेत, त्यांतील एक प्रसिद्ध योद्धा नलसन याचें आहे, व दुसरें दुसरा प्रसिद्ध योद्धा ड्यूक ऑफ वेलिंग्टन याचें आहे. या ' ड्यूक ' चें थडगें उत्तम झिलई केलेल्या राखी रंगावर तांबडे टिपके असलेल्या संगमरवरी दगडाचें आहे. येथें एक अतिशय जड व जंगी अशी पोलादी गाडी ठेविलेली आहे. ती ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या तोफा वितळ-

वून त्यांची केलेली आहे. 'ड्यूक' च्या मृत्युसमयीं या गाडीला १२ काळे घोडे जोडून व तिच्यावर त्याचें शव घालून तें पुरण्याच्या जागीं नेलें होतें.

दुपारचें जेवण एका दुकानांत जेवून आम्ही Royal Academy या चित्रकारांच्या संस्थेची इमारत पाहावयास गेलों. या संस्थेचा सभासद होण्याचा मान मिळण्यासाठीं, चित्रकारांना जीं चित्रें काढून दाखवावीं लागतात, त्यांपैकीं कांहीं चित्रें आम्हीं येथें पाहिलीं. 'On Strike ('संप पुकारला') या नांवाचें चित्र शोकपूर्ण दिसतें. पुरुषाच्या कपाळावर आठ्या व चेहऱ्यावर निश्चय दिसत असून, त्याची बायको दुःखानें त्याच्या खांद्यावर टेकलेली आहे, व मुलीचा चेहरा कुतूहलपूर्ण दिसतो आहे. 'The Outcast' ('वाळींत टाकलेली') हें चित्रसुद्धां शोकपूर्ण आहे. एक लग्न न झालेली मुलगी आपलें मूल घेऊन दुःखी चेहऱ्यानें उभी असून, तिचा बाप तिला घरांतून घालवून देत आहे आणि कुटुंबांतील इतर मंडळी उदास होऊन सभोंवतीं जमलीं आहेत असा हा देखावा आहे. 'Window near the Harbour' ('बंदराजवळची खिडकी') हें चित्रसुद्धा छान आहे. बंदर दिसत आहे अशा एका खिडकीजवळ बसून एका मासेधरूची बायको कांहीं शिवण शिवीत आहे असा हा देखावा आहे. या चित्रांतील उजेड व काळोख यांचा मिलाफ अगदीं खऱ्यासारखा साधला आहे. याशिवाय अनेक सुंदर देखावे, माणसांच्या तसबिरी, सूर्यप्रकाश व सावलीचा योग्य मिलाफ झालेलीं सुंदर चित्रें आम्हीं येथे पाहिलीं. इंग्रज चित्रकारांनीं काढलेलीं दोन हिंदुस्थानांतील देखाव्यांचीं चित्रें येथें पाहून मला फार कौतुक वाटलें. एका चित्राचें नांव 'Ghaut in Benares' (बनारसमधला घाट) असें असून, दुसऱ्याचें नांव 'Hindu Temple in Brindabund' (वृंदावनमधलें हिंदु देऊळ) असें होतें. या संग्रहालयांत कांहीं सुंदर पुतळेही आहेत, आणि कांहीं चित्रकारांच्या रंग मिसळून पाहण्याच्या लाकडी पाट्यां (Palettes) व कांहीं चित्रकारांनीं आपल्या चित्रासाठीं मोल देऊन आणविलेल्या माणसांना बसावयास दिलेल्या खुर्च्या, अशा तऱ्हेचें सामानही येथे संग्रहित केलेलें आहे.

# तारीख १८ नोव्हेंबर

येथली इतिहासप्रसिद्ध Towr of London ( टॉवर ऑफ लंडन ) नांवाची इमारत पाहावयास आम्हीं गेलों. ही इमारत भुऱ्या रंगाच्या दगडाची बांधलेली असल्यामुळें बाहेरून भव्य दिसण्यापेक्षां भयानक दिसते. ही एका अतिशय प्रशस्त मैदानांत असून येथें पाहारा असतो, व आंतून इमारत पाहण्यासाठीं पास काढावा लागतो. या इमारतीचे निरनिराळे सुटे भाग असून त्यांना निरनिराळीं नांवें आहेत. White Tower ( व्हाइट टॉवर ) नांवाच्या इमारतींत तलवारी, बंदुका व लढाईंत लागणाऱ्या इतर जुन्या शस्त्रास्त्रांनीं भरलेलीं दालनेंचीं दालनें आहेत. लढाईच्या वेळीं घोडेस्वारांच्या घोड्यांना घालण्याचीं चिलखतेंही येथें होतीं. कांहीं बंदुकींवर व बंदुकीची दारू ठेवण्याच्या डब्यांवर हस्तिदंत बसवून नक्षीकाम केलेलें पाहून मला जरा आश्चर्य वाटलें. मनुष्यांना एकमेकांना मारतां यावें म्हणून शोधून काढलेल्या राक्षसी उपकरणांना अशा तऱ्हेनें कृत्रिम शोभा आणणें म्हणजे मानवी कलेचा दुरुपयोग केल्यासारखें होत नाहीं काय ? व्हिक्टोरिआ महाराणी आणि पांचवे एडवर्ड बादशहा यांचीं मृतशरीरें ज्या लोखंडी गाड्यांवरून घालून मूठमाती देण्याकरितां नेलीं होतीं, त्या गाड्या येथें ठेविलेल्या आम्हीं पाहिल्या. या इमारतीच्या खालीं अंधारें भुयार आहे तेथें गेलें म्हणजे मन भयभीत होतें. जुन्या काळीं या तळघराचा बंदीखान्याप्रमाणें उपयोग केला जात असे. सध्यां येथें कांहीं जंगी तोफा ठेवलेल्या आहेत. या तळघराच्या आंत एक जुन्या काळची विहीर अजून पाण्यानें भरलेली आहे. त्या काळीं या इमारतींत असलेल्या राजेलोकांच्या राहावयाच्या खोल्यांना पाण्याचा पुरवठा या विहिरींतून होत असे असें सांगतात.

दुसऱ्या इमारतीचें नांव Beanchamp Tower असें आहे. येथें जुन्या काळीं मोटमोठ्या दर्जाचे राजकीय कैदी बंदिवासांत ठेविले जात असत. येथें याप्रमाणें अटकेंत ठेविलेल्या कैद्यांना मरणाची शिक्षा केव्हां होईल याचा नेम नसे. तरी, तशा मनाच्या स्थितींतही त्यांपैकीं कांहींजण



ग्रासमिअर्  [ पृ. ५०



वल्हेली खेडेगांव  [ पृ. ८०

आपला वेळ तेथल्या घट्ट दगडी भिंतींवर आपलीं नांवें व इतर लेख सुंदर अक्षरांत कोरण्यांत व त्यासभोंवतीं नक्षीकाम खोदण्यांत घालवीत असत. ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय ! ते लेख, व तें नक्षीकाम आजमितीला पाहून, पाहणाऱ्याच्या मनांत त्या बिचाऱ्यांविषयीं दया व त्यांच्या धैर्याविषयीं कौतुक वाटल्यावांचून राहत नाहीं. कांहींनीं आपल्यावर लौकरच येणाऱ्या मरणाच्या प्रसंगाविषयीं तत्वज्ञानानें भरलेलीं वाक्यें येथें कोरून ठेविलीं आहेत. Lady Jane Grey ( लेडी जेन ग्रे ) नांवाच्या ज्या तरुण इंग्लंडच्या राणीचा वध करण्यांत आला तिचें नांव Jane ( जेन ) असें तिच्या पतीनें येथें खोदून ठविलें आहे तें आम्हीं पाहिलें. ज्या काळीं राजकारणासाठीं म्हणून अगदीं तरुण व वृद्ध माणसांचा॰ह्वां वध केला जात असे अशा त्या जुन्या आमदानीचें स्मारक या इमारतींत पाहावयास मिळतें. प्रसिद्ध स्कॉच कादंबरीकार Sir Walter Scott ( सर वॉल्टर स्कॉट ) यानें आपला कितीतरी वेळ येथल्या या कोरलेल्या लेखांच्या अभ्यासात घालविला. व अशा तऱ्हेनें मिळविलेल्या माहितीचा त्यानें आपल्या कांहीं कादंबऱ्यांत उपयोग केला.

येथें एक Bloody Tower ( म्हणजे 'रक्ताचा बुरूज' ) नांवाची इमारत आहे, तेथल्या एका खोलींत ज्या बंदिवान लोकांना पुढें फासावर चढविण्यांत येत असे त्यांना ठेवण्यांत येत असे. अशा तऱ्हेनें ठेवलेल्या कितीतरी लोकांचा पुढें वध करण्यांत आला. त्यांत प्रसिद्ध धर्मसुधारक Littimer हाही होता. इतिहासप्रसिद्ध Sir Walter Raleigh यानें कितीतरी वर्षें येथें बंदिवासांत काढलीं. त्यानें येथें असतांनाच History of the World ( जगाचा इतिहास ) हा ग्रंथ लिहिला. तो ग्रंथ पहिल्यानें छापला त्यावेळची एक प्रत अजून येथें ठेवलेली आहे. या इमारतीच्या वरच्या मजल्यावर एक लहानशी उघडी गॅलरी आहे, तेथें फिरून Raleigh ( रॅले ) रोजचा व्यायाम घेत असें. इंग्लंडच्या इतिहासांत महशूर असलेल्या दोन लहान राजपुत्रांचा त्यांच्या चुलत्यानें घडवून आणलेला खून येथल्याच एका लहानशा खोलींत झाला, ती खोली आम्हीं

पाहिली. बिचाऱ्या त्या दोन मुलांचीं हाडें पुढें कितीशा वर्षांनीं या Tower of London इमारतीच्या दुसऱ्या एका भागांत एका भिंतीच्या खालीं पुरलेलीं आढळलीं.

या Tower of London वरून जो शहरांतील रस्ता जातो त्याच्या पलीकडेच टेम्स नदी व तिच्यावरून बांधलेला Tower Bridge नांवाचा मोठा पूल आहे. Tower पाहून झाल्यावर एका दुकानांत जेवून व दुसऱ्या दुकानांत कांहीं खरेदी करून आम्ही घरीं परत आलों. वाटेंत कांहीं गरीब मनुष्यांनीं रस्याच्या बाजूच्या दगडी पायवाटांवर काढलेलों रंगीत खडूंचीं सुंदर चित्रें आम्हीं पाहिलीं. काल दुसऱ्या एका गरीब माणसानें लोकरीनें भरलेलीं चित्रें आम्हीं पाहिलीं. बिचाऱ्यांच्या अंगीं कला व कर्तबगारी आहे, पण स्थिति मात्र आहे फार हलाखीची. या देशांत कोणाही माणसाला रस्त्यांत भिक्षा मागत फिरण्याची मनाई असल्यामुळें, आंधळ्या लोकांना-सुद्धां काड्यांच्या पेट्या किंवा असेंच कांहीं विकत फिरावें लागतें. कांहीं गरीब लोक गाणें म्हणत तर कांहीं Organ नांवाचें वाद्य वाजवीत थंडीवाऱ्यांत सुद्धां रस्ते हिंडत फिरत असतात; कारण त्यांना तेंच एक उपजीविकेचें साधन असतें.

## तारीख १९ नोव्हेंबर

आम्ही 'ब्रिटिश म्युझिअम' ची इमारत पाहावयास गेलों. या संग्रहालयाच्या इमारतींत एक अतिशय जंगी अशी वर्तुलाकार वाचावयाची खोली आहे. त्या खोलीच्या सबंध वाटोळ्या भिंतीच्या बुडापासून तों शेंड्यापर्यंत पुस्तकांच्या 'शेल्व्हज' लागलेल्या आहेत, व त्यांवर पूर्वी होऊन गलेल्या मोठमोठ्या इंग्रज कवींचे व इतर ग्रंथकारांचे सर्व लेख व त्यांसंबंधींचीं टीकात्मक पुस्तकें संगतवारीनें लावून ठेविलेली आहेत. येथें असलेल्या अनेक ग्रंथांचा अभ्यास करणाऱ्या लोकांसाठीं या खोलीमध्यें सोईवार बसावयास जागा, दिवे, वगैरे उत्तम प्रकारची व्यवस्था आहे; व येथें बसलेली प्रत्येक व्यक्ति आपापल्या कामांत चूर असून, बोलणें किंवा अगदीं बारीकसारीक आवाज

मुद्धां येथें कधीं ऐकूं येत नाहीं. अभ्यासाला ज्या शांततेची जरुरी असते ती शांतता येथें पूर्णपणें नांदतांना दिसते. या खोलीच्या बाहेरच्या बाजूला एकीवर एक अशा बांधलेल्या चारपांच वर्तुलाकार गॅलऱ्या आहेत त्यांत छापण्याची कला निघाल्यापासून तों आतांपर्यंत छापलेल्या सर्व पुस्तकांचा संग्रह केलेला आहे. हीं पुस्तकें लाखों आहेत. या संग्रहालयाच्या दाराचें कुलुप काढून आम्हांला तेथल्या रखवालदारानें आंत डोकावयास दिलें; त्यामुळें हा संग्रह केवढा मोठा असावा याची अंधुकशी कल्पना आली.

या सुमाराला या इमारतीच्या एका बाजूला पुस्तकांच्या बांधणीकामाचें प्रदर्शन चालू होतें. त्यांत अनेक देशांतलीं, निरनिराळया प्रकारच्या बांधणीचीं जुनीं व नवीं पुस्तकें मांडलेलीं होतीं. त्यांत कांहीं हिंदुस्थानांतले नमुनेही होते. येथें कांहीं जुनीं वेलबुट्टीनें सुशोभित केलेलीं हस्तलिखितें होतीं तीं पाहण्यालायक होतीं. या हस्तलिखितांतील अक्षर अतिशय काळजीपूर्वक व सुंदर काढलेलें होतें. कांहीं ठिकाणीं तें सोनेरी शाईनें काढलेलें होतें. हा सोनेरी रंग शेकडों वर्षांचा जुना असूनही अगदीं आज तयार केल्याप्रमाणें लकाकत होता. याशिवाय हातांनीं काढलेलीं रंगीत चित्रेंसुद्धां या हस्तलिखितांत होतीं. कांहीं जुन्या पुस्तकांचीं मुखपृष्ठें धातूचीं असून त्यांवर रत्नें जडविलेलीं होतीं, तर कांहींचीं मुखपृष्ठें सुंदर कोरीवकाम केलेल्या हस्तिदंताचीं होतीं. कांहीं जुन्या संस्कृत हस्तलिखितांमध्यें रंगीत चित्रें होतीं. एक भगवद्गीता दोन एक इंच लांबीची होती, व एक अतिलहान संस्कृत पुस्तक साध्या पोस्टाच्या तिकिटाच्या अर्ध्या आकाराचें होतें. एक ताम्रपटही येथें पाहिला. शिवाय, आंग्लकवि शेक्सपीअरच्या नाटकांच्या अतिदुर्मिळ अशा पहिल्या 'फोलिओ' आवृत्तीच्या दोन प्रतीही पाहिल्या.

या इमारतीच्या बाकीच्या भागाचा उपयोग पदार्थसंग्रहालयाप्रमाणें केलेला आहे. हें पदार्थसंग्रहालय इतकें मोठें आहे कीं, यांतील प्रत्येक वस्तु पाहणें केव्हांही शक्य नाहीं. जगांतील सर्व देशांतील, मग ते देश सुसंस्कृत असोत किंवा रानटी असोत, सर्व प्रकारच्या जुन्या व नव्या कलांचे

नमुने येथें ठेविलेले आहेत; त्यांपैकीं कांहीं आम्हीं विशेष लक्ष्य देऊन पाहिले.

जुन्या रोमन लोकांचीं घरगुती उपयोगाचीं मातीचीं भांडीं आमच्या हिंदुस्थानांत सध्यां वापरांत असलेल्या भांड्यांसारखीं दिसलीं. हजारों वर्षांपूर्वीच्या, निरनिराळ्या आकारांच्या व लहानमोठ्या कांचीच्या बाटल्या व इतर भांडीं ( Jugs ) येथें होतीं. आमच्या जात्यासारखें कांहींसें दिसणारें जुनें रोमन जातें, आमच्या तुळशीवृंदावनासारखीं दिसणारीं जुनीं रोमन व्यासपिठेंही येथें दिसलीं. यांशिवाय अतिशय प्राचीन अशीं जुन्या इजिप्शिअन लोकांनीं ताडपत्रीवर लिहिलेलीं हस्तलिखितें येथें नजरेस पडलीं. हीं लिखितें Hierogly phies नांवाच्या चित्रमय लिपींत लिहिलेलीं असून हीं चित्रें रंगीत आहेत, व हे रंग आजमितीला सुद्धां जसेच्या तसे राहिल्यामुळें तेजदार दिसतात. अत्यंत जुन्या काळच्या इजिप्शिअन लोकांत अशी चाल होती कीं मृतशरीर थडग्यांत ठेवतांना त्याच्याबरोबर खाण्याचे पदार्थही तेथें ठेवावयाचे; हेतु हा कीं, मृत्यूनंतरच्या अवस्थेंत ते जिन्नस मृताला उपयोगी पडावेत. अशा तऱ्हेचे कांहीं जिन्नस जुन्या थडग्यांतून उकरून काढलेले प्रेक्षकांना पाहण्यासाठीं या संग्रहालयांत ठेविले आहेत. ते कित्येक हजारों वर्षांपूर्वीचे खजूर, अंजीर, द्राक्षें, डाळिंबें, बिस्किटें आणि वाटोळ्या व त्रिकोनी भाकऱ्या हे जिन्नस पाहून मनाला विस्मय वाटल्याशिवाय राहत नाहीं.

आपल्या हिंदुस्थान देशांतील वस्तूंमध्यें कांहीं शस्त्रास्त्रें होतीं, त्यांपैकीं कांहींच्या मुठींवर मिना चाललेला होता, तर कांहींच्या मुठी रत्नजडित होत्या. म्हैसूरच्या हैदरअलीचा मिना चाललेल्या मुठीचा जंबिया आणि टिपू सुलतानाची सोन्याच्या वाघाच्या डोक्याच्या मुठीची तलवार येथें ठेवलेली आहे. हिंदुस्थानांतले जुने सोन्याचे दागिने येथें आहेत, त्यांमध्यें एक दागिना वांकीसारखा दिसला. हिंदु देवांच्या मूर्तिही येथें कांहीं आहेत. शीख लोकांचा पवित्र धर्मग्रंथ जो ग्रंथसाहेब त्याचीही एक प्रत येथें आहे.

लंडनमधलीं प्रेक्षणीय ठिकाणें पाहत असतां एक विशेष गोष्ट माझ्या लक्ष्यांत आली ती ही कीं, ज्या ठिकाणीं नेलें असतां मुलांना कांहीं उपयुक्त माहिती मिळण्यासारखी होती, अशा ठिकाणीं शाळेंतील मुलांमुलींना घेऊन आलेले शिक्षक-शिक्षकिणी कधीं कधीं आमच्या नजरेस पडत. उदाहरणार्थ, ब्रिटिश म्युझिअम हें पदार्थसंग्रहालय व टॉवर ऑफ लंडन हा ऐतिहासिक स्मृतींनीं भरलेला जुना किल्ला; अशा तऱ्हेच्या जागीं शाळेंतील मुलांमुलींना नेऊन त्यांना त्याविषयीं ज्ञान प्राप्त करून देणें हें त्या देशांत एक शिक्षणाचें अंगच आहे असे समजलें जातें; पण आपल्या बिचाऱ्या हिंदुस्थानांत अशा तऱ्हेचें शिक्षण कितीजणांना मिळत असेल? व मग इंग्लंड देशांतील शाळेंतून बाहेर पडलेला विद्यार्थी आपल्या देशांतील विद्यार्थ्यापेक्षां जास्त माहीतगार व बहुश्रुत निघाला तर त्यांत नवल ते काय?

दुपारचें जेवण स्लेटरच्या एका दुकानीं जेवून आम्हीं प्रसिद्ध नट Sir Martin Harvey याचा अभिनय पाहण्यासाठीं The Only Way हें नाटक पाहावयास गेलों. प्रसिद्ध इंग्रज कादंबरीकार Charles Dickens यानें लिहिलेल्या A Tale of Two Cities या कादंबरीवरून हें नाटक रचलेलें आहे, व यांत १७८९ सालीं फ्रान्समध्यें झालेल्या भयंकर राज्यक्रांतीचें चित्र अत्यंत कौशल्यानें रंगविलेले आहे. त्यावेळीं भयंकर चवताळून जाऊन ज्यांनीं अत्याचार केले त्या फ्रेंच जनतेचें हुबेहुब चित्र या नाटकांत आम्हांला पाहवयास मिळालें, आणि शोकरसानें भरलेले देखावे पाहून माझ्या डोळ्यांना पाणी आलें.

## तारीख २० नोव्हेंबर

दुपारच्या जेवणानंतर कांहीं खरेदी करण्याकरितां आम्ही दुकानांत गेलों, व ती आटोपल्यावर Bourne & Hollingsworth या सर्व प्रकारच्या मालानें भरलेल्या दुकानाच्या वरच्या मजल्यावर असलेल्या त्यांच्याच मालकाच्या फराळाच्या दुकानांत आम्ही चहा घ्यावयास गेलों. ही ह्या देशांतली पद्धत मला फार सोईची वाटली. येथें जीं मालाचीं जंगी

दुकानें आहेत, त्यांत खरेदी करून थकलेल्या माणसांना चहा व फराळ मिळण्याची व्यवस्था असते; त्यामुळें खरेदी संपल्यावर खाण्यापिण्याचें दुकान धुंडीत कोणाला फिरावें लागत नाहीं, व अनायासें दुकानाला या त्याच्या शाखेमळें दुहेरी फायदा होतो.

संध्याकाळीं येथून पायांनीं फिरत फिरत आम्हीं घरीं गेलों.

## तारीख २१ नोव्हेंबर

Imperial War Museum हें पदार्थसंग्रहालय पाहावयास आम्हीं गेलों. युरोपांतील महायुद्धाच्या वेळीं वापरल्या गेल्या त्यासारख्या लहान मोठ्या तोफा, कितीतरी फूट लांबीच्या मोठ्या Torpedos (टॉरपेडोज) (समुद्रांत असलेल्या बोटींवर पाण्यांतून सोडावयाचे दारूचे मोठे गोळे,) मोठ्या मडक्यांहूनही मोठे Mines (माइन्स) नांवाचे दारूचे गोळे, व इतर प्रकारचा मोठा दारूगोळा आणि मनुष्यप्राण्याला मारावयाचीं आयुधें आम्हीं येथें पाहिलीं. याशिवाय, मोटमोठ्या लढाऊ आगबोटींच्या लहान हुबेहूब प्रतिमा, लढाईच्या वेळीं घालावयाचे पोषाख, लढाईंत दिलेले बिल्ले, वगैरे लढाईसंबंधींच्या सर्व प्रकारच्या वस्तूंचा येथें संग्रह केला आहे. या लढाईच्या वेळेच्या एका अतिशय महत्त्वाच्या, गुप्त जर्मन खलित्याची एक प्रत येथें ठेवलेली आहे. हा खलिता म्हणजे विमानांतून लंडन शहरावर बॉम्ब फेकण्यास जर्मनीचा बादशहा कायसर यानें आपल्या सैनिकांस दिलेला परवाना. यामध्यें आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे, इंग्लंडच्या बादशहाचे राजवाडे, प्रसिद्ध St. Paul's Cathedral हें देऊळ या आणि अशा तऱ्हेच्या इमारतींवर मात्र बॅाँब फेकण्याची कायसरनें मनाई केली होती. शिवाय, महायुद्धाच्या प्रारंभाला ऑस्ट्रियानें सर्वियाबरोबर लढाई सुरू केल्याच्या जाहीरनाम्याची एक प्रत, लढाईनंतरच्या तहाच्या जाहीरनाम्याची एक प्रत, कायसरनें राजत्याग केल्याची बातमी छापलेल्या एका जर्मन वर्तमानपत्राची प्रत आम्हीं येथें पाहिली. या युद्धाच्या वेळीं झालेल्या लढाया ज्या रणांगणांत झाल्या त्यांच्या प्रतिकृति, सैनिकांना लढण्याचे

वेळीं उभें राहण्याकरितां खणलेल्या चरांच्या Trenches प्रतिकृति, व जीं पुरुषांनीं करावयाचीं अनेक कामें यावेळीं इंग्रज स्त्रियांनीं पार पाडलीं त्यांच्या लहान लहान प्रतिकृति येथें ठेवलेल्या आहेत. या बायकांनीं केलेल्या कामांत शेतें नांगरणें, लाकडें तोडणें, दारुगोळा तयार करणें, बाहेर-गांवीं पाठविण्याकरितां फळें पेट्यांत भरणें, आजारी माणसांवर शस्त्रक्रिया करणें, वगैरे अनेक कामांचा समावेश झाला होता. सैनिकांना खाणेंपिणें व निजणेंउठणें करण्याकरितां जमीन पोखरून जीं मोठमोठीं 'बिळें' ( Dugouts ) तयार केलीं होतीं, त्यांची एक हुबेहूब अशी व खऱ्या 'बिळा' एवढी मोठी प्रतिमा येथें नमुन्यासाठीं ठेवली आहे. व त्यांत एक खऱ्या सैनिकाएवढा मोठा इंग्रज सैनिकाचा पुतळा उभा केला आहे.

शत्रूच्या गुप्त हेरांकडून जप्त केलेल्या कांहीं वस्तु येथें आहेत, त्यांत चिरूटांतून पाठविलेले निरोप, सहजासहजीं पाहिलें असतां अदृष्य असणाऱ्या शाईनें लिहिलेले निरोप, वगैरे जिनसा आम्हांला दिसल्या; त्याप्रमाणेंच, युद्ध चालू असतां ज्या गोष्टी जर्मन देशांत पाठविण्याची सक्त मनाई होती अशा कांहीं वस्तु, म्हणजे सिगारेटस, रबर, साबू, वगैरे जिनसा 'फोटो' किंवा अशाच दुसऱ्या कांहीं नांवाच्या मिषाखालीं पाठविल्या असतांना मध्येंच पकडल्या, गेलेल्या येथें ठेवलेल्या आहेत.

महायुद्धाच्या शेवटीं शेवटीं जर्मन देशाची स्थिति फार भयंकर झाल्यामुळें कपडा तयार करावयास कापसाची तूट जेव्हां त्यांना भासली, त्यावेळीं कागदापासून कपडा तयार करून त्याचे तयार केलेले कांहीं जिन्नस आम्हांला येथें पाहावयास मिळाले. पुरुषाची तुमान, बायकांचे झालर (लेस) लावलेले कपडे व झालरी या वस्तु अगदीं हुबेहूब कापसाच्या कपड्याप्रमाणें केलेल्या असून, त्यांचा रंग, त्यावर असलेले नमुने, वगैरे फार छान होते; त्यामुळें हे कपडे कागदाचे केलेले असल्याबद्दल मन साशंक होई. अर्थातच हें पाहून जर्मन लोकांच्या हुशारीचें आम्हांला कौतुक वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

अशा तऱ्हेनें हें सर्व संग्रहालय पाहिल्यावर महायुद्धाच्या अति उग्र व

वैचित्र्ययुक्त स्वरूपाची मला खरी कल्पना आली. या इमारतीच्या वरच्या मजल्यावर महायुद्धाशीं निकट संबंध असलेल्या अनेक गोष्टींची व प्रसंगांची चित्रे व युद्धाशीं संबंध असलेल्या मोठमोठ्या व्यक्तींच्या तसबिरी संग्रहित करून ठेविलेल्या आहेत. त्यांत सध्यांचे मुंबईचे गव्हर्नरसाहेब Sir Frederick Sykes यांची एक तसवीर व एक पुतळा ठेविलेला आहे.

## तारीख २२ नोव्हेंबर

संस्कृत मृच्छकटिक नाटकाचें इंग्रजींत भाषांतर केलेलें 'Toy Cart' हें नाटक पाहावयास आम्ही गेलों. एकंदरीनें पाहतां हें नाटक मला फार आवडलें, व आमचें नाटक इंग्रजी रंगभूमीवर आल्याचा थोडा अभिमानही वाटला. नाटकातले पोषाख व देखावे हिंदुस्थानांतील होते व छान वठले होते. मात्र, या सबंध हिंदु वातावरणांत नट व नटी यांच्या तोंडची इंग्रजी भाषा ऐकून जरा विलक्षण वाटे एवढेच! सर्व नट व नटी उघड्या पायांनीं चालल्याप्रमाण दिसत, व नाटकांत नोकरांच्या भूमिका ज्यांनीं घेतल्या होत्या त्यांनीं अंगांत सुद्धां कांहीं कपडे न घातल्याप्रमाणे दिसत होते. चारुदत्त पीतांबर नेसून शाल पांघरला होता आणि मैत्रेय ऋषीनें धोतर नेसून उपरणं पांघरलें होतं. वसंतसेनेनें लेहगा व चोळीचा पोषाख केला असून पौर्वात्य पद्धतीचे दागिने घातले होते, आणि तिची आई पातळ नेसली असून ती हुबेहूब एखाद्या लठ्ठ गुजराथी बाईप्रमाणें दिसत होती. घराचं आंतील भागांत खुर्च्या, टेबल कांहीं नव्हतीं नाटकातील पात्रांना बसावयास लहान लहान चौरंग, तक्क्य, वगैरे होते. धुपाचा वास सुटला होता बाहेर सुरेख निळे आकाश व त्यांतच चमकणारे तारे व मोठमोठे फुलाचे झुबके लागलेलीं झाडें दाखवून हिंदुस्थानांतील वातावरण आणण्याचा प्रयत्न केलेला होता. नाटकातील पात्राचीं शरीरें हिंदुस्थानातील लोकांच्याप्रमाणें सांवळ्या रंगाचीं दाखवलीं होतीं. नाटकांतला गोसावी खऱ्यासारखा दिसला, आणि हिंदु लोकांचे थवे खऱ्या हिंदुलोकांसारखा पोषाख केलेले असे दाखविले होते. या इंग्रजी भाषांतरांत मूळच्या नाटकांतील कवितेचा

भाग बराच गाळून थोडा शिल्लक ठेवलेला होता; शिवाय, कांहीं हास्यरस-पूर्ण भागही कायम ठेवले होते; त्यामुळें नाटक परक्या भाषेंत असूनही चांगलें वठलें होतें; आणि पात्रांनीं आपापले भाग छान केले. शेवटीं शेवटीं तर डोळ्यांना पाणी आणलें. एकच गोष्ट जरा गंमतीची वाटली ती ही कीं, मोठमोठीं संस्कृत नांवें उच्चारण्याची तऱ्हा आपल्यापेक्षां फार भिन्न होती. ' वसंतसेना ' व ' चारुदत्त ' या नांवांच्या ऐवजीं ' वशांतशेना ' व ' चारुडट्टा ' हे उच्चार ऐकून कानाला कसेसेंच वाटे. नाटक पाहावयास आलेल्या मंडळींत हिंदी माणसें फारशीं कोणी आम्हांला दिसलीं नाहींत. प्रेक्षक बहुतक सगळे इंग्रज लोक होते.

## तारीख २३ नोव्हेंबर

Chaliapin या प्रसिद्ध गाणाऱ्याच्या जलशाला मागें वर्णन केलेल्या Albert Hall च्या भव्य इमारतींत आम्हीं गेलों. याचें गाणें मला आवडलें. याचा आवाज अगदीं खालपासून अतिशय उंच सुरांपर्यंत चढे, व गाणें भावनामय होतें. गातांना तो हावभाव करी. त्यानें म्हटलेल्या गाण्यांत ' Song of the Volga Boatmen ' हें मला माहीत असलेलें गाणें सुद्धां होतें. या जलशांत एक Violin ( व्हायलिन ) वाद्य वाजवणारा होता त्याचें वादन कानाला गोड लागलें; मात्र, एक १५ वर्षें वयाचा पिआनो वाजवणारा होता त्याच्या वाजवण्याची खुबी किंवा गोडी मला कांहीं समजली नाहीं.

रात्रीं विश्वनाथ व कमला यांच्या होटेलमधल्या खासगी खोलींत जेवलों व गोष्टी बोलत बसलों.

## तारीख २५ नोव्हेंबर

पुन्हां एकदा Tower of London ( टॉवर ऑफ लंडन ) मध्यें गेलों. येथें इंग्लंडचे राजेसाहेब व राणीसाहेब यांचें सरकारी जवाहीर ठेवलेलें आहे. राजेसाहेबांचा एक रत्नजडित जड सोन्याचा मुकुट, तेजानें तळपणारे असें शेंकडों हिरे बसवून केलेले दोन हिऱ्यांचे मुकुट, एक राणी-

साहेबांचा हिरेजडित मुकुट व राजेसाहेबांचा रत्नजडित राजदंड या वस्तु आम्हीं येथें पाहिल्या. राणीसाहेबांच्या मुकुटांत असलेला प्रसिद्ध कोहिनूर हिरा यावेळीं माझ्या नजरेंत आला नहीं, पण सर्व जगांतील अतिशय मोठा Cullian ( कलिअन ) नांवाचा हिरा त्या रत्नजडित राजदंडांत बसविलेला मीं पाहिला. त्याचें तेज नुसतें तळपत होतें. यांशिवाय उत्तम नक्षीकाम केलेले मोठे जड सोन्याचे राजदंड, तशींच नक्षीकाम केलेलीं निरनिराळ्या सुंदर आकारांचीं भलीं मोठीं जेवणाच्या टेबलावर ठेवण्याचीं मिठाचीं भांडीं, मोठमोठे सोन्याचे थाळे व ख्रिस्तीधर्माची दीक्षा देतांना वापरावयाचें 'पवित्र पाणी' ठेवण्याचें भांडें Baptismal font वगैरे जिन्सा येथें ठेवलेल्या आम्हीं पाहिल्या. एकंदरीनें हा सोनें, हिरे व इतर रत्नें यांचाच एक मोठा संग्रह आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. एका खोलीच्या मध्यभागीं एक मजबूत लोखंडी गजांचा पिंजरा करून त्यामध्यें या सर्व वस्तु मांडल्या आहेत, व त्या खोलींत शिपाई लोकांचा सारखा खडा पहारा असतो.

नवीन वर्षाच्या प्रारंभाला व राजेसाहेबांचे वाढदिवशीं ज्या पदव्या राजेसाहेबांचे तर्फे रयतेला देण्यांत येतात, त्या त्या पदव्यांच्या खुणाही ( पदकें वगैरे ) येथें व्यवस्थित रीतीनें मांडल्या आहेत. Tower of London च्या दुसऱ्या एका भागांत फिरत असतां आम्हांला एक तेथला रखवालदार भेटला, तो हिंदुस्थानांत येऊन गेला असल्यामुळें थोडा वेळ स्वतःकडे आपण होऊन बोलत राहिला.

एका दुकानांत दुपारचें जेवण घेऊन Harley Street या रस्त्यामधल्या डॉ. पारधींच्या खोलींत जाऊन त्यांची भेट घेतली व त्यांच्याकडे बोलत बसलों.

## तारीख २६ नोव्हेंबर

भुयारांतील ( आगगाडीनें Under ground ) Railway आम्ही Golder's Green या ठिकाणीं गेलों आणि Covent garden

Opera नाटक कंपनीच्या Faust या संगीत नाटकाचीं व Pavlova ( पॅव्हलोव्हा ) या प्रसिद्ध नाचणारीच्या नाचाचीं तिकिटें घेऊन परत आलों. परत येतांना गाडींत माझ्या शेजारीं एक इंग्रज बाई बसली होती ती आपण होऊन माझ्याकडे बोलूं लागली. 'राउंड टेबल कॉन्फरन्स'साठीं आलेले हिंदी सभासद सर्व उत्तम वक्ते असून त्यांनीं उत्तम भाषणें केलीं, वगैरे स्तुतिपर व सहानुभूतिपर उद्गार तिनें काढले.

नंतर आम्ही Wallace collection नांवाचें तऱ्हेतऱ्हेच्या अनेक अमूल्य कलाकुसरीच्या जिनसांचें संग्रहालय आहे तें पाहावयास गेलों, आणि तेथें आम्हीं अनेक सुंदर वस्तु पाहिल्या. येथें असलेल्या जुन्या लाकडी सामानांत कांहीं टेबलें व कपाटें पाहण्यासारखीं होतीं. यांवर धातूचें नक्षीकाम आणि सोनेरी व इतर रंगांचें मिन्याचें काम ( Laequer-Work ) केलें असल्यामुळें तीं छान लकाकत होतीं. निरनिराळ्या आकारांचीं लहानमोठीं घड्याळें, रंगीत चिनी मातीचीं भांडीं, जुनीं शस्त्रास्त्रें, वगैरे सुंदर सामान येथें पुष्कळ पाहिलें. कांहीं शस्त्रांच्या मुठी तऱ्हेवाईक आकारांच्या व उंची प्रकारच्या दगडाच्या होत्या, तर कांहींच्या मुठींवर माणकें व पाचेचे खडे बसविले होते ( मनुष्यानें मनुष्यास मारण्यास तयार केलेल्या या शस्त्रांना अशा तऱ्हेनें कृत्रिम शोभा आणण्याची वास्तविक पाहिलें तर काय जरूरी ? हा कलेचा कडेलोटच म्हणावयाचा ! ) येथें जुन्या फ्रेंच राजाच्या व राणीच्या मालकीच्या वस्तूही आहेत. अगदीं लहान लहान आकारांच्या कांहीं तसबिरी आहेत, त्यांत बऱ्याच नेपोलिअन बादशहाच्या आहेत.

त्यांतल्यात्यांत मला फार आवडलेल्या वस्तु म्हणजे लाकूड व हस्तिदंत यांवरील अतिशय बारीक कोरीवकाम, रंगीत मेणाच्या केलेल्या खऱ्या माणसांच्या अगदीं लहान तसबिरी व एका विशेष प्रकारचीं चिनी मातीचीं भांडीं. कोरीवकामांत ख्रिस्ती धर्मग्रंथ बायबल यामधील विशिष्ट प्रसंग दाखविणारें एक लाकडाचें मखर Tabernacle होतें, त्यांत अति लहान लहान मनुष्यांच्या आकृति कोरलेल्या होत्या. लहानशा अक्रोडा-एवढा एक जपाच्या माळेचा लाकडी मणी बरोबर मध्यें फोडून त्याच्या

आंतल्या बाजूला फार सुरेख कोरीवकाम केलेलें होतें. रंगीत मेणाच्या ज्या अगदीं लहान तसबिरी होत्या, त्यांत अगदीं लहानसहान भागसुद्धां हुबेहूब दाखविले होते. स्त्रियांच्या अंगावर असलेल्या मोत्यांच्या दागिन्यांचीं मोत्यें व त्यांच्या कपड्यांना लाविलेल्या जाळीच्या नक्षीदार झालरी अगदीं बारीक पण हुबेहूब दाखविल्या होत्या. ज्या विशेष प्रकारच्या चिनी मातीच्या भांड्यांचा वर उल्लेख केला आहे त्या भांड्यांचे रंग अतिशय चकचकत असून, शिवाय त्यांत समुद्रांतील शिंपांत दिसून येणारे सर्व रंग दिसत होते.

येथें कांहीं उत्तम चित्रकारांच्या चित्रांचा बराच मोठा संग्रह आहे; पण वेळ नसल्यामुळें तो आम्हांला आज पाहतां आला नाहीं.

दुपारचें जेवण एका दुकानांत जेवून, आम्हीं विश्वनाथ व कमला यांच्याकडे गोष्टी बोलण्यासाठीं त्यांच्या होटेलांत गेलों व मग आम्हीं तेथेंच चहा घेतला.

## तारीख २७ नोव्हेंबर

आज सकाळीं लंडन शहरावर पांढरें धुकें Fog पसरलें होतें; पण आनंदाची गोष्ट ही कीं, तें आम्ही राहत असलेल्या भागांत फारसें दाट नसल्यामुळें आम्हांला निदान समोर थोड्या अंतरावर असलेल्या वस्तु तरी दिसत होत्या; त्यापुढें असलेल्या गोष्टी मात्र धुक्यामुळें अदृश्य झाल्या होत्या. अशा वातावरणांत दुपारच्या जेवणानंतर आम्ही भुयारी गाडींत बसून Golder s Green या ठिकाणीं Foust नांवाचें Goethe या जर्मन कवीनें लिहिलेलें प्रसिद्ध संगीत नाटक Opera पाहावयास गेलों. Opera नांवाचें युरोपिअन संगीत नाटक व आपलें हिंदी संगीत नाटक यांमधला एक मोठा फरक म्हणजे, आपल्या संगीत नाटकांत फक्त मधूनमधूनच गाणीं असतात; पण Opera नाटकांत पहिल्यापासून शेवटपर्यंत सर्व नाटक संगीतांत असतें. यामुळें नाटक खरें भासत नाहीं; कारण मरणारीं पात्रेंसुद्धां आपलीं शेवटचीं भाषणें वाद्यांच्या साथीनें संगीतांत करीत असतात.

७५९१९ ... ८३४ ... १०१३

हा कृत्रिम भाग सोडून दिला, तर नाटक एकंदरीनें फार परिणामकारक झालें असें म्हणतां येईल.

नाटकांतील संगीताला जवळ जवळ पन्नास निरनिराळ्या वाद्यांची साथ असून, हीं वाद्यें त्या त्या वेळीं रंगभूमीवर असलेल्या पात्रांच्या निरनिराळ्या भावना वादनांत व्यक्त करीत होतीं; याप्रमाणें, दुःखाचा देखावा रंगभूमीवर असतां वाद्यांचे सूरसुद्धां दुःखी भासत असत. नाटकांतील देखावे खऱ्यासारखे दिसून सुंदर होते. सर्व भाषण संगीतांत असल्यामुळें मात्र, नाटक फार हळू चालल्याप्रमाणें वाटत होतें. एवढें खरें कीं, हें नाटक गद्यांत असतें तर जास्त परिणामकारक वाटलें असतें. Mephistopheles या दैत्याचे कपडे, त्याचें वागणें, वगैरे इतकें खऱ्यासारखें दिसलें, कीं त्याला पाहून अंगावर शहारे येत होते.

७७९८

## तारीख २९ नोव्हेंबर

Wallace Collection नांवाच्या संग्रह लयाचा राहिलेला अर्धा भाग आम्हीं पाहिला. अनेक वर्षांपूर्वीचीं उत्तमोत्तम जुनीं घड्याळें येथें होतीं, त्यांपैकीं कांहीं अजूनही चालत होतीं. या घड्याळांच्या बैठकी म्हणजे सोन्याच्या मुलामा दिलेल्या बाहुल्या, वगैरे जुळवून त्यांपासून तयार केलेले देखावे होते. शिवाय, सुरेख रंगाच्या व वर उत्तम नक्षीदार काम केलेल्या अशा निरनिराळ्या आकारांच्या तपकिरीच्या डब्या; मोत्यें, रत्नें जडवलेले व मिन्याचे काम केलेले जुने गळ्यांत घालण्याचे हार; सोन्याचा मुलामा दिलेलीं भांडीं, अत्यंत सुंदर रंगाचीं, मोठमोठीं चिनी मातीचीं भांडीं; अशा अनेक प्रेक्षणीय वस्तूंचा मोठा संग्रह येथें आम्हीं पाहिला. येथें कांहीं जुन्या खुर्च्या व कोच ठेवलेले होते. त्यांवर बसवलेल्या कपड्यांवर चित्रें होतीं. त्यांत la Fountaine या प्रसिद्ध फ्रेंच लेखकानें लिहिलेल्या गोष्टींतील देखावे होते. यांपैकीं आपण सर्वांनीं लहानपणीं वाचलेल्या 'कोल्हा आणि द्राक्षें', 'कुत्रा आणि भाकरीचा तुकडा' या गोष्टींतील देखावे आमच्या ओळखीचे दिसले.

येथें जुन्या प्रसिद्ध चित्रकारांनीं काढलेलीं चित्रेंही पुष्कळ आहेत, त्यांत कांहीं इटलीमधल्या व्हेनिस शहराचीं होतीं. या शहरांत असतांना आम्ही राहत होतों त्या हॉटेलाजवळच असलेल्या प्रसिद्ध Rialto Bridge नांवाच्या पुलाचेंही चित्र आम्हीं पाहिलें. विलायतेंत आल्यापासून जे जे चित्रांचे संग्रह आम्हीं पाहिले, त्यांत व्हेनिस शहराचा देखावा हा चित्रकारांचा अत्यंत आवडीचा विषय आहे असें आम्हांला दिसून आलें; मग त्याचें कारण या शहराची तऱ्हेवाईक रचना हें असेल कीं काय तें सांगवत नाहीं. Greage या फ्रेंच चित्रकाराच्या पुष्कळ चित्रांत दिसून येणारा एक मुलीचा चेहरा आहे तो मला फार आवडतो लहान मुलांत दिसून येणारा साहजिक साधेपणा या चेहऱ्यांत हुबेहूब व्यक्त होतो. यांपैकीं पुष्कळ चित्रें मला येथें पाहावयास मिळलीं.

हें संग्रहालय पाहून झाल्यावर एका दुकानांत दुपारचें जेवण जेवून आम्ही पायांनीं घरीं जावयास निघालों; वाटेंत Woolworth च्या अत्यंत स्वस्त दुकानांत जाऊन कांहीं सुंदर कॅलेंडरें व क्रिसमस कार्डस् विकत घेतलीं.

## तारीख ३० नोव्हेंबर

दुपारच्या जेवणानंतर सुलूच्या कॉलेजकडे जाण्यास निघालों. आम्ही मोटरबसनें चाललों असतां अर्ध्या रस्त्यावर सुलू आमच्याच बसमध्यें चढली. तिनें आपल्या कॉलेजांतल्या अगदीं लहान पण टुमदार अशा खोलींत आम्हांला चहा व फराळ दिला, आणि निरनिराळ्या विषयांवर बोलण्याचालण्यांत तास, दोन तास केव्हांच निघून गेले. चहाबरोबर खावयास असलेल्या वस्तूंत एक Crumpet ( क्रंपेट ) नांवाची वस्तु होती ती आपल्या येथल्या आंबोळीसारखी असून रूचीला चांगली लागली.

## तारीख १ डिसेंबर

विश्वनाथ व कमला आमच्याकडे आलीं, व आम्ही त्यांना घेऊन ‘ताजमहाल रेस्टोरॉं’ नांवाच्या हिंदुस्थानी लोकांच्या खाद्यपेयाच्या दुकानांत

दुपारच्या जेवणाकरितां गेलों. भात, सांबारें, भाज्या, वगैरे अस्सल देशी पदार्थ खाल्ल्यावर व कांहींशा गोष्टी केल्यावर, वुल्वर्थच्या दुकानांत जाऊन जरा तेथल्या वस्तु पाहत फिरलों. नंतर स्वत: आम्हांला सर्वांना ' मादाम तुसो ' चीं मेणाचीं चित्रें दाखवावयास घेऊन गेले. हीं चित्रें पाहण्याची आमची ही दुसरी खेप होती. गेल्या खेपेला पाहिलेलें सर्व कांहीं या खेपेलाहि पाहिलें; शिवाय, कांहीं विलक्षण प्रकारचे आरसे पाहिले. या आरशांत आमच्या आकृति अगदीं विलक्षण दिसल्या व अर्थात, तें दृश्य पाहून आम्हांला फार हंसूं आलें. येथें कांहीं खेळ, शर्यती, जत्रेंतील पाळणे, वगैरे गोष्टींच्या लहानशा प्रतिमा करून ठेवलेल्या आहेत, त्यांत एक किंवा दोन लहान नाणीं टाकलीं, कीं त्यांतील लपविलेलीं यंत्रें चालू होऊन, खेळ व शर्यती सुरू होतात व पाळणे, वगैरे खऱ्यासारखे हालूं लागतात. असल्या एकदोन खेळांत नाणीं टाकून आम्हीं त्यांची मौज पाहिली. मेणाच्या चित्रांच्या प्रदर्शनाला लागूनच असलेल्या ' तुसो ' च्याच खाद्यपेयाच्या दुकानांत आम्हीं चहा घेतला. अशा तऱ्हेनें सर्व दुपार मौजेंत व गप्पागोष्टींत एकत्र घालवून संध्याकाळीं आम्हीं आपापल्या ठिकाणीं परत आलों.

## तारीख २ डिसेंबर

आम्ही हिंदुस्थानांतील वस्तूंचें पदार्थसंग्रहालय पाहावयास गेलों. हिंदुस्थानांतील सर्व प्रकारचे धंदे व कलाकुसरीचीं कामें या जागीं दिसून येतात. घरगुती वापराचीं भांडींकुंडीं, तऱ्हेतऱ्हेचा कशिदा काढलेलें तऱ्हेतऱ्हेचें कापड, हस्तिदंती काम, लाकडावरचें अतिनाजुक नक्षीकाम, जुन्या काळचीं रंगीत चित्रें, सोन्याचांदीचें मोठमोठें जिन्नस, कांचीसारख्या पारदर्शक व इतर दुर्मिळ अशा दगडाचीं सुरेख घाटांचीं भांडीं, कांचीचीं भांडीं, जडावाचे व मोत्यांचे दागिने, मोठमोठ्या देवादिकांच्या मूर्ति असें अनेक तऱ्हेचें सामान या इमारतींत खचून भरलेलें आहे.

हिंदुस्थानांतील कांहीं माणसें लहानलहान मातीच्या बाहुल्या करून दाखविलीं आहेत. विहिरीवर आंघोळ करीत असलेलीं माणसें, गोवऱ्या

लावणारी बाई, कपडे शिवीत बसलेला शिंपी, एका भाजीवालीचें भाज्यांनीं भरलेलें सबंध दुकान, वगैरे कितीतरी मजेदार बाहुल्या आम्हीं येथें पाहिल्या. शिवाय, एक बाजाराचा हुबेहूब केलेला नमुना येथें पाहिला, त्यांत धान्याचीं, मिठाईचीं, भाजी व फळांचीं दुकानें, बाजारांत दिसणारे अनेक तऱ्हेचे लोक, वगैरे सर्व देखावा लहान प्रमाणांत दाखवलेला आहे.

आपण रोज घरांत वापरतों तसलीं भांडीं एक मोठें दालन भरून आहेत. त्यांत तांब्ये, पेले, समया, विळ्या सर्व कांहीं आहे. एक लहानसें मोदकपात्रही दिसलें; जी ऐलाप्याची काईल कशी मिळवावी या विचारांत मी आहें, तसल्या दोन काइली तेथें मीं पाहिल्या.

ताजमहालाची एक साधारण मोठी अशी हस्तिदंती प्रतिमा फार सुरेख केलेली आहे. खऱ्या ताजमहालावरचें बारीक रंगीत दगडाचें कामही हिच्यांत हुबेहूब दाखविलें आहे; व ताजमहालांतील थडग्यांच्या भोंवतीं असलेल्या दगडाच्या कोरीव पडद्याचीही नाजुक हस्तिदंती प्रतिमा येथें आहे. हें काम एका आग्र्याच्या कारागिरानें केलेलें आहे.

लाकडाच्या कोरीवकामांत हिंदुस्थानांतील निरनिराळ्या शहरांतील कांहीं घरांचे सबंध पुढले नक्षीदार भाग आणून ठेवलेले आम्हांला दिसले. जुन्या काळचीं रंगीत चित्रें जरी आमच्या हल्लींच्या डोळ्यांना तितकीं चांगलीं वाटत नाहींत, तरी त्यावेळचे रंग आज शेंकडों वर्षांनंतर जसेच्या तसे राहिलेले पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं. कांहीं बुद्धाच्या मूर्तींना सोन्याचा मुलामा दिलेला आहे; व त्यांवर कांहीं रत्नेंही बसविलेलीं आहेत.

अशा अनेक तऱ्हेच्या सुंदर वस्तु पाहतां पाहतां तीन गोष्टी विशेष महत्त्वाच्या वाटल्या : ( १ ) पंजाबचा राजा रणजितसिंग याचें नक्षीकाम केलेलें व खुर्चीसारखें दिसणारें सोन्याचें सिंहासन; ( २ ) महितपूरच्या लढाईनंतर इंदूरच्या होळकरांकडून इंग्रजांनीं काबीज करून घेतलेली व जडावाची ( माणकें व पाच बसविलेली ) मूठ असलेली तरवार; ( ३ ) लहानशा साखरी खारकेएवढें मोठें, व एका पाठीमागून एक अशा चार मोंगल बादशहांच्या ताब्यांत असलेलें माणिक; हें अकबर, जहांगीर, शहाजहान व

औरंगजेब यांचेकडे होतें, व यावर त्या चौघांचीं नांवें कोरलेलीं आहेत.

हें पदार्थ संग्रहालय पाहिल्यानंतर शफीच्या दुकानांत भातसांबाऱ्याचें जेवण जेवून व नंतर कांहीं खरेदी करून आम्ही घरीं परतलों.

## तारीख ३ डिसेंबर

आम्ही Natural History Museum नांवाचा सृष्टिशास्त्राचा म्युझिअम पाहावयास गेलों. हें पदार्थसंग्रहालय अतिशय मोठें असून एकएक मोठें दालन एकएका तऱ्हेच्या वस्तूंनीं खचून भरलेलें आहे; मात्र सर्व लहानमोठ्या वस्तूंची मांडणी इतकी सुरेख केलेली आहे कीं, पाहणाऱ्यांना सोईचें पडून सर्व कांहीं सावकाशपणें व नीट पाहतां येतें. यांत असलेलीं सर्व जनावरें, वगैरे पेंढा भरून ठेवल्यामुळें तीं हुबेहूब जिवंत प्राण्यांप्रमाणें दिसतात.

पाण्यांत असणाऱ्या वस्तूंमध्यें अतिशय सुंदर आकारांच्या व नक्षीदार अशा लहानमोठ्या शिंपल्या, शंख व पोवळ्यांचीं झाडें कितीतरी पाहिलीं. अनेक तऱ्हांचे लहानमोठे मासे पाहिले; त्यांत कांहीं सुरेख रंगांचे होते, तर कांहीं दिसावयास विलक्षण अक्राळविक्राळ जबड्यांचे असे होते. त्यांच्या त्या दातांच्या भयंकर रांगाच्या रांगा पाहून भीति वाटते त्यांत एक नक्रराज जबडा उघडून ठेविलेला आहे, त्याचें तें तोंड इतकें मोठें आहे कीं तो मनुष्याला सहज गिळूं शकेल, आणि याप्रमाणें तो समुद्रांत पोहावयास गेलेलीं माणसें गिळतोही. दुसरा एक मोठा मासा होता त्याला एखाद्या कोळ्यासारखे बरेच लांबलांब पाय होते, व त्यांतील प्रत्येक पायाला भयंकर दांत होते; असे अनेक भयंकर मासे आमच्या नजरेला पडले. कांहीं मोठ्या देवमाशांचीं हाडें येथें ठेवलेलीं आहेत, व त्यांवर एका प्रकारच्या मातीचीं कवचें करून ते देवमासे केवढे मोठे होते याची कल्पना आणून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा आकार इतका मोठा आहे कीं एखादी लहान होडी त्यांच्या पोटामध्यें राहील. त्यांपैकीं एकाची लांबी जवळजवळ ५० फूट होती.

जमिनीवरच्या प्राण्यांमध्यें आम्ही पुष्कळ साप पाहिले. त्यांत एक २५ फूट लांबीचा अजगर होता. हजारों वर्षांपूर्वी, म्हणजे जेव्हां मनुष्यप्राणी अगदीं रानटी स्थितींत होता त्यावेळीं या पृथ्वीच्या पाठीवर असलेल्या अतिशय अवाढव्य प्राण्यांचे सांगाडे येथें ठेविलेले आहेत, ते पाहून आम्हांला फार आश्चर्य वाटलें. त्यांत कांहीं हत्तीसारख्या पण सध्यांच्या हत्तीहून पुष्कळ मोठ्या अशा जनावरांचे सांगाडे होते; पण सर्वांत आश्चर्य वाटण्या जोगा सांगाडा एका जमिनीवरून सरपटणाऱ्या प्राण्याचा होता. याची डोक्यापासून शेपटीच्या टोकापर्यंतची लांबी ८० फूट होती व उंचीही बरीच होती. हा सांगाडा कृत्रिम असून तो अमेरिकेंत असलेल्या खऱ्या सांगाड्या-बरहुकुम केलेला आहे; कारण हा जुन्या काळचा सांगाडा अतिशय दुर्मिळ आहे.

याशिवाय, अनेक जातीचे लहानमोठे पाळींव कुत्रे, मांजरें, कोंबड्या, बकरे, गाई, बैल वगैरे जनावरें येथें पाहावयास मिळालीं; त्यांत कांहीं हिंदुस्थानांतीलही जनावरें पाहून आनंद वाटला. सर्वांत लहान आकाराचा कुत्रा पाहून मात्र मौज वाटली. लहान मुलांना खेळण्याकरितां तयार केलेले जे अगदीं लहान कुत्रे आपण दुकानांत पाहतों तेवढा लहान हा कुत्रा होता; व तें कुत्र्याचें पोर नव्हतें, तर त्या कुत्र्याच्या जातीचा आकारच तेवढा होता.

लहानमोठे पक्षी तर तेथें हजारों ठेविलेले आहेत. त्यांपैकीं कांहीं अतिशय सुरेख रंगांचे आहेत. त्यांच्या हिरव्यागार व तांबड्या भडक पिसांवर विजेच्या दिव्यांचा उजेड पडल्यामुळे तीं पिसें कशीं लकलकत होतीं. त्यांपैकीं सर्वांत लहान जे पक्षी होते त्यांची लांबी फार तर आपल्या बोटाच्या दीडदोन पेरांइतकी होईल.

इतकें सर्व पाहण्यास आम्हांला पुष्कळ ताप लागले; पण दुपारचें जेवण मिळण्याची सोय खुद्द म्युझिअममध्येंच असल्यामुळें आम्हांला फार सुलभ गेलें; कारण जेवण झाल्यावर पुनः कांहीं दालनें पाहावयास मिळालीं.

## तारीख ४ डिसेंबर

आधीं ग्रिंडले कंपनीकडे कांहीं कामाकरितां गेलों, व मग 'इंडिया ऑफिस' मध्यें जाऊन 'हाउस ऑफ कॉमन्स' ची बैठक पाहण्यासाटीं पास मागून घेतले; हेतु हा कीं, आज या सबंध ब्रिटिश साम्राज्याचे व्यवहार चालविणारी जी ही सभा हिची बैठक तरी एकदां पाहून घ्यावी.

पास घेतल्यावर दुपारचें जेवण एका दुकानांत जेवलों, व सभेला अजून बराच वेळ असल्यामुळें रस्त्यावरून येथें तेथें भिरभिर फिरलों. धुकें फार असल्यामुळें एक प्रकारचा मजेदार देखावा रस्त्यांवर दिसत होता. हिंदुस्थानांत दिवस उजाडण्यापूर्वी जसें अधुक अधुक दिसतें, त्याप्रमाणें जवळच्या वस्तु अंधुक दिसत होत्या व दूरच्या दिसतच नव्हत्या; फेर इतकाच कीं हा अंधुकपणा हिंदुस्थानांतल्याप्रमाणें नुसत्या उजेडाच्या अभावीं नसून, दाट धुकें हवेंत पसरल्यामुळें आला होता व त्यामुळें एक निराळ्याच प्रकारची शोभा दिसत होती.

शेवटीं एकदां आम्ही 'हाउस ऑफ पार्लमेंट' कडे गेलों; व आणखी बराच वेळ थांबून, पुनः एकदां नवे पास घेऊन व एका पुस्तकांत सह्या करून सभेच्या दिवाणखान्यावर ज्या चौफेर गॅलऱ्या होत्या त्यांतील एकींत जाऊन बसलों. सभेचा दिवाणखाना कांहीं अतिशय मोठा असा नाहीं, बेताचाच आहे. दिवाणखान्याच्या एका बाजूला एखाद्या सिंहासनाच्या आकाराची अशी सभेच्या अध्यक्षांची खुर्ची आहे. तिच्या समोरच्या बाजूला एका टेबलावर एक मोठी सोन्याची गदा ठेवलेली होती. खालीं दिवाणखान्यांत काय चाललें होतें तें आम्हांला नीट दिसलें मुख्य प्रधान रॅमसे मॅकडॉनल्डच्या तोंडचे चार शब्द ऐकले. कांहीं वेळानें ते व सभेच्या अध्यक्षस्थानीं असलेले दुसरे एक गृहस्थ बैठकींतून उठून गेले, ते मग आम्ही तेथें असेपर्यंत कांहीं परत आले नाहींत. एका ठरावावर वादविवाद होऊन दोन्ही बाजूंनीं 'होय' व 'नाहीं' असा निरनिराळा घोष करून आपलीं मतें व्यक्त कलीं, व नंतर दोन्ही बाजूंच्या मंडळीनें बाहेर जाऊन आपआपलीं मतें दिलीं. कांहीं वेळानें तीं मतें मोजून किती झालीं तें

चार माणसांनीं आंत येऊन सांगितलें, व जास्त मतें ज्या बाजूला पडलीं त्या बाजूनें ठरावाचा निकाल झाल्याबद्दल सांगण्यांत आलें. मग दुसऱ्या एका ठरावावर एकमेकांच्या उलट अशा दोन बाजूंनीं कांहीं भाषणें झालीं. भाषणें चालू असतांना कांहीं मंडळी उठून जात होती व कांहीं आंत येत होती. वक्त्याच्या एखाद्या विधानानंतर कोणीतरी मध्येंच उठून त्याला प्रश्न विचारी व त्या प्रश्नाला वक्ता उत्तर देई. भाषणांतला एखादा भाग ऐकून कोणी हंसत, तर एखाद्या भागानंतर 'ऐका, ऐका,' असा घोष करून कांहींजण आपली पसंती दर्शवीत. अशा तऱ्हेचा वादविवाद तास दीड तास ऐकल्यावर संध्याकाळ झाल्यामुळें आम्हीं तेथून उठून आलों. सभा चालूच होती.

## तारीख ५ डिसेंबर

आम्ही सृष्टिशास्त्राच्या म्युझिअमचा राहिलेला भाग पाहण्याकरितां पुनः तेथें गेलों. रानावनांत व पाण्यांत राहणारीं सर्व जनावरें पेंढा भरून ठेविलेलीं येथें पाहावयास मिळालीं. वाघ, सिंह, अतिशय उंच व मोठे असे जिराफ, भयंकर अवाढव्य असे सील मासे व तसेच अवाढव्य 'हिपोपोटेमस्' हे सर्व तेथें होते. तेथें पहिल्यानेंच मी पांढऱ्या रंगाचा वाघ पाहिला. पिवळ्या रंगाच्या बदलीं पांढरा रंग व त्यावर काळे पट्टे असा या वाघाचा रंग होता.

वनस्पतींच्या भागांत आम्हांला विशेष असें भासणारें कांहीं दिसलें नाहीं; फक्त, येथें एका अतिशय मोठ्या झाडाच्या खोडाचा एक वर्तुलाकार भाग कापून ठेविलेला आहे तो पाहण्यालायक आहे. या वाटोळ्या लाकडाचा टेबलाच्या जागीं जर उपयोग केला, तर त्याच्या सभोंवतीं पंचवीस तीस माणसें सहज बसूं शकतील इतकें हें मोठें आहे; व तें ज्या झाडापासून कापलें तें झाड कापण्याच्या वेळेस त्याचें वय सुमारें १३०० वर्षें होतें हें त्यावर लिहिलेल्या तारखांवरून व खुणांवरून समजतें.

खनिज पदार्थांच्या भागांत नाना तऱ्हेचे अतिशय सुंदर सुंदर रंगांचे दगड पाहिले. जसे फुलांत हजारों रंग दृष्टीस पडतात तसेच रंग या दगडांत

आम्हांला दिसून आले; व त्यांपैकीं कांहीं रंग इतके पारदर्शक होते कीं त्यांवर दिव्याचा उजेड पडल्याबरोबर ते रत्नांसारखे लकलकूं लागले. कांहीं दगडांवर रंगीत पानांची वेल किंवा अशींच दुसरीं कांहीं चित्रें काढल्या-प्रमाणें दिसत होतीं; पण हीं चित्रें काढलेलीं नसून मूळचींच त्या दगडांवर उमटलेलीं होतीं. आकाशांतून पडलेल्या कांहीं उल्का येथें ठेवलेल्या होत्या. त्या लोखंडाच्या ओबडधोबड गोळ्यांप्रमाणें दिसल्या. 'अॅस्टबेस्टॉस्' नांवाचा मऊ पांढऱ्या रेशमाप्रमाणें दिसणारा खनिज पदार्थ ( हा एक प्रकारचा दगड म्हणावयाचा ) येथें ठेवलेला आहे; शिवाय, सोन्याचा दगड खाणींतून काढल्यावर जसा दिसतो, तशी त्याची प्रतिमा करून ठेविलेली आम्हीं पाहिली. बारीक हिरे, माणकें, पाच वगैरेही या भागांत ठेविलेले आहेत.

हें पाहून झाल्यावर आम्ही म्युझिअममधल्याच जेवणाच्या ठिकाणीं जेवून, नंतर व्हिक्टोरिआ व आल्बर्ट म्युझिअममधला चित्रांचा भाग पाहावयास गेलों. कांहीं कारणामुळें तीं चित्रें पाहण्याकडे माझें मन लागेना; तरी पण थोडींबहुत पाहिलीं. रॅफेल या जुन्या व प्रसिद्ध इटालिअन चित्र-कारानें काढलेलीं ७ मोठीं चित्रें येथें आहेत. लँड्सिअर या इंग्रज चित्र-काराचीं जनावरांचीं चित्रें फार छान असतात; त्यांपैकीं कांहीं कुत्र्यांचीं चित्रें या ठिकाणीं आम्हीं पाहिलीं. हीं चित्रें इतकीं सुरेख साधलीं आहेत कीं, त्यांतील कुत्र्यांच्या तोंडावरून त्यांच्या मनांतील भावना अगदीं स्पष्ट तऱ्हेनें व्यक्त होतात.

## तारीख ६ डिसेंबर

दुपारीं एका दुकानांत जेवून मग आम्हीं 'नॅशनल आर्ट गॅलरी' पुन: एकदां पाहावयास गेलों. हूच् या चित्रकाराचीं घराच्या आंतल्या भागांचीं कांहीं चित्रें मला फार आवडलीं. व्हेलास्के या प्रसिद्ध जुन्या चित्रकाराचें एक 'व्हीनस् अॅन्ड क्युपिड्स' या नांवाचें चित्र आम्हांला मुद्दाम दाख-विण्यांत आलें. कांहीं वर्षांपूर्वी बायकांना मत देण्याचा हक्क प्राप्त व्हावा

म्हणून ' सर्फ्रेजेट्स ' नांवाच्या बायकांनीं या शहरांत जो धुमाकूळ मांडला होता, त्यावेळीं त्यांपैकींच एका बाईनें हें चित्र फोडून व फाडून टाकलें होतें असें आम्हांला कळलें. पण नंतर तें नीट जोडून जसेंच्या तसें केलें आतां त्यांत मुळींसुद्धां खोड दिसत नाहीं.

## तारीख ७ डिसेंबर

सुळू आमच्याकडे दुपारीं आली व तितक्यांत बनीही सुटी पडल्यामुळें केंब्रिजहून आला; मग आम्ही ताजमहाल नांवाच्या हिंदुस्थानी दुकानांत जाऊन जेवलों. तेथून विश्वनाथ व कमला यांच्या होटेलमध्यें गेलों. तेथें बराच वेळ गोष्टी व चहा पिणें झाल्यावर सुळू घरीं गेली व आम्ही तिघें तेथेंच जेवावयास राहिलों.

## तारीख ८ डिसेंबर

आज मोटरबसमधून कांहीं मैलांवर असलेला ' विंडसर कॅसल ' पाहावयास गेलों. हा एक जुना किल्ला आहे व तो टेम्स नदीच्या कांठीं एका लहानशा टेकाडावर बांधलेला आहे. पाऊस पडत असल्यामुळे या किल्ल्यावरून दिसणारा दूरचा देखावा व बाहेरच्या बाजूनें दिसणारा किल्ल्याचा नदीकांठचा देखावा हे दोन्ही आम्हांला पाहावयाला मिळाले नाहींत; पण किल्ल्याच्या आंतले पाहण्यासारखे भाग आम्हीं सर्व पाहून घेतले.

पहिल्यानें राणीला तिच्या प्रजेनें तयार करून दिलेलें बाहुलीचें घर पाहिलें. एखाद्या खऱ्या राजाच्या घरांत ज्या ज्या लहानमोठ्या वस्तु आढळतील तितक्या सर्व अतिशय लहान प्रमाणांत या बाहुलीच्या घरांत आहेत; आणि मुख्य गोष्ट म्हणजे सर्व लहानमोठ्या वस्तु अगदीं प्रमाणबद्ध आहेत; आणि जशा आपल्या खरोखरीच्या घरांत असतात तशा ! लहान मोटारी आहेत त्या मोठ्या मोटारींप्रमाणें पेट्रोलवर चालतात. इंग्लंडच्या राजाचें राजा या नात्यानें जे कांहीं जवाहीर आहे, ( म्हणजे मुकुट, गदा, वगैरे ) त्यांच्या हुबेहूब प्रतिकृति करून या घरांत ठेविलेल्या आहेत. लहान

लहान दारूच्या बाटल्या खरी दारू भरून येथें ठेविलेल्या आहेत हें घर कांचीच्या कवच मध्यें ठेविल्यामुळें सर्व बारीकसारीक वस्तु दिसणें शक्य नाहीं; पण घरांतल्या मुख्य खोल्या व त्यांतलें सर्व सामान आणि बगिचा हीं नीट दिसतात. या घराशिवाय आणखी कितीशा अगदीं लहान खेळाच्या वस्तु राणीला ठिकठिकाणांहून लोकांनीं पाठविल्या, त्या सर्व कपाटांत घालून लोकांना दाखविण्याकरितां ठेविलेल्या आहेत. त्यांत एक खरोखरीच नखाएवढी कात्री, चकू व गव्हाच्या एका दाण्याएवढें अंगुस्तान आहे, व आणखी सुरेख, लहान अशा अनेक वस्तु आहेत. शिवाय, इंग्लंडच्या जुन्या राजांची लहानपणचीं कांहीं खेळणींही येथें ठेविलेलीं आहेत. व्हिक्टोरिआ राणीचा खेळण्याचा चइाच्या पेलेबशांचा संच आम्हीं येथें पाहिला.

राजाच्या मोठमोठ्या समारंभांच्या वेळीं वापरण्याचीं मोठमोठीं दालनें आम्हीं पाहिलीं यांच्या छतांवर व भिंतींवर सफेत, सोनेरी, वगैरे रंगांचें सुरेख काम केलेलें आहे, व कांहीं भिंती उत्तम रंगीत रेशमी कपड्यानें आच्छादलेल्या आहेत भिंतींवर कांहीं सुरेख लाकडाचें कोरीवकाम आहे. येथें लाकूड सामानही उत्तम आहे. जुन्या काळच्या उत्तम चित्रकारांनीं काढलेल्या खऱ्या माणसांच्या तसबिरी व मोठमोठीं रंगीत सुतांचीं विणलेलीं गालिचेवजा चित्रें येथें पुष्कळ आहेत. या सुताच्या विणलेल्या चित्रांत रंगांचा मेळ, वगैरे साध्या चित्रांइतक्याच कुशलतेनें केलेली आढळते, व हे गालिचे जुने असूनही यांचे रंग अजून खराब झालेले नाहींत. येथें एक मोठी खोली आहे. त्यांतलें सर्व सामान निळ्या रंगाच्या उंची कपड्यानें मढविलेलें आहे. 'नाइट् ऑफ दी गार्टर्' नांवाची फार मोठी पदवी राजेसाहेब जेव्हां एखाद्याला देतात तेव्हां तो समारंभ या खोलींत होतो. आजपर्यंत ही पदवी ज्याला ज्याला मिळाली त्या प्रत्येकाच्या घराण्याची खुणा मेजवानी देण्याकरितां राखून ठेविलेल्या एका अतिशय मोठ्या दालनाच्या सबंध छतावर आणि भिंतींवर रंगांनीं काढली आहे; त्यामुळें या दालनांत एक निराळीच शोभा दिसते. कांहीं खोल्यांत चिनीमातीच्या सुरेख सामानानें कपाटांचीं कपाटें भरलेलीं आहेत; शिवाय, शस्त्रें आणि इतर सामान

पुष्कळ आहे; त्यांत श्रीरंगपट्टणहून आणलेलें एक सोन्याचें वाघाचें तोंड आम्हीं पाहिलें.

किल्ल्याच्या एका भागांत व्हिक्टोरिआ राणीच्या वंशांतल्या एक दोन माणसांचीं थडगीं पाहिलीं. या खोलीच्या भिंतींवर रंगीत चित्रें खोदलेलीं आहेत, व छतावरही रंगीत काम केलेलें आहे; आणि येथल्या खिडक्यांमध्यें रंगीत चित्रांचीं कांचेचीं तावदानें बसविलेलीं आहेत.

'सेंट जॉर्जिस चॅपल' नांवाचें जें देऊळ किल्ल्यांत आहे, त्याची बांधणी अतिशय सुरेख आहे असें समजतात. त्याचे दगडाचे सुरेख खांब व छतावरचें व इतर ठिकाणचें दगडावरचें खोदीवकाम चांगलें आहे खरें; पण हिंदुस्थानांतल ज्या आम्हीं या कामाचे उत्तमोत्तम नमुने आमच्या देशांत पाहिले आहेत, त्यांना येथल्या खोदीवकामाचें तितकेंसें कौतुक वाटत नाहीं. या देवळांत 'नाइट्स ऑफ दी गार्टर' ही पदवी असलेल्या सर्वांचीं निशाणें व शिरस्त्राणें वर टांगून ठेविलेलीं आहेत. येथें कांहीं राजघराण्यांतील मंडळींचीं थडगीं आहेत. सातव्या एडवर्ड बादशहांचें व त्यांच्या राणीचें मिळून जें एक थडगें आहे तें येथेंच आहे. चौथ्या जॉर्ज राजाच्या मुलीचें थडगें पाहण्यासारखें आहे. मृताचें शरीर झांकलेलें आहे व चार बाजूंना चार बायका डोक्यावर कपडा पांघरून रडत आहेत असा हा पुतळा केलेला आहे. हें थडगें पांढऱ्या रंगाचें आहे, व पाठीमागल्या बाजूला पांढऱ्या कपड्याच्या पडद्याची प्रतिकृति दगडाची केलेली आहे ती फार छान साधली आहे.

शेवटीं आम्हीं किल्ल्यामधली जुनी तुरुंगाची अंधारी जागा पाहिली. येथूनच एक किल्ल्याच्या खालून दूरवर गेलेला गुप्त रस्ता सुरू होतो. तेथें फक्त पुराणवस्तु संशोधकांना जावयास देतात. येथें जें घड्याळ आहे, तें शेंकडों वर्षांपूर्वीं एका मनुष्यानें तयार केलें. त्याचीं मोठमोठीं यंत्रें आजपर्यंत सुस्थितींत असून तें घड्याळ अजूनही छान चालतें. येथल्या मनोऱ्यामध्यें जी घंटा आहे ती सहा मैलांवर असलेल्या स्टॉक पोजिस या गांवापर्यंत मागें ऐकूं जात असे; व इंग्रज कवि ग्रे यानें त्या गांवीं लिहिलेल्या

आपल्या 'एलजी रिटन् इन् अ कंट्री चर्चयार्ड' (Elegy written in a Country Churchyard) या कवितेमध्यें याच घंटेच्या नादा-विषयीं लिहिलें आहे.

या विंडसर किल्ल्याचा विस्तार पुष्कळ मोठा आहे; पण बाकीच्या भागांत लहानमोठ्या अधिकाऱ्यांच्या खासगी राहण्याच्या जागा असल्या-मुळें ते भाग लोकांना पाहतां येत नाहींत. हा किल्ला पाहून झाल्यावर तेथें जवळच एका दुकानांत दुपारचें जेवण अतिशय घाईनें उरकून घेऊन आम्हीं परत येण्याची मोटर गांठली.

## तारीख ९ डिसेंबर

दुपारचें जेवण झाल्यावर आम्ही मि. मॅकिनर्नींच्या घरीं भेटायला गेलों. (हे गृहस्थ आमच्याच बोटीनें विलायतेला आले होते.) ती मंडळी खास लंडनपासून कांहीं अंतरावर राहतात. आम्ही त्यांच्या घरीं त्यांच्या कुटुंबा-बरोबर बोलण्याचालण्यांत दुपार घालविली व आम्हांला त्यांनीं चहा दिला. चहाबरोबर खाण्याचे पदार्थ घराच्या मालकिणीनें स्वतः तयार केले होते व चहाही तिनेंच तयार करून सर्वांना दिला; कारण तिची मोलकरीण त्या वेळीं घरीं नव्हती.

## तारीख १० डिसेंबर

मि. व्हॅानबॅाकच्या घरीं आम्ही दुपारच्या जेवणानंतर गेलों. दिवाण-खान्यांत विस्तवाच्या जवळ शेकत बसून सर्व दुपार अनेक तऱ्हेच्या गोष्टी करण्यांत घालविली. नंतर चहा व खाणें झालें. पुनः गोष्टी झाल्या त्या रात्रीच्या जेवणापर्यंत. जेवणासाठीं मिसेस व्हॅानबॅाकनें मुद्दाम भात व आमटी स्वतः तयार केली होती. मग जेवणानंतर कांहीं वेळानें आम्हीं घरीं परतलों.

## तारीख ११ डिसेंबर

दुपारीं एका दुकानांत जेवावयास जात असतांना वाटेंत एक बाई भेटली. तिला पाहून आम्हांला फार आश्चर्य वाटलें. टारकी या गांवीं आम्ही ज्या

होटेलांत उतरलों होतों त्याच होटेलांत ही बाईही उतरली होती. तेथें आमची व तिची ओळख झाली होती, पण तेथून गेल्यावर या अफाट व लाखों माणसांनीं गजबजलेल्या लंडन शहरांत ती आम्हांला अशी रस्त्यांत भेटेल अशी कल्पनाही नव्हती.

जेवण झाल्यावर आम्ही ॲना पॅव्हलोव्हा या जगप्रसिद्ध नाचणारीचा नाच पाहावयास गेलों. हिचा नाच फार छान झाला. हिच्याबरोबर असलेल्या इतर पुरुष-बायकांचाही नाच फार छान झाला. पुष्कळ वेळां ही मंडळी पायांच्या बोटांवरच फक्त नाचत, व नाचतांना यांचे पाय जमिनीवर इतके हलके पडत कीं, आवाज मुळींसुद्धां होत नसे. नाच पुष्कळ तऱ्हेचे होते, व त्या सर्वांतील शरीरांचे हावभाव पाहण्यास फार रम्य वाटले. "आक्काबाईचा कोंबडा" म्हणून जी एका तऱ्हेची फुगडी आपल्यामध्यें आहे, तशा तऱ्हेचा एक नाच एकानें नाचून दाखविला; तो नाचावयास फार कठीण असा आम्हांला वाटला. असें म्हणतात कीं एखादी भावना ज्याप्रमाणें कवि कवितेच्या द्वारें व चित्रकार चित्राच्या द्वारें व्यक्त करतो, तशीच नाचणारा नृत्याच्या द्वारें व्यक्त करतो. कवितेच्या द्वारें व्यक्त केलेल्या भावना मला परिचित आहेत व चित्रांच्या द्वारेंही व्यक्त केलेल्या निरनिराळ्या भावना आपल्याला चित्रें पाहतांना दिसून येतात; पण त्यामध्यें त्या कशा दाखवितां येतात याचें मला आजपर्यंत गूढ होतें, तें पॅव्हलोव्हाला पाहिल्याबरोबर उकललें गेलें.

एका नाचांत ( Coquettery of Columbine ) एका चंचल व छिल्लर वृत्तीच्या बाईचें दोन पुरुषांशीं वर्तन पॅव्हलोव्हानें फार मार्मिक रीतीनें व्यक्त केलें. नाचतां नाचतांच त्या दोघांपैकीं एकाकडे विशेष भिन्नत्वाचे हावभाव करून त्याच वेळीं दुसऱ्यासंबंधीं तुच्छता ती दाखवी; व लागलेंच त्या दुसऱ्याकडे मित्रत्व दाखवून पहिल्याचा धिक्कार करी; व ही बदलणारी भावना कांहीं शब्द वगैरे न बोलतां फक्त आपल्या नृत्याच्या द्वारें ती व्यक्त करी.

दुसऱ्या एका नाचांत तेथल्या Autumn ऋतूंतील देखावा तिनें

दाखवला. यावेळीं रंगभूमीवर पिकलेल्या पानांच्या झाडांचा देखावा दाखवला होता. मधून मधून एकएक तसलेंच पान वरून खालीं रंगभूमीवर गळून पडत होतें. अर्धवट पिकलेल्या पानामध्यें दिसणारे जे हिरवे, लालसर व पिवळे रंग असतात, तसल्या रंगाचे कपडे घालून पुष्कळ मुली झाडांचीं पानें बनल्या होत्या, व पॅव्हलोव्हानें शेवंतीच्या फुलाच्या पाकळ्यांप्रमाणें मोठ्या पाकळया आपल्या कपड्यांना झालरीसारख्या लावून ती शेवंतीचें फूल झाली होती. तीं 'पानें' व तें 'फूल' नाचत असतांना 'उत्तरेकडचा वारा' रंगभूमीवर आला. हा 'वारा' म्हणजे एक उघडा मनुष्य अगदीं लहानसा कपडा नेसलेला असा होता. त्याचे केस विंचरून उडत असल्याप्रमाणें पाठीमागें फिरवलेले दिसत होते. तो उघडा असल्या-मुळें 'वाऱ्याचा' थंडपणा व्यक्त होत होता व तऱ्हेवाईक केसांमुळें तो 'वारा' असल्याचें व्यक्त होत होतें. तो रंगभूमीवर आला तो जोराच्या वाऱ्याप्रमाणें एका टोंकाहून दुसऱ्या टोंकाकडे जोरानें नाचत गेला, व त्या नंतर सर्व 'पानें' (म्हणजे त्या पानांसारख्या दिसणाऱ्या मुली) ठिक-ठिकाणीं जमिनीवर गळून पडलीं व 'शेवंतीच्या फुला'च्या पाकळ्याही नाहींशा झाल्या.

## तारीख १२ डिसेंबर

दुपारच्या जेवणानंतर येथलें सेल फ्रिजचें दुकान पाहावयास गेलों. हें पांचसहा मजल्यांचें, अतिशय मोठें अमेरिकन दुकान आहे. येथें एकदोन तास घालवून आम्हीं अर्धें दुकान जेमतेम ओझरतें पाहिलें. नानातऱ्हेच्या असंख्य वस्तु येथें दिसल्या; व ज्याप्रमाणें मुंग्यांच्या वारुळावर मुंग्या फिरत असतात, त्याप्रमाणें माणसें (विशेषतः बायका) या वस्तु पाहत व खरेदी करीत फिरत होतीं. आम्हींही थोडीशी खरेदी केली.

## तारीख १३ डिसेंबर

दुपारीं बाहेर पडतों, तर चित्रविचित्र कपडे केलेले मुलगे व मुली एका मोठ्या इस्पितळासाठीं लोकांकडून पैसे गोळा करतांना दिसले. हे सर्व

शहरभर पसरले होते. दुपारच्या जेवणानंतर आम्हीं वेस्ट डलिचला हुगवर्फ मंडळीला भेटायला गेलों. दुपार बोलण्याचालण्यांत मजेनें केव्हांच निघून गेली. आम्हांला त्यांनीं चहा पण दिला. आणि संध्याकाळ झाल्यावर आम्हीं घरीं परतलों.

## तारीख १४ डिसेंबर

सकाळीं आम्हीं येथला 'झू' (जनावरांचा बगिचा) पाहावयास गेलों. येथें पुष्कळ तऱ्हेचीं जनावरें आहेत. सिंहाच्या घरांत एक वाघ व सिंह यांपासून उत्पन्न झालेलें मिश्र जनावर पाहिलें. एकदम पाहिलें असतांना हा सिंहच आहे असें वाटलें, पण बारकाईनें पाहिल्यावर त्याच्या तोंडाचा घाट वाघाच्या तोंडासारखा दिसला; बाकी रंग, वगैरे सिंहाचाच आहे. हें जनावर नवानगरचे जामसाहेब रणजितसिंगजी यांनीं नजर केलेलें आहे.

एक तपकिरी रंगाचें आस्वल माणसासारखे पाय पसरून बसलें होतें, व ध्रुवाकडल्या प्रदेशांतल्या एका सफेत आस्वलाला नमस्कार करण्यास शिकविलेलें होतें. आम्हांला पाहिल्याबरोबर त्यानें नमस्कार केला. त्याबरोबर स्वतःनीं त्याला उलटा नमस्कार केला.

"पेंग्विनस्" पक्ष्यांची फार मौज पाहिली. यांना पुढें दोन पंख व पाठीमागें दोन पाय असल्यामुळें पंखांच्या योगानें पाण्यांत पोहतां व पायांनीं जमिनीवर चालतां येतें. जमिनीवर दोन पायांवर उभें राहून माणसासारखें चालतांना त्यांना पाहून मौज वाटते. एक मनुष्य त्यांना मासे खावयास घालीत होता त्यामुळें ते त्याच्या पाठीमागें चालत जात होते; व त्यांना पाहावयास आलेलीं कांहीं मुलें त्यांचे पंख आपल्या हातांत धरून चालत होतीं, तेव्हां तीं आपल्या लहान भावंडांनाच धरून नेत असल्याप्रमाणें दिसलें. "सील" मासे पाण्यांत सारखे पोहत होते, व काकाकुवा पक्ष्यांनीं ओरडून ओरडून आपल्या खोलींत नुसता कल्होळ माजविला होता.

याशिवाय लहान लहान किडे, झुरळें, तऱ्हेतऱ्हेचे साप, अतिशय सुरेख सुरेख रंगांचे पक्षी व अनेक मोठीं जनावरें तेथें पाहिलीं. अजगरांच्या मोठ-मोठ्या लोथींच्या लोथी पाहून मन विटलें. सर्व तऱ्हेच्या प्राण्यांना ज्या ज्या प्रकारची जमीन किंवा पाणी लागतें त्या त्या प्रकारची जमीन किंवा पाणी तयार करून, व त्यांना जिवंत राहण्यास जितकी उष्णता लागते तितकी उष्णता कृत्रिम तऱ्हेनें तयार करून, तेथें तेथें त्यांना ठेविलेलें आहे. डोंगरी बकऱ्यांसाठीं दगडाचे कृत्रिम लहान लहान डोंगरही बागेंत केले आहेत. प्रेक्षक लोक जनावरांना पाव, हिरवीं पानें व भुईमुगाच्या शेंगा खावयास देत होते. आम्हींही माकडांना व खारींना शेंगा खावयास दिल्या. या दिवशीं निरभ्र आकाशांत सूर्य प्रकाशत होता, असा देखावा या शहरांत या दिवसांत दुर्मिळ असल्यामुळें, आम्हांला तो विशेष आनंददायक वाटला.

बगिच्यांतील मासे ठेविलेली जागा कांहीं कारणामुळें आम्हांला या दिवशीं पाहावयास मिळाली नाहीं; म्हणून बाकी सर्व साधारणपणें पाहून झाल्यावर आम्ही या ठिकाणींच असलेल्या प्रशस्त दुकानांत जेवून विश्वनाथाच्या होटेलांत गेलों. आमचें रात्रीचें जेवण तेथेंच झालें व गप्पागोष्टीही पुष्कळ झाल्या.

## तारीख १५ डिसेंबर

सकाळीं आम्ही गॅमेजिस् नांवाच्या खेळण्यांसाठीं प्रसिद्ध असलेल्या दुकानांत गेलों व ओळखीच्या कांहीं मुलांसाठीं थोडा खेळ खरेदी केला. ही खरेदी चालू असतां, सोलापुरांतील आमच्या ओळखीचे मि. कुक व त्यांची पत्नी यांची आमची अचानकपणें गांठ पडली व थोडें बोलणें झालें. दुकानांत नाताळानिमित्त "दी ओल्ड वुमन् हू लिव्हड इन् द शू', (The old woman who lived in the shoe) या गोष्टींतील म्हाताऱ्या बाईचा एक मोठा पुतळा पुष्कळ रूमाल एकाला एक टांचून त्यांचा तयार केलेला होता. तिचे कपडे रंगीत रुमालांचे केलेले होते; फक्त मुखवटा तेवढा रूमालांचा केलेला नव्हता. तिच्याजवळ एक भयंकर मोठा

बूटही रूमालांचा बनविलेला होता; व त्यावर तिचीं कांहीं मुलें बसविलेलीं दाखविण्याकरितां बाहुल्या बसविल्या होत्या.

दुपारच्या जेवणानंतर आम्हीं पुनः सेलफ्रिजच्या दुकानांत जाऊन, बाकी राहिलेल्या मजल्यांवरचें सामान पाहून आणखी थोडीशी खरेदी केली. येथें एक मोठी मुलगी, तिच्याजवळ एक गाडी, पाठीमागें कांहीं झाडें असा एक देखावा तयार केला होता; तो सर्व पुष्कळसे पांढरे रुमाल एकाला एक टांचून त्यांचा केलेला होता. माणसांचें लक्ष दुकानांतील वस्तूंकडे ओढून घेण्याकरितां अशा तऱ्हेचे देखावे, वगैरे करण्याची येथें पद्धत आहे. या दुकानांत नाताळानिमित्त एक विशेष प्रकारचा देखावा तयार केला होता. एका खोलींत बसावयास लहानलहान बाकें ठेविलीं होतीं. तेथें बसल्यावर एक कसलें तरी यंत्र चालू केल्याबरोबर ती खोली हादरूं लागली व जणू काय आपण आकाशनौकेमध्यें बसलों आहोंत असा भास होऊं लागला. मग उत्तरध्रुवाकडचीं म्हणून कांहीं विलक्षण, मजेदार सिनेमाचीं चित्रें दाखविण्यांत आलीं. मागाहून आम्हीं दुसऱ्या एका खोलींत गेलों, तेथें उत्तरध्रुवाकडच्या लहानलहान देखाव्यांनीं ती खोली भरून टाकली होती. हे देखावे म्हणजे साधीं चित्रें नसून, ते लहानलहान वस्तूंचे तयार केले होते. जिकडेतिकडे बर्फाचे डोंगर दाखविलें होतें. मध्यें कांहीं तळीं होती. एका ठिकाणीं 'एस्किमो' लोक विस्तवाभोंवतीं शेकत बसले होते, तर दुसऱ्या ठिकाणीं 'रेड इंडिअन' लोक आपल्या लहानलहान झोपड्यांजवळ बसले होते. एका ठिकाणीं एका माणसाच्या पाठीमागें एक तपकिरी आस्वल सारखें पळत होतें, तर दुसऱ्या ठिकाणीं बरींच पांढरीं आस्वलें बर्फाच्या डोंगरावरून खालीं पळत होतीं. खोलींत एक प्रकारचा निळसर उजेड होता. हा सर्व देखावा विशेषतः मुलांसाठीं तयार केला होता, व लहान मुलांना येथें एकएक खेळणें बक्षीस मिळत होतें.

## तारीख १६ डिसेंबर

सकाळीं 'मेडिची गॅलरीज' नांवाच्या दुकानीं जाऊन कांहीं लहान चित्रें, नाताळांत एकमेकांना पाठवतात तसलीं चित्रांचीं कार्डें वगैरे खरेदी केलीं.

दुपारच्या जेवणानंतर 'गॅमेजिस' या दुकानांत गेलों. तेथें आंत शिरण्याचे पूर्वी ज्यांना उद्योगधंदा कांहीं नाहीं अशा लोकांचा एक मेळा आपल्या कठीण स्थितीसंबंधीं लोकांची जागृति करीत रस्त्यावरून गेला व जातांजातां लोकांकडून पैसे मिळविण्याचाही त्यांनीं प्रयत्न केला. एका बाजूला या नाताळाच्या सणानिमित्त अनेक आवश्यक व अनावश्यक वस्तु खरेदी करण्यासाठीं पैशांच्या थैल्या घेऊन जाणाऱ्यांचा थवा, तर दुसऱ्या बाजूला ज्यांना दिवसांतून पोटभर अन्न मिळण्याची मारामार अशा दीन-दुबळ्या लोकांचा तो मेळा असा विरोध पाहून क्षणभर मन द्रवल्याशिवाय राहिलें नाहीं.

गॅमेजिस या दुकानांतील दोन तीन मजले पाहून लहानसहान खरेदी झाल्यावर, तेथेंच एका मजल्यावर त्यांच्याच चहाच्या प्रशस्त दुकानीं बसून आम्हीं चहा, वगैरे घेतला.

## तारीख १७ डिसेंबर

सकाळीं दहा वाजण्याच्या सुमाराला कांहीं खरेदी करण्यासाठीं म्हणून बाहेर पडलों, तर हां हां म्हणतां रस्त्यांत डोक्यावर येथलें प्रसिद्ध काळें धुकें जमूं लागलें. हळू हळू तें इतकें काळेकुट्ट झालें कीं, तिऱ्हाइताला हा दिवस आहे कीं रात्र आहे अशी भ्रांति पडली असती. मध्यरात्रीसारखा अंधार शहरभर पसरला, व दुकानांत, रस्त्यांत, गाड्यांवर, घरांवर विजेच्या दिव्यांचा लखलखाट झाला. आम्ही एका ठिकाणीं जेवलों, व कांहीं वेळानें "बिटरस्वीट्" ( Bitter Sweat ) या दुपारच्या नाटकाला जावयाचें असल्यामुळें, मधला वेळ चित्रें पाहण्यांत घालवावा या हेतूनें आम्हीं "नॅशनल् आर्ट गॅलरी"कडे वळलों, पण तेथें कळलें कीं धुक्यामुळें "गॅलरी" बंद आहे; तेव्हां आतां या अंधारांत हा मधला वेळ घालवावा तरी कोठें अशी पंचाईत पडली. शेवटीं त्या 'आर्ट गॅलरी'च्या छपराखालीं अंधारांत उभें राहून आजूबाजूच्या विजेच्या दिव्यांनीं दाखविल्या जाणाऱ्या जाहिरातींकडे पाहत आम्हीं कसातरी तो वेळ काढला व मग नाटकाला गेलों.

नाटक संगीत ( ऑपरेटा ) होतें. नाटकाच्या कथानकांत विचारांची खोली किंवा रचनेचें चातुर्य असें विशेष कांहींच नव्हतें; तरी पण एवढें मोठें नाटकगृह अगदीं चिकार भरलें होतें. बरें नाटक नवें होतें असेंही कांहीं नाहीं. तें आज कित्येक महिने चाललेलें आहे; मात्र त्यांत पात्रें पुष्कळ असून, त्यांचे कपडे छान छान होते, नाच व गाणें होतें आणि देखावे चांगले होते; उदाहरणार्थ, रंगभूमीवर नाचाची जी खोली दाखविली होती ती एखाद्या खऱ्या घरांतील खोलीप्रमाणें दिसत होती. तो वरच्या मजल्यावर जाणारा भव्य जिना, छपराला लटकलेले झुंबर, बाहेरच्या बाजूला दिसणारी गच्ची व पलीकडे दिसणारा चंद्रप्रकाश, सर्व जसें कांहीं खरें !

## तारीख १८ डिसेंबर

डाउटी स्ट्रीट ( doughty street ) मध्यें असणारा प्रसिद्ध इंग्रज कादंबरीकार डिकन्स् याचें जुनें राहतें घर पाहण्यास आम्हीं सकाळीं गेलों. तेथें डिकन्स्च्या पुष्कळ वस्तु आणून त्यांचा संग्रह केला आहे. त्याच्या कादंबऱ्यांच्या कांहीं अगदीं पहिल्यानें छापलेल्या मोठमोठ्या प्रति, त्याचीं पत्रें, त्याचें टेबल, दौती, सुरेख रंगीत फुलें वर असलेला त्याचा चहा पिण्याचा पेला, तांबडा रेशमी रुमाल, हातांत धरावयाची काठी, अशा अनेक वस्तु येथें ठेविलेल्या आहेत; शिवाय, एक खोली त्याच्यासंबंधींच्या पुस्तकांनीं भरलेली आहे. त्याच्या कादंबऱ्यांतील प्रसिद्ध पात्रांच्या चिनीमातीच्या केलेल्या प्रतिमा, त्यानें वर्णन केलेल्या प्रसंगांचीं त्यावेळच्या चित्रकारांनीं काढलेलीं चित्रेंही येथें पुष्कळ पाहिलीं. तो लहान असतांना त्याच्या बापाच्या घरांतील पोटमाळ्यांतील ज्या खोलींत तो राहत असे, त्या खोलीची लहानशी कांचीच्या तावदानांची खिडकी येथें ठेविलेली आहे; तसेंच, त्याच्या 'ऑलिव्हर ट्विवस्ट' ( Oliver Twist ) या कादंबरींत ऑलिव्हरला ज्या खिडकींतून लोटून दिल्याचा उल्लेख आहे ती खिडकी आणि 'पिकविक पेपर्स' ( Pikwick Papers )

या कादंबरींत ज्याचा उल्लेख केला आहे तो 'Bill stumps his mark' हीं अक्षरें असलेला दगड याही वस्तु येथल्या संग्रहांत आढळल्या. 'पिकविक पेपर्स' ही कादंबरी लिहून झाल्यावर त्यानें आपल्या मित्रास एक मेजवानी दिली; त्यावेळीं त्यानें आपल्या हातानें लिहिलेली एक आमंत्रणपत्रिका, तसेंच, त्या मेजवानीच्या वेळीं टेबलावर ठेविलेल्या पाहुण्यांच्या नांवाच्या नक्षीदार कार्डांपैकीं एक कार्ड, या वस्तु येथें ठेविलेल्या आहेत. डिकन्सच्या या घराच्या सहा खोल्या पहिल्यानें बांधलेल्या त्याच आहेत; मात्र, खालीं असलेलें स्वयंपाक घर पडित होतें, त्याच्या जागीं 'पिकविक पेपर्स'मध्यें वर्णन केलेल्या Dingly Dell Kitchen बरहुकूम स्वयंपाकघर बांधण्यांत आलें आहे. तेथें नाताळानिमित्त एक तात्पुरतें दुकान मांडलें होतें व त्यांत डिकन्ससंबंधींच्या बऱ्याच निरनिराळ्या वस्तु विकावयास ठेविल्या होत्या; तेथें थोडीशी खरेदी करून आम्हीं, पुढें लंडन शहराच्या दुसऱ्या एका भागांत 'Old Curiosity Shop' नांवाचें दुकान आहे तें पाहावयाला गेलों. डिकन्सनें याच नांवाची जी कादंबरी लिहिली तिचें नांव या दुकानावरून सुचलें असें म्हणतात; पण या म्हणण्यांत किती तथ्य हें आम्हांला नीट समजलें नाहीं. हें दुकान लहानसें व जुनाट दिसणारें असें आहे. तेथें थोडीशी खरेदी करून आम्ही दुपारचें जेवण जेवायला गेलों.

आजचें हें जेवण आम्ही "Cheshire Cheese" नांवाच्या एका शेंकडों वर्षांपूर्वीच्या जुन्या उपहारगृहांत जेवलों. या ठिकाणीं फार जुन्या काळीं जॉनसन, डिकन्स, वगैरे इंग्रजी वाङ्मयांतील नांवाजलेले लेखक जेवायला येत असत. जेवणाचे टेबलापुढे जीं जुनीं बाकें आहेत, त्यांवरील जॉनसनची आवडती जागा आम्हीं पाहिली. डिकन्सनें आपल्या 'Tale of Two Cities' या कादंबरींत Charles Darnay व Sidney Carton या दोन गृहस्थांची भेट ज्या ठिकाणीं झाली म्हणून कल्पिलें आहे, ती जागा याच ठिकाणीं आहे म्हणून आख्यायिका आहे; व त्याच विशिष्ट जागीं आम्ही जेवायला बसलों. येथें एक मांसाचा प्रकार

तयार करतात तो इतर ठिकाणांपेक्षां भिन्न असून, तो आज शेकडों वर्षें एकाच नमुन्याचा केला जात आहे असें म्हणतात; व तो तयार करण्याची खुबी दुसऱ्या कोणाला कळूं नये म्हणून अगदीं गुप्त रीतीनें ती वस्तु तयार करण्यांत येते. मी मांसाहारी नसल्यामुळें जरी या वस्तूची रुचि मला कळली नाहीं तरी शेजारची मंडळी ती खात असतांना सुटलेल्या खमंग व रोजच्यापेक्षां अगदीं वेगळ्या वासावरून तो पदार्थ कांहीं विशिष्ट प्रकारचा असावा असें मलाही वाटलें. येथली आठवण म्हणून येथेंही कांहीं बारीकसारीक खरेदी आम्हीं केली, नंतर वर जाऊन जॉन्सन् बसत असे ती खुर्ची, त्यानें प्रसिद्ध केलेला इंग्रजी भाषेचा भला मोठा दिसणारा कोश, या उपहारगृहांत मागें वापरलेलीं अगदी जुनीं चिनी मातीचीं भांडीं, वगैरे वस्तु पाहिल्या-सरते शेवटीं खालीं जाऊन भुयारांतील अतिशयच जुन्या अशा खोल्या पाहिल्या. या खोल्या कितीशा वर्षांपूर्वीच्या असूनही आज चांगल्या स्थितींत आहेत, व येथें मोठमोठीं दारूचीं पिंपें भरून ठेविलेलीं आहेत. 'Dickens Fellowship' नांवाचें जें मंडळ आहे त्याच्या सभा, वगैरे येथल्याच एका खोलींत भरतात असें आम्हांस सांगण्यांत आलें.

दुपारीं आम्हीं Liberty (लिबर्टी)च्या दुकानांत गेलों. हें दुकान लंडनच्या मोठ्या दुकानांत गणलें जातें; व याचें वैशिष्ट्य हें आहे कीं, यांत जगांतील सर्व देशांतील सर्व तऱ्हांचा उत्तम माल दृष्टीस पडतो. अर्थात् हिंदुस्थानांतीलही माल येथें आम्हीं पाहिला. नाताळाकरितां म्हणून लहान-लहान वस्तूंचाही भरणा दुकानांत पुष्कळ केलेला दिसला. पूर्वीं कधींही न पाहिलेल्या दोन विशेष प्रकारच्या वस्तु येथें माझ्या नजरेला पडल्या. फुलदाणीप्रमाणें टेबलावर शोभेकरितां ठेवितां येण्याइतके लहान जपानी बगिचे व फुलपाखरांच्या पंखांचीं तयार केलेलीं चित्रें.

जपानी बगिच्यामध्यें पाण्याचें तळें, त्यांत मासे, पाण्यावर पूल वगैरे सर्व कांहीं लहान प्रमाणांत होतें; पण सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्या बागेंतील छोटे वृक्ष खरेखुरे असून ते पूर्ण वाढीला पोंचलेले असावेत. झाडांचें वय कितीही वाढलें तरी त्याबरोबर त्यांची उंची वाढूं न देण्याची

कांहीं कला जपानी लोकांना माहीत आहे, तिच्यामुळें हे असले छोटे वृक्ष त्यांना तयार करतां येतात.

ज्याप्रमाणें कागदावर रंगीत चित्रें काढतात त्याप्रमाणेंच, पण रंगांच्या बदलीं मेलेल्या फुलपांखरांचे पंख चिकटवून तयार केलेलीं हीं चित्रें बरीं दिसतात.

## तारीख १९ डिसेंबर

दुपारीं शकीच्या उपहारगृहांत देशी जेवण जेवल्यावर जवळच असलेल्या केस धुण्याच्या दुकानांत जाऊन मी केस धुऊन घेतले. माझ्या अंगावरचा एकही कपडा काढल्याशिवाय किंवा तो यत्किंचित् भिजल्याशिवाय, तेथल्या मुलीनें माझे केस स्वच्छ धुऊन मग त्यांवर एका धातूच्या मोठ्या नळींतून विजेच्या सहाय्यानें गरमगरम हवा सोडली, व अशा तऱ्हेनें माझे केस पांचदहा मिनिटांत वाळवून पहिल्याप्रमाणें अगदीं कोरडे करून दिले.

## तारीख २० डिसेंबर

बनीचा मित्र डायज् हा त्याला भेटण्याकरितां सकाळीं आमच्या हॉटेलांत आला, त्याला घेऊन आम्हीं दुपारच्या जेवणाला बाहेर गेलों. नंतर संध्याकाळच्या जेवणाला आम्ही श्री. मावळणकर बाईच्या घरीं गेलों. रस्ता लांबचा होता, व सर्व रस्ताभर दुकानांत व इतर ठिकाणीं जवळ आलेल्या नाताळाच्या सणानिमित्त रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांचा लखलखाट केला होता. एका मोठ्या इमारतीवर एक दिव्यांची मोठी बोट व तिच्याखालीं दिव्यांचेंच पाणी तयार केलें होतें, तो देखावा फार छान दिसला. मावळणकरांकडचें जेवण अगदीं आपल्या देशी पदार्थांचें असून, तें त्यांच्याकडे असलेल्या ब्राह्मणानें तयार केलें होतें. संध्याकाळ अनेक प्रकारच्या गोष्टींत केव्हांच मजेनें निघून गेली.

## तारीख २१ डिसेंबर

सुलू आम्हांला भेटायला आली. कांहीं वेळ बोलणेंचालणें झाल्यावर तिला घेऊन आम्हीं "ताजमहाल" या देशी उपहारगृहांत दुपारच्या

जेवणाला गेलों. विश्वनाथ व कमला यांनाही तेथें बोलाविलें होतेंच. हंसत बोलत जेवण झाल्यावर सुलू घरीं गेली व आम्ही सर्व विश्वनाथच्या होटेलांत जाऊन रात्रीच्या जेवणाला तेथेंच राहिलों.

## तारीख २२ डिसेंबर

हिंदुस्थानचे मंत्री मि. वेजवुड् बेन ( Secretary of State For India ) यांच्या पत्नीनें गोलमेज परिषदेच्या ( Round Table Conference )च्या सभासदांना रात्रीं मोठी पार्टी दिली, तिला कसेंसें आम्हांला बोलावणें आलें होतें. संध्याकाळीं लंडन् शहरांतील प्रसिद्ध धुकें रस्त्यावर दाट पसरलें होतें, व त्यामुळें रस्ता दिसण्याचीही मारामार होत होती, म्हणून तेथें जाण्यास उशीर होईल या नेहमींच्या आमच्या भीतीला अनुसरून आम्हीं पार्टीला जाण्यास भाड्याच्या मोटारीनें बरींच आधीं निघालों. रस्त्यांत वाट न दिसल्यामुळें अपघात होईल कीं काय या भीतीनें जरा चमत्कारिक वाटत होतें. शेवटीं एकदां Imperial Institute या इमारतीकडे पार्टीच्या आधीं चांगलीं वीस मिनिटें पोंचलों. आंत जाऊन पाहतों तों एकच जोडपें आमच्या आधीं आलेलें दिसलें; तरी पण, दोन माणसें तरी आमच्या आधीं आलेलीं पाहून त्यांतल्यात्यांत आम्हांला आनंद झाला; इतक्यांत तीं दोघें पुढें झालीं व त्यांनीं आपणच आपली ओळख आम्हांला करून दिली. तेव्हां आम्हांला कळलें कीं हीं दोघें दुसरीं कोणी नसून आमचे त्या दिवसांचे यजमान व यजमानीण मि. व मिसेस वेजवुड बेन् हीं होतीं. आम्हांला लौकर आल्याबद्दल ओशाळें वाटूं नये म्हणून तीं आमच्याकडे थोडेंबहुत हंसलीं, बोललीं व दुसरी मंडळी येईपर्यंत इमारतींतील कांहीं भाग पाहावयाला आम्हांला त्यांनीं सांगितलें. इंग्रज लोकांच्या वसाहतींत उत्पन्न व तयार होणाऱ्या वस्तु, वगैरेचा तेथें ठेवलेला संग्रह पाहून जर आम्हीं वर येतों, तर सर्व दिवाणखाना आमंत्रित मंडळीनें भरून गेलेला दिसला. जसजशी आणखी मंडळी येत होती, तसतशीं त्यांचीं नांवें पुकारलीं जाऊन त्यांच्याशीं यजमान व यजमानीण हस्तांदोलन करीत

होतीं. जमलेल्या मंडळींत चाललेल्या बोलण्यानें दिवाणखाना दुमदुमून राहिला होता. तो देखावा पाहून जणूं काय आपण हिंदुस्थानांतच आहों असा घटकाभर भास झाल्यास नवल तें काय? हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतील पुरुष व स्त्रिया तद्देशीय कपडे घालून आलेल्या तेथें कितीतरी दिसल्या. आमच्या माहितीची मंडळी जरी येथें पुष्कळ होती, तरी त्यांच्याकडे जाऊन बोलण्याइतक्या ओळखीची मंडळी फार थोडी भेटली; तरी तितकी तरी भेटली म्हणून जरा बरें वाटलें. खाणेंपिणें, बोलणेंचालणें यांत रात्र बरीच गेली. मंडळी पुष्कळच जमली होती व त्यांत इंग्रज पाहुणेही पुष्कळ होते; त्यांपैकीं एक दोघी मडमा आमच्याकडे मुद्दाम येऊन बोलल्या. त्यांनीं पूर्वी बरींच वर्षें हिंदुस्थानांत काढलेलीं होतीं. त्य पैकीं एकीनें (ही एका कर्नलची बायको होती) आम्हांला आपल्या घरीं चहाला बोलाविलें.

## तारीख २३ डिसेंबर

आम्हीं Peter Pan हें मुलांसाठीं लिहिलेलें प्रसिद्ध नाटक पाहिलें. याचें संविधानक म्हणजे मुलांना सांगतात त्या प्रकारच्या एखाद्या कहाणीसारखें होतें व त्यांतले पुष्कळसे नट लहान मुलें असून त्या सर्वांनीं आपापलें काम फार छान केलें. यांतले देखावे फार छान होते व कांहीं तर अद्भुत होते. लांडगे, कुत्रा, पक्षी, सुसर, वगैरे प्राणी खऱ्या प्राण्याप्रमाणें हालतांचालतांना पाहून आम्हां मोठ्यांनासुद्धां मौज वाटली; तर मुलांना किती मौज वाटली असेल! रुपेरी अंगांच्या मत्स्यकन्या खडकावर बसलेल्या पाहिल्या; माणसें पाण्यांत पोहतांना, होडी पाण्यावर चालतांना, पाण्याला भरती येऊन खडक पाण्याखालीं जातांना पाहून खऱ्याचा भास होत होता. रानांतील देखाव्यांत झाडाच्या पोकळ खोडांतून जमिनीखालचीं मुलें वर येतांना पाहून मौज वाटे; तसेंच, जमिनीचा कडा तुटलेला असल्यामुळें, एकाच वेळीं दिसत असलेला जमिनीवरचा रानांतील देखावा व जमिनीखालचा लहान मुलांच्या घरांचा देखावा रम्य वाटला.

नाटकाच्या अगदीं शेवटीं दाखवलेल्या देखाव्यानें मात्र बहार केली. या वेळीं रंगभूमीवर बेताचाच उजेड असून झाडांच्या शेंड्यांचा देखावा दाखविला होता. त्यांतील एका झाडावर एक चिमुकलें घर दिसूं लागलें व त्यांत दिव्यांचा उजेड होता. नाटकांतील नायक व नायिका ( हीं पीटर पॅन व वेंडी नांवाचीं दोन मुलेंच होतीं ) या घरांत दिसत होतीं, व आजूबाजूच्या झाडांत पऱ्यांचीं घरें कल्पिलेलीं असल्यामुळें, त्यांचें द्योतक म्हणून त्या सर्व झाडांतून रंगीबेरंगी विजेचे दिवे लाविलेले होते. असा हा रम्य देखावा होता; पण या सर्व नाटकांत क्षणभर मलाही थक्क करून सोडणारा सर्वांत अद्भुत देखावा म्हणजे, या नाटकांत भाग घेणारीं खरीं मुलें जेव्हां अतिशय सुंदर हावभाव करीत पक्षांसारखीं हवेंत उडून गेलीं तेव्हांचा ! सागड बाहुल्यांच्या खेळांत आपण अशा तऱ्हेचे देखावे पाहतों; पण ते लाकडी बाहुल्यांपुरते असतात. खरीं मुलें अशीं कळीनें उडविणें म्हणजे अगदींच वेगळें आहे. अशा तऱ्हेचें देखावे तयार करण्याचें यंत्रचातुर्य आमच्या लोकांमध्यें येऊन, त्यांनीं आमच्या देशांतल्या लहान मुलांकरितां जर अशीं नाटकें बसविलीं तर किती छान होईल ! असा विचार माझ्या मनांत आला; व तें नाटक पाहावयास आलेलीं लहान मुलें पाहून, 'आमची कमू येथें असती तर तिला किती मौज वाटली असती ' या विचारानें थोडें वाईट वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

## तारीख २५ डिसेंबर

आज नाताळचा दिवस; जेथें तेथें घरें, होटेलें, वगैरे हिरव्या पानांनीं, रंगीबेरंगी कागदांच्या पट्ट्यांनीं व अनेक रंगांच्या विजेच्या दिव्यांनीं शृंगारलेलीं होतीं; पण आमच्या होटेलांत असला प्रकार विशेष कांहीं नव्हता; नाहीं म्हणायला, कांहीं हिरव्या पानांचे पुंजके जेवणाच्या व सामाईक बसावयाच्या खोल्यांत जागजागीं टांगले होते, व रंगीत रबराचे फुगे मध्येंमध्यें टांगले होते. आम्हीं नेहमींप्रमाणें दुपारच्या जेवणाला लायन्सच्या एका दुकानांत गेलों. या दुकानांत नेहमीं इतकी गर्दी असते कीं कांहीं

मनुष्यांना जागासुद्धां मिळत नाहीं; पण नाताळाचा सण घरींच साजरा करण्याची पद्धत येथें असल्यामुळें, या ठिकाणीं आज जेवणारांची इतकी गर्दी नव्हती. जी मंडळी तेथें होती ती लंडनमध्यें कोठें घर नसलेली अशींच असावी. आज रस्त्याचें रूप मात्र अगदीं पालटलें होतें. जे रस्ते गेले दहा पंधरा दिवस माणसांनीं इतके गजबजलेले असत कीं त्यांच्या बाजूच्या दगडी पायवाटांवर गर्दीमुळें धक्काबुक्की सुद्धां होत असे, तेच रस्ते आज अगदीं ओसाड पडल्याप्रमाणें दिसत होते. रस्त्यावर गाड्या, मोटरीही फार कमी होत्या. रात्रीच्या जेवणाला आम्हीं विश्वनाथकडे गेलों. त्याच्या होटेलांत शोभा खूप केली होती. जेवण नाताळांत असतें त्याप्रमाणें विशेष प्रकारचें होतें. जेवणाचे टेबलावर हातानें ओढून वाजवण्याच्या कागदी फटाकऱ्या ( Chrismas Crackers ) ठेविल्या होत्या; त्या ओढून, त्यांतून निघालेल्या विलक्षण आकाराच्या, रंगीत कागदांच्या टोप्या आम्हीं डोक्याला घातल्या, व तेथें असलेलें एक कागदाचे विलक्षण आकाराचें नाक, त्याला खालीं पिकलेल्या मिशा चिकटवलेलें असें स्वतः आपल्या नाकाला लावून बसले होते. होटेलांतील इतर मंडळीहि अशाच प्रकारची मौज जेवतांना करीत होती, व जेवणानंतर ती नाचावयास गेली. आम्हीं जेवल्यावर दिवाणखान्यांत बसून गोष्टी केल्या. मिसेस् गावडे ही इंग्रज बाई इंदुराहून लंडन शहरांत आजच संध्याकाळीं आली. ती व तिचा मुलगा विश्वनाथच्याच होटेलांत राहावयास आल्यामुळें तीं दोघें आमच्याबरोबर जेवावयास होतीं; त्यामुळें साहजीकच इंदूरच्या पुष्कळ गोष्टी निघाल्या.

## तारीख २६ डिसेंबर

व्हॅानबॅाक मंडळीनें आम्हांला दुपारच्या जेवणाला बोलाविलें होतें, म्हणून त्यांच्या मुलासाठीं एकदोन खेळण्याच्या वस्तु घेऊन आम्ही गेलों. तेथें मिसेस व्हॅानबॅाकची एक बहीण भेटली. दुपार अनेक प्रकारच्या गोष्टींत व अगदीं मोकळेपणानें हंसण्याबोलण्यांत मजेनें निघून गेली.

## तारीख २७ डिसेंबर

आज आमच्या लग्नाचा वाढदिवस असल्यामुळें, विश्वनाथ, कमला, मिसेस् गावडे व तिचा मुलगा यांना घेऊन आम्ही रात्रीच्या जेवणाला स्टयुअर्टच्या दुकानांत गेलों.

## तारीख २८ डिसेंबर

सकाळीं आम्ही Hampstead Heath (हॅंम्प्स्टेड हीथ) येथली लोकांची फिरावयाची जागा पाहण्यास गेलों. हिरव्यागार लहान टेकड्या, त्यांवर मधूनमधून असलेलीं मोठमोठीं झाडें, टेकड्यांच्या खालीं लहान-लहान तळीं व त्यांत आनंदानें बागडणारीं बदकें, राजहंस, वगैरे पक्षी, दूर दिसणाऱ्या आणखी लहान टेकड्या व त्यांवर दिसणारीं घरें, असा हा देखावा हिंवाळ्यांतसुद्धां आम्हांला रम्य वाटला; तर उन्हाळ्यांत जेव्हां झाडें पानांनीं भरलेलीं असतात व जेव्हां या देशांत एकंदर सृष्टीचें स्वरूप जास्त रम्य दिसत असतें, तेव्हां हा देखावा अधिक मनोहर दिसत असल्यास नवल नाहीं. आज सूर्य चांगला प्रकाशत असल्यामुळें, पुष्कळ मुलें व मोठीं माणसें येथें फिरावयास आलेलीं दिसलीं. थोडा वेळ फिरून मग आम्ही बनीचा मित्र डायज याच्या घराचा शोध काढीत चाललों असतां, तोच स्वतः रस्त्यावर भेटला व आम्हांला सर्वांना आपल्या खोलींत घेऊन गेला. कांहीं वेळ बोलणेंचालणें झाल्यावर, त्यानें कॉफी व त्याला नाताळाच्या सणानिमित्त मुंबईहून आलेली केकही आम्हांला दिली. नंतर आम्ही दोघें परतलों, व बनीला त्यानें दुपारच्या जेवणाला ठेवून घेतलें.

आमचें सर्वांचें रात्रीचें जेवण विश्वनाथकडे झालें.

## तारीख २९ डिसेंबर

दुपारीं आम्ही अल्लादीन हें नाटक पाहायला गेलों. या नाटकांत 'अल्लादीन आणि जादूचा दिवा' ही प्रसिद्ध गोष्ट गोंवलेली आहे. गोष्टींत जे अद्भुत प्रकार आहेत ते तसेच अद्भुत तऱ्हेनें नाटकांतही आणिले होते.

अशा तऱ्हेच्या अद्भुत गोष्टींस साजेसे कपडे व जवाहीरहि नाटकांत खूप दिसलें. याशिवाय, पुष्कळ लहानलहान मुलींचे तऱ्हेतऱ्हेचे नाच आणि गाणीं व छानदार देखावे यांनीं हें नाटक भरलेलें असल्यामुळें आम्हांला तें फारच आवडलें. 'रत्नांचा बाग' या व दुसऱ्या देखाव्यांतील बायकांचे नानातऱ्हांचे रंगीत कपडे, जरतार, वगैरेच्या कसबी कामानें झगझगत होते व जवाहीरहि झळकत होतें. 'आंगठीच्या सेवका'चे कपडे सोन्याचे घडविल्याप्रमाणें दिसत होते. रंगभूमीवर काळोखांतून एकदम एक उत्तम राजवाडा उत्पन्न झाला, तर दुसऱ्या एका वेळीं पेटलेल्या दिव्यांनीं सुशोभित केलेला राजवाडा क्षणांत आमच्या नजरेसमोर नाहींसा झाला; अल्लादीननें आंगठी चोळल्याबरोबर 'आंगठीचा सेवक' एकदम समोर उत्पन्न झाला; समोर आम्हांला एक लहानसें, अगदीं चपटें असें कपाट दिसत होतें, व त्यांतील खण अगदीं मोकळे असल्याचे आम्हीं पाहिलें होतें; त्यामुळें जेव्हां या कपाटांतून एक मोठें खाण्याच्या पदार्थांनीं भरलेलें जेवणाचें टेबल एकदम बाहेर आलें, व त्याच्या पाठोपाठ कितीसे नोकर रंगीबेरंगी मिठा-ईनें भरलेल्या टोपल्या घेऊन त्यांतून आले तेव्हां आम्हांला फार आश्चर्य वाटलें.

लहान मुलींना शाळेंत ज्याप्रमाणें निरनिराळ्या कवाइती शिकवितात, त्या धर्तीवरचे पुष्कळ नाच अगदीं लहानलहान मुलींनीं उत्तम तऱ्हेनें करून दाखविले. त्यांतही, एक फुलाचा नाच फार बहारीचा झाला. पिवळ्या रंगाचे कपडे केलेली एक मुलगी उभी होती, तिच्याभोंवतीं पांढरे कपडे केलेल्या पुष्कळ मुली गात व नाचत असतां वर्तुळाकार जमल्या व त्या हळूहळू खालीं बसल्या. त्यांच्या कपड्यांना पाठीमागें फुलांच्या पाकळ्याप्रमाणें कांहीं भाग लावलेले असल्यामुळें, त्या सर्व मुलींची मिळून एका अर्धवट उमललेल्या फुलाप्रमाणें आकृति दिसूं लागली; मध्यें पिवळे केसर व बाजूला पांढऱ्या पाकळ्या. कांहीं वेळानें त्या बाजूच्या मुली जमिनीवर निजल्या, त्याबरोबर त्या फुलाच्या पाकळ्या अगदीं पुरत्या उमलल्याप्रमाणें दिसल्या व हें "फूल" फार छान दिसलें.

अगदीं शेवटचा देखावा फारच सुरेख होता. या देखाव्याचें नांव "मुलींचा पडदा" असें होतें. लहान मुली रंगभूमीवर नाचत असतां, एकदम वरून सोनेरी दोर खालीं रंगभूमीवर आले, व त्यांना त्या मुलींनीं घट्ट धरल्यावर त्या मुलींसकट ते दोर जरासे वर गेले आणि मुली त्यांना लटकत राहिल्या; व हा "मुलींचा पडदा"च टांगल्यासारखा दिसूं लागला. याशिवाय या नाटकांत ( अशा तऱ्हेचीं नाटकें मुद्दाम लहान मुलांसाठीं नाताळाच्या सणाच्या वेळीं करण्याची येथें पद्धत आहे. ) लहान मुलांना रमविण्याकरितां दोन कुत्र्यांचीं सोंगें आणिलीं होतीं व मध्यें लपालपीचा एक मजेदार देखावाही दाखविला होता.

## तारीख ३१ डिसेंबर

आमच्या ओळखीच्या हुगवर्फच्या मुलांकरितां मीं कांहीं खेळ घेतला होता. तो नेण्याकरितां स्टीनी हुगवर्फ लंडनमध्यें आली होती, तिला आम्हीं एका चांगल्याशा दुकानांत चहाला नेलें. बोलतचालत चहा पिणें झाल्यावर मीं खेळ तिच्या स्वाधीन केला व आम्ही आपापल्या ठिकाणीं परत येण्यास निघालों.

जुनें वर्ष संपून नवें वर्ष लागेपर्यंत जागावें म्हणून रात्रीं बारा वाजेपर्यंत आम्ही खोलींत बसून राहिलों. बरोबर बारा वाजतां फटाकड्यांचे आवाज व आगगाड्यांच्या एंजिनांच्या शिट्या ऐकूं आल्या, व जवळच्या देवळांतील घंटेचा नादही कानांवर आला; आणि या सर्वांनीं नवीन वर्ष सुरू झाल्याबद्दल इशारत दिली.

## तारीख १ जानेवारी

दुपारीं स्टयुअर्टच्या दुकानांत जेवून आम्ही "Old Vic" नवांच्या नाटकगृहांत शेक्सपिअरचें Richard II हें नाटक पाहायला गेलों. नाटक फार चांगलें झालें; विशेषतः Gielgud या नटानें Richard II चें पात्र छान वठवलें. नाटकाच्या शेवटीं शेवटीं त्या राजाच्या मनाची स्थिति

पाहून डोळ्यांत पाणी येण्याची वेळ आली. शेक्सपिअर्च्या नाटकांना अनुरूप असे अगदीं साधे देखावे रंगभूमिवर दाखविले होते, व नट व नटी हल्लींच्याप्रमाणें रंगभूमीवर आंतल्या बाजूनें न येतां, प्रेक्षकांच्या समोरून वर जात होत्या.

## तारीख २ जानेवारी

"सेक्रेटरी ऑफ् स्टेट"च्या पार्टीला गेलों असतांना ज्या बाईनीं आम्हांला चहाला बोलाविलें होतें त्या मिसेस् लक्स्मूरकडे आम्ही तिघेंही चहाला गेलों. त्या व त्यांचे यजमान हिंदुस्थानांत पुष्कळ वर्षे राहिलेले असल्यामुळें व त्या गृहस्थांना आमच्या देशांतील लोकांची माहिती व सहानुभूति असल्यामुळें, आमचें बोलणेंचालणें मनोरंजक झालें व ती संध्याकाळ चांगली गेली. आम्हांला माहित असलेलीं पुष्कळ माणसें त्या बाईंच्याही ओळखीचीं निघालीं. त्यांच्या त्या लहानशा, सुशोभित दिवाणखान्यांत हिंदुस्थानांतून नेलेल्या व त्या देशाच्या पुष्कळ वस्तु होत्या.

## तारीख ३ जानेवारी

आम्हीं "हॅम्‌टन कोर्ट पॅलेस" नांवाचा फार जुना राजवाडा व त्याच्या भोंवतालची प्रशस्त जागा पाहण्यास मोठ्या मोटरबसमधून गेलों. ही मोटरबस लांबच्या मुक्कामाला जाणाऱ्या ज्या विशिष्ट मोटर्बसिस् आहेत त्यांपैकीं एक असल्यामुळें तिच्यांतील बैठकी, वगैरे जास्त सोईच्या होत्या; त्यामुळें, आमचा पल्ला जरी बराच लांब होता तरी आम्हांला कटाळा आला नाहीं. "हॅम्‌टन कोर्ट"ल पोंचण्याचे जरा आधीं "बुशीपार्क" नांवाच्या एका मोठ्या बगिच्यामधून आमची मोटर गेली. यांत मोठमोठे वृक्ष, मधून मधून तळीं, इकडून तिकडे निर्भीडपणें फिरणारीं हरणें, व रम्य वातावरणाचा आस्वाद घेण्याकरितां येथून तेथें फिरणारीं माणसें व मुलें असा देखावा आमच्या नजरेला पडला.

"हॅमटन कोर्ट"च्या बाजूला असणारा अवाढव्य बगिचा या हिंवाळ्याच्या

दिवसांतही रम्य दिसला; मग तो येथल्या उन्हाळ्यामध्यें फुलांपानांनीं अतिशयच सुरेख दिसत असेल यांत संशय नाहीं. जरी मोठमोठ्या झाडांचीं सर्व पानें झडून गेलीं होतीं, तरी जेथें तेथें हिरव्यागार हिरवळींचे मोठमोठे चौक, हिरवींगार, त्रिकोनांसारखीं नीट कापलेलीं "फर" नांवाचीं झाडें, पक्षांच्या आकारांसारखीं कापलेलीं लहान झुडपें, मोठमोठीं तळीं, त्यांत कारंजीं व इकडेतिकडे बागडणारे राजहंस पक्षी हा देखावा कांहीं कमी आल्हाददायक नव्हता. बगिच्याला लागूनच "टेम्स" नदी वाहत असल्यामुळें नदीवर असलेल्या कांहीं गृहनौका ( House-boats ) ही आम्हीं पाहिल्या. या बगिच्यांत एक विशिष्ट गोष्ट पाहिली ती ही कीं, कांचीचीं तावदानें लावलेल्या एका अतिशय मोठ्या दालनामध्यें एक अडीचशें वर्षांपूर्वीचा द्राक्षाचा वेल अजूनही जिवंत आहे. त्याचें खोड व फांद्या यांना नीट वळण दिल्यामुळें, आडव्याउभ्या रेघांच्या चौकटीप्रमाणें त्या दिसत. आम्हीं ज्यावेळीं हा वेल पाहिला तेव्हां आम्हांला फक्त या लाकडाच्या चौकटी दिसल्या. त्यांचा रंगही हिरवा नव्हता व वेलावर एकसुद्धां पान नव्हतें. हा वेल उन्हाळ्यामध्यें अजूनही उत्तम प्रतीच्या द्राक्षांचे हजारों घड देतो हें जर आम्हांला कळलें नसतें, तर हा वेल मेलेला आहे असाच आमचा समज झाला असता.

येथें "धी मेझ" (The maye) नांवाची एक भुलभुलावणी आहे. तेथें आम्हीं गेलों. ही भुलभुलावणी मनुष्याच्या उंचीइतक्या झुडपांच्या एका वईची केलेली आहे. हिच्या मध्यभागीं असलेल्या थोड्या मोकळ्या जागेंत एक बांक आहे तेथें जाऊन मग पुनः बाहेर पडण्याच्या दरवाजाकडे येणें हें वाटतें तितकें सोपें नाहीं याचा अनुभव आम्हांला आला. कितीदांतरी वाट चुकल्यामुळें आम्हांला परत फिरावें लागलें! पण शेवटीं एकदां आम्हीं त्या बांकाकडे जाऊन नीट परत आलों.

जवळच असलेल्या एका लहानशा दुकानांत आम्हीं दुपारचें जेवण जेवलों, व मग जाऊन "हॅमूटन कोर्ट" मधला राजवाडा पाहिला. खालच्या बाजूला एक मोठें जुनें स्वयंपाकघर आहे. तेथें एक भयंकर मोठी चूल आहे.

ती त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें बैलासारखें मोठें जनावर सबंध शिजविण्याकरितां बांधलेली आहे; शिवाय भाज्या, वगैरे शिजविण्याकरितां बांधलेल्या बऱ्याच शेगड्या आम्हीं त्या प्रशस्त स्वयंपाकघरांत पाहिल्या. खोल्या शेकण्याकरितां त्यावेळीं वापरांत असणाऱ्या कांहीं धातूंच्या उंच शेगड्याही तेथें अजून आहेत.

वरतीं त्यावेळच्या राजाच्या वापरांत असणाऱ्या मोठमोठ्या खोल्या आहेत. त्यांत जुनीं लढाईचीं आयुधें आहेत; जुन्या काळच्या मोठमोठ्या चित्रकारांनीं काढलेलीं चित्रे व त्यावेळच्या माणसांच्या तसविरी भिंतीवर लाविलेल्या आहेत. कांहीं खोल्यांच्या छतांवर उत्तम चित्रें रंगविलेलीं आहेत. याशिवाय, मोठमोठे आरसे, पलंग व उत्तमप्रकारचें इतर लांकडीसामान येथें ठेविलेलें पाहिलें. पलंगाच्या चौकटींवरून उत्तमप्रतीच्या रेशमी कपडाचे पडदे सोडलेले आहेत. अर्थात हे पडदे आतां बरेच जुने झालेले आहेत; कारण हें सर्व सामान जुनें असून तें त्यावेळच्या राजाच्या वापरांत होतें. "पृथ्वीवर नवीन असें कांहींच नाहीं" या अर्थाची एक म्हण इंग्रजीमध्यें आहे, त्या म्हणीची आठवण येथें दोन लहानशा वस्तु पाहून मला झाली. त्या दोन वस्तु म्हणजे, एक लहान मुलांची खेळण्याची लहान तोफ; व दुसरी वस्तु म्हणजे पक्वान्नें करतांना वापरण्याचें चिरणें. हे चिरणें हुबेहुब करंज्या कापण्याच्या आपल्या चिरण्याप्रमाणें होतें. राजवाड्याच्या सर्व मोठमोठ्या खोल्यांतून बाहेरील बागेचा फार उत्तम देखावा दिसतो.

## तारीख ५ जानेवारी

शाळेंत जाणाऱ्या मुलांसाठीं मुद्दाम मांडलेलें प्रदर्शन पाहण्यास आम्ही दुपारीं गेलों. लहान मुलें व त्यांचे आईबाप यांची भयंकर गर्दी लोटली होती; इतकी, कीं चालणें मोठें मुष्किलीचें होत होतें. एका मोठ्या इमारतीच्या दोनतीन मजल्यांवर मिळून हें प्रदर्शन मांडलेलें होतें. येथे विशेषेकरून लहान मुलांना प्रत्येक धंद्याचें ज्ञान करून देणारे जिन्नस भरले होते; उदाहरणार्थ, आगगाडीचे बावटे कसे बदलतात, आगबोटीची दिशा चाक

फिरवून कशी बदलतात, अशा अनेक गोष्टी मुलांना दाखविण्यांत येत होत्या. त्यांत दोन गोष्टी मला फार मनोरंजक वाटल्या. एकीकडे कांहीं मुली पक्वान्नें कशीं करतात हें प्रत्यक्ष रीतीनें दाखवीत होत्या. मैदा, लोणी, वगैरे सामान तेथें ठेविलेलें होतें, व त्याच्या ताज्या "केक्स" तेथल्या तेथें तयार करून व भाजून, वगैरे लोकांना त्या दाखवीत होत्या.

पण सर्वांत विशेष पाहण्यासारखी तेथली गोष्ट म्हणजे लहान खेळाचा आगगाडीचा रस्ता होता. या रस्त्यानें एका मोठ्या दिवाणखान्याचा बराच मोठा भाग व्यापला होता. खऱ्या आगगाडीच्या रस्त्याप्रमाणें या रस्त्यावरही पूल, बोगदे, स्टेशनें, वगैरे सर्व कांहीं होतें व स्टेशनावर माणसें आणि रस्त्याच्या बाजूला झाडें, वगैरेही होतीं. त्या रस्त्यावरून कितीतरी लहान आगगाड्या एकाच वेळीं फिरत होत्या; त्यांत मालाच्या गाड्या, माणसांच्या गाड्या (या गाड्या अगदीं हुबेहुब खऱ्या गाड्यांप्रमाणें दिसत होत्या), वगैरे सर्व तऱ्हा होत्या; व मधून मधून दोन गाड्या एकमेकांना भेटत. हा मजेदार देखावा एकसारखा सुरू होता व तो पाहत आम्ही कितीतरी वेळ उभीं होतों. खरें म्हटलें तर, हा आगगाडीचा रस्ता पाहण्याची बनीची फार इच्छा असल्यामुळेंच आम्ही मुद्दाम हें प्रदर्शन पाहावयास गेलों होतों.

रात्रीचें जेवण आटोपल्यावर आम्हीं तिघें "Almost a Honey moon" हें नाटक पाहावयास गेलों. तो एक मजेदार असा "फार्स"च होता, व तो पाहतांना पहिल्यापासून शेवटपर्यंत हंसतां हंसतां पुरेवाट झाली. एक मनुष्य दारू पिऊन त्या नादांत एका बाईच्या घरीं जाऊन तेथें कसा निजतो व त्यामुळें कसकसे घोटाळे होतात त्याचें चित्र या नाटकांत दाखविलें होतें.

## तारीख ६ जानेवारी

सकाळीं आम्ही जनावरांच्या बगिच्यांत दुसऱ्यानें गेलों व पाहतों, तों बागेमधल्या मैदानांतील गवतावर व घरांच्या छपरांवर जिकडेतिकडे दंव गोठून त्याचें पांढरें बर्फ झालें होतें. आम्ही निरनिराळे जिवंत मासे

ठेविलेल्या दालनाकडे गेलों. या दालनांत बराच काळोख केलेला आहे. दालनाच्या भिंतीच्या पुढच्या बाजूला जाड कांच लावून, भिंत व कांच यांत मुद्दाम ठेविलेल्या पोकळीमध्यें निरनिराळे लहान लहान भाग केलेले आहेत व त्यांत समुद्राचें स्वच्छ पाणी भरून निरनिराळ्या प्रकारचे मासे सोडले आहेत; व ज्या ज्या माशाला जशी जशी परिस्थिति लागते तशी तशी ती तयार केली आहे. कांहीं भागांत वाळू, तर कांहीं भागांत दगड व शिंपा, कांहींत समुद्रांत उगवणारें गवत, तर कांहींत दुसरी कांहीं वस्तु अशा घालून त्यांत शेंकडों प्रकारचे मासे ठेविलेले आहेत; व ते आपआपल्या ठिकाणीं स्वच्छंदानें फिरतांना पाहणाऱ्याला दिसतात. तेथें अगदीं लहानां-पासून तों पुष्कळ मोठ्यापर्यंत असे आणि अनेक निरनिराळ्या रंगांचे मासे आम्हीं पाहिले. X-ray fish ( एक्स्रे फिश ) या नांवाचे, अगदीं लहान जातीचे मासे येथें होते. या माशांना हें नांव देण्याचें कारण हें कीं, ज्याप्रमाणें X-ray ( एक्सरे ) नांवाचीं किरणें मनुष्याच्या अंगावर पडलीं असतां त्याच्या शरीरांतील सर्व हाडें, वगैरे नीट दिसतात, त्याप्रमाणें या माशाचीं हाडें त्याच्या पारदर्शक कातडींतून आपल्याला नीट दिसतात. दुसऱ्या जातीचा, बोटभर लांबीचा एक चमत्कारिक मासा तेथें पाहिला. त्याचें तोंड कांहींसें घोड्याच्या तोंडासारखें असल्यामुळें, त्याला Sea horse ( समुद्रांतील घोडा ) असें नांव दिलेलें आहे. इंग्रजी गोष्टींमध्यें Dragon ( ड्रॅगन् ) नांवाचा एक कल्पित प्राणी आहे त्याचें जें चित्र काढतात, त्यासारखा हा मासा दिसतो. अळंब्यांच्या आकाराच्या पांढऱ्या व लाल रंगांच्या समुद्रांतील वनस्पतीही येथें दिसल्या.

## तारीख ७ जानेवारी

हुग्वर्फ मंडळीला भेटण्यासाठीं आम्ही West Dulwich ला गेलों. आगगाडींतून जातांना बाहेरच्या बाजूला झाडापेडांवर व गवतावर पांढऱ्या शुभ्र गोठलेल्या दंवाचा रम्य देखावा दिसला. Dulwich मध्यें घरांचीं छपरेंही पांढरींशुभ्र दिसत होतीं. मि. हुग्वर्फ हे आजारी असल्यामुळें स्वतः

त्यांच्याकडे बोलत बसले, व मी बायकामंडळीकडे बोलत बसलें. पुष्कळ बोलणेंचालणें झाल्यावर, त्यांच्याकडे चहा, वगैरे घेऊन आम्ही संध्याकाळीं परत आलों.

## तारीख ८ जानेवारी

आज सुलूला घेऊन आम्ही स्लेटरच्या एका दुकानांत रात्रीं जेवावयास गेलों, व मग आमच्या होटेलांत परत येऊन गोष्टी बोलत बसलों.

## तारीख ९ जानेवारी

शेक्सपिअरच्या Twelfth Night या नाटकाचा खेळ पाहावयास आम्ही गेलों. नाटकांतले देखावे, वगैरे साधेच होते; कारण शेक्सपिअरच्या काळीं नाटकाचा आकर्षकपणा त्याच्यामधल्या देखाव्यांवर अवलंबून नसून नाटकाच्या रचनेवर व त्यांत व्यक्त केलेल्या भावनांवर अवलंबून असे: पण या नाटकांत असलेला हास्यरस खेळांत छान वठला. प्रत्येक पात्रानें आपापला भाग छान केला, व Leslie French या नटानें नाटकांतल्या खुषमस्कऱ्याचा (Fool) भाग अप्रतिम केला. Gielgud यानें Malvolio चा भागहि उत्तम वठवला. हें नाटक आम्हांला फार आवडलें.

## तारीख १० जानेवारी

हुगवर्फर्नी दोन मोठीं मुलें फँक व स्टीनी यांना बरोबर घेऊन आम्ही Little Tommy Tucker हें संगीत नाटक पाहावयास गेलों. नाटक पहात असतां मधून मधून चॉकोलेट्स् खाण्याची येथें पद्धत आहे; म्हणून आम्हींही आमच्या पाहुण्यांसाठीं बरोबर चॉकोलेट्स् घेऊन गेलों होतों. येथें Musical Comedy नांवाचें जें संगीत नाटक असतें त्यांत नाच, नाचाबरोबर जमतील अशाच तऱ्हेचीं गाणीं, हास्यरस उत्पन्न करणारे प्रसंग यांवर जास्त भर दिलेला असून, नाट्यरचना, तसेंच उच्च दर्जाच्या नाटकांत दिसून येणारें नाटकाचें संविधानक व उच्च विचारभावना यांना फांटा दिलेला असतो; व अशाच तऱ्हेचीं नाटकं कामानें थकलेल्या माणसाला

घटकाभर करमणूक म्हणूनच रचलेलीं असतात. त्याप्रमाणें, या नाटकांतही नाच, गाणीं, हास्यरस, वगैरे भरपूर होतीं; व त्यामुळें आम्हांला सर्वांना हें नाटक फार आवडलें. तें संपल्यानंतर आम्हीं सर्व प्रसिद्ध Monicoच्या दुकानांत जाऊन चहा घेतला.

## तारीख ११ जानेवारी

आज सकाळपासूनच मला कसें चमत्कारिक वाटत होतें. आम्ही दुपारचें जेवण Chiltern Court Restaurant नांवाच्या एका प्रसिद्ध व डौलदार दुकानांत जेवलों, व मग विश्वनाथ व कमला यांना भेटावयास गेलों. सर्व दुपार व संध्याकाळ तेथें घालवल्यावर, रात्रीं मला ताप भरला व आम्ही भाड्याच्या मोटरमधून आमच्या होटेलांत परत आलों. त्या रात्रीं जी मी आजारी झालें, ती मी बरेच दिवस इन्फ्लुएंझानें आजारी होतें. एकदोन दिवसांनीं स्वतःनां थोडासा त्याच आजारानें त्रास झाला; आणि दोन दिवसांनीं बनी केंब्रिजला परत गेला, तेथें त्यालाही इन्फ्ल्युएन्झा झाला. अशा या प्रकारांनीं आमच्या व विशेषतः स्वतःच्या मनाची फार ओढाताण झाली, व त्यांना या परक्या देशांत माझ्याविषयीं काळजी वाटूं लागली: पण माझ्या या दुखण्यामुळें आमच्याच होटेलांत असणाऱ्या मि. सिंग या पंजाबी गृहस्थांची व स्वतःची जास्त ओळख होऊन, त्यांच्या चांगुलपणामुळें व मदतीनें लंडनमध्यें डॉक्टरचा धंदा करणाऱ्या एका पंजाबी डॉक्टरांच्या हातीं माझी "केस" देण्यांत आली, व त्यांच्या औषधानें मला लौकरच बरें वाटूं लागलें. बनीही केंब्रिजला बरा झाल्याचें कळलें व आमचीं मनें शांत झालीं. मी आजारी असतांना व दुखण्यांतून उठल्यावर, व्हॅान्‌बॅाक्स्, मि. दाणी, सुळू, विश्वनाथ, कमला वगैरेंच्या भेटी झाल्यानें मनाला जरा उल्हास वाटे. विशेषतः एक दिवस फारच मौजेंत गेला. कमला दुखण्यांतून उठून हिंदुस्थानांत परत जाणार असल्यामुळें त्या दिवशीं आम्हांला भेटायला आली होती, व मिसेस व्हॅानबॅाकही आली होती; त्या सर्वांना घेऊन आम्ही जवळच असलेल्या 'कोरा' होटेलमध्यें दुपारचें जेवण जेवावयास गेलों, व

मजेनें हंसत बोलत जेवलों. ती सर्व दुपार आम्हीं बोलण्याचालण्यांत घालविली. यानंतर कमला लौकरच हिंदुस्थानांत परत गेली; मग थोडे दिवस विश्वनाथ व आम्ही दुपारच्या जेवणास कोठेंतरी बरोबर जात असूं. याच सुमाराला एका दुपारीं "शर्न"च्या शाकाहारी दुकानीं स्वतः व मी जेवावयास गेलों. येथले सर्व पदार्थ इंग्रजी पद्धतीचे, पण भाज्या, फळें, किंवा सुका मेवा असल्या जिनसांचे केलेले असत. या ठिकाणीं अंड्यांचे पदार्थसुद्धां वर्ज्य होते.

## तारीख १ फेब्रुवारी

सकाळीं हां हां म्हणतां काळेकुट्ट धुकें शहरावर दाट पसरलें, व रस्त्यांवर रात्रीप्रमाणें अंधार पडला. दुपारीं आम्ही विश्वनाथला बरोबर घेऊन 'रीजेन्ट पॅलेस होटेल'मध्यें जेवावयास गेलों. जेवण झाल्यावर धुकेंही नाहींसें झालें, व मग आम्ही दोघें जगप्रसिद्ध व्हायोलिन वाजवणारा Kreisler (क्रायस्लर) याच्या जलशाला श्रोत्यांनीं खचून भरलेल्या आल्बर्ट हॉलच्या जंगी इमारतींत गेलों. आम्हांला जागा Kreisler च्या पाठीमागें थोड्याच अंतरावर मिळाल्यामुळें, त्याचें वादन छान ऐकूं आलें. हातभर लांबीचें एवढेंसें वाद्य! पण त्यावर विलक्षण जलद गतीनें चालणाऱ्या क्रायस्लरच्या बोटांनीं त्यांतून किती तऱ्हेचे मंजुळ सूर काढले! घटकेंत आनंदानें ओथंबलेले जलद सूर, तर घटकेंत गंभीर भावनायुक्त नाजूक व मंद सूर काढून त्यानें कांहीं तास श्रोत्यांचें मनोरंजन केलें, व श्रोत्यांनींही त्याच्या वादनाची पसंती टाळ्यांच्या कडकडाटानें व्यक्त केली; पण त्या टाळ्या ऐकून मग श्रोत्यांना मुजरा करतांनासुद्धां त्याचा गंभीर चेहरा फारसा पालटला नाहीं. कडक तपश्चर्या करणाऱ्या एखाद्या तपस्व्याप्रमाणें त्याची मुद्रा गंभीर दिसत होती.

त्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही सुळूला बरोबर घेऊन 'रीजेंट पॅलेस होटेल'मध्यें जेवावयास गेलों.

## तारीख २ फेब्रुवारी

"रीजेंट पॅलेस होटेल"मध्यें जेवावयास गेलों असतां, Mrs. Playfair या नांवाची हिंदुस्थानांतील आमच्या ओळखीची एक इंग्रजबाई

आम्हांला अचानक भेटली. तिला पाहून कांहीं वर्षे झालीं असल्यामुळें आम्ही तिला पहिल्यानें ओळखलें नाहीं, पण तिनें आम्हांला ओळखलें.

दोनप्रहरीं व्हॅानबॅाक्सना भेटावयास गेलों असतां त्यांनीं चहाला ठेवून घेतलें, व आम्ही नाहीं, नाहीं म्हणत असतां, अतिशय आग्रह करून आम्हांला रात्रीच्या जेवणालाही ठेवून घेतलें. कांहीं गोंधळ होऊन त्या रात्रीं आमची व विश्वनाथची चुकामूक झाली; व त्यामुळें आमच्या दोघांच्याही मनाला अस्वस्थता येऊन ती व्हॅानबॅाक्सकडची रात्र इतकी मजेंत गेली नाहीं; आणि रात्रीं उशिरां होटेलांत परत आल्यावर, आणखी बिचाऱ्या मि. हुगवर्फच्या मृत्यूची बातमी कळली.

## तारीख ३ फेब्रुवारी

हुगवर्फची उत्तरक्रिया दुसऱ्या दिवशीं होणार असल्यामुळें, त्याच्यासाठीं कांहीं फुलें पाठविण्याची आम्हीं व्यवस्था केली, आणि नंतर मि. सिंग व त्यांचे एक मित्र यांना बरोबर घेऊन आम्ही "कोरा" होटेलमध्यें जेवावयास गेलों. जेवण झाल्यावर दुपारच्या गाडीनें केंब्रिजला जाण्यास निघालों. बरोबर मि. सिंग हेही होते. केंब्रिजच्या स्टेशनावर बनी भेटला व तो आमच्याबरोबर आला. होटेलमध्यें राहण्यापेक्षां, भाड्याच्या खोल्या घेऊन खासगी तऱ्हेनें राहिलेलें जास्त बरें असा मि. सिंगचा आग्रह पडल्यामुळें, आम्ही एका भाड्याच्या मोटारींतून अशा तऱ्हेच्या भाड्याच्या जागा पहावयास निघालों, व बराच वेळ घालवूनही चांगली जागा न आढळल्यामुळें शेवटीं "बेल व्ह्यू" होटेलमध्यें जाऊन उतरलों; आणि मि. सिंगना रात्रीं आमच्याकडेच जेवावयास बोलाविलें.

## तारीख ४ फेब्रुवारी

हें होटेल आम्हांला फारच आवडलें. येथलें जेवणखाण तर चांगलें होतेंच; पण आजूबाजूचा देखावाही शांत असा होता. याच्याबरोबर पाठीमागें ग्रँटा नदी ( ही आपल्या देशांतील एखाद्या कालव्यापेक्षांही लहान

असेल ) वाहत होती, व तिला लागूनच होटेलची बाग असल्यामुळें बैठकीच्या खोलींतून बागेंतील हिरवळ, झाडें व पाठीमागें नदी असा रम्य देखावा नेहमीं दिसे व आमच्या निजावयाच्या खोलींतूनही हाच देखावा दिसत असे. बैठकीच्या खोल्या दोन होत्या, व त्यांत आरामशीर खुर्च्या, निरनिराळ्या रंगांच्या Hyacinth फुलांच्या कुंड्या व इतर फुलें, भिंतींत बांधलेल्या शेगडीवर कांहीं शोभेच्या चिनीमातीच्या वस्तु, एक लहान शेल्फ भरून पुस्तकें, व दोन पियानो अशा तऱ्हेचें सामान पाहुण्यांच्या वापरासाठीं ठेविलेलें होतें. येथें बसलें असतां, Hyacinths चा मधुर वास येई, नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर मधूनमधून माणसांची जा ये दिसे, क्वचित एखादी होडी नदींतून जातांना दिसे, तर कधीं पांढरे राजहंस पक्षी नदींतून संथपणें पोहतांना दिसत. शेल्फमधल्या पुस्तकांत पुष्कळ नांवाजलेलीं व मोठ्या लेखकांनीं लिहिलेलींही पुस्तकें होतीं. शेक्सपिअरच्या नाटकांपासून तों थेट युक्लिडच्या भूमितीपर्यंत पुस्तकें येथें होतीं. मी त्यांपैकीं Love & Cottale हें गोष्टीचें पुस्तक वाचलें.

आज थोडथोडें बर्फ पडतांना पाहिलें; व ज्या "रॉबिन" पक्षांविषयीं लहानपणापासून ऐकत होतों, ते बागेंतील हिरवळीवर मधून मधून दिसले. या पक्षांचा वरील रंग चिमण्यांसारखा कांहींसा असतो, पण त्यांच्या छातीवर लाल रंगाचा भाग असतो.

दुपारच्या जेवणाला बरोबर बनी होता आणि चहाला मि. सिंग होते. चहानंतर ते आम्हांला आपलें Kings College ( किंग्स कॉलेज ) दाखवावयास घेऊन गेले. आम्ही जराशीं त्या कॉलेजांतील प्रशस्त कॉम्पाउंडांतून फिरलों व नंतर होटेलांत परत आलों. रात्रीच्या जेवणाच्या वेळींही मि. सिंग आमच्याबरोबर होते व मग कांहीं वेळानें बनीही भेटावयास आला.

## तारीख ५ फेब्रुवारी

बनीनें आम्हांला येथलीं कांहीं कॉलेजें दाखविलीं. दुपारीं मि. सिंगनीं आम्हांला त्यांच्या कॉलेजमधल्या खोलींत चहाला नेलें. खोली चांगली

प्रशस्त असून, तेथले पलंग, कोच वगैरे सामानसुद्धां आरामशीर वाटलें. चहा वगैरे करण्यासाठीं म्हणून व विद्यार्थ्यांच्या वापरासाठीं जवळच गॅसच्या चुली होत्या. चहानंतर आम्ही पुष्कळ वेळ गोष्टी बोलत बसलों होतों.

## तारीख ६ फेब्रुवारी

सकाळीं Kings College ( किंग्स कॉलेज ) चें Chapel ( देऊळ ) पाहिलें. हें शेंकडों वर्षांचें जुनें असून दगडाचें बांधलेलें आहे, व त्याचें बाहेरील नक्षीकाम छान पाहण्यालायक आहे. नेहमींप्रमाणें या देवळांतही आंत रंगीत चित्रें तयार केलेल्या कांचीच्या खिडक्या पाहिल्या. बनी व त्याचे मित्र श्री. नारळीकर यांना घेऊन येथें नवीनच उघडलेल्या एका दुकानांत चहाला गेलों.

## तारीख ७ फेब्रुवारी

बाहेर जिकडेतिकडे बर्फ पडलेलें दिसत होतें. संध्याकाळीं आणखी कांहीं कॉलेजें आम्हीं पाहिलीं. रात्रीं श्री. सिंग व त्यांच्या ओळखीची बाई Mrs. Vaet यांच्याबरोबर थोडें "ब्रिज" खेळलों.

## तारीख ८ फेब्रुवारी

बनीच्या कॉलेजचे मुख्य प्रोफेसर मि. थॅचर यांच्याकडे आम्ही तिघेंही दुपारीं जेवावयास गेलों. तेथें त्यांच्या घरीं राहत असलेली एक पारशी मुलगी भेटली. थॅचरनीं पुष्कळ मजेदार गोष्टी वगैरे सांगितल्या. त्यांच्या आठनऊ वर्षांच्या मुलीला कांहीं रोग होऊन तिची वाढ खुंटली गेल्यामुळें, तिची अंगलट लहान मुलीसारखी, पण आवाज मोठा व डोकें फार मोठें, असा कांहीं विलक्षण प्रकार झाला आहे. आणि ती आईबापांची एकुलती एक मुलगी असल्यामुळें, मला तिच्याबद्दल जास्त वाईट वाटलें.

## तारीख ९ फेब्रुवारी

सुलूच्या ओळखीची पारशी मुलगी मिस कूका आम्हांला Newnham College हें मुलींचें कॉलेज दाखविण्यास घेऊन गेली. केंब्रिजमध्यें

असतांना सुलू याच कॉलेजांत जात होती. हें कॉलेज छान आहे. मुलींना राहण्यास नीटनेटक्या लहानशा स्वतंत्र खोल्या असून, शिवाय सर्वांना जेवण्यासाठीं दोनतीन प्रशस्त आणि भरपूर उजेडाच्या खोल्या आहेत. शिवाय लायब्ररी, टुमदार वाचनाची खोली, वगैरे सर्व कांहीं सोयी आहेत. बाहेर गुलाबांचा मोठा बगिचा व हिरवीगार मैदानें आहेत, आणि मुलींना खेळण्याकरितां १९ टेनिसकोर्टें आहेत. सुलू पूर्वी ज्या खोलींत राहत होती ती खोली मिस कूकानें आम्हांला दाखविली.

दुपारीं नारळीकरांच्या घरीं आम्हीं दोघें चहाला गेलों.

## तारीख ११ फेब्रुवारी

Wilson नांवाचा एक बनीचा मित्र आमच्याकडे दुपारीं चहा घ्यावयास आला; पण श्री. सिंगनीं आपणाचा मक्ता सर्व आपल्याकडे घेतल्यामुळें, आम्हांला दोघां जवळ जवळ गप्पच बसावें लागलें.

## तारीख १२ फेब्रुवारी

प्रो. थॅचर व त्यांची बायको हीं आमच्याकडे दुपारच्या जेवणाला आलीं. मिसेस थॅचरकडे माझें मनोरंजक संभाषण झालें दुपारीं आम्ही बनीबरोबर सर्वांत श्रीमंत असें Trinity College (ट्रिनिटी कॉलेज) पाहावयास गेलों. या कॉलेजच्या मालकीची जागा पुष्कळच असून, तींत हिरण्यागार हिरवळीचीं मैदानें, दुतर्फा झाडांच्या रांगा, वगैरे आहेत. याच्या जागेतून नदी वाहत असून, तिच्यामुळें कॉलेजच्या पटांगणाच्या शोभेंत भर पडली आहे. नदीवर पूलही पुष्कळ आहेत.

## तारीख १४ फेब्रुवारी

सकाळीं Trinity College व St. Johns College या कॉलेजांत जाऊन कांहीं चेहरे काढले.

रात्रीं Indian Mejliss नांवाची येथल्या हिंदी विद्यार्थ्यांची जी संस्था आहे, तिच्या वार्षिक मेजवानीला तिकिटें विकत घेऊन आम्ही गेलों. Colonel Younghusband नांवाचा एक हिंदुस्थानचा कैवारी या मेजवानीला मुख्य निमंत्रित पाहुणा या नात्यानें हजर होता. जेवणाला बरेच हिंदी विद्यार्थी आणि कांहीं तुरळक हिंदी व इंग्रजी गृहस्थ आणि स्त्रिया हजर होत्या. जेवणानंतर भाषणें झालीं, त्यांत कांहीं भाषणें मजेदार व चांगलीं झालीं. कांहीं विद्यार्थ्यांचीं भाषणें मात्र अगदीच वाह्यात झालीं. मिस कूका या विद्यार्थिनीनें एक लहानसें पण मजेदार भाषण केलें.

## तारीख १५ फेब्रुवारी

सकाळीं उठल्यावर हिरवळीवर, वगैरे पडलेल्या बर्फाचा छान देखावा दिसला. सकाळच्या खाण्यापिण्यानंतर बनीबरोबर जाऊन आणखी कांहीं कॉलेजें पाहिलीं.

कांहीं कॉलेजांचे Halls [जेवणाच्या खोल्या] ही आम्हीं पाहिले. विद्यार्थ्यांचीं जेवतांना बसावयाचीं बाकें व जेवण जेवण्याचीं टेबलें अगदींच साधीं होतीं. त्यांत चैन किंवा थाटमाट यांना जरासुद्धां जागा नव्हती. त्याच खोल्यांत एका बाजूला कॉलेजांतील प्रोफेसर्सची जेवण्याची जागा. त्यांचें सामानसुमान अर्थातच विद्यार्थ्यांच्या सामानसुमानापेक्षां वरच्या दर्जाचें होतें.

संध्याकाळच्या चहानंतर आम्हीं पायीं फिरावयास गेलों.

## तारीख १६ फेब्रुवारी

सकाळीं एका दुकानांत जाऊन तेथल्या माणसाकडून केस धुऊन घेतले.

दुपारीं उन छान पडलें असून आकाश निळें दिसत होतें. बनीला बरोबर घेऊन शहराबाहेर असलेलें मुलींचें Girton College नांवाचें कॉलेज पाहण्यासाठीं आम्हीं मोटरबसमधून गेलों. आसपासचा देखावा खेडेगांवांतल्या-सारखा असून फार रम्य होता. कॉलेजच्या आसपास लहान, टुमदार घरें

होतीं. हिरवीगार झाडें व हिरवळीनें भरलेल्या अशा जागेच्या मध्यभागीं तांबड्या विटांची कॉलेजची भव्य इमारत उभी आहे. पाहुणेमंडळींची बसावयाची खोली, कॉलेजचें पुस्तकालय, वाचनालय, भोजनगृह व देऊळ, वगैरे पाहून आम्ही परतलों. या कॉलेजमध्यें कोणी ओळखीची मुलगी नसल्यामुळें, आम्हांला Newnham College सारखें बारकाईनें हें कॉलेज पाहतां आलें नाहीं.

होटेलध्यें परत आल्यावर लागलीच कांहीं वेळानें वर्फ पडूं लागलें. तो सुंदर देखावा बंद दारांच्या दिवाणखान्यांतून मी पाहत होतें. आकाशांतून कोणीतरी पांढऱ्या शुभ्र कागदांच्या कपट्यांचा वर्षाव करावा, त्याप्रमाणें तो देखावा होता.

रात्रीं प्रसिद्ध गणितज्ञ नारळीकर व मेहता नांवाचा दुसरा एक विद्यार्थी हे आमच्याकडे जेवावयास आले.

## तारीख १७ फेब्रुवारी

दुपारीं आम्हीं आमचा तिघांचा Group Photo ( एकत्र चेहरा ) काढून घेतला.

मिस कूका यांनीं आम्हांला आपल्या खोलींत चहाला बोलाविलें, तेथें त्यांच्या ओळखीची एक इंग्रजी मुलगी आम्हांला भेटली; पण आमच्याबरोबर असलेल्या मि. सिंग या गृहस्थांनीं भाषणाचें सर्व काम आपल्याकडे घेतल्यानें, आम्हांला विशेष बोलाचालावयास झालें नाहीं; त्यामुळें ती संध्याकाळ जरा कंटाळवाणी झाली यांत शंका नाहीं.

रात्रीच्या जेवणानंतर आम्ही Cambridge Union या संस्थेचा वादविवाद ऐकावयास गेलों. इंग्लंड देशाची राज्यकर्ती सभा जी पार्लमेंट तिची ही संस्था म्हणजे एक लहानशी प्रतिकृति आहे. एक कांहींतरी मुद्दा घेऊन, त्यावर दोन परस्पर विरुद्ध मतांच्या विद्यार्थ्यांचीं भाषणें होतात, व शेवटीं कोणत्या बाजूला किती मतें पडलीं हें पाहून, सभेपुढील ठराव पास झाला, कीं नापास झाला याचा निर्णय दिला जातो. या सभेचे सभासद

व अधिकारी हे सर्व केंब्रिजच्या विश्वविद्यालयाचे विद्यार्थी असतात. आजच्या वादविवादाचा विषय Socialism ( सोशिआलिझम ) हा असून, सोशिआलिझमच्या समर्थनार्थ कांहीं भाषणें फार छान झालीं. दुसरीं कांहीं भाषणें अगदीं जेमतेम होतीं.

## तारीख १८ फेब्रुवारी

मेहता या विद्यार्थ्याच्या खोलींत त्यानें बोलाविल्यावरून आम्ही चहा घेण्यास गेलों. बोलणेंचालणें मनोरंजक झालें. तेथे नुकताच पास होऊन आय. सी. एस. मध्यें शिरलेला कापडिआ नांवाचा एक पारशी मुलगा आम्हांला भेटला. त्याची आई व मी लहानपणीं एकाच शाळेत जात होतों हा योगायोग जरा मौजेचा वाटला. चहानंतर घरीं येतांना Cambridge Union (केंब्रिज युनिअन ) या संस्थेच्या कांहीं मुख्य खोल्या आम्हीं पाहिल्या. विद्यार्थ्यांचें धूम्रपानगृह, वाचनालय व लेखनालय या खोल्या मोठ्या प्रशस्त वाटल्या.

## तारीख १९ फेब्रुवारी

सकाळच्या गाडीनें निघून लंडनला आलों. केंब्रिजच्या स्टेशनावर बनी आम्हांला पोंचवावयास आला होता. लंडनच्या स्टेशनावर आमची नुकतीच ओळख झालेली जर्मन मुलगी मिस फेत हॅ भेटली, तिला घेऊन आम्ही मोटरमधून "व्हिक्टोरिआ" स्टेशनावर आलों. या मुलीच्या मनांत माझ्याविषयीं इतका कांहीं स्नेहभाव उत्पन्न झाला, कीं तिनें माझ्या गालाचें चुंबन घेऊन, मला एक Violet च्या फुलांचा लहानसा गुच्छही दिला.

कांहीं तासानीं आम्ही डोव्हरला पोंचलों. वाटेंत कोठें कोठें बर्फ पडलेला दिसत होता, व डोव्हर शहराजवळ येतां येतां खडूच्या पांढऱ्याशुभ्र टेकड्याही दिसल्या. डोव्हरहून बोटींतून निघून फ्रान्सदेशांतील "कॅले" शहरांत येऊन पोंचल्यावर पहिल्यानें तेथल्या जकातखात्याच्या लोकांनी आमचें सामान तपासलें. पोर्टर लोकांच्या मदतीमुळें येथें आम्हांला फारसा त्रास झाला

नाहीं. येथें आम्हीं दुपारीं "पॅरिस"ला जाणाऱ्या गाडींत बसलों, व ती गाडी मध्यें दुसऱ्या कोणत्याही स्टेशनावर न थांबतां संध्याकाळीं एकदम "पॅरिस"मधल्या एका स्टेशनावर थांबली. वाटेत जेथं तेथें बर्फ पडलेला असा देखावा दिसत होता. आम्ही ज्या होटेलांत उतरणार होतों, तें "पॅरिस"च्या एका बाजूला एकांतांत असें असल्यामुळें मोटारवाल्याला तें मिळेना व त्यामुळें त्यानें आम्हांला कितीतरी व हलक्या वस्तीच्या भागांतून फिरविलें. "पॅरिस' सारख्या नवख्या गांवांत या रात्रीच्या वेळीं असें फिरत असतां आम्हांला जराशी भीतीच वाटली. शेवटीं वाटेवरच्या एकदोघांना विचारून आम्ही एकदाचे होटेल Livingstone मध्यें येऊन पोंचलों. येथला व्यवस्थापक जर्मन असून, त्याला फ्रेंच व इंग्रजी भाषाही उत्तम येत असल्यामुळें आम्हांला फारसा त्रास पडला नाहीं. होटेलमधल्या इतर नोकरांकडे आम्ही मोडकेंतोडकें फ्रेंच बोलून काम भागवावयास सुरवात केली. मी पुष्कळ वर्षांमागें कां होईना पण या भाषेचा शाळेंत व कॉलेजांत अभ्यास केल्यामुळें मी फ्रेंचमध्यें चार शब्द बोलूं शकलें यांत कांहींच नवल नाहीं पण स्वतः महायुद्धाच्या वेळीं येथें कांहीं महिने राहिले असतां, जें फ्रेंच भाषेचें ज्ञान त्यांनीं संपादन केलें होतें, त्याच्या जोरावर ते इतकें बोलूं शकले याचें मला नवल वाटलें.

## तारीख २० फेब्रुवारी

सकाळीं कॉफीबरोबर फ्रेंचब्रेड ( पाव ) खाऊन आम्ही Lonvre राजवाड्यांतील प्रसिद्ध चित्रांचा संग्रह पाहावयास गेलों. या राजवाड्याचा विस्तार फारच मोटा असून, याच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळे संग्रह केलेले आहेत. राजवाडा बाहेरून दिसावयास फार भव्य असून अनेक नांवाजलेल्या फ्रेंच माणसांचे पुतळे येथें करून ठेविलेले आहेत. चित्रें ठेविलेल्या कांहीं दालनांच्या छतांवर उत्तम चितारकाम केलेलें आहे. या संग्रहांत सर्व युरोप खंडांतील उत्तमोत्तम जुन्या चित्रकारांचीं हजारों चित्रें आहेत. नेपोलिअन बादशहाची सुंदर बादशाहीण Josephine हिनें

तांबडी काश्मिरी शाल अंगावर घेऊन काढलेली भव्य तसबीर, Greuze या फ्रेंच चित्रकाराची The broken Pitcher, The milk-maid, वगैरे चित्रें, Millet या फ्रेंच माणसाचें The Gleaners हें चित्र, आणि Whistler या इंग्रज चित्रकारानें काढलेली आपल्या वृद्ध आईची तसबीर हीं व दुसरीं अनेक नांवाजलेलीं चित्रें आम्हांला येथें दिसलीं. त्यांतल्या त्यांत या बहुतेक सर्व चित्रांविषयीं मला आधींची माहिती असल्यामुळें व त्यांच्या लहान नकला माझ्या नजरेंत आल्या असल्यामुळें मला जास्त आनंद वाटला. आम्हीं तीं चित्रें पाहत असतां कांहीं चित्रकार त्या भिंतीवर टांगलेल्या प्रसिद्ध चित्रांच्या नकला करण्यांत गुंग झाले होते. कांहींचीं चित्रें पुरीं झालीं होतीं त्या मंडळींचें चित्रकलेमधील नैपुण्य पाहून मला त्यांचा हेवा वाटल्यावांचून राहिला नाहीं. एक Swiss बाई चित्र काढीत असतां आमच्याकडे पाहून हंसली व मग बोलूं लागली. मी तिच्या कलेची स्तुति करून मला वाटणारा तिच्यासंबंधींचा हेवा व्यक्त केला. तेव्हां ती म्हणाली,

" मी चित्रें काढावयास फार उशीरां सुरुवात केली, त्याप्रमाणें तुलाही या वयांत करतां येईल."

पुष्कळ वर्षांपूर्वीं या बाईची एक बहिण हिंदुस्थानांत असल्यामुळें तिला साहजिकच आमच्याविषयीं सहानुभूति वाटूं लागून ती आमच्याकडे बोलली.

दुपारचें जेवण एका दुकानांत जेवून मग रस्त्याच्या बाजूच्या दुकानांतील खिडक्यांत ठेविलेल्या सुंदर वस्तु पाहत पाहत आम्ही वाट चालूं लागलों. शेवटीं आम्हीं Place de la Concorde नांवाच्या भव्य व मोठ्या थोरल्या चौकाकडे पोंचलों. या चौकापासून निरनिराळ्या बाजूंना जाणारे अनेक रस्ते फुटतात. चौकाच्या मध्यभागीं एक हजारों वर्षांपूर्वींचा जुना इजिप्सिअन खांब असून त्यावर त्या देशाच्या प्राचीन लिपींत कोरलेला लेख आहे. फ्रान्स देशांत जितके इलाखे आहेत, त्यांतील प्रत्येकाच्या नांवें एक असे सुंदर पुतळे या चौकांत ठेविलेले असून मध्यें दोन मोठे पाण्याचे कारंज आहेत; जवळच बाजूला सेन (Seine) नदी वाहत

आहे. येथें मीं कांहीं चेहरे काढल्यावर, आम्हीं Champs Elysecs नांवाच्या दुतर्फा झाडांच्या रांगा असलेल्या अतिशय सुंदर व भव्य अशा रस्त्यानें चालत चालत या रस्त्यावर असलेल्या Arc de Triomphe नांवाच्या प्रसिद्ध कमानीकडे येऊन पोंचलों. ही भली लांब, रुंद, जाड व उंच कमान जुन्या लढायांचें स्मारक म्हणून उभारलेली आहे व हिच्या-वर लढायांचीं चित्रें, वगैरे कोरलेलीं आहेत. ही कमान आंतून पोकळ असून आंतल्या बाजूला खोल्या आहेत, व विजेच्या पाळण्यांत बसून कमानीच्या छपरांवर जातां येतें. या छपरांवरून पॅरिस शहराचा देखावा मोठा मजेदार दिसतो. या कमानीच्या मध्यबिंदूपासून निघून निरनिराळ्या बाजूंना जाणारे रस्ते या उंचीवरून नीट लक्षांत येतात. येथून मी शहराचा चेहरा घेतला व छपरावर असलेल्या लहानशा दुकानांतून कांहीं चित्रांचीं कार्डें विकत घेतलीं. विजेच्या पाळण्यांतून खालीं उतरतांना कमानींतील मधल्या मजल्यावर उतरून कमानीच्या आंतील एका खोलींत ठेविलेलीं महायुद्धांतील स्मारकें आम्हीं पाहिलीं.

या कमानीच्या खालीं महायुद्धांतील एका अज्ञात वीराचें थडगें आहे. या थडग्याजवळ एक ज्योत चोवीस तास व बारा मास जळत असते. महायुद्धां-तील एका अज्ञात वीराचें शव आणून या ठिकाणीं त्याचें थडगें बांधण्याच्या-वेळीं जगांतील निरनिराळ्या ठिकाणांहून ज्या फुलांच्या माळा या सत्कारार्थ पाठविल्या होत्या, त्या सर्व या कमानीच्या आंतल्या एका खोलीच्या भिंतीवर लावून ठेविलेल्या आम्हीं पाहिल्या.

पॅरिसमधले हे मोठे रस्ते अतिशय भव्य, प्रशस्त, सुंदर व स्वच्छ दिस-तात. शिवाय, खुद्द शहरांतसुद्धां मधूनमधून राखून ठेविलेलीं मोठमोठीं हिरवळीचीं मैदानें या शहराला शोभा आणितात.

## तारीख २१ फेब्रुवारी

जशी लंडनमध्यें भुयारी आगगाडी आहे, तशी पॅरिसमध्येंही आहे. पण कांहीं कारणानें या येथल्या भुयारी गाडीनें प्रवास करतांना लंडन-

मधल्या गाडीइतकें मनाला प्रशस्त वाटत नाहीं. या गाडींत आजच एकदां आम्हीं बसलों. व येथलें प्रसिद्ध Notre dame de Paris चें देऊळ पाहावयाला गेलों. हें भव्य देऊळ दगडांचें बांधलेलें असून यावर बाहेरील बाजूला उत्कृष्ट खोदींवकाम आहे. आंत येशू ख्रिस्ताच्या आईची मूर्ति आहे. व नेहमींप्रमाणें रंगीत चित्रें आंत घडवलेल्या कांचीच्या तावदानांच्या खिडक्या ( Stained glass windows ) आहेत. आम्ही हें देऊळ आंतून पाहत असतां देवळाच्या इमारतींत बाजूला एका लहानशा खोलीएवढ्या भागांत एक फ्रेंच लग्न लागत असलेलें पाहिलें. लग्नाला एक मूठभर मंडळी हजर होती, व लग्नविधि अगदीं शांतपणें व गडबडीशिवाय चालला होता. हा देखावा पाहून याच्या अगदीं विरुद्ध दिशेला असलेल्या आमच्या हिंदु लग्नसमारंभाची आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं.

नंतर आम्ही तिकिटें विकत घेऊन देवळाच्या मालकीचे जवाहीर पाहावयास गलों.

येथे सुंदर नक्षीकाम केलेलीं व त्यापैकीं कांहीं रत्नजडित अशीं मोटमोठीं सोन्याचीं भांडीं, जुन्या काळच्या बड्या फ्रेंच लोकांचे सोनेरी कलावस्तूंच्या कामांनीं सजविलेले व रत्नजडित झुबे व जुन्या काळच्या मोठ्या लोकांच्या आठवणीच्या कांहीं वस्तु ठेविलेल्या आहेत. सोन्याचीं भांडीं पुष्कळ होतीं, पण सर्वांत अतिशय प्रेक्षणीय असा शेंकडों लकलकणाऱ्या हिऱ्यांनीं मढविलेला एक क्रूस होता. त्यांत कांहीं माणकें व एक मोठा पाचूचा खडा पण होता, व त्या क्रुसाची लांबी जवळ जवळ दोन फूट होती.

नंतर आम्ही Palais de Justice ( येथली न्यायखात्याचीं कोर्टें )-च्या आवारांत गलों. या कोर्टांची दगडी इमारत फार भव्य दिसली, पण ती आम्हीं आंतून पाहिली नाहीं. वकील लोक, वगैरेंच्या सोईसाठीं या इमारतीला लागूनच ठेविलेल्या फराळाच्या दुकानांत जाऊन आम्ही जेवलों. येथें जेववयास आलेल्या मंडळींत वकिलीच्या धंद्याची खूण जो झगा तो घातलेल्या बऱ्याच स्त्रिया ( वकिलिणी) दृष्टीस पडल्या.

जेवण झाल्यावर आम्ही Sainte Chapelle नांवाचें एक लहानच पण अतिशय सुंदर असें जुनें देऊळ पाहावयास गेलों. हें जुन्या काळच्या फ्रान्सच्या राजाचें देऊळ आहे आणि धर्मयुद्ध करावयास गेलेल्या जुन्या Crusader लोकांनीं परत येतांना आपल्याबरोबर येशू ख्रिस्ताचे स्मारक म्हणून आणिलेल्या कांहीं वस्तु येथें पुरलेल्या आहेत म्हणून सांगतात. देवळाच्या खालच्या भागाच्या भिंतींना छान निळा रंग दिलेला असून त्यावर सोनेरी रंगाचीं तीन पानांचीं तिकटीं मधून मधून रंगविलेलीं आहेत. हीं तिकटीं म्हणजे फ्रान्सच्या राजघराण्याची खूण होती. पण देवळाचे वरचें दालन याहीपेक्षां अतिशय प्रेक्षणीय आहे. येथें खालीं जमिनीपासून वर छपरापर्यंत पोंचलेल्या रंगीत चित्रे आंत तयार केलेल्या कांचांच्या तावदानांच्या ज्या अत्यंत सुंदर खिडक्या ( Stained glass windows ) आहेत, त्यांची फार शोभा दिसते. एखाद्या रत्नजडित महालांत त्या रत्नांमधून बाहेरील सूर्यप्रकाश आंत आल्यावर जी शोभा दिसेल त्या तऱ्हेचें दृश्य येथें दिसलें.

घरीं परत येऊन आमच्या होटेलाजवळ असलेले Coeur Sacre नांवाचे नवीन बांधलेलें रोमन् कॅथॉलिक् देऊळ पाहावयास आम्ही गेलों. हें देऊळ मोठें असून एका लहानशा टेकडीवर बांधलेलें आहे. टेकडीच्या माथ्यापर्यंत एकावर एक असे मजले असून त्यांवर तळें, हिरवळीचे चौक, वगैरे असलेली बाग तयार केलेली आहे, तेथें लोक हवा खावयास येतात. टेकडीवर जाण्यास Funuicular नांवाची एका तऱ्हेची डोंगरी आगगाडी आहे, तिच्यांतून आम्ही वर गेलों व परत येतांना पायीं टेकडी उतरलों. या टेकडीवरून पॅरिस शहराचा छान देखावा दृष्टीस पडतो.

देवळाच्या आंत मोठमोठे दगडी पुतळे आहेत. आम्ही आंत गेलों तेव्हां Mars नांवाचें धर्मकृत्य सुरू होतें. भाविक लोकांनीं लाविलेल्या अनेक लहानमोठ्या मेणबत्त्या जळत होत्या, व पांढरा पोशाख केलेल्या Nuns ( मठवासिनी ) गंभीर सुरांत पदें म्हणत होत्या.

हें सर्व पाहून झाल्यावर आम्ही एका दुकानांत जाऊन कॉफी पिऊन घरीं परत आलों.

८९१११ दि: ११.२ ५७८ ३ बोई दि २८

## तारीख २२ फेब्रुवारी

दिवस छान असून ऊन पडलें होतें. पॅरिसहून थोड्या अंतरावर असलेल्या एका गांवीं एक शहा नांवाचें हिंदु कुटुंब राहत होतें. त्यांना भेटावयास जाण्यासाठीं आम्ही निघालों. आगगाडीनें जाण्यासाठीं स्टेशनवर गेलों. तों तेथें कोठल्या गाडींत बसावयाचें याची चौकशी करण्यास बराच त्रास पडला; पण शेवटीं एकदां आम्ही निघालों. तेथें जातांना वाटेंत रानाची शोभा दिसत होती. आम्ही शहांच्या घरीं पोंचलों व आम्हांला श्री. व सौ. शहा भेटलीं. ही मंडळी जवळ जवळ २५ वर्षें या देशांत राहिली असून अजून पूर्णपणें शाकाहारी आहेत हें ऐकून आम्हांला आश्चर्य वाटलें. सौ. शहाकडे बोलण्यास मला जरा अडचण पडूं लागली; कारण त्यांना मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषा येत नव्हत्या. त्या फक्त गुजराथी व फ्रेंच भाषा बोलत. ज्याप्रमाणें आपल्या येथें आपण आपली मायभाषा बोलत असतांना मधून अनेक इंग्रजी शब्द वापरतों, त्याप्रमाणें सौ. शहा गुजराथी बोलतांना मध्यें फ्रेंच शब्द वापरत. अशा तऱ्हेचें भाषामिश्रण आमच्या कानांना अपरिचित असल्यामुळें आम्हांला फार मौज वाटली. त्यांच्या घरीं काम करणाऱ्या फ्रेंच मुलीशीं त्या फ्रेंच भाषा बोलत. त्यांचा स्वयंपाकी हिंदुस्थानांतून नेलेला होता, त्यामुळें आम्हांला त्या दिवशीं अगदीं निर्भेळ देशी जेवण मिळालें. जेवण झाल्याबरोबर आम्हांला त्या मंडळीनें मोटरमधून लांब लांब फिरावयास नेलें. मधूनच उंचसखल जमीन व लहान टेकड्या, मधून मोठीं शेतें व लहान रानें, व मधून मधून लहान खेडेगांवें आणि कोठें कोठें जमीन नांगरत असल्याचें दृश्य असा मिश्र देखावा आम्हांला या मोटरच्या सहलींत दिसला. फिरून घरीं आल्यावर घाईघाईनें चहा घेऊन आगगाडीनें आम्ही परत बिऱ्हाडीं आलों.

## तारीख २३ फेब्रुवारी

आज मला समजलें कीं आम्हीं सध्यां राहत असलेलें होटेल पॅरिसचा कांहीं वर्षांमागें भयंकर असा समजलेला जो भाग त्यांत आहे. व आम्ही

पाहिलेलें Coeur Sacre चें देऊळ त्याच Montmartre नांवाच्या भागांतील एका टेकडीवर आहे. या भागांत पूर्वी ज्याप्रमाणें खून होत असत, त्याप्रमाणेंच हें ठिकाण गरीब चित्रकारांचें व गाणाऱ्यांचें, वगैरे राहण्याचेंही ठिकाण होतें.

येथला प्रसिद्ध Eiffel Tower पाहावयास आम्हीं गेलों. हा टॉवर सबंध धातूचा तयार केलेला असून, जवळ जवळ एक हजार फूट उंच असावा. याची बांधणी पोकळ आहे. धातूंचीं वालें एकमेकांना जुळवून हा तयार केलेला आहे. याच्या अगदीं वरच्या टोंकापर्यंत जाण्यास विजेचा पाळणा आहे, व प्रेक्षकांना उतरण्यासाठीं टॉवरवर तीन मजले आहेत. आम्हीं याचे दोन मजले तेथें उतरून पहिले, पण जेव्हां त्याचें टोक वर अतिशय उंचावर आकाशांत गेलेलें दिसलें, तेव्हां अगदीं वरच्या तिसऱ्या मजल्यावर जाण्यास आम्हांला धीर होईना. या दोन मजल्यांवर लहान लहान दुकानें आहेत, तेथें टॉवरला दिलेल्या भेटीच्या आठवणीदाखल सुंदर वस्तु विकत मिळतात. आम्हीं त्या थोड्या खरेदी केल्या. या टॉवरच्या चित्रांचीं पोस्ट-कार्डें कांहीं खरेदी करून येथेच असलेल्या पोस्टांतून आम्हीं तीं हिंदुस्थानांत मुलांना पाठवून दिलीं. या टॉवरवरून चौफेर शहराचा सुंदर देखावा दिसतो व एका बाजूला Seine नदीचें पात्र दिसते. मोठे सुंदर रस्ते, मोठमोठ्या मोकळ्या जागा व मोठे हिरवळीचे हिरवेगार चौक असा नयन-मनोहर देखावा येथून दिसला.

Eiffel Tower पाहून झाल्यावर जवळच असलेल्या एका लहानशा मजेदार दिसणाऱ्या दुकानांत जेवून आम्ही या टॉवरजवळच असलेली Trocadero नांवाची बाहेरून सुंदर व भव्य दिसणारी इमारत पाहावयास गेलों; पण तेथें गेल्यावर इमारत बंद असल्याचें कळलें. या इमारतीचा बगिचा सुरेख आहे. बगिच्याला मजले मजले असून त्यांवर मोठमोठ्या पुष्करणी तयार केलेल्या आहेत व जनावरांचे धातूचे पुतळे करून मधून मधून ते शोभेसाठीं ठेविले आहेत.

यानंतर आम्हीं Tuilleries चा अति मोठा बगिचा पाहावयास गेलों.

या बगिच्यांत फिरून तेथल्या मोठमोठ्या पण आतां पानांशिवाय असलेल्या वृक्षांच्या रांगा, हिरव्यागार हिरवळीचे चौक, मोठ्या, कृत्रिम व आंत कारंजीं असलेल्या पुष्करणी व अनेक सुंदर पुतळे आम्हीं पाहिले. फिरत फिरत आम्ही बगिच्याच्या दुसऱ्या टोंकाला असलेल्या Louvre राजवाड्याजवळ आलों. याच राजवाड्याच्या एका भागांत आम्हीं कांहीं दिवसांपूर्वी पाहिलेला प्रसिद्ध चित्रांचा संग्रह आहे. एकंदर राजवाडा एवढा मोठा आहे कीं शेंकडों कुटुंबें तेथें राहूं शकतील.

येथून आम्ही Madeleine Church हें प्रसिद्ध देऊळ पाहावयास गेलों. या देवळाची बाहेरील बाजू ग्रीक इमारतीसारखी दिसते. बाहेर सुंदर खांबांची रांग असून, वरच्या बाजूला येशू ख्रिस्त व "मादलेन" (Madeleine) यांच्या गोष्टींतील देखावा कोरलेला आहे. देवळाच्या आंत अनेक पुतळे आहेत, त्यांत कांचीसारख्या पारदर्शक दगडांचा केलेला येशूचा अर्धा पुतळा आहे. व्यासपिठावर चढण्यास संगमरवरी दगडाच्या पायऱ्या आहेत आणि मादलेन व देवदूत यांचे पुतळे आहेत. पाटीमागें भिंतीवर येशू व "मादलेन" यांचें रंगीत चित्र आहे. सर्व पाहून झाल्यावर एका फॅशनेबल दुकानांत आम्हीं चहा घेतला.

## तारीख २४ फेब्रुवारी

जुन्या फ्रेंच राजांच्या Versailles (व्हरसाय) येथील प्रसिद्ध राजवाडा पाहण्यास आम्ही गेलों. हा राजवाडा खूप मोठा असून, त्याच्या भोंवतालचा बाग अति मोठा आहे. आंतील मोठमोठ्या दालनांच्या भिंतींवर व छतांवर उत्तमोत्तम चित्रें काढलेलीं आहेत. चित्रें, दरवाज वगैरेंच्या बाजूंनीं उत्तम नक्षीदार सोनेरी चौकटी केलेल्या आहेत. एक मोठा आरसेमहाल येथें आहे. या दालनाच्या सर्व भिंती मोठमोठ्या आरशांनीं मढविल्या आहेत. जमिनी संगमरवरी दगडांच्या व लाकडी कामाच्या केलेल्या आहेत. शिवाय, छतांना लटकलेले झुंबर, भिंतींवर टांगलेले मूल्यवान, जुने, रंगीत चित्रें आंत विणलेले गालिचे, अशा अनेक सुंदर, चैनीच्या वस्तु येथें दृष्टीस पडल्या ही

झाली मोठ्या दालनांची गोष्ट! याशिवाय राणीच्या वापरावयाच्या लहान खोल्या येथें आहेत; त्यांत सुंदर, रेशमी कपड्यानें मढविलेलीं टेबलें, खुर्च्या, वगैरे सामान आहे. येथें चिनीमातीचीं तयार केलेलीं, तेली रंगाच्या चित्रांसारखीं चित्रें चौकटींत बसवून भिंतींवर टांगलेलीं आम्हीं पाहिलीं. या राजवाड्यांतून बाहेरील उत्कृष्ट बागेचा छान देखावा दिसतो. × × × × सालीं फ्रेंच लोकांनीं पुकारलेल्या बंडाच्या वेळीं याच राजवाड्यांत येऊन बंडखोरांनीं सोळावा लुई व त्याची राणी यांना पकडलें.

या राजवाड्याचा बगिचा अति उत्कृष्ट तऱ्हेनें तयार केलेला आहे. लहान लहान रानें, हिरव्या हिरवळीचे चौक, पुष्करणी सभोंवतीं धातूचे पुतळे असलेलें कारंजें, दुतर्फा झाडें असलेले सुंदर व लांब रस्ते, पुतळे या सर्वांनीं युक्त असा हा बाग आहे. हिंवाळा असल्यामुळें मोठ्या वृक्षांचीं पानें मात्र सर्व झडून पडलेलीं होतीं.

हा राजवाडा पाहून झाल्यावर, येथून जवळच असलेलें Le Grand Trianon हें राजगृह पाहावयास आम्ही गेलों. येथें उत्तमोत्तम रंगीत रेशमी कपड्यानें मढविलेलें लाकूडसामान आहे. व्हिक्टोरिआ राणीसाहेब फ्रान्स देशामध्यें पाहुण्या म्हणून आल्या असतां, त्या येथें ज्या खोलींत राहिल्या होत्या ती खोली, तसेंच नेपोलिअन बादशहानें वापरलेली खोली या आम्हीं पाहिल्या. या दोघांनीं वापरलेले पलंग मौल्यवान, रेशमी कपड्यानें मढविलेले आहेत. या इमारतीच्या पाठीमागेही छान मोठी बाग आहे.

Le Petit Trianon नांवाचें दुसरें एक लहान राजगृह आम्हीं येथें पाहिलें. येथेंही सुंदर लाकूडकामानें युक्त अशा खोल्या आम्हांला दिसल्या. फ्रान्सची महाराणी Marie antoinette (जिचा पुढें बंडात लोकांनीं शिरच्छेद केला ती) हिचें हें आवडतें राहावयाचे ठिकाण होतें. येथील बाग अशा तऱ्हेनें तयार केलेली आहे, कीं ती कृत्रिम न दिसतां एखाद्या सुंदर खेडेगांवाचा भाग आहे असा भास व्हावा. येथें रान, लहानसा पाण्याचा ओहोळ, त्यावरून जाणारा एक ओबडधोबड पूल, अशा तऱ्हेचा खेडेगांवी पद्धतीचा देखावा आम्हांला दिसला व त्यामुळें या बागेंत मनाला शांत वाटलें

येथून जवळच एक गाडीखाना आहे, तेथ फ्रान्स देशाच्या जुन्या राजाराण्यांनीं व नेपोलिअन बादशहानें वापरलेलीं वाहनें जपून ठेवलेलीं आहेत. लाल व सोनेरी रंगाच्या मोठमोठ्या घोड्यांच्या गाड्यांवर सुंदर चित्रें काढलेलीं आहेत. कांहीं Sedan chairs ( एक तऱ्हेच्या पालख्या ) व Sledges ( बर्फावरून ओढण्याच्या गाड्या ) ही येथें आहेत.

संध्याकाळीं आमच्या होटेलांत आम्हांला लंडन शहरांत भेटलेले श्री. खोसला नांवाचे गृहस्थ राहावयास आले. यांनीं पूर्वी प्रसिद्ध मानसशास्त्रवेत्ता Freud यांच्या हाताखालीं अभ्यास केलेला असल्यामुळें, आमचें या विषयासंबंधीं मनोरंजक संभाषण झालें.

## तारीख २५ फेब्रुवारी

आजचा सबंध दिवस आम्हीं Louvre राजवाड्यांतील प्रसिद्ध चित्रांचा संग्रह पाहण्यांत घालविला. पुष्कळ चित्रकार जुन्या चित्रांच्या नकला तयार करण्यांत गुतले होते. पूर्वी आमच्या देशांत असतांना माझ्या पाहण्यांत आलेलीं कांहीं चित्रें ज्या मूळ चित्रांवरून काढलेलीं, होतीं, तीं मूळ चित्रें येथें पाहिलीं. काहीं जुन्या डच चित्रकारांनीं काढलेलीं, त्यांच्या देशांतील शांत व सौम्य देखाव्यांचीं व घरगुती विषयांचीं लहान चित्रें मला फार आवडलीं.

आज दुपारचें जेवण आम्हीं एका स्वस्तशा दुकानांत जेवलों. तेथें कांहीं बारीक कच्चे मासे आम्हांला खावयास दिले, पण मला तसा संशय आल्यामुळें मी ते खाण्याचा प्रयत्न केला नाहीं म्हणून बरें झालें!

## तारीख २६ फेब्रुवारी

आम्हीं नेपोलिअन बादशहाचें थडगें पहावयास गेलों. या थडग्याभोंवतालची इमारत पांढरा दगड व संगमरवरी दगड यांची बांधलेली असून हिचें बांधकाम उत्कृष्ट आहे. इमारतीच्या घुमटांच्या आंतल्या बाजूला रंगीत चित्रें काढलेलीं आहेत. इमारतींत मुख्य ठिकाणीं जें व्यासपीठ आहे त्याचे

खांब काळया व सफेत अशा मिश्र रंगाच्या संगमरवरी दगडांचे असून त्यांचे-भोंवतीं सोनेरी कारागिरीचें मखर आहे व या व्यासपीठाच्या मध्यभागीं सुळावर चढविलेल्या येशू खिस्ताची मूर्ति आहे. या जागेच्या आसपास पिवळीं कांचीचीं तावदानें आहेत, त्यांतून सूर्यप्रकाश आल्यामुळें सबंध व्यासपीठ फिक्या सोनेरी रंगानें धुऊन काढल्याप्रमाणें दिसत होतें.

नेपोलिअन बादशहाचें थडगें तर फारच सुंदर बांधलेलें आहे. या इमारतीमध्यें एखाद्या उथळ विहिरीप्रमाणें जागा खोदून, त्या खोदलेल्या जागेच्या मध्यभागीं लाल मातीच्या रंगाच्या व झिलई दिल्यामुळें तकाकणाऱ्या संगमरवरी दगडाचें खुद्द थडगें आहे. याच्या बाजूला जमिनीवर हिरव्या संगमरवरी दगडाची Laurel झाडाच्या पानांप्रमाणें दिसणाऱ्या पानांची माळ काढलेली आहे, आणि तिच्या बाहेरल्या अंगाला सूर्याच्या किरणांचे द्योतक म्हणून पांढऱ्या व पिवळ्या संगमरवरी दगडांचे किरण दाखविले आहेत. या सर्वांच्या भोंवती पुतळे करून निशाणेंही लाविलेलीं आहेत या इमारतीच्या खालीं जे भुयार आहे त्याच्या दरवाजाच्या बाजूला दोन मोठे काळया पाषाणाचे पुतळे केलेले असून, त्यांच्या हातांत एका तक्क्यावर बादशहाचा मुकुट दाखविलेला आहे. या इमारतींत नेपोलिअन बादशहाच्या कांहीं नातलगांचींसुद्धां थडगीं आहेत.

Duval च्या दुकानीं आम्हीं दुपारचें जेवण जेवलों, व नंतर श्री. खोसला यांच्या खरेदीसाठीं त्यांच्याबरोबर Louvre नांवाच्या एका जंगी दुकानात आम्हीं गेलों. या दुकानांत विजेचे दिवे झाडांचे, वगैरे आकार करून त्यांवर लाविले होते. ही दिव्यांची व्यवस्था सुंदर दिसत होती.

## तारीख २७ फेब्रुवारी

सकाळीं लूव्हर ( Louvre ) राजवाड्यांतील चित्रसंग्रह पहाण्यास पुन: एकदां गेलों, व तीं पाहून झाल्यावर राजवाड्यांतील इतर दालनांतून फिरून तेथील पदार्थसंग्रहावरून नुसती ओझरती नजर फिरवली. या संग्रहांत चिनी मातीच्या जिनसा, हिरव्या रंगाच्या दगडाच्या ( jade )

वस्तु, गालिचे, फर्निचर, जुने सोन्याचे अलंकार व जुनें पौर्वात्य दगडीकाम वगैरे होतें; आणि कांहीं अर्वाचीन चित्रेंही होतीं. यांपैकीं मला सर्वांत आवडलेल्या जिनसा म्हणजे उत्तम चित्रें आणि प्रसिद्ध माणसांच्या तसबिरी व दालनांतील भिंतींवर आणि छपरांवर केलेलें सोनेरी काम. हे काम अप्रतिम होतें. येथें जुन्या फ्रेंच राजाचें जवाहीर ठेवलेलें आम्हीं पाहिलें. या जवाहिरांत एक रत्नजडित मुकुट होता. त्यावरील हिरे व इतर रत्नें बोरांएवढीं मोठीं होतीं. तसेंच, एका तरवारीच्या मुठीवरील हिरे लहान परंतु अतिशय चमकणारे होते.

दुव्हाल ( Duval ) च्या दुकानांत दुपारचे जेवण जेवून Galeries Lafayette नांवाच्या पॅरिस शहरांतील एका प्रसिद्ध दुकानीं आम्ही गेलों. दुकानांतील इमारतीचा सुशोभित अंतर्भाग, त्याचा रंगीत कांचीचा मोटा घुमट व आंतील दिव्यांची रचना पाहून एखाद्या राजवाड्याचा भास होतो. येथें थोडीशी खरेदी करून आम्ही एका दुकानांत जाऊन कॉफी घेतली.

## तारीख २८ फेब्रुवारी

Pantheon ही इमारत पाहावयास जात असतां वाटेत थांबून आम्हीं एक मोठा स्तंभ उभारलेला आहे तो पाहिला; हा फार उंच असून त्याच्या शिखरावर हातांत मशाल धरलेला असा एक पुतळा केलेला आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं Bastilleचा तुरुंग फोडला गेला त्याच्या स्मरणार्थ हा स्तंभ उभारलेला आहे.

Pantheon ( पान्थेऑं ) च्या इमारतींत प्रसिद्ध व्यक्तींचीं थडगीं आहेत. या इमारतींत घुमटांच्या आंतल्या बाजूंवर व खांबांवर कांहीं अतिशय सुंदर दगडी कोरीवकाम आहे. फ्रान्स देशाच्या इतिहासांतील प्रसंग दाखविणारीं मोठमोठीं रंगीत चित्रें येथल्या भिंतींवर काढलेलीं आहेत आणि देशांत होऊन गेलेल्या मोठ्या व्यक्तींच्या स्मरणार्थ काहीं पुतळेही उभारलेले आहेत. या इमारतीच्या कोंदुस वासाच्या भुयारांत प्रसिद्ध फ्रेंच लेखक रूसो, व्हाल्टेअर व व्हिक्टर ह्यूगो यांचीं थडगीं आम्हीं पाहिलीं.

मला सरदी झाली होती तरी बाहेरच्या थंडींत, वाऱ्यांत व पावसांत चालत जाऊन आम्ही एका दुकानांत दुपारचें जेवण जेवलों, आणि पुढें जाऊन Luxembourg राजवाड्यांत असलेला पदार्थसंग्रहालय पाहिला. येथें अर्वाचीन चित्रांचा संग्रह आहे.

कोणत्याही कारणानें म्हणा, पण मला येथलीं चित्रें फारशीं आवडलीं नाहींत. विशेषेंकरून Louvre (लूव्हो) मधल्या संग्रहांतील तीं जुनीं रेखीव चित्रें म्हणजे अर्धवट भरकटलेले रंगाचे डागसे वाटले. यांतील दोन चित्रें हिंदुस्थानासंबंधीं असल्यामुळे मला आवडलीं. एक चित्र मदुरेंतील फळविक्यांचें असून त्यांतील रंग उठून दिसत होते: आणि दुसरें चित्र लाल भोपळ्याच्या ( डांगराच्या ) वेलाचें होतें. त्यावरून मला एकदम आठवण झालीं कीं हा भोपळा मी येथल्या बाजारांत पाहिला होता. येथून परत जाण्यापूर्वीं आम्ही या राजवाड्यासभोंवतीं असलेल्या बगीच्यावरून एकदां नजर फिरवली. Tuileries च्या बगिच्याप्रमाणे बगिच्यांतही हिरवळी दुतर्फा झाडांच्या रांगा व पुष्कळसे पुतळे होते.

होटेलमध्यें परत गेल्याबरोबर मला दम्यानें पछाडल्यामुळें बिछान्यांत जाऊन निजावें लागलें.

## तारीख १ मार्च

पहांटेच्या सुमाराला मला इंजेक्शन देण्यासाठीं फ्रेंच पुलीसखात्यांतील एका डॉक्टरला बोलवावें लागलें. कारण माझा दमा फार वाढून त्यानें मला फार त्रास होत होता. आमच्या येथल्या होटेलांत एक ' डच ' मनुष्य व त्याची बायको हीं राहत होतीं, तीं दोघेंही फार मायाळू असून आम्हांला या प्रसंगीं अनेक तऱ्हांनीं फार उपयोगीं पडलीं. मागहून मला कळलें कीं त्या फ्रेंच डॉक्टरच्या पाठोपाठ एक पुलीस शिपाई डॉक्टर पाहावयास आलेली ' केस ' कायद्याच्या सदरांत येण्याजोगती होती कीं काय हें पाहण्याकरितां म्हणून मुद्दाम आमच्या होटेलांत येऊन थडकला होता. यामुळें पॅरिस शहरांतील जीवनावर थोडा ओझरता प्रकाश पडतो.

यानंतर तीनचार दिवस मी खोलींतल्या खोलींतच होतें. या अवधींत त्या " डच " जोडप्याशीं आमची चांगलीच गट्टी जमली व आमचें त्यांच्या-कडे बोलणेंचालणेंही झालें. त्यांना एक सुंदर, तरतरीत अशी लहान मुलगी होती, तिला आम्ही पुढें एक बाहुली घेऊन दिली.

पॅरिस शहरांतील मोठे चौक, रुंद रस्ते, झाडांच्या सुंदर रांगा, सुंदर जुने राजवाडे, त्यांच्या सभोंवतीं असणारे अफाट व रेखीव जुने बगिचे आणि त्या बगिच्यांत असलेलें कारंजें व तळीं, या सर्वांमुळें या शहराला अतिशय सुंदर स्वरूप प्राप्त झालें आहे. शिवाय येथें कांहीं उत्तम, मोठीं दुकानेंही आहेत.

## तारीख ८ मार्च

अगदीं सकाळच्या लौकरच्या आगगाडीनें पॅरिसहून निघून आम्हीं जर्मनींमधील Heidllberg ( हायडल्बर्ग ) या शहरीं गेलों. आग-गाडींतून बाहेर पाहिलें तों जमिनीवर जेथें तेथें बर्फ पडलेला दिसत होता. आमचा प्रवास नंतर झाडांझुडपांनीं आच्छादलेल्या व वरतीं लहान लहान खेडीं असलेल्या अशा टेकड्यांमधून झाला. येथें सुद्धां बर्फ पडलेला होता. सारब्रुक ( Sarbruck ) या जर्मन सरहद्दीवरच्या गांवीं त्यांचा जकातखात्याचा अधिकारी फार उद्धटपणानें वागला, पण रेल्वेचे अधिकारी फार सभ्य व आम्हांला मदत करणारे असे भेटले. एकदां आगगाडी बदलल्यावर आम्ही हायड्ल्बर्गला ( Heidelberg ) संध्याकाळीं फार उशीरां पोंचलों आणि पुष्कळ शतकांपूर्वीच्या जुन्या इमारतींत असलेल्या होटेल रिटरमध्ये उतरलों. या होटेलमधल्या त्या जुन्या जेवणाच्या दालनाच्या लाकडी भिंतीवर अनेक चिनीमातीच्या लाद्या लावल्या असून त्यावर निरनिराळ्या उठावदार आकृति आहेत, आणि येथें कांहीं जुनीं शस्त्रास्त्रेंसुद्धां आहेत. तेथें बसलें असतां त्या ठिकाणाच्या जुनेपणाची जाणीव होते. रात्रीचें जेवण संपल्यावर बिचाऱ्या दिवाकराची मैत्रीण Hilde व तिचा मुलगा Reggie हीं Constance या गांवाहून

आलों. या Hilde ची जरी मला पुष्कळ वर्षे ऐकून माहिती होती, तरी ती प्रत्यक्ष भेटण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें आम्ही रात्रीं उशिरां-पर्यंत बोलत बसलों.

## तारीख ९ मार्च

सकाळीं आम्ही बाहेर फिरावयास गेलों व रम्य हायडल्बर्ग शहर पाहिलें. या शहराच्या मधून नेकर ( Necker ) नदी जात असून, तिच्या दोन्ही कांठांवर हें शहर वसलेलें आहे. शहराच्या दोन्ही बाजूंना जोडणारे असे पुष्कळ पूल त्या नदीवर आहेत. नदीच्या दोन्ही बाजूंस झाडांनीं आच्छादलेल्या टेकड्या आहेत. या टेकड्यांवरसुद्धां घरें आहेत. या ऋतूमध्यें त्या झाडांचीं पानें सर्व झडलेलीं होतीं. बिचारा आमचा आवडता दिवाकर या गांवांत राहत होता तेव्हां त्याचा ज्या ज्या जागांशीं संबंध घडला होता त्या सर्व जागा आम्हीं पाहिल्या. तो ज्या प्रयोगशाळेंत काम करीत होता ती प्रयोगशाळा; जेथें तो थोडे दिवस राहिला होता व आतां फार दूर वाटत असलेल्या अशा त्या काळीं ज्या ठिकाणीं हिंदुस्थानांतून गेलेले विद्यार्थी जमत असत असें तें फ्राउ प्रोफेसर शेररचें ( Frau Professor Scherrer ) घर आणि त्याचें शेवटचें रहावयाचें ठिकाण नं ५ ब्रिकेनस्त्रासे ( Bruckenstrasse ) या सर्व जागा Hilde नें आम्हांला दाखवल्या. तिचें स्वतःचें लहानसें घरकुल व ज्या स्वयंपाकघरांत ती व दिवाकर कधीं कधीं मजेखातर स्वयंपाक करीत असत तें त्या घरकुलांतलें छोटेसें स्वयंपाक-घरसुद्धां तिनें आम्हांला दाखवलें. आम्ही बाहेर जातांना जुन्या तांबड्या रंगाच्या पुलावरून गेलों आणि परत येतांना एका नव्या पुलावरून आलों.

दुपारच्या जेवणानंतर आम्ही Funnicular Railway नें (या रेल्वेच्या एक डब्याच्या गाड्या विजेच्या दोरीच्या सहाय्यानें डोंगरावरच्या चढउतारावरून वरखालीं जातात ) टेकडीवरील Schoess पाहावयास गेलों. या जुन्या किल्ल्याच्या आवारांत जर्मन कवि Goethe ची बसावयाची आवडती जागा आम्हीं पाहिली, तेथून हायडल्बर्ग



हायड्ल्बर्ग [ पृ. १६०

शहराचा छान देखावा आम्हांला दिसला. डोंगराच्या बाजूवर राईमधील झाडांच्या मधल्या जमिनीवर दाट बर्फ पडला होता. या किल्ल्याच्या एका भागांत सर्व जगांतील अतिशय मोठें दारूचें पिंप आम्हीं पाहिलें. या पिंपांत ५०००० गॅलन्स, म्हणजे १२५०० कॅरोसीनचे डबे भरून दारू मावते. हें पिंप इतकें मोठें आहे कीं त्याच्यावर तयार केलेल्या जागेवर थोडी मंडळी नाचूं शकतील.

नंतर आम्हीं या Funnicular रेल्वेनें टेकडीवरचें सर्वांत वरचें स्टेशन Konigstuhl येथें जाऊन उतरलों. येथें अतिशय दाट असें pine नांवाच्या ( देवदारासारखा वृक्ष ) झाडांचें सुंदर रान होतें. येथून हायडल्बर्ग शहर व नेकर नदी यांचा धुक्यामुळें पुसट पुसट असा देखावा आम्हांला दिसला. बर्फ पडूं लागल्यामुळें आम्हांला त्या राईमध्यें फिरतां येईना, त्यामुळें आम्हीं लागलींच रेल्वेनें खालीं उतरून मधल्या एका स्टेशनावर उतरलों, आणि तेथें थोडें फिरल्यावर मग एकदम परत खालीं गेलों.

## तारीख १० मार्च

सकाळीं हवा फार थंड होती व आकाशांतून बर्फ पडत होतें; म्हणून आम्हीं कोठें बाहेर गेलों नाहीं; एका जर्मन-इंग्रजी कोशाच्या साहाय्यानें Hilde कडे गोष्टी बोललों. दुपारीं दाट बर्फांतून बँकेकडे चालत गेलों तेव्हां आकाशांतून आणखीही बर्फ पडतच होतें. नंतर एका दुकानांत जाऊन खाद्य-पेय घेतलें.

## तारीख ११ मार्च

गार वाऱ्यांत व बर्फांत चालत जाऊन रुग्णालयें असलेला भाग आम्हीं पाहिला. थंडी इतकी होती कीं पाय तुटून पडतात कीं काय असें वाटत होते व हात दुखूं लागले; तशा स्थितींत जाऊन Bruickenstrasse या रस्त्यांत असलेल्या बिचाऱ्या दिवाकराच्या घराचा फोटो घेतला, आणि नंतर Scherer ( शेरेर ) च्या घराच्या बाजूनें जाऊन जुन्या पुलावरून होटेलमध्ये परत गेलों.

एका दुकानांत कॉफी घेऊन Mr. Solomon च्या घरीं चहाला गेलों. हे गृहस्थ हायड्ल्बर्ग विद्यापिठाशीं संबंध असलेले एक बडे मोठे अधिकारी होते आणि दिवाकराचे खरे हितचिंतक होते. यांना इंग्रजी भाषा चांगली येत असल्यामुळें आमचें चांगलें बोलणेंचालणें झालें, व नंतर त्यांनीं आपल्या भेटीला येणाऱ्या मंडळींसाठीं ठेवलेल्या पुस्तकांत (Visitor's book) आमच्या सह्या घेतल्या. त्यांच्याकडे असलेलीं दिवाकराचीं एकदोन पत्रेंही त्यांनीं मला दिलीं.

दुसऱ्या दिवशीं अगदीं सकाळच्या गाडीनें Hilde व तिचा मुलगा Reggie हीं Constance ला परत जाणार असल्यामुळें आम्हीं त्यांचा रात्रींच निरोप घेतला. हायड्ल्बर्गमध्यें आम्हीं राहिलों तितके दिवस माझें मन दुःखी व उदास होतें; कारण आम्ही पाहिलेल्या सर्व ठिकाणां-मुळें बिचाऱ्या दिवाकरासंबंधीं दुःखदायक स्मृति पुनः जागृत झाल्या. अनेक वर्षें निघून गेल्यामुळें भरून आलेल्या जखमा पुनः उघडल्या गेल्या.

## तारीख १२ मार्च

सकाळीं Hilde व Reggie यांना आम्हीं शेवटचा निरोप दिला. कांहीं वेळानें आम्ही ट्रॅममध्यें बसून स्टेशनाकडे गेलों, इस्पितळें व नदी यांवरून शेवटची नजर फिरवली आणि दुपारच्या गाडीनें बर्लिन शहरीं जाण्यास निघालों. आगगाडीनें जात असतां बाहेर कांहीं भागांत बर्फ पडलेलें दिसलें. दुसऱ्या कांहीं भागांत आपल्या हिंदुस्थानांतील शहरांत उन्हाळ्यांत दिसून येणाऱ्या देखाव्यासारखा कांहींसा देखावा वाटला; कारण हा प्रदेश सपाट लालसर मातीचा व अनाकर्षक असा दिसला. 'पाइन,' 'फर,' वगैरे झाडांचीं कांहीं सुंदर वनें पण दृष्टीला पडलीं. रात्रींचें जेवण आगगाडींतच जेवून आम्ही बर्लिनला दहा वाजतां पोंचलों आणि Hotel Saxonia नांवाच्या एका लहानशा खासगी होटेलांत राहावयास गेलों.

# तारीख १३ मार्च

Kaiser Friedrich Museum नांवाचें पदार्थसंग्रहालय पाहण्याचे हेतूनें आम्ही एका बसमध्यें चढलों, आणि बसच्या कंडक्टरच्या बेपर्वाईमुळें ज्या ठिकाणीं खालीं उतरावयास पाहिजे होतें तेथें उतरलों नाहीं. आम्ही सारखीं पुढें पुढे जात होतों; आणि अतिशय पुढें गेल्यावर कांहीं दयाळू जर्मन उतारूंनीं आपण होऊन आमची चूक लक्षांत आणून दिली. एका कोणाला थोडी इंग्रजी भाषा येत होती, त्यामुळें आम्ही जेव्हां एकदांचे खालीं उतरलों तेव्हां पुनः परत कसें जावें याविषयीं आम्हांला थोडयाशा सूचना देण्यांत आल्या. थोडेंसें चालून गेल्यावर आम्हांला इच्छित ठिकाणीं जाण्याचा रस्ता इंग्रजी भाषेंत सांगणारा कोणी भेटतो कीं काय, हें पाहण्याची आम्हीं खटपट केली, पण यश आलें नाहीं. शेवटीं एका बँकेमधल्या लोकांनी आम्हांला बरोबर कसें जावयाचें तें सांगितलें आणि आम्ही ट्रॅमनें त्या संग्रहालयाकडे पोंचलों. 'जुनें,' 'नवें' आणि 'परगॅमन' (Pergamon) हीं सर्व संग्रहालयें आम्हीं पाहिलीं. अशा ठिकाणीं दिसून येणाऱ्या अनेक वस्तु आणि प्राचीन, प्रख्यात चित्रकारांचीं चित्रें येथें होतीं; पण आम्हीं फक्त विशेष पाहण्यासारख्या आणि आकर्षक अशा कांहीं वस्तु पाहिल्या. अत्यंत जुनी इजिप्त देशाची राणी निफ्रॅटीस हिचा हजारों वर्षांपूर्वीचा जुना अर्धपुतळा जो आहे, त्याची हुबेहुब प्रतिमा येथें व आणखी पुष्कळ संग्रहालयांत ठेविलेली आहे. Pergamon नांवाचें एक पांढऱ्या संगमरवरी दगडाचें हजारों वर्षांचें जुनें ग्रीस देशांतील देऊळ त्याचे थोडेथोडे भाग येथें आणून व ते जसेच्या तसे जुळवून येथें एका मोठ्या प्रशस्त इमारतींत उभारलें आहे. अतिशय प्राचीन काळीं तें ग्रीस देशांत जसें उभें होतें तसेंच आज तें येथें उभें आहे. आणखी कांहीं जुन्या देवळांचे अवशेषही आम्हीं पाहिले. आशिया खंडांतील अति प्राचीन बॅबिलॉन शहरांतील त्या जुन्या काळच्या एका इमारतींतील निळ्या रंगाच्या लाद्या येथें आणून व त्या पुनः जुळवून त्या जुन्या काळच्या एका राजवाड्याचा पुढील

दरवाजा व त्यांतील रस्ता त्या काळाबरहुकूम येथें उभारला आहे. या निळ्या लाद्यांच्या भिंतींवर निरनिराळ्या जनावरांचीं चित्रें आहेत.

रात्रींच्या जेवणासाठीं आम्ही Vaterland Haus नांवाच्या एका दुकानांत गेलों. हें एक नुसतें साधें खाण्यापिण्याचें दुकान नसून, एक येथलें पाहण्यालायक असें विशिष्ट स्थळ आहे. ही जागा पाहून मी चकित झालें. या इमारतींतील सर्व मजल्यांवरच्या निरनिराळ्या खोल्या युरोपखंडांतील अनेक देशांतल्या व इतर ठिकाणच्या खाद्यपेयांच्या दुकानांप्रमाणें सुसज्ज केलेल्या होत्या; त्यांपैकीं Rhineterrace नांवाच्या येथल्या सर्वांत उत्तम व मोठ्या दालनांत आम्ही जेवलों. Rhine (ऱ्हाइन) नदीवरच्या Goarshausen नांवाच्या एका खेड्याची अगदीं हुबेहुब अशी लहान प्रतिकृति या दालनाच्या एका टोंकाला तयार केली होती. हिरव्या झुडपांनीं आच्छादिलेल्या टेकड्यांमधून जाणारी ती Rhine नदी, टेकड्यांवरील जुन्या किल्ल्यांचे अवशेष, त्या नदीच्या कांठावरच्या Goarshausen खेडेगांवांतील घरें व देऊळ यांच्या लहान प्रतिमा, हें सर्व कांहीं या देखाव्यांत होतें. नदीवर लहान लहान बोटी, त्यांहून फार लहान होड्यांना ओढून नेऊन सारखी जा ये करीत होत्या. या सर्व देखाव्याच्या अगदीं पुढल्या भागाला द्राक्षांचे घड लटकलेले असे द्राक्षांचे वेल तयार केले होते. आमचें जेवण चालू असतां येथें करमणुकीकरितां म्हणून गाणीं, संभाषणें व नाच यांचा कार्यक्रम चालू होता. यांतील सर्वांत उत्तम चीज म्हणजे 'द्राक्षें तोडणारांचा नाच'ही होती. नाचणाऱ्या मुलींचे कपडे चटचटीत लाल व हिरव्या रंगाचे असून, त्यांच्या पाठींवर निरनिराळ्या रंगांच्या द्राक्षघडांनीं सजविलेल्या करंड्या होत्या. नाचाच्या शेवटीं या द्राक्षघडांच्या आंतल्या बाजूंना असलेले विजेचे दिवे पेटवल्यामुळें, तो सर्व देखावा फार सुंदर, रंगात व कौशल्यपूर्ण असा दिसला. या सर्व कार्यक्रमाशिवाय आणखी एक विशिष्ट प्रकार येथें पाहण्यालायक होता, पण तो कांहीं ठराविक वेळींच दाखवीत असत. तो देखावा म्हणजे Rhine नदीच्या त्या तयार केलेल्या भागावर बदलत्या हवामानानें होणाऱ्या परिणामाचें

चित्र. पहिल्यानें त्या Golarshausen खेडेगांवांत चांगला सूर्यप्रकाश दिसत होता. नंतर संध्याकाळ होऊन खेडेगांवांत अंधार व आकाशांत तारे दिसूं लागले. थोड्या वेळानें त्या मोडक्या किल्ल्यावर चंद्रप्रकाश पडला; पण हळूहळू आकाशांत ढगें जमूं लागलीं व वादळ होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, वाऱ्याचा कर्कश आवाज व विजांचा कडकडाट ऐकूं येऊं लागला; काळ्याकुट्ट अंधारांत विजा चमकूं लागल्या; आणि नंतर पावसाच्या धारा पडतांना आम्हीं पाहिल्या; आणि हें सर्व होत असतां Goarshausen खेडेगांवांतील चिमुकल्या घरांच्या छोट्या खिडक्यांतून आंतील दिव्यांचा प्रकाश दिसूं लागला. थोड्या वेळानें आकाश निरभ्र झालें व पुनः तारे चमकूं लागले.

ऑस्ट्रिया देशांतील खाद्यपेयांच्या दुकानांप्रमाणें सजविलेल्या खोलींत उन्हाळ्यांत बसावयासाठीं केलेले लहान लहान मांडव असतात तसले करून त्यांवर द्राक्षघड लटकलेले वेल सोडलेले होते व रंगीत Chinese lanterns (कागदांचे दिवे) लावले होते; आणि या खोलीच्या एका टोकाला ऑस्ट्रिया देशाची राजधानी Vienna या शहराचा रात्रीचा देखावा उठावदार चित्रानें दाखविला होता. त्या शहरांतून वाहणारी Danube नदी, तिच्यांतून चालत असलेली बोट आणि त्या शहरांतले चिमुकले दिवे यांनीं त्या देखाव्याला खरेपणा आला होता. ऑस्ट्रिया देशांतील कांहीं मुली या खोलींत बँड वाजवीत होत्या. ज्याला पाहिजे असेल त्याला या खोलींत बसून त्याच देशांतलें खाद्य व मद्य खाण्यास व पिण्यास मिळण्याची सोय केलेली होती.

तुर्कस्तानांतील कॉफीपान गृहाच्या खोलीच्या बाहेरचें व आंतलें लाकडी सामान (फर्निचर) तुर्की नमुन्याचें होतें. येथें बसावयास लहान स्टुलें, कॉफी पिण्यास लहान लहान टेबलें आणि ती कॉफी आणून देण्यास शिद्दी लोक होते; आणि त्या खोलींतील प्रकाश मंद, फिक्कट गुलाबी असा होता; या देशाची राजधानी कॉन्स्टँटिनोपल् (Constantinople) या शहराची एक उठावदार प्रतिमा या खोलींत होती. पुढल्या भागांत आंत दिवे पेटलेलीं अशीं

चिमुकलीं घरें, एक मशिद, झाडेंझुडपें आणि खऱ्या पाण्याचा फवारा उडवणारा एक लहानसा कारंजा केलेला होता. पाठीमागल्या भागांत कॉन्स्टँटिनोपल शहरांतील आंत दिव्यांचा उजेड असलेलीं अशीं छोटींशीं घरें, खऱ्यासारख्या लाटा येत असणारा व त्यावरतीं बोटींचे चिमुकले दिवे चमकत असलेला असा समुद्र यांचें लहानसें दृष्य दाखविलें होतें.

बव्हेरिआ देशांतील कॉफीपान गृहामध्यें 'बव्हेरिअन आल्पस' या पर्वतांचा देखावा दाखविला होता व येथें त्या देशांतील मुलींसारखे कपडे घालून कांहीं मुली त्या देशांतील विशिष्ट नाच नाचून दाखवीत होत्या. येथलें लाकडी सामान ( फर्निचर ) पांढऱ्या रंगाचें असून त्यावर रंगीत वेलबुट्टीचें काम केलेलें होतें.

इटली देशांतील शेतकऱ्याच्या खाणावळीचें जें दृश्य दाखविलें होतें त्यांत एक शेतकऱ्याची झोपडी असून तिच्याजवळ संत्र्यांनीं लादलेलें असें संत्र्यांचें झाड होतें, आणि येथल्या नोकरवर्गानें इटली देशांतल्यासारखे कपडे घातले होते.

एक लहानसें जपानी चहापान गृहही येथें होतें. येथलें लाकडी सामान जपानी तऱ्हेचें असून तेथें काम करण्यास एक जपानी मुलगी होती.

एक Wild West Bar नांवाची खोली होती. ती अंधारी असून तेथें कंदील टांगलेले होते आणि तिच्या छताच्या तुळ्या ओबडधोबड होत्या. अमेरिकेंत 'काउबॉय्' नांवाचे जे गुराखी लोक असतात, त्या लोकांच्या झोपड्याचा देखावा येथें दाखविला होता, आणि त्या देखाव्याला खरेपणाचा भास आणण्याकरितां तेथल्या काम करणाऱ्यांना 'काउबॉय्ज' चे पोशाख देऊन, त्यांच्याच प्रकारचें वादन तेथें चालू होतें. तेथे एक खरा शिद्दीही होता.

Palm Room ( पाम झाडांची खोली ) नांवाची जी खोली होती ती त्या दुकानांतील नाचाची मुख्य खोली होती. तिच्यांत वेड्यावांकड्या व लोंबणाऱ्या पायांच्या बाहुल्यांना खऱ्या बायकांसारख्या धरून सुरू असलेला नाच आम्हीं पाहिला. या दुकानाच्या अगदीं वरच्या मजल्यावर स्वयंपाकघर

होतें तें दाखविण्याकरितां शेवटीं आम्हांला एक मनुष्य तेथें घेऊन गेला. तें मोठें थोरलें स्वयंपाकघर अत्यंत स्वच्छ होतें. Soup ( सुरवा ) तयार करण्याचीं मोठीं पंचपात्रें, मांस ठेवण्याची जागा, गिऱ्हाइकांना खाण्यास लागणारे मासे जिवंत ठेवण्याचें पाण्याचें लहान टाकें हीं आम्हीं तेथें पाहिलीं. खालच्या मजल्यांवर जेवावयास आलेल्या गिऱ्हाइकांना काय काय पदार्थ पाहिजेत त्यांच्या याद्या वर पाठवून, नंतर जेवून झाल्यावर त्या उष्ट्या बशा पुनः वर पाठविण्यासाठीं म्हणून विजेच्या हालत्या पट्ट्या व नळ्या यांची एक विशेष मांडणी केलेलीही येथें आम्हांला दाखविण्यांत आली.

## तारीख १४ मार्च

येथल्या 'विद्यार्थ्यांच्या संघा'च्या मार्फत आम्हीं स्विट्झरलंड या देशांतील इंग्रजी भाषा बोलणारा एक मार्गदर्शक मागवून घेऊन त्याच्याबरोबर बर्लिन शहरांतील जुना राजवाडा पाहण्यास गेलों. तेथें जातांना आम्ही 'Unter Den Linden' ( 'उन्तर देन लिनदेन' ) या बर्लिनच्या प्रसिद्ध व प्रशस्त रस्त्यावरून चालत गेलों. त्या राजवाड्यांत अत्यंत सुंदर अशा वस्तूंचा प्रचंड संग्रह आम्हीं पाहिला. आंतून सोनेरी काम केलेलीं व आंतील भिंती रेशमी कापडानें मढवलेलीं अशीं भव्य दालनें तेथें होतीं, पूर्वी जर्मन बादशहांच्या मालकीच्या असलेल्या सोन्याच्या बशा व भांडीं, सुंदर कपाटें, चित्रें, पारदर्शक पिवळ्या amber ( तैलस्फटिक ) नावाच्या पाषाणाच्या केलेल्या वस्तु, हस्तिदंताच्या घडवलेल्या सुंदर मोठ्या जिनसा आणि ज्यांत कांहीं अतिशय मोठ्या जिनसा होत्या असा चिनी मातीच्या पदार्थांचा संग्रह आम्हीं पाहिला. एका चिनी मातीच्या मूर्तीचें डोकें होतें, त्याला हातानें हलूच टपली मारली असतां तें हालत असे. याशिवाय, तेथें बुट्टीदार गालिचे आणि बुट्टीदार भरतकामाचे पदार्थही होते. जुनीं लहानमोठीं घड्याळें होतीं, त्यांतील कांहींवर मीना चाळलेला होता व कांहीं रत्नजडित होतीं.

दुपारच्या जेवणानंतर आम्हीं पशुसंग्रहालय पाहावयास गेलों. हा संग्रहालय जरी कदाचित् लंडनमधील पशुसंग्रहालयाएवढा मोठा नसला, तरी

याचीं कांहीं विशेष अंगें आहेत. लंडनमधल्या संग्रहालयाप्रमाणेंच याही संग्रहालयांत एक Aquarium (जलचर प्राणी ठेवण्यासाठीं केलेल्या कृत्रिम तळ्यांचा समुदाय) आहे. निरनिराळे पशु ठेवण्यासाठीं बांधलेलीं घरें, चिनी पगोडा (देऊळ), हिंदूंचें देऊळ, मुसलमानांची मशीद अशा वेगवेगळ्या नमुन्यांबरहुकूम तयार केलेलीं असल्यामुळें सुंदर दिसतात. यांची आंतील रचना सुद्धां बाहेरच्या शिल्पकलेला जुळेल अशीच आहे. उदाहरणार्थ, यांतील कांहीं इमारतींच्या आंतबाहेर ज्या देशांतील शिल्पकला दाखविली आहे त्या देशांतील देखाव्यांचीं चित्रें आहेत. शिवाय, त्या पशु ठेवण्याच्या उष्ण इमारतींतील मोकळ्या जागेंत उष्ण कटिबंधांत होणारीं झाडें लावलीं असल्यामुळें त्या जागा सुंदर दिसतात. सुसरी ठेवलेल्या तळ्याच्या किनाऱ्यावर मोठमोठीं उष्णकटिबंधांतलीं झाडें आणि एका टोंकाला एक लहानसें झोपडें असल्यामुळें, तें तळें अगदीं अकृत्रिम असें दिसलें. तेथें एक केळीचें झाड असून त्यावर एक केळ्यांचा घड लागलेला होता. कांहीं सुसरी किनाऱ्यावर हवा खात पडल्या होत्या व कांहीं पाण्यांत निजल्या होत्या. पक्ष्यांना आंघोळीसाठीं जागा तयार केल्या होत्या. या ठिकाणीं आम्हीं एक विशेष गोष्ट पाहिली ती ही कीं कांहीं पशूंच्या इमारतींत लोक त्या जिवंत जनावरांचीं चित्रें काढीत होते व कोणी त्यांच्या मातीच्या प्रतिमा तयार करीत होते.

## तारीख १५ मार्च

आमच्या सुशिक्षित मार्गदर्शकाला बरोबर घेऊन आम्ही आगगाडीनें Potsdam (पॉट्सडम्) या ठिकाणीं जाऊन तेथील राजवाडे पाहिले. ह्या प्रवासांत कांहीं सुंदर वनश्री पाहिली आणि झाडांनीं वेष्टिलेलें व आंतील पाणी गोठून गेलेलें Wannsee सरोवर पाहिलें. आम्हीं Sans Souci (सां सूसी) राजवाड्याकडे पोंचलों तेव्हां बर्फ पडत होतें. येथें आम्हीं कांहीं फार चित्तवेधक गोष्टी पहिल्या. फ्रेड्रिक् धी ग्रेट (Frederick The Great) हा जर्मन बादशहा ज्या खोलींत व ज्या आरामखुर्चींत

वापरला, ती खोली व खुर्ची, तसेंच, तो ज्यावर काम करीत असे तें टेबल हीं आम्हीं पाहिलीं. राजवाड्यांत नेहमीं दिसून येतात तशीं कांहीं छानदार दालनें येथेंही आहेत. त्यांतही एक खोली विशेष नमूद करण्यासारखी आहे. जेव्हां फ्रेंच कवि Voltaire हा Frederick The Great या बादशहाचा पाहुणा म्हणून येथें येत असे तेव्हांची त्याची राहावयाची खोली पाहण्यालायक आहे. या खोलीच्या आंतला सर्व भाग पिवळ्या रंगाच्या लाकडाचा केलेला असून, खोलीचें छत व भिंती यांवर फळांचे व फुलांचे रंगीत घोस उठावदार रीतीनें तयार केलेले आहेत. येथल्या खुर्च्या मढवण्यास वापरलेलें बुट्टीदार कापड फ्रान्समधल्या प्रसिद्ध Gobelins कारखान्यांत तयार केलेलें असून la Foutaine या प्रसिद्ध फ्रेंच लेखकाच्या कल्पित कथांचीं चित्रें त्या बुट्टीदार कापडांत विणलेलीं आहेत Voltaire या सुंदर चिनी मातीच्या बऱ्याच भांड्यांचा एक संच अजूनही येथें राखून ठेवलेला आहे. जरी या राजवाड्यासभोंवतालचा बगिचा फ्रान्स देशांतील Versailles (व्हर्सायि) राजवाड्याच्या बगिच्याची प्रतिकृति आहे, तरी हा बगिचा त्या प्रसिद्ध मूळच्या बगिचापेक्षां पुष्कळ लहान आहे. बगिच्यांत गच्चीवर गच्ची अशा अनेक गच्च्या असून त्यावर झाडेंझुडपें व हिरवळी आहेत; शिवाय, एक कारंजा व बागेंतून वाहत जाणारा एक पाण्याचा पाट आहे. पण सर्व पाणी गोठून गेल्यामुळें व जमीन बर्फाच्छादित असल्यामुळें या बागेचें खरें सौंदर्य आमच्या नजरेस पडलें नाहीं.

नंतर एका टॅक्सीनें आम्हीं नवा राजवाडा पाहावयास गेलों. येथें आम्हांला एक चमत्कारिक गोष्ट करावी लागली. अशी गोष्ट अजूनपर्यंत फक्त हिंदुस्थानांत ताजमहालासारखें स्थळ पाहावयास गेलें असतां करावी लागत असे. ही गोष्ट म्हणजे राजवाड्यांतील चांगल्या वस्तु आमच्या घाणेरड्या बुटांनीं बिघडूं नयेत म्हणून कीं काय. आम्हांला आमच्या बुटांवर अडचे, मोठे व बोजड बुरणुसाचे ( felt ) जोडे चढवावे लागले. येथल्या दालनांच्या छतांवर व भिंतींवर सोनेरी व रुपेरी काम केलेलें असल्यामुळें हीं

दालनें अधिकच भव्य दिसलीं. रंगीत जरीचा आणि रेशमी कपडा यांनीं भिंती मढवलेल्या होत्या. येथें चित्रेंही होतीं आणि सुंदर बांधणीच्या पुस्तकांनीं भरलेली एक मोठी लायब्ररी होती. येथें दोन विशिष्ट प्रकारच्या खोल्या आहेत; यांपैकीं एकीचें नांव Tea Cup Room ( चहाच्या पेल्यासारखी खोली ) आहे; कारण तिचा आकार पालथ्या घातलेल्या चहाच्या पेल्याप्रमाणें असून तिचें छत घुमटासारखें आहे, व पेल्याच्या मुठीच्या जागीं खिडकीचा कोनाडा आहे या खोलीचा रंग पिवळा आहे, आणि येथल्या भिंतीवर व छतावर रंगीत फुलांचीं चित्रें आहेत.

दुसऱ्या विशिष्ट प्रकारच्या खोलीचें नांव Grotto Room ( गुहेसारखी खोली ) असें आहे. या मोठ्या खोलीची सबंध आंतली बाजू शिंपा, खनीज पदार्थांचे तुकडे, बहुमोलाच्या दगडांचे तुकडे, वगैरेंनीं मढवलेली आहे. कांहीं जागीं या शिंपा, वगैरे फुलांच्या आकृति करून बसवलेल्या आहेत. दुसऱ्या कांहीं ठिकाणीं ओबडधोबड आकाराचे तुकडे जमेच्या तसेच चिकटवलेले आहेत; पण या सर्वांचा मिळून एक अति सुंदर कलाकृति निर्माण झाली आहे.

संध्याकाळीं Vaterland Haus या खाद्यपेयाच्या दुकानाला आम्हीं दुसरी भेट दिली, व ऑस्ट्रिया देशांतले नाच पाहिले व ऑस्ट्रियन मुलींनीं वाजवलेलें बँड ऐकलें. यथें कांहीं मजेदार दारूच्या बाटल्या पाहिल्या. त्यांना नळ्या अडकवलेल्या होत्या. या नळीखालीं धरलेले ग्लास दारूनें भरलें म्हणजे दारू बाहेर येण्याचें आपोआप बंद होई. 'Rhine Terrace' या दालनांत जाऊन अम्हीं तो नदीवरचा विजा व पावसाचा देखावा पाहिला आणि दुसऱ्याही खोल्या पुनः एकदां फिरून पाहिल्या.

## तारीख १६ मार्च

Wertheims नांवाचें विविध प्रकारच्या मालाचें जंगी दुकान पाहिलें आणि तेथें थोडीशी खरदी केली. Easter च्या सणानिमित्त मुद्दाम तयार केलेल्या ज्या विशेष वस्तु तेथें होत्या त्यांत बसलेल्या ससाचा एक मला

जंगी नमुना केलेला होता. या कृत्रिम सशाला त्याचे कान आणि पाय हालवतां येत होते. तसेंच, सिगारेट ओढणाऱ्या बाईची एक कृति होती ती खऱ्याप्रमाणें दिसत होती. ज्या हातांत सिगारेट होती तो हात पुढेंमागें हालत होता व सिगारेट तोंडाकडे गेल्याबरोबर ती खरी पेटल्याप्रमाणें जळजळीत दिसत होती.

दुपारच्या जेवणानंतर आम्हीं Tier Garten नांवाच्या बगिच्यांतून फिरलों. नुकताच बर्फ पडून गेल्यामुळें जमीन दलदलीसारखी झाली होती. हा बगिचा अतिशय जंगी प्रमाणांत असून यांत मोठमोठे सुंदर वृक्ष, झुडपें व हिरवळी आहेत. आणि त्या सर्वांमधून रस्ते आहेत. येथे थोडा वेळ बसल्यावर आम्हीं चालत परत गेलों, आणि त्याच रात्रीं आम्हीं बर्लिनहून कोलन शहरीं जाण्यास निघालों.

## तारीख १७ मार्च

अगदीं सकाळीं कोलनला उतरून आम्हीं Excelsior Hotel नांवाच्या होटेलांत उतरलों. या अति भव्य होटेलांत उतरण्याची सूचना बर्लिनमधल्या आमच्या 'स्विस' मार्गदर्शकानें केली होती. आमच्या राहावयाच्या खोलीला लागून एक खाजगी स्नानाची खोली होती, आणि खोलीच्या भिंती रेशमी कपड्याप्रमाणें दिसणाऱ्या हिरव्या रंगाच्या कपड्यानें मढविलेल्या होत्या; भिंतींवर चित्रें सुद्धां टांगलेलीं होतीं. कोलन शहरांतील प्रसिद्ध देवळाचा चांगला देखावा आमच्या खोलींतून दिसत होत. या होटेलांतील जेवणाची खोली सुंदर असून तिच्यांत दिव्यांच्या बदली झुंबर होते, व जेवण चालू असतां तेथें वादन सुरू होतें. साहजिकपणें येथें राहण्याचे दरही या सर्व थाटाला साजेसे म्हणजे फार भारी होते. गांवांतील प्रेक्षणीय स्थळें प्रवाशांना दाखविण्याकरितां एक मोटर बस देवळाकडून निघत असतां कर्मधर्मसंयोगानें आमच्या नजरेस पडली आणि त्या प्रवाशांबरोबर आम्हीही निघालों. पुढें गेलों तसें शहराच्या जुन्या भागांतील अरुंद रस्ते व जुनीं घरें आम्हीं पाहिलीं. शहराच्या नव्या भागातील मोठ्या

चौकांत पुतळे व कारंजे होते आणि तेथल्या रुंद नव्या रस्त्यांच्या दुतर्फा सुंदर व मोठे वृक्ष असून त्यांच्या रस्त्यांवर कमानी बनल्या होत्या. जातांना वाटेवर निरनिराळीं ठिकाणें आम्हांला दाखवण्यांत येत होतीं; उदाहरणार्थ, रंग तयार करण्याचा 'ऱ्हाइन' (Rhine) नदीवरचा कारखाना, 'अॅसपिरीन' (aspirin) व तयार रंग होतात ती जागा, आणि १९१४ ते १९१८ मधल्या महायुद्धानंतर जें इंग्रजी सैन्य येथल' ताबा घेऊन राहिलें होतें त्या सैन्याचा जनरल राहत होता तें घर.

दुपारच्या जेवणानंतर आम्हीं Rhine नदीच्या बाजूने मोटरींतून फार मोठी सहल केली, त्यावेळीं प्रसिद्ध विद्यापीठ असलेल्या Bonn (बॉन) या शहरांतून जात असतां विद्यापिठाची इमारत, प्रसिद्ध, गायनकुशल Beethoven याचा जन्म झाला ती जागा आणि त्याचे राहाचयचे घर यांचें आम्हांला ओझरतें दर्शन झालें. कोलन शहर हें प्राचीन रोमन साम्राज्याच्या वेळचें जुने शहर असल्यामुळें, येथे कांहीं जुनें रोमन अवशेष आम्हांला दिसले. छान प्रशस्त रस्त्यांवरून सहल करीत व इग्रजांचा ताबा ठेवणारें सैन्य जेव्हां येथे होतें तेव्हांच्या त्यांच्या शिपायांच्या खोल्या व त्यांच्या ऑफिसरांचे छानदार मोठ बंगले यांच्यावर जातांजातां नजर फिरवीत शेवटीं Rhine नदीच्या कांठावरील Godesberg या शहरीं चहा घेण्याकरितां आम्हीं एका होटेलांत गेलों. येथून Drachenfels या डोंगरावरील किल्ल्याच्या मोडतोडीचे मीं कांहीं चेहरे घेतले. येथून आम्हीं 'Seven Hills' (सात टेकड्या) पाहिल्या. आणि या टेकड्यांच्या पायथ्याशीं Rhine नदीच्या कांठीं असलेलीं खडीं आम्हांला दिसलीं; पण हा देखावा पाहून माझी निराशाच झाली; कारण टेकड्यांवरच्या झाडांवरचीं पानें झडून गेलेलीं होतीं आणि वनश्रीचा हिरवा रंग आजूबाजूला कोठेंच दिसत नव्हता. चहा पिऊन झाल्यावर आमची मोटर आमच्यासकट विजेच्या बोटीवर चढविण्यांत येऊन, आम्ही तर ओलांडून नदीच्या पलीकडच्या तीरावर गलों. आमची मोटर बोटीवरून सरळ जमिनीवर आली; व आतां नदीच्या दुसऱ्या बाजूनें जाऊन पुनः आम्ही बॉन

( Bonn ) शहरीं गेलों आणि तेथून कोलनला पोंचलों. येथें आसपासच्या रस्त्याचा कांहीं भाग कोलन् हें शहर पॅरिस शहराला जोडण्याकरितां फ्रान्स देशाचा बादशहा नेपोलिअन यानें तयार करविला होता, आणि आम्हीं त्या वेळचा मैलाच्या खुणेचा एक दगड रस्त्यावर पाहिला.

## तारीख १८ मार्च

या शहराच्या सुखवस्तु लोकांच्या देवघेवीचीं दुकानें असलेल्या भागांत चालत जाऊन आठवणीखातर कांहीं वस्तु आम्हीं खरेदी केल्या; आणि दुपारच्या जेवणानंतर येथलें प्रसिद्ध देऊळ पाहण्यास गेलों. हें देऊळ युरोपखंडांतील उत्तमोत्तम देवळांपैकीं एक असून याचें बाहेरच्या बाजूचें कोरीवकाम फार सुंदर आणि फार परिश्रमानें तयार केलेलें आहे. दोन अतिशय उच्च अशीं निमुळतीं शिखरें भव्य शोभिवंत अशीं आकाशांत वर गेलेलीं आहेत. देवळाच्या आंतल्या बाजूला रंगीत कांचेचीं चित्रें असलेल्या सुंदर खिडक्या आहेत, पण या खिडक्या Milan शहरांतील देवळाच्या खिडक्यांइतक्या मोठ्या नाहींत. छानदार मूर्ति कोरलेल्या देवळाच्या त्या मधल्या व्यासपिठावर सोनेरी काम भरलेलें असून, तें विजेच्या दिव्यांच्या उजेडांत तळपत होतें. त्या देवळाच्या मालकीचें जडजवाहीरसुद्धां आम्हीं पाहिलें. त्यांत कांहीं अत्यंत मौल्यवान अशा वस्तु आहेत. चांदीसोन्याच्या कांहीं जड पेट्यांवर सुंदर उठावदार काम केलेलें आहे आणि त्यांवर लहानमोठे मौल्यवान दगड व रत्नेंही जडवलेलीं आहेत; आणि त्यांत कांहीं पवित्र व्यक्तींचे अवशेष ठेवलेले आहेत. याशिवाय, सोन्याचीं भांडीं, येथल्या पाद्री लोकांच्या मालकीचा हिरे व पाच यांनीं जडवलेला एक क्रास आणि दारू पिण्याच्या ग्लासाच्या आकाराचे व मोठ्या रत्नांनीं जडवलेलें असें मोठें सोन्याचें भांडें हीं आम्हीं पाहिलीं. येथें असलेल्या इंग्रजींत छापलेल्या स्पष्टीकरणामुळे आम्हांला हें जडजवाहीर नीट पाहतां आलें.

हें सर्व पाहून झाल्यावर शहरांतील एका दुकानांत आम्ही चहा पिण्याकरितां गेलों.

## तारीख १९ मार्च

सकाळच्या आगगाडीनें आम्ही कोलनहून पॅरिसला जाण्यास निघालों. युरोपखंडात प्रसिद्ध असलेलीं Liege ( लिएज ), Namur ( नामूर ) वगैरे बेलजिअम देशांतील शहरें आम्हांला रस्त्यांत लागलीं. टेकड्या, दऱ्या व हिरवीं कुरणें, आणि टेकड्यांच्या माथ्यांवरील व नदीच्या कांठीं वसलेलीं खेडेगांवें यामुळें आगगाडी ज्या प्रदेशांतून चालली होती तो प्रदेश सुंदर दिसत होता, आणि कित्येक तासपर्यंत आगगाडी नदीला समांतर अशी चालली होती. आम्ही पॅरिसला दुपारीं पोंचलों, व पाहिलें तों बनी आमच्या आधींच Hotel Regina या होटेलांत येऊन राहिलेला होता. हें होटेल छान व मोठें होतें, व येथलें वातावरण फार आल्हाद-दायक असून हें चांगल्या वस्तींत होतें. समोरच Tuileries च्या बगिच्याचा मनोरम देखावा दिसत होता. आमची खोलीही फार सोईस्कर होती. पलंग खोलीच्या एका कमानीसारख्या भागांत ठेवलेले असून खोलीचा बाकीचा भाग बसण्याउठण्यास मोकळा ठेवलेला होता, आणि खोलीलाच लागून एक खाजगी आंघोळीची खोली होती. खोलीच्या भिंतीवर लावलेला कपडासुद्धां छानदार नमुन्याचा होता. फिक्कट पिवळसर पृष्ठभागावर गुलाबी रंगाचीं फुलें व हिरवीं पानें असलेल्या या कपड्यामुळें आल्हाददायक वातावरण उत्पन्न झालें होतें.

## तारीख २० मार्च

आम्हीं बनीला घेऊन पुनः Louvre राजवाड्यांतील चित्रसंग्रहालय व पदार्थसंग्रहालय पाहावयास गेलों असतां गेल्या खेपेला भेटलेली ती स्विस चित्रकार बाई पुनः आम्हांला भेटली आणि आम्हीं तिच्याकडे थोडें बोललों. या खेपेला ती कोणी मागविलेल्या दुसऱ्या एका चित्राची नक्कल करीत होती. नंतर आम्हीं हिरण्यागार हिरवळींनीं व सुशोभित रीतीनें मांडणी केलेल्या नव्या फुलांच्या वाफ्यांनीं सजलेल्या अशा Tuileries च्या बगिच्यांतून चालत आलों.

दुपारीं स्वत: व बनीहे Champs Elysees नांवाचा प्रशस्त रस्ता, Arc de Triomphe नांवाची भव्य कमान आणि नेपोलिअन बादशहाचें थडगें हीं ठिकाणें पाहावयास गेले, व नंतर आम्हीं एका दुकानांत जाऊन चहा घेतला.

## तारीख २१ मार्च

आम्हीं तिघेंही Conciergerie हें ठिकाण पाहावयास गेलों. French Revolution नांवानें प्रसिद्ध असलेल्या फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीच्या वेळीं तेथली राणी Marie Antoinette हिचा वध करण्यापूर्वी तिला ज्या अति लहान व अंधाऱ्या खोलींत ठेवण्यांत आलें होतें ती खोली आम्हीं पाहिली. वधस्थळीं जाण्यापूर्वी ज्या 'क्रॉस'चें तिनें चुंबन घेतलें तो 'क्रॉस' आणि ती अगदीं शेवटीं ज्या भांड्यांतून पाणी प्याली तें लहान भांडें ( jug ) या वस्तु येथें अजून राखून ठेवलेल्या आहेत. त्या क्रांतीच्या वेळीं ज्या अनेक लोकांचा वध करण्यांत आला त्या लोकांना वधापूर्वी जेथें ठेवण्यांत येत असे व ज्याच्या जमिनीवर ते निजत असत तें दालनही आम्हीं पाहिलें.

नंतर आम्हीं Sainte Chapelle नांवाचें तें लहान सुंदर देऊळ व Notre Dame de Paris हें प्रसिद्ध देऊळ हीं पुन: पाहिलीं व Notre Dame च्या देवळाचें जवाहीरसुद्धां पुन: एकदां पाहिलें. या देवळाचें शिल्पकाम जरी चांगलें आहे, तरी तें Milan ( मिलान ) व Cologne ( कोलन ) या शहरांतील देवळांच्या इतकें सुंदर नाहीं.

दुपारीं पुन: एकदां Pantheon पाहून आम्हीं Cuny पदार्थ-संग्रहालय पाहावयास गेलों. अशा ठिकाणीं साधारणपणें दिसणाऱ्या जिनसा म्हणजे चिनीमातीच्या सुंदर वस्तु, जुनें जवाहीर, जुन्या काळच्या लोकांच्या मुखवट्यांच्या मेणानें तयार केलेल्या अगदीं लहान प्रतिमा त्या सर्व येथें होत्या. चिनी मातीची केलेली 'ॲसपरेगस' ही भाजी, कांहीं फळें व अक्रोडें या जिनसा मला फार आवडल्या. पुष्कळ फूट उंच असलेली एक प्रतिमा होती ती म्हणजे येशू ख्रिस्ताचा जन्म व त्याला अनेक लोकांनीं आण-

लेल्या देणग्या याचें अगदीं हुबेहुब चित्र होतें. या प्रतिमेच्या दुसऱ्या बाजूला स्वयंपाकघराच्या आंतील भाग यासारखे घरगुती देखावे तितक्याच हुबेहुब रीतीनें दाखविले होते.

या पदार्थसंग्रहालयाच्या एका भागांत एक दमट खोली होती, तेथें प्राचीन काळीं रोमन लोकांची आंघोळीची जागा होती. त्या खोलीच्या भिंतीचे कांहीं भाग जुनाट व दमट दिसले. जुन्या काळच्या मृत रोमन लोकांना पुरलेल्या कांहीं दगडी पेट्या खुद्द पॅरिस शहरीं सांपडलेल्या या ठिकाणीं आम्हीं पाहिल्या. होटेलांत परत जातांना नदीच्या कांठवरच्या भिंतीवर असलेलीं, मजेदार दिसणारीं जुन्या पुस्तकांचीं लहान पेटीवजा दुकानें आम्हांला ओझरतीं दिसलीं.

दुपारीं एका लहानशा इंग्रजी दुकानांत चहा घेतला. संध्याकाळच्या जेवणाच्या जरा आधीं आम्हीं रस्त्याच्या ज्या भागाला Place de la Concorde हें नांव आहे ती जागा पाहावयास गेलों. या ठिकाणीं जिकडेतिकडे दिव्याचा लखलखाट असून, तेथें असलेले पुतळे इजिप्त देशांतून आणलेला जुन्या काळचा दगडी खांब ( Egyption Obelisk ) आणि पाण्याचीं कारंजीं यांवर दिव्यांचा उजेड पाडलेला होता. कारंजांतून उडणारे पाण्याचे फवारे उजेडांत फार सुंदर दिसत होते. या ठिकाणाचे कांहीं फोटो काढून होटेलांत परत जातांना आम्ही Tuileries च्या बागेतून गेलों. येथेंही फिक्कट गुलाबी रंगाचे दिवे असून, त्यांपैकीं कांहींचीं प्रतिबिंबें कारंज्यांच्या मोठ्या तळ्यांत पडलीं होतीं. मोठा रम्य देखावा होता तो !

## तारीख २२ मार्च

Versailles ( व्हरसाय् ) चा राजवाडा पाहण्यास पुनः गेलों. प्रवासी लोकांची सर्व व्यवस्था करणारी जी प्रसिद्ध Cook ( कुक ) ची कंपनी आहे. तिच्यामार्फत आम्ही या खेपेला तेथं गेलों. प्रवास मोठ्या मोटरबसमधून इतर प्रवासी लोकांबरोबर झाला व बरोबर सर्व

गोष्टी नीट समजावून दाखविण्यास एक कंपनीचा माणूस होता. दुतर्फा मोठमोठीं झाडें असलेल्या व झाडांच्या पलीकडे रुंद पायरस्ते असलेल्या अशा अतिशय रुंद व भव्य Champs Clysees नांवाच्या रस्त्यावरून आम्हीं पहिल्यानें गेलों. नंतर Avenue Foch नांवाच्या सुंदर रस्त्यावरून गेलों. येथें हिरवींगार झुडपें व वृक्ष होते, आणि तो दिवस रविवार असल्यामुळें रस्त्याच्या बाजूला असलेल्या हिरवळीवर लोक फिरतांना दिसत होते. नंतर आम्ही Bois de Boulogue नांवाच्या रानांतून गेलों. उन्हाळ्याचे दिवस नसल्यामुळें झाडांवर पानांची शोभा दिसत नव्हती, तरीही तेथल्या लहान पायवाटा, मधल्या मोकळ्या जागा व मधून मधून दिसणारा हिरवा रंग यांमुळें तें रान रम्य दिसलें. पाठीमागें St. Cloud येथील राई असलेल्या अशा एका Seine नदीच्या सुंदर वळणापलीकडे गेल्यावर पुनः एकदां Versailles येथल्या राजवाड्याचें तेज व ऐश्वर्य आमच्या नजरेला पडलें. येथें असलेल्या माणसांच्या चित्रांचें काम इतकें अप्रतिम झालेलें आहे कीं तीं साधीं चित्रें नसून त्या उठावदार कामांत केलेल्या प्रतिकृति आहेत असा भास होतो; इतका छान त्या चित्रांतला छायाभाग साधलेला आहे. अशींच आणखीं साधीं काळ्या व पांढऱ्या रंगांनीं काढलेलीं चित्रें येथें पाहिलीं, त्यांचेही छायाभाग असेच छान साधले असून, तीं भिंतींवरलीं साधीं चित्रें नसून ते Plaster of Paris (प्लास्टर ऑफ पॅरिस्) चे केलेले पुतळे आहेत असा भास होतो. येथल्या टेबलें, खुर्च्या, वगैरे सजावट सामानासंबंधीं आम्हाला असें सांगण्यांत आलें कीं फ्रान्सचा राजा चौदावा लुई याच्या वेळीं राजवाड्यांतील हें सर्व सामान चांदीचे केलेलें व अतिशय मौल्यवान कापड्यानें मढवलेलें होतें; पण नंतर फ्रान्स देशाला गरिबी आल्यामुळें ती चांदी विकून टाकावी लागली. या राजवाडयांत लढाईचा ठराव मंजूर करण्यासाठीं व तह करण्यासाठीं अशा वेगवेगळ्या खोल्या असून त्यांना अनुक्रमें 'लढाईची खोली' व 'तहाची खोली' अशीं नांवें आहेत; आणि प्रत्येक गोष्टीसाठीं एक एक वेगळी खोली आहे.

एका चांगल्या दुकानांत दुपारचें जेवण जेवून आम्ही पुनः एकदां

तेथल्या प्रसिद्ध जुन्या गाडयांचा संग्रह पाहावयास गेलों. या गाडया पितळेच्या केलेल्या असून त्यांवरून सोन्याचा मुलामा केला असल्याचें आम्हांला कळलें. पुन: एकदां Petit Trianon नांवाची इमारत पाहावयास आम्ही गेलों. ही इमारत राजवाडयापेक्षां पुष्कळच लहान आहे; पण बिचाऱ्या Marie Antoinette या फ्रान्सच्या राणीची ही आवडती जागा असून, ती राजवाडयांतील थाटमाट व ऐश्वर्य हीं सोडून येथें निवांतपणें राहण्यास आवडीनें येत असे.

घरीं परत जातांना Malmaison किल्ल्यावरून जात असतां त्याच्या आसपासचीं हिरवींगार मोठमोठीं झाडें व हिरवळी यांचें ओझरतें दर्शन झालें. नेपोलिअन बादशहानें आपली पत्नी जोसेफीन हिच्याशीं काडीमोड केल्यानंतर ती या किल्ल्यांत राहत असे. आतां या ठिकाणीं नेपोलिअनच्या आठवणीच्या अनेक वस्तूंचा संग्रह केला आहे. ज्या ठिकाणीं जोसेफीन वारली ती खोली व तो बिछाना आम्हीं येथें पाहिला. तिच्या वापरण्याच्या खाजगी वस्तु अजून येथें ठेवलेल्या आहेत. नेपोलिअनचे अतिशय भपकेबाज झुबें, त्याचीं घड्याळें, त्याचे छावणींत वापरण्याचे पलंग व बिछाने, वगैरे गोष्टी पाहिल्या; पण त्यांतही मनाला जास्त आकर्षक अशा वाटणाऱ्या गोष्टी म्हणजे त्याला कैद करून सेंट् हेलीनाच्या बेटावर ठेवलें असतांना तेथें त्याची वापरण्याची अगदीं साधी धातूची तोंड धुण्याच्या गिंडीची घोडी, तेथें बागेत बसण्याचा लाकडी बांक, मृत्युसमयीं त्याच्या अंगावर असलेलें साधें पांढरें खमीस, आणि त्याचें शव आंत असलेल्या पेटीवर झांकलेला निळा व सोनेरी रंगाचा कपडा. पुढें कांहीं वर्षांनीं जेव्हां ती त्याच्या शवाची पेटी सेंट हेलीनाहून फ्रान्स देशांत नेली तेव्हां हा निळा व सोनेरी कपडा त्या पेटीवर आच्छादलेला होता. या किल्ल्यांतील त्याची वापरण्याची खोली भिंतीवरील सुंदर, रंगीत नक्षीकामासकट जशीच्या तशी ठेवलेली आहे. येथला जड चांदीचा व वरून सोन्याचा मुलामा केलेला जो जेवण्याचा भांडयांचा संच आहे, त्यांतील कांहीं भांडीं अतिशय मोठीं असून तो अतिशयच भपकेदार दिसला !

रात्रीच्या जेवणानंतर आम्ही येथल्या प्रसिद्ध 'ऑपेरा' नाटकगृहामध्यें Wagner नें लिहिलेला प्रसिद्ध 'ऑपेरा' (संगीत नाटक) Tanbausser हा पाहावयास गेलों. या नाटकगृहाचें शिल्पकाम फार भव्य आहे. आंत अतिशय मोठीं दालनें व गॅलऱ्या असून त्यांत पुतळे ठेवलेले आहेत; संगमरवरी दगडाचे जिने येथें आहेत, व झगझगीत उजेडाऱ्या दिव्यांची शोभिवंत मांडणी केलेली आहे. नाटकगृहाची इमारत २५० वर्षांची जुनी आहे

त्या फ्रेंच नाटकांतील शब्द जरी आम्हांला कळत नव्हते, तरी त्यांतील सुंदर देखावे व त्या देखाव्यांतील धुक्यांतून दिसल्याप्रमाणें दिसणारे भुरकट रंग, पात्रांचे सुंदर पोशाख व नाच हे मला फार आवडले. मधून मधून पुढें दिसणाऱ्या देखाव्यांच्या मागे नवे देखावे एकदम दिसूं लागत; कधींकधीं रंगभूमिवर एकदम एका वेळीं शंभर मनुष्यें आल्यामुळें त्या देखाव्याला सत्यसृष्टीचें स्वरूप येई. नाटकाचें कथानक जरी शोकमय होतें, तरी सर्व भाषण पद्यमय असल्यामुळें, अभिनय फार हळूहळू होई व त्यामुळें तें कंटाळवाणें भासे. नाटक खरोखरी चांगलें असूनही तें सत्यसृष्टींतलें नसून कृत्रिम आहे असें वाटे. नाटकगृहाच्या खालच्या भागांत बसलेल्या लोकांमध्यें सुंदर पोषाख केलेल्या फ्रेंच बायका दिसल्या.

## तारीख २४ मार्च

सकाळीं स्वतः Pasteur Institute (पाश्चर इन्स्टिटयूट) पाहून आले. दुपारच्या जेवणानंतर होटेल Livingstone मध्यें माझ्या दम्याच्या वेळीं आमच्या फार उपयोगी पडलेले Macarthy चें कुटुंब आम्हांला भेटावयास आलें तेव्हां आम्हीं त्यांना चहा दिला.

## तारीख २५ मार्च

'टॉमस कुक'च्या मार्फत इतर प्रवाशांबरोबर आम्हीं Fontainebleu येथला राजवाडा पाहावयास गेलों. तेथें जातांना Seine नदीच्या आसपासचा सुंदर प्रदेश, हिरव्यागार टेकड्या, आणि खऱ्या सरोवरांप्रमाणें

दिसणारीं कृत्रिम सरोवरें दृष्टीला पडलीं. दुतर्फा मोठमोठे वृक्ष असलेल्या रस्त्यावरून आम्हीं जात होतों, पण आमची मोटरबस बिघडल्यामुळें आम्हीं एक तासभर रस्त्यांत मध्येंच अडकून पडलों; पण मग दुसरी मोटरबस आमच्या मदतीला आली, व आम्हीं एकदांचे Barbizon च्या मजेशीर व सुंदर खेडेगांवांत येऊन दाखल झालों. फ्रेंच चित्रकारांपैकीं जुन्या काळचे कांहीं प्रसिद्ध चित्रकार येथें राहत असत; आणि त्यांच्या राहत्या घरांवर खुणांसाठीं म्हणून पाटया लावलेल्या आहेत. या गांवांत सध्यांही कांहीं चित्रकार राहतात. Millet ( मिले ) चित्रकाराच्या 'The Angelus' नांवाच्या प्रसिद्ध चित्रांत असलेलें देऊळ आम्हांला ओझरतें दिसलें. Rousseau ( रूसो ) चित्रकाराचें सुंदर लहान घर आणि त्याचा काम करण्याचा "स्टुडिओ" हीं आम्हीं पाहिलीं. "स्टुडिओ"मध्यें मोठमोठीं चित्रें विकावयास ठेवलीं होतीं. Millet चित्रकाराचें घर जरी कंगाल दिसत होतें, तरी त्या प्रशांत व खेडेगांवांतील वातावरणांत तें रम्य दिसलें. त्याच्या मृत्युसमयीं त्याचा काम करण्याचा "स्टुडिओ" ज्या स्थितींत होता, तसाच तो आजमितीला ठेवला आहे. येथेंसुद्धां विक्रीकरितां चित्रें ठेवलेलीं होतीं.

एका मजेशीर जुन्या होटेलांत आम्हीं सर्व प्रवासी दुपारचें जेवण जेवलों. प्रसिद्ध स्कॉच ग्रंथकार Robert Louis Stevenson हा या होटेलांत एकदां राहिला होता म्हणे !

जेवणानंतर Fontainebleu च्या विशाल अरण्यांतून आमची मोटरबस जात होती; पण त्यावेळीं झाडांवर पानें नसल्यामुळें त्या अरण्याची खरी शोभा आमच्या नजरेस पडली नाहीं; तरी पण हिरवीं fir व pine चीं ( देवदाराच्या जातीचीं ) झाडें, हिरवी शेवाळ आणि झाडांच्या खोडांना आच्छादून टाकणाऱ्या वेली व झाडांमधून येणाऱ्या उजेडाचा छायेशीं खेळ यामुळें एक प्रकारची शोभा दिसत होती. अशा सुंदर रस्त्यानें पुष्कळ वेळ पुढें गेल्यावर आम्हीं शेवटीं एकदां Fontainebleu ( फॉनूतेनब्लु ) च्या राजवाड्याकडे पोंचलों.

फ्रान्स देशांतील जुन्या राजांच्या या राजवाड्यांत वेगवेगळ्या नमुन्यांच्या बांधलेल्या खोल्या, त्यांच्या निरनिराळ्या तऱ्हांच्या लाकडी जमिनी, सोनेरी व निळ्या रंगांचें सुरेख काम केलेलीं छतें, रेशमी कपड्यानें मढवलेलें उंची लाकडी सजावट सामान व भिंती, सोनेरी रंगाचे पलंग आणि उंची गालिचे अशा तऱ्हेच्या कित्येक प्रेक्षणीय वस्तु येथें आमच्या नजरेला पडल्या. एका लहानशा स्नानाच्या खोलींत सर्व बाजूंना वर्ती नक्षी काढलेले असे आरसे लावलेले होते. जुन्या काळच्या कोणा राजाच्या लग्नाच्या वेळीं वापरलेल्या, वरतीं सुंदर चित्रें असलेल्या सुरेख चिनी मातीच्या शंभरांवर बशा येथें पाहिल्या. नेपोलिअन बादशहाचीं पुस्तकें ठेवलेल्या एका मोठ्या दालनांत त्यानें राज्याचा परित्याग केल्याचें लिहून दिलेल्या कागदाची हुबेहुब नक्कल अशी एक प्रत ठेवलेली आहे; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या परित्याग-पत्रावर त्यानें सही केव्हांही केली नाहीं. येथल्या एका लहानशा टेबलावर एका ठिकाणीं खोलगटसा भाग आहे, त्याविषयीं अशी आख्यायिका आहे कीं जेव्हां नेपोलिअनला राज्यपरित्यागपत्रावर सही करण्यास सांगण्यांत आलें तेव्हां त्यानें रागानें हात आपटल्यामुळें ती जागा खोलगट झाली आहे. या लायब्ररीमध्यें प्रसिद्ध आंग्लकवि शेक्सपिअर याच्या सर्व नाटकांचा "सेट" पाहून मौज वाटली. जरी या राजवाड्याच्या खोल्या Versailles (व्हर्सोय)च्या राजवाड्याच्या दालनांएवढ्या मोठ्या किंवा भपकेदार नाहींत, तरी त्या जास्त सुंदर दिसतात.

एका तऱ्हेनें पाहतां येथला बगिचासुद्धां Versailles च्या बगिच्यापेक्षां मला जास्त छान वाटला; कारण येथें तो निसर्गाचाच एक भाग असल्याप्रमाणें दिसला. समोर एक सरोवर व पाण्याचा पाट असून पाठीमागें राई होती. पाटांत एक होडी होती व सरोवरांत Carp नांवाचे मासे होते, आणि तेथें कांहीं राजहंस पक्षीही होते. या बागेच्या निसर्गरम्यपणामुळें तो जास्त शोभिवंत दिसत होता.

जवळच्या एका दुकानांत कांहीं पेय घेऊन आम्ही Fontainebleu

च्या दुसऱ्या एका भागांतील निराळ्या रस्त्यानें परत जावयास निघालों. या रस्त्याच्या दुतर्फा मोठे वृक्ष होते. येथून जात असतां मध्येंच एका ठिकाणीं आम्ही एक स्तंभ पाहिला. तो वॉटरलूच्या लढाईनंतर ड्यूक ऑफ वेलिंग्टन व नेपोलिअन यांची ज्या ठिकाणीं भेट झाली त्याच जागेवर बांधलेला आहे.

## तारीख २६ मार्च

पुन्हां एकदां आम्ही Eiffel ( आयफेल ) टावर पाहावयास गेलों. बनी आणि मी या टावरच्या अगदीं वरच्या तिसऱ्या मजल्यावर गेलों, व तेथें असलेल्या दुकानांपैकीं एकांतून एक लहानशी वस्तु मीं आठवण म्हणून खरेदी केली. या अगदीं वरच्या मजल्याला सभोंवर कांचेचीं तावदानें बसवलेलीं होतीं, त्यांमधून पॅरिस शहराच्या सबंध विस्ताराचा देखावा दिसला. या इतक्या उंचीवरून खालील रस्त्यांवरच्या सर्व वस्तु, माणसेंसुद्धां, अतिशय लहान दिसलीं. एक लहान चेंडू रस्त्यावरून गडगडत गेल्याप्रमाणें दिसला तो एक धांवत जात असलेला कुत्रा असावा.

वसंत ऋतूला प्रारंभ झाला असल्यामुळें बगिचे सुंदर दिसत होते. आणि जेथें तेथें हिरवेगार झालें होतें. दुपारच्या जेवणानंतर जेथें प्रसिद्ध Goblins चे गालिचे विणतात तो कारखाना पाहावयास आम्ही गेलों. येथें आम्हीं हातांनीं विणलेल्या सुंदर रंगांत गालिचांचा मोठा संग्रह पाहिला, त्यांपैकीं कांहीं गालिचे म्हणजे प्रसिद्ध चित्रकारांनीं काढलेल्या चित्रांच्या हुबेहुब नकला होत्या. The Sleeping Beauty, Cinderella, Jack The Giant-killer, वगैरे लहान मुलांच्या आवडीच्या गोष्टींतील देखावे कांहीं गालिच्यांत विणलेले होते आम्हीं तेथल्या हातमागांवर काम सुरू असतांना पाहिलें. विणणाऱ्याच्या पाठीमागें विणावयाचा नमुना लावलेला असून विणणाऱ्याच्या पुढें आरसा होता; त्या आरशांत पडलेल्या नमुन्याच्या प्रतिबिंबामुळें विणण्याच्या कामाला मदत होई.

नंतर Champs Clysees या रस्त्यावरून जातांना हिरवीं झुडपें व

हिरवळी, खाद्यपदार्थांचीं व खेळण्यांचीं लहान दुकानें, बाजूच्या पायवाटां-वरून गाढवांच्या पाठीवर किंवा बकऱ्यांच्या गाड्यांत बसून फिरणारीं मुलें आणि उनांत बाकांवर बसलेलीं मोठीं माणसें असा चित्ताकर्षक देखावा नजरेला पडला. पुढें रस्त्याच्या ज्या भागावर बरींच खाद्यपदार्थांचीं दुकानें आहेत त्या भागाकडे आम्ही हळूहळू आलों. या सर्व दुकानांच्यापुढें पाय-वाटेवर मोठमोठ्या रंगीत छत्र्या लावलेल्या होत्या व त्यांच्याखालीं लोक बसून खाद्यपेयें घेत होते, व रस्त्यावरील वाहतुकीची मौज पाहत होते. आम्ही-सुद्धां अशाच एका छत्रीखालीं लहानशा टेबलाभोंवतीं बसलों व कांहीं केक्स वगैरे खाल्ल्या.

पुढें Monceau Park नांवाच्या झाडेंझुडपें व हिरवळी असलेल्या मोठ्या बागेत गेलों. तेथें मुलें खेळतांना व त्यांच्या आया जवळ बसून शिवणकाम करीत असतांना नजरेला पडल्या; अशा तऱ्हेनें सर्वजण ऊन व मोकळी हवा यांचा पूर्ण उपभोग घेतांना दिसलीं.

## तारीख २७ मार्च

Seine नदीच्या बाजूच्या भिंतीवरील अगदीं लहान व मजेदार जुन्या पुस्तकांचीं दुकानें पाहण्यास बनी व मी गेलों. तेथें मीं कांहीं चेहरे काढले आणि थोडी खरेदी केली. हीं दुकानें म्हणजे त्या भिंतीवर कायम बसवलेल्या व किल्ल्याकुलुपें लावतां येण्यासारख्या मोठ्या पेट्या आहेत.

दुपारच्या जेवणानंतर Sacre' Coeur च्या देवळाकडे आम्ही पुन्हा एकदां गेलों. त्यावेळीं देवळामध्यें उपासना सुरू होती आणि व्यासपीठाच्या जवळच्या भागांत दिव्यांची रोशनाई सुंदर दिसत होती. त्यांचें सुरू असलेलें पद्यगायन आमच्या पूर्वेकडील देशांतल्या संगीत प्रमाणें माझ्या कानाला लागलें. हें देऊळ ज्या लहानशा टेकडीवर आहे त्या टेकडीवरून शहराचा चांगला देखावा दिसत होता, आणि टेकडीवरून खालीं उतरतांना पाहिलें तों सूर्यस्नान करणाऱ्या लोकांनीं देवळाच्या खालच्या बाजूचा बगिचा भरून गेला होता. पुरुष वाचीत होते, बायका शिवण-

काम करीत होत्या व मुलें खेळत होतीं; आणि कांहीं थोडीं माणसें खात बसलीं होतीं.

Boulevardes des Capucines नांवाच्या रस्त्याच्या बाजूच्या पायवाटेवर एका दुकानांत चहा घेऊन घरीं परत जातांना Place de la madeleine या ठिकाणचा सुंदर फुलांचा बाजार आमच्या नजरेस पडला.

## तारीख २८ मार्च

सकाळीं Louvre नांवाच्या दुकानांत कांहीं खरेदी करून Tuileries च्या बगिच्यांत एका संगमरवरी दगडाच्या बांकावर कांहीं वेळ बसलों. दुपारच्या जेवणानंतर शहरापासून कांहीं अंतरावर असलेलें St. denis ( सें. देनी ) चें देऊळ पाहण्यास आम्ही आगगाडीनें गेलों आणि तेथें त्या देवळाच्या भुयारांत असलेलीं फ्रान्सचा राजा चौदावा लुई व त्याची राणी यांचीं थडगीं पाहिलीं; आणि सोळावा लुई व त्याची राणी मारी आन्तुवानेत यांचीं अत्यंत साधीं बांधलेलीं थडगींही पाहिलीं. येथें आणखी पुष्कळ जुनीं थडगीं होतीं. येथून शहरांत परत जातांना आम्हांला ट्रॅम बदलण्याचा, वगैरे फार त्रास झाला; आणि माझी तर पक्की खात्री आहे, कीं आम्ही परक्या देशाचीं माणसें आहोंत हें पाहून व त्याचा पुरता फायदा घेऊन ट्रॅमच्या कन्डक्टरांनीं आम्हांला तिकिटांच्या बाबतींत फसवलें. जरी आम्हीं तेथें जातांना जाण्यायेण्याचीं अशीं दुहेरी तिकिटें काढलीं होतीं, तरी परत येतांना आम्हांला ठिकठिकाणीं आणखी तिकिटें घेण्यास त्यांनीं भाग पाडलें !

## तारीख २९ मार्च

सकाळच्या आगगाडीनें आम्ही Calais ( काले ) शहरीं जाण्यास निघालों जातांना वाटेंत Gorse झाडावरचीं पिवळीं फुलें पाहून वसंत ऋतूला सुरुवात झाल्याचें लक्ष्यांत आलें. कालेहून डोव्हरला बोटीनें गेल्यावर डोव्हरहून लंडनला जाणाऱ्या आगगाडींत फार गर्दी असल्याचें आढळून



सेन् नदीच्या बाजूच्या भिंतीवरील जुन्या पुस्तकांचीं दुकानें–पॅरिस् [पृ. १८३



हॅम्स्टेड् हीथवरचें कृत्रिम तळें [पृ. १९०

आलें; त्यामुळें नंतर थोड्याच मिनिटांत निघणाऱ्या दुसऱ्या आगगाडीनें आम्ही निघालों. Pullman car नांवाच्या डब्यांतील मऊ गाद्यांच्या आरामशीर खुर्च्यांवर बसून चहा पिण्याचा आम्हांला खरा हक्क नसतांही तसें करण्याची खास परवानगी या आगगाडींतील लोकांनीं आम्हांला दिली. या खेपेला पिकॅडिली या लंडनच्या मध्यवर्ती भागांत असलेल्या Regent Palace Hotel नांवाच्या होटेलांत आम्ही उतरलों. हें आंतील बाजूनें सुंदर सजविलेलें असें एक फार मोठें होटेल असून येथील बसण्याउठण्याचें दालन व जेवणघर हीं अत्यंत मोठीं आहेत. जेवणाखाण्याच्या वेळीं हीं मोठीं दालनें शेंकडों लोकांनीं गजबजलेलीं असून मधमाशांच्या पोळ्यांप्रमाणें दिसत; पण या होटेलांतली विशेष गोष्ट म्हणजे येथल्या सर्व सुखसोई, सुग्रास अन्न आणि जेवतांना, वगैरे चालू असलेलें व पैसे दिल्याशिवाय कांनीं पडणारें संगीत (खरें संगीत, रेडिओवरचें नव्हे) हें सर्व लक्ष्यांत घेतां होटेलांत राहण्याचे व जेवणाखाण्याचे दर फार माफक आहेत.

## तारीख ३० मार्च

दुपारच्या वेळीं शेक्स्पिअरच्या हॅमलेट नाटकाचा खेळ पाहावयास गेलों. सर्व पात्रांचा अभिनय चांगला होता. Godfrey Tearle नें हॅमलेटचें पात्र चांगलें वठवलें व Irene Vanbrugh हिनें राणीचा अभिनय केलेला पाहत असतां केव्हां केव्हां डोळ्यांना पाणी येत होतें.

## तारीख ३१ मार्च

चार्ली चॅप्लिन या सिनेमा-नटानें स्वतः लिहिलेला 'City Lights' (सिटी लाईटस्) हा सिनेमा पाहण्यास दुपारीं गेलों. चार्ली चॅपलिनच्या इतर सिनेमांप्रमाणें जरी हा सिनेमासुद्धां हास्यरस उत्पन्न करणारा आहे. तरी याच्या बुडाशीं शोकरसाची झुळुक आहे ही यांत विशेष गोष्ट आहे. चित्र चांगलें आहे. संध्याकाळीं येथें नवीनच ओळख झालेले सुंदरसिंग आमच्याकडे जेवावयास आले.

# तारीख १ एप्रिल

ड्रूरी लेन नाटकगृहामध्यें 'Song of the Drum' नांवाचें हास्यरस-प्रधान संगीत नाटक पाहावयास दुपारीं गेलों. या नाटकांतील पात्रांचे पोषाख त्यांच्यावरील झगझगीत सोनेरी कलाबतूच्या कामामुळें सुंदर दिसले आणि यांत कांहीं सुंदर नाचही होते. शाळेंत मुलींच्या कसरतींत ज्याप्रमाणें मध्येंच कांहीं मुली मिळून निरनिराळ्या आकृति करून दाखवितात, त्याप्रमाणें या नाचांतही नाचणाऱ्यांनीं करून दाखविल्या; शिवाय कांहीं कसरतीही नाटकांत करून दाखवल्या. अतिशय लवचिक शरिराच्या एका मुलीला एखाद्या निर्जीव वस्तूप्रमाणें एक मनुष्य दुसऱ्याकडे फेंकून देत होता. तिला एका पायानें टांगली, तिला झोपाळ्यासारखी हालवली, आणि उड्या मारतांना वापरावयाच्या दोरी ( Skipping rope ) सारखाही तिचा उपयोग केला. एका नाचांत नाचणाऱ्यांच्या हातांत अत्यंत मोठे असे शहामृगाच्या पिसांचे तिरंगी पंखे होते, त्यांचे रंग नाचणाऱ्यांच्या पोषाखाशीं मिळणारे असे असून, केव्हांकेव्हां ते पुरते उघडले म्हणजे त्यांच्या पाठीमागें नाचणारेही लपून जात. या नाटकांतले कांहीं देखावे सुद्धां फार छान होते. पूर्वेकडील देशांतील बाजाराचा एक देखावा हुबेहुब वठवला होता. यांत किराणा मालाचीं व गालिचांचीं दुकानें, पक्षी असलेले पिंजरे, पोस्टकार्डें विकणारे लोक हे होते. कांहीं बायका पाण्याचे घडे डोक्यावर घेऊन बाजारांतून जात होत्या, एक मनुष्य बकऱ्याला हाकवीत नेत होता, दुसरा एक गाढव घेऊन चालला होता, आणखी कांहीं मनुष्यें अशींच नुसतीं चाललीं होतीं; आणि इतक्यांत एक भांडण सुरू झालें. या सर्व देखाव्याच्या मागें असलेल्या पडद्यावर कलिंगडांच्या व खरबुजांच्या ढिगांचीं चित्रें काढलीं असल्यामुळें बाजाराचें पौर्वात्य वातावरण दाखवण्यांत त्याची मदत झाली होती. दुसऱ्या एका चित्ताकर्शक देखाव्यांत सुंदर राजवाड्याच्या इमारती, दोन जिवंत 'अफगाण हाउन्डस' नांवाचे कुत्रे, एक खरा घोडा व एक जिवंत उंट हीं जनावरें रंगभूमीवर आणलीं होतीं.

संध्याकाळीं नवीन ओळख झालेली Miss Vath नांवाची जर्मन मुलगी आमच्याकडे होटेलांत जेवावयास आली.

## तारीख २ एप्रिल

दुपारच्या जेवणाला सुलू आली. आम्हीं खूप गप्पा मारल्या व मग बनीनें सुचविल्यावरून तिला संध्याकाळच्या जेवणाला ठेवून घेतलें. जेवणा-नंतर आम्हीं चौघें शेक्सपिअरचें उत्तम व हास्यरसपूर्ण नाटक Much Ado About Nothing हें पाहावयास गेलों. नट व नटींनीं नाटक केलेंही छान! Benedick व Beatrice चें जोडपें Gielgud व Dorothy Green यांनीं चांगलें वठवलें. आम्हांला नाटक फार आवडलें व आम्हीं खूप हंसलों. नाटकगृहांत प्रेक्षक अगदीं थोडे पाहून वाईट वाटलें. शेक्सपिअरचीं नाटकें पाहणें फॅशनेबल समजलें जात नसावेंसें वाटतें!

## तारीख ३ एप्रिल

आमचे मित्र व्हॅानबॅाक्स हे आमच्याकडे दुपारच्या जेवणाला आले; आणि शफीच्या दुकानांत चांगलें चमचमीत देशी पद्धतीचें जेवण झाल्यावर आम्हीं होटेलांत परत येऊन खूप गोष्टी केल्या. चहा प्याल्या-नंतर तीं घरीं गेलीं.

## तारीख ४ एप्रिल

दुपारच्या जेवणानंतर आम्हीं दोघेंजण Hyde Park या बगिच्यांत गेलों ऊन चांगलें पडलें होतें आणि Serpentine सरोवरामध्ये पुष्कळ लोक होड्यांतून सहल करीत होते. कांहीं बागेत फिरत होते, तर कांहीं नुसते उन्हांत बसले होते. बदकें व राजहंस पक्षी पाण्यांत चालत होते. झाडांना नवी पालवी फुटूं लागली होती. पिवळ्या Daffodil फुलांच्या कळ्या खूप आल्या होत्या आणि कांहीं थोडीं Daffodil चीं फुलेंही

फुललीं होतीं. नंतर संध्याकाळीं सुलू आमच्याकडे आली व रात्रीच्या जेवणाला राहिली.

## तारीख ५ एप्रिल

आज आमच्या होटेलांत लोकांची इतकी गर्दी होती कीं होटेलमध्यें वस्तीला राहणाऱ्या लोकांना सकाळच्या न्याहारीसाठीं व दुपारच्या जेवणासाठीं रांगेत उभें राहून वाट पहावी लागली. सुलू आमच्याकडे रात्रीं जेवावयास आली होती. तिची व आमची ही येथली शेवटचीच भेट असल्यामुळें, जेवणानंतर आम्हीं तिचा निरोप घेतला व तिला टॅक्सीमधून तिच्या वस्तीच्या जागीं पोंचविली.

## तारीख ६ एप्रिल

Barratts of Wimpole Street ( बॅरट्स् ऑफ् विंपोल स्ट्रीट ) हें नाटक पाहण्यास आम्हीं संध्याकाळीं गेलों. प्रसिद्ध आंग्ल कवयित्री Elizabeth Barratt Browning ( इलिझाबेथ बॅरट् ब्राउनिंग ) हिच्या चरित्राच्या आधारानें हे नाटक रचलें असून तें फारच छान साधलें आहे. नाटकांतील अभिनयसुद्धां उत्तम वठला. प्रसिद्ध नट Sedric Hardwicke ( सेड्रिक् हार्डविक् ) यानें केलेली इलिझाबेथच्या जुलमी बापाची भूमिका अत्यंत प्रेक्षणीय झाली. रंगभूमिवरचें त्याचें वागणें इतकें स्वाभाविक झालें, कीं त्याच्या जुलमामुळें त्याच्या मुलांना झालेलें दुःख पाहून प्रेक्षकांचें मन त्याच्याविषयींच्या तिरस्कारानें भरून गेलें. कवि रॉबर्ट ब्राउनिंग व इलिझाबेथ यांच्याही भूमिका छान झाल्या.

## तारीख ७ एप्रिल

सकाळीं थोडी खरेदी करून, मग संध्याकाळीं इतिहासप्रसिद्ध फ्रेंच मुलगी जोन् ऑफ आर्क हिच्या चरित्राच्या आधारानें लिहिलेलें बर्नार्ड शॉ याचें सेंट् जोन् हें नाटक पाहण्यास गेलों. सिबिल थॉर्नडाइक या प्रसिद्ध

नटीनें जोनूची भूमिका छान केली, आणि जरी ती नटी पोक्त वयाची आहे, तरी रंगभूमिवर ती एखाद्या तरुण, निष्कलंक, अडाणी व भोळसट खेडेगांवच्या मुलीप्रमाणें दिसली व वागली. या नाटकांत मध्येंमध्यें मोठीं लांब भाषणें असल्यामुळें नाटक थोडें कंटाळवाणें झालें आहे.

## तारीख ८ एप्रिल

सकाळीं थोडी खरेदी करून आलों. नंतर दुपारीं स्वतःच्या पंचवीस वर्षांपूर्वीच्या जुन्या ओळखीच्या बाई मिसेस प्लॅट आमच्याकडे जेवावयास आल्या. त्यांची व स्वतःची इतक्या वर्षांनंतर गांठ पडल्यामुळें साहजिकच त्यांच्या जुन्या गोष्टी निघाल्या. आमच्या होटेलांत सोळाव्या लुईची खोली ( Loux XVI Room ) नांवाची एक खास खोली आहे, तेथें अतिशय चांगल्या पदार्थांचें व भरपूर असें स्पेशल जेवण देतात. त्या ठिकाणीं आम्हीं आमच्या पाहुण्याबाईंना घेऊन जेवावयास गेलों. जेवणानंतर The Belle Of New York (धी बेल ऑफ न्यूयॉर्क) हें जुन्या काळचें हास्यरसपूर्ण संगीत नाटक पुनः रंगभूमीवर आणलें आहे त्याचा खेळ पाहावयास आम्ही गेलों. असल्या सर्व नाटकांत दिसून येणारे सुंदर पोषाख, रम्य देखावे आणि चांगलें संगीत हीं सर्व या नाटकांत होतीं. नाटक संपल्यावर आम्ही मिसेस प्लॅटना एका दुकानांत चहाला घेऊन गेलों व चहानंतर त्यांचा निरोप घेतला.

## तारीख ९ एप्रिल

The Old Curiosity Shop ( धी ओल्ड क्युरिऑसिटी शॉप् ) या दुकानाला दुसरी भेट दिली. येथें आम्हांला एक मनुष्य भेटला, त्यानें आपण अमेरिकन असल्याचें सांगून आमच्याकडे चांगल्या गोष्टी केल्या. मुंबईच्या एका पारशी गृहस्थांची व आपली चांगली ओळख असल्याचेंही त्यानें सांगितलें, व आम्हांला एखाद्या दिवशीं दुपारच्या जेवणाला बोलावण्याचें वचन त्यानें दिलें. त्याच्या गोड बोलण्याचालण्यानें आम्हांला पुरती भुरळ

पडली. होटेलमध्यें परत जाण्याकरितां बसमधून उततांना तों बाजूच्या पायवाटेवर आमच्या जुन्या ओळखीची मिसेस् प्लेफेअर् ही बाई भेटली आणि आम्ही तिला आमच्याबरोबर जेवावयास घेऊन आलों. आम्हांला सकाळीं दुकानांत भेटलेल्या अमेरिकन माणसांविषयीं जेव्हां आम्हीं बनीला सांगितलें तेव्हां अर्धवट थट्टेनें तो म्हणाला कीं तो कोणी लफंगा असावा.

आज संध्याकाळच्या जेवणाच्या वेळीं जेवणघरांत इतकी गर्दी होती कीं आम्हांला जेवणासाठीं थांबलेल्या माणसांच्या रांगेत नंबरांवर बसून जेवणाची वाट पाहावी लागली.

## तारीख १० एप्रिल

सकाळीं आम्ही हॅम्स्टेड हीथ् ( Hampstead Heath ) वर गेलों. तेथें चांगले ऊन पडलें होतें व मंद वारा वाहत होता. हा भाग टेकडीवजा होता आणि आजूबाजूला झाडांच्या राया होत्या. कांहीं लोक फिरत होते. तर कांहीं उनांत बसून हवा खात होते. एक लहान कृत्रिम तळें होतें त्यांत कांहीं मुलगे खेळाच्या होड्या चालवीत होते. कांहीं मुली खेळत होत्या व " Here we go round the mulberry Bush "हें गाणें म्हणत होत्या. तें दुरून येणारे मुलांचे आवाज कानाला किती गोड लागत होते! झाडांना बारीक नवीन पालवी फुटत होती, " गॉर्स "च्या झुडपांवर पिवळीं फुलें दिसत होतीं आणि रानामधल्या मोकळ्या जागा रम्य दिसत होत्या. जवळच्या खासगी बागांतील कांहीं झाडें त्यांवरील फिक्कया गुलाबी रंगाच्या फुलांनीं फार शोभून दिसत होतीं. घरीं परत जातांना आम्ही कॅम्डन टाउन ( Camden Town ) या भागांत जाऊन थोडीशी खरेदी केली. रात्रीं जेवणानंतर The King's Messenger ( धी किंग्स मेसेंजर ) या नाटकांतलें Martin Harvey ( मार्टिन हारवे ) या प्रसिद्ध नटाचें काम पाहण्यास गेलों. त्यानें, त्याच्या पत्नीनें व सर्वांनींच आपलीं कामें चांगलीं केलीं. नाटकाच्या प्रारंभालाच रंगभूमिवर खरोखरीच्या वादळाप्रमाणें वादळ झालें; म्हणजे विजांचा चकचकाट व गडगडाट आणि वादळी वाऱ्याचा

आवाज चालू होता. सबंध नाटकांत फक्त एकाच स्थळाचा देखावा होता, व तो एका इटली देशांतील खाणावळीचा होता सबंध नाटकांत एकच देखावा दाखविणें हें नाटक बसविण्याच्या दृष्टीनें काटकसरीचें आहे म्हणून हा प्रघात जास्त प्रचारांत आणावा असें मला वाटतें. नाटकाचें पहिले दोन अंक भावनापूर्ण गूढ असून फार चित्ताकर्षक वाटले; पण शेवटचा अंक अगदीं मिळमिळीत असल्यामुळें फार निराशा झाली.

## तरीख ११ एप्रिल

St. James's Park ( सेंट जेम्सिस पार्क ) मध्यें आम्ही फिरावयास गेलों. हिरव्या हिरवळींतून थोडीं पांढरीं 'डेझी'चीं फुलें व कोठेंकोठें एखादें अस्मानी 'क्रॉकस'चे फूल डोकावून पाहत होतें. पिवळीं 'डॅफोडिल'चीं फुलेंही येथें उमललीं होतीं; लहान झुडपांवर पिवळीं व फिक्या गुलाबी रंगाचीं फुलें दिसत होतीं आणि मोठ्या वृक्षांवर फिक्कट हिरव्या रंगाची थोडी नवी पालवी पारदर्शक असल्याप्रमाणें लकाकत होती. तळ्यांत बदकें व राजहंस पक्षी पोहत होते. मोठीं माणसें हवा खात होतीं व मुलें खेळत होतीं. घरीं परत येतांना पुष्कळ 'डॅफोडिल'चीं फुलें आणि कांहीं सुंदर लहान अस्मानी फुलांचीं झुडपें एका खासगी चौकाभोंवतींच्या बागेंत पाहिलीं.

दुपारच्या जेवणानंतर राजेसाहेबांचें जवाहीर पाहण्यासाठीं म्हणून मुद्दाम आम्ही 'टावर ऑफ लंडन'मध्यें पुनः गेलों. राणीसाहेबांच्या मुकुटांत बसविलेला प्रसिद्ध कोहिनूर हिरा पाहिला. एखाद्या अक्रोडाइतका तो मोठा आहे; पण त्याचा तास जुन्या पद्धतीनें पडल्यामुळें, तो ऑफ्रिकेच्या मोठ्या 'कलिअन्' हिऱ्याएवढा किंवा कांहीं दुसऱ्या लहान हिऱ्याएवढाही तेजःपुंज दिसला नाहीं. निरनिराळे तेजःपुंज हिऱ्यांचे मुकुट व राजेसाहेबांची रत्नखचित तरवार पाहिली. तरवारीच्या सोनेरी म्यानावर रत्नें बसवून त्यांच्या आकृति बनवलेल्या आहेत आणि तरवारीची मूठ हिरेजडित आहे. सोन्याच्या गदेच्या मुठींत तेजःपुंज 'कलिअन' हिरा बसवलेला आहे,

आणि सोन्याचे गोल आहेत, त्यांवर मोत्यें व रत्नेंही पट्टयांच्या आकारांत व क्रूसाच्या आकृतींत बसवलेलीं आहेत; शिवाय, सोन्याचें सरापात्र, वरतीं सुंदर नक्षीकाम केलेलें, लहान मुलांना ख्रिस्ती धर्माची दिक्षा देण्याचें पात्र आणि अनेक मोठ्या सोनेरी गदा येथें ठेविलेल्या आहेत. याशिवाय, राजे-साहेबांच्या वतीनें रयतेला बहाल केल्या जाणाऱ्या पदव्यांचे द्योतक असे जे बिल्ले व गळयांत घालण्याचे पट्टे येथे ठेवलेले आहेत, त्यांत हिंदुस्थानांतील लोकांना दिल्या जाणाऱ्या पदव्यांचींही चिन्हें होतीं.

'टावर ऑफ लंडन'हून परत आल्यावर आम्हीं 'स्टयुअर्टच्या दुकानांत चहा घेतला. या दुकानाच्या बाहेरच्या बाजूला या देशांतील आचाऱ्यासारखें एक बाहुलें करून ठेवलें होतें, त्याचे ओठ व डोळे हालत होते, व तें बाहुलें हातांनीं एका पुड्यांतून कागदाच्या जाहिराती बाहेर काढीत होतें. या देशांत मीं पाहिलेल्या जाहिरातींच्या नमुन्यांत मला हा सर्वांत उत्तम वाटला.

## तारीख १२ एप्रिल

आज म्हणजे रविवारीं सकाळीं उत्तम सूर्यप्रकाश व मंद वारा अशी छान हवा झाली होती. दूरच्या ठिकाणीं जाणाऱ्या ज्या बसिस असतात तसल्या एकींत बसून हॅम्प्टन कोर्ट (Hampton Court)ला आम्ही गेलों. तेथें जाताना रिचमंड व बार्न्स हीं टेम्स नदीवरचीं ठिकाणें आम्हांला वाटेंत लागलीं. रिचमंड पुलावरून जातांना टेम्स नदीमध्यें एक लहानसें हिरवेंगार बेट व नदींतून लहान होड्या वल्हवीत जाणारे लोक असा सुंदर देखावा नजरेस पडला; शिवाय, 'बार्न्स कॉमन' नांवाची जागाही दिसली. हिरवीं कुरणें, झाडांझुडपांना नुकतीच फुटत असलेली फिक्कट हिरवी पारदर्शक पालवी आणि गॉर्सच्या झुडपांवरचीं पिवळीं फुलें असा रम्य देखावा या जागीं नजरेस पडला. माणसें फिरत होतीं किंवा हिरव्या गवतावर बसलेलीं होतीं. खासगी बगिच्यांत पिवळीं 'डॅफोडिल'चीं फुलें व निळीं, फिक्कीं जांभळीं व पांढरीं 'हायसिंथ'चीं फुलें शोभिवंत दिसत होतीं.

सबंध वाटभर झाडांना नवी पालवी फुटत असलेली व हिरवींगार कुरणें दिसत होतीं. फळझाडांवरचा सुंदर फिक्कट गुलाबी रंगाचा मोहोरही मधून मधून नजरेला पडत होता.

शेवटीं एकदां 'हॅम्टन कोर्ट'ला पोंचलों! येथल्या बगिच्यांत पिवळा, निळा, पांढरा, फिक्कट जांभळा, तांबडा व गुलाबी हे रंग उधळल्याप्रमाणें दिसत होते; याशिवाय, हिरव्या हिरवळी व सदा हिरवीं असणारीं सोंगटीच्या आकाराचीं 'फर'चीं झाडें हीही होतीं. फळझाडांवर मोतिया रंगाचा, गुलाबी व पांढरा मोहोर दिसत होता. बागेंतील एका लहानशा भागांत बांकदार आळी तयार करून त्यांची एक आकृति बनवली होती. तींत पांढरा मोतिया, निळा, फिक्कट जांभळा अशा अनेक रंगांच्या 'हायसिंथ'च्या फुलांनीं फारच शोभा दिसत होती. बागेंतील पाण्याच्या पाटामध्यें बदकें व राजहंस पक्षी पोहत होते. मुलें कमळाच्या तळ्यांत असलेल्या माशांना पाव खावयास घालीत होतीं. छान पडलेल्या हवेचा पूर्ण फायदा घेण्याच्या हेतूनें लोक बागेंत फिरत होते. 'हॅमटन कोर्ट'च्या बगिच्याला लागून असणाऱ्या नदींत असलेलीं नौका–गृहें ( House boats ) पुन: पाहिलीं. कांचेचीं तावदानें असलेल्या दालनांतील १५० वर्षांचा जुना द्राक्षवेल, जो गेल्या खेपेला एखाद्या मेलेल्या झाडाच्या खोडाप्रमाणें दिसला होता, त्यावर आज सर्वभर हिरव्या पानांचे लहान पुंजके फुटत असलेले दिसत होते. फ्रान्स देशांतील 'व्हरसाय' ( Versailles ) येथील राजवाड्याची रचना करणाऱ्या माणसानेंच याची रचना केली असें आम्हांला सांगण्यांत आलें. एकंदरीनें पाहतां आजच्या एकंदर प्रवासांत सुंदर प्रदेशांतील एक छान भाग आमच्या नजरेस पडला.

## तारीख १३ एप्रिल

आज दुपारच्या जेवणानंतर Hcogwerfs ( हुगवर्फस ) चा निरोप घेण्याकरितां त्यांच्याकडे गेलों. त्यांच्याकडे बेस्ट् डलिचला जाण्यास छान लांबचा पल्ला मारावा लागला, आणि मग त्यांच्याकडे चहा घेऊन घरीं परतलों.

## तारीख १४ एप्रिल

दुपारच्या जेवणाला प्रसन्न सोनेजी आला, आणि वनीचे मित्र श्री. डायझ् हे संध्याकाळच्या जेवणाला आले.

## तारीख १५ एप्रिल

इंग्लंडचे भारतमंत्री श्री. वेजवूड बेंच यांच्या पार्टीला पहिल्यानें भेट होऊन नवीनच ओळख झालेले 'लक्समोअर्स' यांच्याकडे चहाला गेलों. कर्नल लक्समोअरच्या मजेदार बोलण्यानें आमची बरीच करमणूक झाली.

संध्याकाळच्या जेवणानंतर शेक्सपिअर्चें 'किंग लिअर्' हें नाटक पाहावयास गेलों. 'लिअर्'ची भूमिका घेणारा 'गीलगूड' आपलें भाषण मोठ्यानें ओरडत होता, तरी ती भूमिका चांगली वठली नाहीं. त्या राजाची मुलगी कॉरडीलिआ हिचा अभिनय इतका चांगला झाला कीं तिचें भाषण ऐकून डोळ्यांना पाणी आलें. 'केंट'चा व 'एडगर्'चा भागही चांगला झाला; पण नाटकामधल्या 'फूल' (विदूषक) चा भाग त्यानें 'ट्वेल्फ्थ् नाईट' या नाटकांत केल्याप्रमाणेंच बहारीचा केला, त्याचा अभिनय त्याच्या भूमिकेशीं तंतोतंत जुळणारा, हुबेहुब खऱ्यासारखा व परिणामकारक असल्यामुळें त्याची भूमिका उत्तम वठली. आज नाटकगृह भरलेलें होतें.

## तारीख १६ एप्रिल

'क्रिस्टल् पॅलेस्' ही इमारत पाहावयास गेलों. ढग आल्यामुळें दिवस कसा अंधारा झाला होता. जरी याचें नांव राजवाडा असें आहे, तरी ही एक नुसती अवाढव्य इमारत असून हिचा नेहमीं प्रदर्शनें भरविण्यासाठीं उपयोग करण्यांत येत असल्यामुळें, या इमारतीचें छप्पर व भिंती सर्व कांचीच्या केलेल्या आहेत. आज तेथें कसलेंही प्रदर्शन नव्हतें. इमारतीच्या मध्यभागीं एक मोठें जलशाचें दालन (कॉन्सर्ट हॉल) असून त्यांत एक मोठें वाजवावयाचें 'ऑर्गन्' आहे. हॉलच्या दोन बाजूंना लहान लहान खोल्या असून त्यांचें बांधकाम व चितारलेल्या भिंती इजिप्त व टर्की या देशांतल्या

इमारतींच्या धर्तीवर केलेल्या आहेत. या ' क्रिस्ल् पॅलेस ' ला शोभा आणणाऱ्या ज्या कांहीं गोष्टी आहेत, त्यांत एक कांचेचा कारंजा, जिवंत ' सोनेरी ' मासे असलेलें एक तळें, जिवंत पक्षी आंत असलेले पिंजरे आणि मातीच्या कुंड्यांत असलेलीं मोठीं खजुरीचीं झाडें हीं आहेत. शिवाय, या इमरतीच्या सर्व भागांतून युरप खंडांतील प्राचीन व प्रसिद्ध पुतळ्यांच्या अनेक नकला करून ठेवलेल्या आहेत. या नकलांपैकीं कांहीं आकृति इतक्या उत्तम व खऱ्यासारख्या साधल्या आहेत, कीं त्या ज्यावरून तयार केल्या ते मूळचे पुतळे कितीतरी उत्तम असले पाहिजेत असें मला वाटलें. येथें एका ठिकाणीं तांदूळ कांडणें, वगैरेसारखे घरगुती उद्योग करणाऱ्या महाराष्ट्रीय बायकांच्या अगदीं लहान मातीच्या प्रतिमा पाहून मला मौज वाटली. तेथें एक सुंदर बारीक नक्षीकाम केलेली अशी छान हस्तिदंती चिनी बोटीची प्रतिमा होती, तिच्यांत माणसांच्यासुद्धां लहान प्रतिमा केलेल्या होत्या. प्रिन्स् ऑफ वेल्सची कॅनडा देशांतील जी जमीन आहे तिची प्रतिमा येथें करून ठेवलेली आहे. ती एवढी मोठी आहे कीं तिनें एखाद्या साधारण मोठ्या खोलीचा जवळजवळ अर्धा भाग भरेल. ही प्रतिमा खऱ्यासारखी केली असून तिच्यांत बंगला, बगिचा, टेनिस्कोर्ट, गाईंचे गोठे व घोड्यांचे तबेले हें सर्व कांहीं केलेलें आहे. तेथें कृत्रिम घोडेसुद्धां आहेत, आणि गुरें व मेंढरें कुरणांत चरतांना दाखवलीं आहेत; आणि या सर्व इस्टेटीच्या पाठीमागे कॅनडा देशांतील रानवट डोंगराळ प्रदेशाचा देखावा करून दाखविला आहे. या सर्व प्रेक्षणीय वस्तूंशिवाय या 'क्रिसल पॅलेस'मध्यें एक सिनेमा-गृह, प्रवाशांना आठवणीदाखल वस्तु विकणारीं लहान दुकानें, पोस्ट व तारऑफिसें व खाण्यापिण्याचीं दुकानें हें सर्व होतें. कांहीं गंमतीचीं यंत्रें तेथें होतीं. त्यांत कांहीं बायकांच्या प्रतिमा होत्या. त्यांपैकीं एखादीच्या बाजूच्या फटींतून एक 'पेनी'चें नाणें आंत टाकलें कीं त्या टाकणाऱ्या माणसाला त्याच्या नशिबांत असलेल्या गोष्टींचें छापलेलें कार्ड ती बाई काढून देई. एक संगीतानें भरलेली पेटी होती, तिच्यांत एक 'पेनी' टाकल्याबरोबर आम्हांला तितक्या किंमतीचें संगीत ऐकूं आलें.

'क्रिसल पॅलेस' पाहून झाल्यावर आम्ही दुपारच्या जेवणाला दाणींच्या घरीं गेलों व चहाच्या वेळेपर्यंत त्यांच्याकडे गोष्टी बोलत बसलों. चहानंतर त्यांच्या सर्व कुटुंबाबरोबर आम्ही फिरायला गेलों. शहराबाहेर फिरावयास गेलें असतां जसा देखावा दिसतो तसा देखावा नजरेला पडला, आणि रंगीत फुलांनीं शोभिवंत दिसणारे असे कांहीं सुंदर बाग पाहिले. जांभळट, गुलाबी आणि निळी ' हायसिंथ् ' चीं फुलें आणि थोडीं ' ट्युलिपचीं ' व ' डॅफोडिल् ' चीं फुलेंही नजरेला पडलीं. प्रसिद्ध इंग्रज कादंबरीकार ' डिकन्स् ' हा एका काळीं राहत होता तें ' पिक्विक् कॉटेज ' नांवाचें घर आम्हांला दाखविण्यांत आलें.

## तारीख १७ एप्रिल

सुरतेंतील आमच्या ओळखीचे ' स्लेनीज ' यांच्या व त्याच्या ' मॅक्वेड्स ' नां भेटण्यासाठीं म्हणून आम्ही बऱ्याच लांब असलेल्या ' केंटन ' या ठिकाणीं गेलों. ' केंटन ' हा भाग नवीन वसलेला व त्यामुळें शांत असा असल्यामुळें, येथें खेडेंगांवांत आल्याप्रमाणें वाटलें. ' मॅक्वेडस् ' च्या चिमुकल्या घरांत चहा घेऊन त्यांच्याकडे गोष्टी केल्या. बोलतां बोलतां आढळून आलें कीं कांहीं आमच्या ओळखीचीं माणसें त्यांच्याही ओळखीचीं होतीं; त्यांपैकीं एक म्हणजे माझी कॉलेजांतील वर्गभगिनी किटी बर्न ! ( आतां मिसेस ग्रीन ) संध्याकाळीं परत गेल्यावर आमच्याकडे आमची नवीन ओळख झालेली जर्मन मुलगी ' मिस फेत ' ही जेवावयास व गोष्टी बोलण्यास आली.

## तारीख १८ एप्रिल

रत्नागिरीमधल्या आमच्या ओळखीच्या मिसेस फॉक्स यांना त्यांच्या घरीं भेटावयास गेलों असतांना तेथें त्यांचीं मुलें भेटलीं. तेथें चहा घेतला व जुन्या काळच्या आठवणी काढल्या. नंतर दनीचे मित्र श्री. डायज यांच्या हॅंपस्टेड येथल्या जागीं चहाला गेलों. आजचा दिवस अतिशय थंडीचा व पावसाचा असा होता; आणि तरी आज मध्यरात्रीपासून सरकारी हिशेबाप्रमाणें उन्हाळ्याला सुरुवात होणार होती !

## तारीख १९ एप्रिल

बनीचे मित्र मेहता हे आमच्याकडे दुपारीं जेवावयास आले. ' उन्हाळ्याचा ' हा पहिला दिवस अतिशय थंड व पावसाचा होता. श्री. मेहतांशीं मनोरंजक बोलणेंचालणें झालें. नंतर लंडन शहरांतील एका गरीब वस्तीच्या ठिकाणीं एका अगदीं लहानशा घरांत डॉ लाड यांच्याकडे आम्ही दोघें चहा घेण्यास गेलों असतां तेथें डॉक्टरांची इंग्रजी पत्नी भेटली. तेथें मुंबईचे डॉ. व मिसेस नोऱ्होना व डॉ. लाडांचा एक जवळचा नातलग ही मंडळीसुद्धां भेटली.

रात्रीं इतकी थंडी पडली कीं आमच्या निजावयाच्या खोलींत रात्रीं विजेचा ' हीटर ' ( खोली गरम करण्याचें यंत्र ) मागून घ्यावा लागला.

## तारीख २० एप्रिल

आज बनीचा वाढदिवस ! म्हणून दुपारीं आम्ही आमच्या हॉटेलांतील जेवणगृहाच्या ' सोळाव्या लुईची खोली ' नांवाच्या एका विशिष्ट भागांत जाऊन उत्तम जेवण जेवलों. जेवण आटपल्यावर Good afternoon ( गुड आफ्टरनून ) नांवाचा खेळ पाहावयास नाटकगृहांत गेलों मुलांमुलींच्या शाळेच्या बक्षीससमारंभाच्या वेळीं ज्याप्रमाणें लहानलहान संभाषणें, नाच वगैरे करतात तसल्या लहानलहान गोष्टींचा हा खेळ मुद्दाम लहान मुलांकरितां केला होता. तो चांगला असून आमच्यासारख्या मोठ्या माणसांसही तो मनोरंजक वाटला. यामध्यें सांकेतिक नाच, एक मूकनाटिका, हावभावयुक्त गाणीं व त्यांना साजेशी रंगभूमीवरली सजावट अशा तऱ्हेचे भाग होते. 'टिन जी जी' ( Tin gee gee ) नांवाचा एक भाग फार मजेदार वाटला. खेळण्याच्या दुकानांतील एका भागाची कार्डबोर्ड कापून तयार केलेली नक्कल रंगभूमीवर ठेवली असून त्यांत दाखविलेल्या अनेक खेळण्यांमध्यें दोन मुलगे ( बाहुले ) व एक बाहुली अशा तीन बाहुल्या होत्या; पण या तीन बाहुल्यांचीं डोकीं मात्र खऱ्या माणसांचीं होतीं ! हीं माणसें त्या बाहुल्यांच्या धडांच्या मागें उभीं होतीं. बाहुली

जी होती ती त्या दोन बाहुल्यांतील जो जास्त किंमतीचा होता त्याच्याशीं जास्त सलोखा दाखवीत होती. हें पाहून त्या कमी किंमतीच्या बाहुल्यानें दुकानांतील मुलीकडे कुरकुर केली. त्याबरोबर त्या मुलीला दया येऊन तिनें ते दोन बाहुले होते त्यांच्या किंमतीच्या चिठ्यांची अदलाबदल केली; त्याबरोबर ती बाहुली त्या दुसऱ्या बाहुल्याशीं सलोखा करूं लागली; कारण आतां त्याच्या गळ्यांत जास्त किंमतीची चिठी लटकली होती!

संध्याकाळच्या जेवणानंतर आम्ही तिघेंजण 'धी बेल ऑफ न्यूयॉर्क' (The Belle of new york) हें नाटक दुसऱ्यांदां पाहावयास गेलों. यांतलीं गाणीं कानांत घुमत राहणारीं अशीं होतीं. सारखा पोषाख केलेले पोर्तुगीज जुळे भाऊ एकदम एकाच वेळीं बोलत व हावभाव करीत; त्यामुळें ते मजेदार दिसत. 'डॉरथी वॉर्ड' ही पोक्त वयाची नटी असून तिनें एका तरुण मुलीची भूमिका घेतली होती, आणि ती दिसतही होती तशीच. 'जॉनी शोफील्ड' (Johnny Schofield) चें सर्वत्र बोलणें शिळीमध्यें असूनसुद्धां स्वच्छ एकूं येऊन मनोरंजक वाटलें. या नाटकांतील अभिनय चांगला वठून तें मनोरंजक वाटलें.

## तारीख २१ एप्रिल

आज दुपारच्या जेवणाला प्रसन्न सोनेजी आमच्याकडे आला होता. तो गेल्यावर आम्ही दुपार 'रीजेंटस पार्क' या बगिच्यांत फिरून तेथील सुंदर फुलें पाहण्यांत घालविली संध्याकाळच्या जेवणानंतर 'एव्हरग्रीन' नांवाचें हास्यरसप्रधान संगीत नाटक पाहण्यास आम्ही गेलों नाटकांतील संगीत कानाला गोड व कांहींसें पौर्वात्य संगीताप्रमाणें लागलें. पात्रांचे पोषाख सुंदर असून कांहींवर रुपेरी बगडीचें काम केलेलें होतें; आणि देखावे तर फार भपकेबाज होते. एक देखावा जत्रेचा होता. दुसरा एक 'काबारे'चा देखावा (यांत नाच, गाणीं, खाद्यपेयें वगैरे असतात) होता, त्यांत कितीतरी दिवे आणि माणसांची गर्दी आणि गडबड, सर्व कांहीं अगदीं भरपूर होतें. या नाटकगृहाला 'फिरती रंगभूमि' होती, त्यामुळें एका क्षणांत

समोरचा देखावा भरकन् नाहींसा होऊन त्याच्या जागीं दुसरा देखावा लागलाच तयार होई. आणखी एक नवलाईची गोष्ट या रंगभूमीवर पाहिली ती ही, कीं एकाच वेळीं चार निरनिराळ्या खोल्यांत होणाऱ्या घडामोडी आमच्या नजरेला पडल्या. यांपैकीं दोन खोल्या तळमजल्यावर व दुसऱ्या दोन खोल्या त्यांच्यावर म्हणजे पहिल्या मजल्यावर होत्या. दुसरा एक देखावा स्पेन देशांतील एका देवळाच्या उत्सवाचा होता; पाद्री लोकांची मिरवणूक, मूर्ति, मेणबत्त्या, वगैरे उत्सवांतील सर्व भपका दाखविला होता. एका नटीने कसरतीचा नाच करून दाखविला. तिनें आपल्या शरिराच्या अनेक प्रतीनें घड्या केल्या, व तिला इकडून तिकडे चेंडूसारखें फेकण्यांत आलें व दोरीसारखे झोंके देण्यांत आले. स्पेन देशांतील बाजाराच्या एका देखाव्यांत या बाईला एखाद्या सापाप्रमाणें टोपलींत घालून आणलें व ती सापाप्रमाणें विळखे देतच त्या टोपलींतून बाहेर आली. तिने घातलेला मोराच्या पिसांच्या रंगाचा खवलेदार पोषाख सापाच्या कातडीसारखा दिसत असल्यामुळें हा भास जास्त वठला. जत्रेच्या देखाव्यामध्यें खऱ्या जत्रेंत असतात त्याप्रमाणें अनेक इमारती, वाटोळीं फिरणारीं हत्तीघोड्यांचीं चक्रें, विजेच्या दिव्यांची रोशनाई वगैरे सर्व होतें. एक नाचगाण्याचा लहानसा कार्यक्रमसुद्धां या जत्रेंतील एक भाग म्हणून दाखविला; म्हणजे या मोठ्या खेळामधला तो एक लहानसा खेळ होता म्हणावयाचा!

## तारीख २२ एप्रिल

'ॲक्टन' येथें आमच्या ओळखीच्या मॅकिननिंजच्या घरीं चहाला गेलों, पण ती संध्याकाळ एकंदरीनें पाहतां कंटाळवाणी गेली; कारण मि. मॅकिननिंखेरीज बाकी सर्व मंडळी जरा सुस्तशी बसली होती व त्यामुळें बोलणेंचालणें फारसे झालें नाहीं.

## तारीख २३ एप्रिल

दुपारच्या जेवणानंतर बनीला 'केंब्रिजच्या' आगगाडींत बसलेला पाहून त्याचा आम्हीं हिंदुस्थानांत परत जाण्याच्या पूर्वीचा शेवटचा निरोप घेतला.

त्यावेळीं आम्हीं सर्वांनीं आमचीं मनें घट्ट केलीं व धीरानें वागलों. होटेलांत परत जातांना वाटेंत 'व्हॉनब्रॉक्स' भेटली. होटेलांत आम्ही गोष्टी बोलत बसलों व नंतर त्यांनीं आम्हांला चहा दिला. संध्याकाळच्या जेवणाच्या वेळीं आमचीं मनें दुःखानें भारावलीं असल्यामुळें आम्ही गप्प व उदास बसलों होतों; आणि नंतर बनीला सोडून लौकरच दूर जाणार या विचारानें उत्पन्न होणाऱ्या दुःखी मनोभावनांना आम्हीं आमच्या निजण्याच्या खोलींत मोकळी वाट करून दिली.

## तारीख २४ एप्रिल

सकाळीं दुकानांत जाऊन आम्हीं थोडीशी खरेदी केली, आणि दुपारीं प्रसन्न सोनेजी आमच्याकडे जेवावयास आला. दुपारीं 'कॉलिसिअम्' नाटक-गृहामध्यें 'व्हाइट हॉर्स इन्' हें नाटक पाहावयास आम्ही गेलों. हें नाटक-गृह फार भपकेबाज आणि अतिशय मोठें आहे. नाटकगृहाचा आंतला भाग नक्षीदार असून, तो आणखी सुशोभित करण्यासाठीं फुलांच्या कुंड्यांही ठेवल्या होत्या. बसावयाच्या खुर्च्यासुद्धां आरामशीर होत्या. नाटकांतील संविधानक ऑस्ट्रिया देशांतील जीवनावरून रचलेलें असल्यामुळें, नाटक-गृहांतील पुरुष, स्त्रिया व नोकरांनीं त्या देशांतल्या सारखाच पोशाख केला होता. एकंदरींत हें नाटक म्हणजे आश्चर्यानें थक्क करून सोडणारें झालें. रंगभूमीवर पाठीमागल्या भागांत वर्फाच्छादित Alps ( आल्पस ) पर्वत असून, त्यावर 'पाइन्' झाडांचीं रानें, डोंगराच्या हिरव्या उतरणी, एक झोंपडी, धो धो पाणी वाहणारा खऱ्यासारखा दिसणारा धबधबा, एक पूल व खरीं जिवंत डोंगराळ प्रदेशांतील बकरीं होतीं. पुढील भागांत एक सरोवर होतें, व त्याच्या आजूबाजूला लहान झोंपडीं होतीं आणि White Horse In ( व्हाइट हॉर्स इन् ) नांवाच्या होटेलाच्या सुंदर व खऱ्यासारख्या दिस-णाऱ्या इमारती होत्या. या होटेलाच्या बागेंत खाण्यापिण्यासाठीं टेबलें मांड-लेलीं होतीं. नाटकांत देखावे वेगवेगळे आणि खऱ्यासारखे दिसणारे होते. एका देखाव्यांत एक गाईचा गोठा होता. त्यांत चार खऱ्या गाईएवढ्या



लेमन सरोवर [पृ. २०३



'लीडो'च्या किनाऱ्यावरील कपडे बदलण्याच्या खोल्या [पृ. २०६

मोठ्या कृत्रिम गाईचें दूध काढलें जात होतें. त्या आपल्या माना व जबडे खऱ्या जिवंत गाईप्रमाणें हालवीत होत्या. एक खऱ्या घोड्याची गाडी रंगभूमीवर आली व एक कुक् कंपनीची बस प्रवासी लोकांनीं भरलेली आणि बरोबर एक मार्गदर्शक असलेली अशीसुद्धां रंगभूमीवर आली. सरोवरावर एक बोट हळूहळू पुढें आली. तिच्या बंबांतून धूर निघत होता. त्या बोटींतून आलेला ऑस्ट्रिया देशाचा बादशहा जोसेफ हा खऱ्या बादशहासारखा दिसला, व त्याला घेण्यास खेडेगांवांतील लोकांचा एक घोळकाच्या घोळका सामोरा आला. एक दृष्य असें होतें कीं त्यांत आम्हीं आकाशांत हळूहळू ढगें येतांना पाहिलीं. नंतर विजांचा लखलखाट व कडकडाट सुरू झाला आणि कांहीं वेळानें खरा पाऊस पडूं लागला; त्याबरोबर रंगभूमीवर जवळजवळ शंभर माणसें निरनिराळ्या रंगांच्या छत्र्या घेऊन हजर झालीं. एका देखाव्यांत सार्वजनिक स्नानगृहें दाखविलीं होतीं, आणि दुसऱ्या एका दृष्यांत बाजाराचा दिवस दाखविला असून मांस, भाज्या व फळफळावळ यांनीं भरलेल्या टोपल्या घेऊन जात असलेल्या मुली दिसल्या. शेवटच्या देखाव्यांत एका उन्हाळ्यांतील रात्रीं सरोवरांत सभोवार केलेल्या सहलीचें दृष्य दाखविलें होतें. रंगभूमि वाटोळी फिरवून तिच्या निरनिराळ्या भागांवर असलेले निरनिराळे सुंदर देखावे एकामागून एक प्रेक्षकांच्या नजरेपुढें आणून हें शेवटचें दृष्य तयार केलें होतें. सरोवराच्या धक्क्याकडे दिव्यांची रोशनाई केलेली ती बोट, राईतलें दिव्यांचा लखलखाट असलेलें खाद्यपेयांचें दुकान, एका खेडेगांवाच्या जत्रेंतील दिव्यांनीं सुशोभित केलेल्या झोपाळ्यांवर झोंके घेत असलेल्या मुली; आणि शेवटीं तो पहिल्यानें दाखविलेला सबंध देखावा हिरवा डोंगराचा उतार, तीं झोंपडी व पूल, तो वाहणारा पाण्याचा धबधबा आणि डोंगरावरची बकरीं अशा अनेक मनोरम दृष्यांचा घडविलेला हा नाटकांतील शेवटचा प्रवेश होता.

'टीरोलीज' ( Tyrolese ) पुरुषांचे कांहीं सुंदर नाच या नाटकांत पाहिले. 'धी सॉंग ऑफ धी ड्रम' ( The song of the Drum ) या नाटकांतल्या सारखीं कांहीं खरीं जिवंत जनावरें या नाटकांतही होतीं;

आणि ‘ एव्हरग्रीन ’ ( Evergreen ) या नाटकाप्रमाणें कांहीं डोळ्यांना दिपवून सोडणारीं दृष्येंही यांत होतीं. ‘ व्हाइट हॉर्स इन ’ ( White Horse Inn ) या नाटकांत वरील दोन नाटकांतील विशेष गोष्टी असून शिवाय, आणखी अनेक याच प्रकारच्या मनोवेधक गोष्टींचा त्यांत समावेश केलेला असल्यामुळें, हें नाटक त्या दोन नाटकांपेक्षां जास्त सरस होतें.

संध्याकाळच्या जेवणाला ‘ मिस फेत ’ ( miss fath ) ही जर्मन बाई आमच्याकडे आली होती. इंग्लंड देशांतील वस्तीची आमची ही शेवटचीच रात्र होती.

## तारीख २५ एप्रिल

दुपारच्या आधींच आम्हीं लंडन सोडलें. दोघे व्हॉनवॉक्स, श्री. दाणी आणि मिस फेत हीं आम्हांला व्हिक्टोरिआ स्टेशनवर निरोप देण्यास आलीं होतीं. इंग्लंडांतील आगगाडीचा प्रवास संपवून व नंतर बोटींतून ‘ खाडी ’ ( The British Channel ) चा प्रवास करून मग फ्रान्स देशांतील आगगाडींत बसलों. दोन्ही देशांतील प्रवासांत रम्य सृष्टिशोभा पाहिली. फळझाडांवर पांढरा, मोतिया रंगाचा व गुलाबी मोहोर होता. हिरव्या किनाऱ्यांवर पिवळीं रानटीं फुलें फुललीं होतीं. तशीच इंद्रधनुष्याची सुंदर व सबंध कमान नजरेला पडली, व तिच्याच एका बाजूला तिची पुसट पडछाया दिसत होती. पॅरिसला पोंचल्यावर गार दु नॉर ( Gare du Nord ) या स्टेशनावर आम्ही उतरलों आणि टॅक्सींत बसून गार् द लिऑं ( Gare de Lyons ) या स्टेशनावर गेलों. दुपारचें जेवण आगगाडींत उशिरां झाल्यामुळें, या स्टेशनावर संध्याकाळच्या जेवणाच्या बदलीं आम्हीं फक्त कॉफी व बिस्किटें घेतलीं, आणि स्वित्झरलंड देशांत जाणाऱ्या आगगाडींत ‘ वागोंली ’ ( Wagonlits ) या आगगाडींतील आरामशीर बिछान्यावर निजलों.

## तारीख २६ एप्रिल

अगदीं सकाळीं आगगाडीवरच आमच्या मालाची जकातखात्यातर्फे तपासणी झाली. आम्ही स्वित्झरलंडमधल्या डोंगराळ प्रदेशांतून जात होतों. टेकड्यांवर खेडेंगांवें वसलेलीं दिसत होतीं; आणि मधूनमधून फुलें नजरेला पडत होतीं; त्यांत कांहीं सुंदर जांभळट रंगाचे फुलांचे झुबके दिसले. 'व्हेव्हे' च्या स्टेशनावर उतरुन स्टेशनाजवळच असलेल्या एका होटेलांत गेलों, तेथें आमच्या स्वागतार्थ मिसेस जॉलींनीं पाठविलेलें पत्र आधींच आलें होतें ते आम्हांला मिळालें. दुपारीं मिसेस जॉली स्वतः आमच्या होटेलांत येऊन आम्हांला टेकडीवरल्या त्यांच्या लहानशा घरा (Chalet) मध्यें घेऊन गेल्या. तथें जातांना रम्य सृष्टिशोभा आमच्या नजरेला पडली. बर्फाच्छादित 'आल्पस' (Alps) पाठीमागें व पुढे Leman सरोवर दिसत होतें. आमच्या आसपासच्या डोंगराच्या उतारावर घरें वसलेलीं होतीं आणि आसपास पारदर्शक हिरव्या रंगाची नवी पालवी फुटलेलीं झाडें, पांढऱ्या मोहोराने भरलेलीं फळझाडें आणि हिरव्या कुरणांत उगवलेलीं पिवळीं रानटी फुलें दिसत होतीं. मिसेस जॉलीचा 'शाले' म्हणजे एक लहानलहान खोल्यांचें छोटेसें टुमदार घर होतें. त्या घराला एक सुंदरशी लहान उतरती बाग होती. तिच्यांत निरनिराळ्या रंगांचीं फुलें उमलूं लागलीं होतीं; शिवाय, बागेत 'स्ट्रॉबेरी' फळांचे रोपे, 'रासबेरी'चीं ताडें, 'गूजबेरी'चीं झुडपें, गुलाबी मोहोराचीं 'पीच'चीं झाडें आणि पांढऱ्या मोहोराचीं दुसरीं अशींच फळझाडें होतीं. आम्हीं सबंध संध्याकाळ तथेंच गप्पागोष्टींत घालवली आणि आमचा चहा व संध्याकाळचें जेवणही तेथेंच झालें. त्यांच्या दोन मुलींना मी लहानशा वस्तु देणगीदाखल दिल्या, आणि रात्रीं निजावयाचे वेळीं आम्हीं होटेलांत परत आलों.

## तारीख २७ एप्रिल

सकाळच्या न्याहारीनंतर एका केस धुण्याच्या दुकानांत जाऊन मी केस धुऊन घेतले, आणि नंतर जरी आकाश अभ्राच्छादित होतें तरी आम्हीं सरो-

वराजवळ फिरण्यास गेलों. जवळच असलेल्या सुंदर लहानशा बगिच्यांत आम्ही फिरलों. तेथें निरनिराळ्या रंगांचीं 'पॅन्झी'चीं फुलें, 'फरगेट मी नाटस (Forget me nots) आणि पांढऱ्या, पिवळ्या, गुलाबी आणि तांबड्या 'टयुलिप'च्या फुलांचे मिसळ वाफे होते; व हिरव्या गवतावर पांढरीं 'डेझी'चीं फुलें व पिवळीं फुलें नुसतीं भरलीं होतीं. यानंतर पावसामुळें सर्व दिवसभर आम्ही होटेलांतच बसून राहिलों.

## तारीख २८ एप्रिल

'फ्युनिक्युलर रेल्वे' नांवाच्या विजेच्या तारेवर डोंगरांच्या चढउतारावर चालणाऱ्या आगगाडीनें 'माउन्ट पेलरें' (Mount Pelerin) नांवाच्या डोंगराच्या शिखरावर गेलों. डोंगर चढत असतांना दुतर्फा हिरव्या कुरणांत सुंदर पिवळीं रानफुलें आणि टेकड्यांच्या वळचणींतून बाहेर पडलेले मधमाशांच्या पोळ्यांच्या आकारांचे जांभळट फुलांचे झुबके (मला वाटतें या फुलांचें नांव Edelweiss असें आहे) आम्हीं पाहिले. आमची डोंगरी आगगाडी डोंगरावरील एकदोन स्टेशनांवर थांबली, आणि नंतर ती डोंगराच्या शिखरावर थांबल्यावर आम्ही खालीं उतरलों. येथून सरोवराच्या पलीकडे असलेल्या टेकडीच्या पायथ्याशीं वसलेलें 'व्हेव्हे' शहर आणि त्याच्या पलीकडे असलेल्या बर्फाच्छादित डोंगरांचा देखावा नजरेस पडला. दूर अंतरावर Chillon च्या किल्ल्याचें ओझरतें दृश्य दिसत होतें. आम्ही चढून आलों होतों त्या डोंगराच्या माथ्यावर राहतीं घरें आणि खाद्यपेयांचीं व इतर दुकानें असून सभोंवार आणखी रानटी फुलें उगवलेलीं होतीं. येथल्याच एका दुकानांत आठवणीसाठीं म्हणून कांहीं लहान वस्तु आम्हीं खरेदी केल्या.

दुपारच्या जेवणानंतर मिसेस् जॉली भेटावयास आल्या. आम्ही सर्व बाहेर जाऊन सरोवराच्या बाजूच्या दगडी पायरस्त्यावर फिरलों, आणि नंतर मिसेस् जॉलींनीं तेथल्या एका दुकानांत आम्हांला उत्तम चहा दिला. ती सर्व दुपार आम्ही गप्पागोष्टी करण्यांत आणि बरोबर फिरण्यांत घालविली. नंतर

आम्ही सर्व हॉटेलांत परत गेल्यावर मिसेस जॉलींनीं आमचा शेवटचा निरोप घेतला.

## तारीख २९ एप्रिल

सकाळच्या आगगाडीनें आम्ही व्हेनिसला जाण्यास निघालों. रेल्वेवर कांहीं अपघात झालेला असल्यामुळें, ज्या गाडीनें जाण्याचा आम्हीं बेत केला होता त्या गाडीनें न जातां आम्हांला दुसऱ्या गाडीनें जावें लागलें. त्यामुळें इटली देशांत Milan ( मिलान ) स्टेशनावर आम्हांला गाडी बदलावी लागली. या दुसऱ्या गाडींतून व्हेनिसपर्यंतचा प्रवास गाडींत फार गर्दी असल्यामुळें त्रासाचा झाला. व्हेव्हेपासून Milan पर्यंतच्या प्रवासांत सृष्टिशोभा छान दिसली. हिरवीं शेतें व कुरणें, फळझाडांवरचा पांढरा मोहोर आणि पारदर्शक फिक्कट हिरव्या रंगाच्या नव्या पालवीनें भरलेलीं झाडें नयनमनोहर होतीं; आणि मधूनमधून हिरव्या कुरणांत रानटी फुलेंही उगवलेलीं दिसत होतीं. नंतर आम्हांला Lake Maggiore नांवाचें रम्य सरोवर दिसलें. त्याच्या किनाऱ्यावर मनोहर खेडेगांवें वसलेलीं होतीं, त्याच्यामध्यें असलेल्या बेटांवर लोक राहत होते आणि त्याच्या बाजूला असलेल्या रम्य हिरव्यागार बगिच्यांत लाल, गुलाबी आणि जांभळट फुलें सूर्यप्रकाशांत झळकत होतीं. आमची आगगाडी Garda ( गार्डा ) सरोवराच्याही बाजूनें गेली. 'व्हॅरोना' व 'पॅडचुआ' या शहरांतून आमची आगगाडी जात असतांना पाहून मौज वाटली; कारण शेक्सपिअरच्या नाटकांमध्यें या जुन्या दोन शहरांचा उल्लेख झालेला आहे. आम्ही संध्याकाळीं व्हेनिसला पोंचलों, आणि आगगाडींतून उतरल्यावर 'गाँडोला' होडींत बसून 'ग्रँड कॅनाल' हा कालवा व त्याला जोडणारे लहान पाट यांमधून चांदण्यांत संध्याकाळच्या वाऱ्याची झुळुक खात अशा थाटानें हॉटेलकडे जाण्यास निघालों. या होडींतील सफरीनें आगगाडीच्या प्रवासाचा शीण गेला व शेवटीं आम्ही 'लॅगूना' या भागांत आलों. हा समुद्राचा भाग आंत आलेला आहे; तरी पण तो इतका मोठा आहे कीं खुल्या समुद्रा-

सारखाच तो दिसतो. या 'लॅगूना'च्या बाजूला असलेल्या Hotel Savoia Jolanda नांवाच्या होटेलांत आम्ही उतरलों. हें एक लहानसें खाजगी होटेल होतें, आणि येथील आमच्या खोलींतून 'लॅगूना'वरील 'गँडोलाज' व इतर बोटींचा आणि समोरच्या फरसबंदीवरून चालणाऱ्या लोकांचा मजेदार देखावा दिसत होता.

## तारीख ३० एप्रिल

'सेंट मार्क'च्या चौकांतील दुकानांत व्हेनिसमधल्या प्रसिद्ध कांचकामाच्या कांहीं वस्तु खरेदी केल्या. अगदीं साध्या आउतांनीं कांचेच्या रसापासून कांचेचा धागा कसा करतात व त्याच रसापासून कांचेचे मणी कसे करतात तें आम्ही एका दुकानांत पाहिलें. तसेंच, एका प्रकारच्या सफेत खडी-सारख्या पदार्थानें कांचीवर नाजुक नक्षीदार झालरीसारखें काम करतांना पाहिलें.

व्हेनिस शहरांतील लोकांचें समुद्रस्नान करण्याचें प्रसिद्ध ठिकाण जें 'लीडो' तें पाहण्यास आम्ही लहान वाफेच्या बोटींतून दुपारीं गेलों. बोटींतून उतरून दुतर्फा सुंदर वृक्ष असलेल्या रस्त्यानें आम्ही स्नान करतात त्या किनाऱ्याच्या भागाकडे चालत गेलों, आणि तेथें जातांना वाटेंत आठवणीदाखल कांहीं वस्तु खरेदी केल्या. किनाऱ्याकडे पोंचल्यावर एक जंगी हॉलसारखी इमारत आम्हीं पाहिली. हॉलच्या दोन बाजूंना लहान-लहान दुकानें असून मध्यभागीं बसण्यासाठीं खुर्च्या मांडलेल्या होत्या. येथून पुढें गेल्यावर एक खाण्यापिण्याचें दुकान पाहिलें. त्याची गच्ची समुद्रावर बांधलेली असल्यामुळें, तिच्यावरून समुद्र व त्याचा किनारा यांचा देखावा नीट दिसत होता. येथें बसून आम्हीं कॉफी घेतली व केक्स खाल्या. नंतर किनाऱ्याच्या बाजूनें फिरून एका पाठीमागें एक असलेल्या अशा खोल्यांच्या ओळींच्या ओळी आम्हीं पाहिल्या. या लहान खोल्यांचा उपयोग कपडे वगैरे बदलण्यासाठीं करावयाचा. आंत थोडें जुजबी फर्निचर असून, त्याच्या बाहेरच्या बाजूंवर रंगीत पट्टे रंगवून शोभा आणली होती. येथें आणखी

खाद्यपेयांचीं दुकानें होतीं. सर्व पाहून झाल्यावर व्हेनिसला परत जाणाऱ्या बोटींत बसण्याकरितां जावयाचें तें आम्ही आलों त्याच सरळ व अगदीं जवळच्या रस्त्यानें न जातां, जरा लांबच्या रस्त्यानें जाण्याचें आम्हीं ठरविलें. हेतु हा कीं कसेंही झालें तरी या लहानशा बेटांत आम्ही दुसऱ्या वाटेनें जाऊनपुद्धां लौकरच बोटी निघण्याच्या ठिकाणीं जाऊन पोंचूं; पण ही आमची मोठी चूक झाली असें आम्हांला लौकरच समजून आलें; कारण रस्ता चुकल्यामुळें आम्हांला मैलांचे मैल चालावें लागलें, व इटॅलिअन भाषा येत नसल्यामुळें रस्त्यावरच्या लोकांना परत जाण्याचा रस्ता खुणांनीं विचारावा लागला; शेवटीं एका सायकलवाल्या माणसाच्या मदतीनें त्याच्या पाठीमागें पाठीमागें जाऊन एकदांचे आम्ही बोटी निघण्याच्या ठिकाणीं पोंचलों. मात्र या लांबच्या रस्त्यावरून येतांना कांहीं मोठीं होटेलें, छान इमारती व उत्तम चटकदार रंगांच्या फुलांनीं सुशोभित असे सुंदर बगिचे आमच्या नजरेस पडले. एका जागीं निरनिराळ्या रंगांच्या 'ट्युलिप'च्या फुलांच्या रांगांच्या रांगा मला दिसल्या. या भागांतील रस्तेपुद्धां स्वच्छ व छान होते, आणि दोन्ही बाजूंना छान झाडांच्या रांगा होत्या. मात्र या आमच्या चुकीमुळें आम्ही व्हेनिसला परत आलों तेव्हां बराच उशीर झाला होता.

## तारीख १ मे

एक मार्गदर्शक बरोबर घेऊन आम्ही पुनः एकदां 'सेंट मार्क'चें देऊळ पाहण्यास गेलों, आणि तीं रंगीत कांचीचे तुकडे एकाला एक जोडून तयार केलेलीं सुंदर, जुनीं मोठमोठीं चित्रें पाहिलीं. त्या चित्रांत असलेले सोनेरी रंगाचे तुकडे खऱ्या सोन्यासारखे लखाकत होते. हें देऊळ व त्यांतलीं तीं तुकड्यांचीं जंगी चित्रें शेंकडों वर्षांपूर्वींचीं जुनीं आहेत. देवळांतील मुख्य व्यासपिठाखालीं 'सेंट मार्क'चें थडगें आहे व व्यासपिठावर नक्षीकाम केलेला लखलखणारा, खऱ्या सोन्याचा पत्रा बसवलेला आहे. देवळाची बाहेरची बाजूसुद्धां पुतळे व कांचीच्या तुकड्यांच्या चित्रांनीं सुशोभित केलेली आहे.

नंतर आम्ही विजेच्या 'लिफ्ट''मध्यें बसून Campanile नांवाच्या उंच घंटेच्या टॉवरमध्यें गेलों. व्हेनिस शहर हें अनेक लहान लहान बेटांचें बनलेलें शहर आहे. या शहराचा सबंध चांगला देखावा आम्हांला या घंटेच्या टॉवरमधून दिसला. या घंटागृहांतील डाकेंतच इंग्लंडमध्यें असलेल्या बनीला एक पोस्टकार्ड लिहून आम्हीं टाकलें.

दुपारच्या जेवणानंतर आम्ही 'रिआल्टो ब्रिज' हा त्याच्या दोन्ही बाजूंवर लहान लहान दुकानें असलेला प्रसिद्ध पूल पाहावयास गेलों, आणि नंतर आम्ही 'होटेल मार्कोनी'मध्यें गेलों. बऱ्याच महिन्यांपूर्वी जेव्हां आम्हीं युरप खंडांत पहिल्यानें पाय ठेवला त्यावेळीं याच होटेलांत आम्ही उतरलों होतों; त्यामुळें तेथल्या व्यवस्था पाहणाऱ्या मंडळीनें आमचें चांगलें स्वागत करून आम्हांला चहाही दिला.

संध्याकाळच्या जेवणानंतर आम्ही थोडेंसें फिरवयास गेलों आणि 'लागूना'च्या बाजूच्या फरसबंदी गच्चीवरून समुद्रांतील 'गॅंडोलाज' ( एक तऱ्हेच्या होड्या ) वर गायनवादन चाललें होतें तें ऐकत राहिलों. युरप खंडांतील या आमच्या अगदीं शेवटच्या रात्रीं आणि याच गच्चीवरून मीं कधीं न विसरण्य'सारखा असा देखावा पाहिला. निरभ्र निळया आकाशांत जवळजवळ पौर्णिमेचा चंद्र, व पाठीमागच्या बाजूला त्या काळया दिसणाऱ्या St. Georgio आणि Santa Maria de la Salute या दोन देवळांच्या आकृत्या व अशाच दुसऱ्या इमारतींच्या आकृत्या; असा हा देखावा अत्यंत मनोहर होता. मधूनच एखादी 'गॅंडोला' बाजूनें निघून जाई, तेव्हां या देखाव्यांत आणखी एका रम्य काळया आकृतीची भर पडे. दूर असलेल्या दिव्यांनीं प्रकाशित अशा कांहीं 'गॅंडोलाज'वरून ऐकूं येत असलेलें छान गायन आणि त्याला साथ करणारें व त्याहूनही अधिक सुंदर असें वादन मनाला आल्हाद देत होतें; आणि आमच्या एका बाजूला तेजस्वी दिव्यांची रांग होती. आमच्यासारखीच इतर कांहीं मंडळीही बाहेर उभी राहून हें गायनवादन ऐकत होती.

अशा तऱ्हेनें आमच्या युरप खंडाला दिलेल्या पहिल्या भेटीचा शेवट

झाला. निरनिराळ्या राष्ट्रांतील लोक व त्यांच्या चालीरीती यांचा अभ्यास करण्याच्या हेतूनें जरी आम्हीं हा प्रवास केला नव्हता, तरी या प्रवासांत अनेक लहानसहान गोष्टी माझ्या नजरेंतून गेल्या. उदाहरणार्थ, निरनिराळ्या देशांतील सृष्टिशोभा पाहून मी तिचा पूर्ण आस्वाद घेतला. इंग्लंड देशांतील नुसत्या उकडलेल्या भाज्यांपेक्षां युरप खंडांतील दुसऱ्या देशांतील भाज्या शिजविण्याच्या तऱ्हा आमच्यासारख्या हिंदुस्थानी मंडळीच्या रूचीशीं जास्त जमतात हें माझ्या नजरेला आलें. फ्रान्स देशांतील खालच्या वर्गांतील लोक इतके स्वाभिमानशून्य आढळले कीं ते विशेष कांहीं कारणाशिवायसुद्धां बक्षिसासाठीं हात पसरीत असत. इटॅलिअन वस्तु विकणारे लोक आपल्या मालाला गिऱ्हाईक मिळावें म्हणून माल विकत घेणाऱ्याच्या कसे गळीं पडतात हें पाहिलें. इंग्लंडमधील दुकानांच्या मोठमोठ्या कांचीच्या खिडक्यांतली विक्रीच्या वस्तूंची आकर्षक मांडणी मला फार आवडली. दुकानाबाहेरील फरसबंदी पायवाटांवरून चालत असतांना या खिडक्यांतील वस्तूंनीं मन सहज ओढलें जाऊन दुकानांत जाऊन वस्तु खरेदी करण्याचा गिऱ्हाइकाला सहजच मोह होतो.

## तारीख २ मे

मुंबईला जाणाऱ्या 'गांजे' ( Gange ) नांवाच्या इटॅलिअन बोटीवर आम्ही चढलों. बोटीवर आमच्यासारखीच आणखी कांहीं हिंदुस्थानी मंडळी होती. त्यांत एक पारशी व्यापारी गृहस्थ होते. आमच्याकडे लंडनमधील 'ओल्ड क्युरिऑसिटी शॉप 'मध्यें आम्हांला भेटलेला तो अमेरिकन, ज्या पारशी गृहस्थांची व आपली मैत्री आहे म्हणून आम्हांला सांगत होता. ते पारशी गृहस्थही या बोटीवर होते. या गृहस्थांकडे झालेल्या भाषणावरून आम्हांला कळून चुकलें कीं तो अमेरिकन बहुतकरून एक लफंगा असावा. त्यानें आम्हांला व त्यांना आपलें नांव निरनिराळें सांगितलें होतें; आणि आम्हांला असें आढळून आलें कीं जी कांहीं माहिती या पारशी गृहस्थांकडून त्यानें मिळविली होती तिचा उपयोग त्यानें आमच्याकडे बोलतांना केला

होता. तो मनुष्य म्हणे सारखा यांच्या पाळतीवर राहिलेला होता ! परदेशांत प्रवास करतांना काळजी घ्यावी तेवढी थोडीच एवढें मात्र खरें !

थोड्याच दिवसांत आम्ही आनंदित मनानें परत हिंदुस्थानांत येऊन पोंचलों, व आमचें सर्व कुटुंब आणि काली कुत्रीसुद्धां आम्हांला घेण्यास बोटीच्या धक्क्यावर आली होती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ८५५११ वि: ९१:८।।।१५
क्रमांक ८३४ नों: दि: १८।३।८१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ७७१८
स्थळ प्रत

# महत्त्वाचें शुद्धिपत्र

| पृ. | ओ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १७ | ११ | शिलॉन् | शियाँ |
| १८ | १६ | आहेत... | आहेत त्यांवरून चढून जावें लागतें. डोंगरांवर रानेंच्या रानें असून... |
| २१ | २१ | उंचावरची | उंचावर जी |
| २७ | ५ | त्या व्यक्तीप्रमाणें | त्या खऱ्या व्यक्तीप्रमाणें |
| ५६ | १३ | किलार्नोंचीं | किलार्नीचीं |
| ,, | १९ | Muerors | Mucross |
| ५९ | ३ | Slangollen | Llangollen |
| (आणि पुढें ठिकठिकाणीं) | | | |
| ५९ | १३ | चित्रें आहेत. आंत तयार केलेल्या अशा कांचीच्या | चित्रें कांचेच्या आंत तयार केलेल्या अशा कांचेच्या... |
| | | (पुस्तकांत सर्वत्र 'कांचीच्या' ऐवजीं 'कांचेच्या' वाचावें) | |
| ६१ | २४ | Milles Alexandes | Misses Alexander |
| ६२ | १८ | हार्ष | हार्प |
| ९१ | ६ | डोकावयास | डोकावावयास |
| ९२ | १० | Hieroglyphies | Hieroglyphics |
| १०९ | ६ | ॲस्टबेस्टॉस | ॲस्बेस्टॉस |
| १३१ | १८ | "हॅम्टन कोर्ट"ल | "हॅम्टन कोर्ट" ला |
| १३७ | ५ | ३१ जानेवारी | ११ जानेवारी. |
| १३७ | १० | 'त्या रात्रीं येथपासून' निराळा पॅरा | |